15-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

ABG/ 11:00

15-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

ABG/ MHM/ SBT/ 11:00

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी. व मु.शी. : तोंडी उत्तरे.**

**सभापती** : आता सर्वप्रथम दिनांक 8 एप्रिल,2005 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.2015 घेण्यात येईल.

**( तारांकित प्रश्न क्रमांक- 2015 )**

**महाराष्ट्र राज्य सुर□ार□□ मंडळातील भरतीत**
**ला□ो रुपयांचा झालेला □ैरव्यवहार**

**(5) * 2015 श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. □ाति□द्दी□□ातिब , श्री. मुझफ्फर हुसे□ सय्यद , श्री. सुधा□र □□□□, प्रा. जो□द्र □ावाडे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. राजेंद्र जै□, डॉ. वसंत पवार , श्री. वसंतराव चव्हा□ :** स□मा□□य □म□ार मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □य :-

(1) महाराष्ट्र राज्य सुर□ार□□ मंडळा□र□□च्या भरतीत मंडळाच्या अधि□ऱ्यां□ ला□ो रुपयांचा □ैरप्र□ार □ल्याचे माहे डिसेंबर, 2004,जा□ेवारी, 2005 या □ालावधीत अथवा त्यादरम्या□ आढळू□ आले आहे हे □रे आहे □य,

(2) असल्यास, शास□□या प्र□र□ची चौ□शी □ली आहे □य,

(3) असल्यास, चौ□शीत □य आढळू□ आले व त्या□ुसार सदरहू अधि□ऱ्यांवर □□ती □रवाई □ली वा □र□यात येत आहे,

(4) अद्याप, □□तीच □रवाई □ली □सल्यास, विलंबाची □र□□ □य आहेत ?

**श्री.□□श □ाई□**: 1),2),3) व 4) नाही.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयाकरिता येथील सुरक्षा रक्षकांची भरती ही दिनांक 9 मे 2002 रोजीच्या शासन निर्णयाव्दारे करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये अर्ज करतांना उमेदवाराने सेवा योजन कार्यायलयाच्या वैध नोंदणी कार्डाच्या छायांकित प्रतीसह अर्ज करावा असे नमूद केले आहे.

त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्र.11646/11724/1196 या प्रकरणी दिनांक 22 ऑगस्ट,1996 रोजी रिक्त पदे भरण्याबाबतच्या कार्यपध्दती संबंधी सूचना दिल्याप्रमाणे दि.19 नोव्हेंबर,2003 रोजी परिपत्रक काढले असून सदर परिपत्रकानुसार यापुढे सुरक्षा रक्षकांची भरती करण्याबाबत दक्षता घेण्यात येईल.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने थोडी सुधारणा करु इच्छितो. हा प्रश्न विचारणा-या सदस्यांच्या नावामध्ये "मे.सुधीर सावंत " असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्या ऐवजी "मेजर सुधीर सावंत " असे वाचावे. तदनंतर उत्तरामध्ये "कार्यायलयाच्या" असा उल्लेख इ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ालेला आहे. त्या ऐवजी " कार्यालयाच्या" असे वाचावे. उर्वरित उत्तर वितरीत केल्याप्रमाणे.

2....



ता.प्र.क्र.2015...

श्री.संजय दत्त : शासनाने खाजगी सुरक्षा रक्षकांच्या ठेकेदारांना या कायद्यातून सूट दिलेली आहे. सदर खाजगी ठेकेदार त्या सुरक्षा रक्षकांना पगार तसेच इतर सेवाशर्ती पूर्णपणे देतात काय यासंबंधी कामगार खाते किंवा कामगार आयुक्त यांनी तपासणी केली आहे काय ? तसेच या सुरक्षा रक्षकांची पोलीस पडताळणी केली आहे काय ? केली नसल्यास, त्यांना कायद्यातून दिलेली सूट रद्द करण्यात येईल काय ? ही सूट किती दिवसात रद्द करण्यात येईल ?

श्री. गणेश नाईक : या विषयावर मी वेळोवेळी स्पष्ट सांगितले आहे की, खाजगी सुरक्षा रक्षक संघटना आहेत, त्यांच्याकडून कामगारांना किमान वेतन, किमान सवलती दिल्या जात नसतील तर त्या संदर्भात आमच्याकडे तक्रार करा. कामगार खात्याकडून अंमजबजावणी झाली नाही तर निश्चितपणे कामगार खात्यातील अंमलबजावणी न करणा-या अधिका-यावर कारवाई केली जाईल आणि त्या सुरक्षा रक्षकांना न्याय दिला जाईल. सुरक्षा रक्षकांच्या कॅरेक्टर विषयी पोलीसांकडून पडताळणी केली गेली आहे काय असा सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे.सभापती महोदय त्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी आपला हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी द्यावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. तदनंतर आपण आपला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावा. सन्माननीय मंत्री श्री.गणेश नाईक यांनी आपले उत्तर पूर्ण करावे.

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2015 पुढे सुरु ...

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, याठिकाणी ज्यावेळी शासनाच्या असे निदर्शनास आले की परराज्यातील लोक चुकीच्या पध्दतीने शस्त्र परवाने घेऊन या राज्यात नोंदणी करण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यावेळी या गोष्टीची शहानिशा करण्यास शासनाने सुरुवात केलेली आहे आणि यामध्ये जर गुन्हेगार लोक असतील तर अशा लोकांना हुडकून त्यांना सेवेतून दूर करण्याचा शासन निश्चितपणाने प्रयत्न करील.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, मुळात हा प्रश्न याठिकाणी सेवायोजन कार्यालयाकडून यादी का मागविण्यात आली नाही या मुद्यावर अडला होता आणि म्हणून राखून ठेवण्यात आला होता. सेवायोजन कार्यालयाकडून नांवे का मागविण्यात आली नाही याबाबत अधिका-यांनी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा हवाला दिला होता. त्या निर्णयाप्रमाणे नांवे मागविली नाहीत असे सांगितले होते. याबाबतच माझी हरकत आहे. सुप्रीम कोर्टाची जजमेंट आहे. त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या कामगार विभागाने देखील जीआर काढला आहे. सुप्रीम कोर्टाने मॅंडेटरी केलेले आहे आणि असे म्हटले आहे की. "It should be mandatory for the requisitioning authority/establishment to intimate the employment exchange and employment exchange should sponsor the names of the candidates to the requisitioning department for selection strictly according to seniority and reservation, as per requisition. In addition, the appropriate Department or undertaking or establishment having wider circulation and also display on their office notice boards or announce on radio, television and employment ;news bulletins and then consider the cases of all the candidates who have applied.

सुप्रीम कोर्टाची जजमेंट आल्यानंतर सरकारची विचित्र अवस्था झाली आणि सेवायोजन कार्यालयाकडून अर्ज मागविल्यानंतर लाखो अर्ज आले. त्यानंतर खुलासा मागितला. कामगार विभागाने खुलासा केला त्यामध्ये असे म्हटले आहे की, Accordingly, it is clarified that in addition to notifying the vacancies for the relevant categories (excluding those filled through the Union Public Service Commission/Staff Selection



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Commission) to the Employment Exchange the requisitioning authority/establishments may, keeping in view administrative/budgetary convenience, arrange for the publication of the recruitment notice for such categories in the "Employment News" published by the publication Division of the Ministry of Information and Broadcasting, Government of India and then consider the cases of all the candidates who have applied."

यानंतर श्री. गायकवाड ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2015 श्री.दिवाकर रावते ...

सभापती महोदय, जर 100 जागा असतील तर त्यासाठी लाखो अर्ज येत असतात आणि त्या अर्जाची स्क्रुटिनी करावी लागते , नंतर त्या उमेदवारांची परीक्षा घ्यावी लागते. आता हे मॅन्डेटरी केलेले आहे की, वर्तमानपत्रात जाहिरात देत असतांना अशी अट घातली असेल की, 50 टक्के मार्क्स असलेल्या उमेदवारांनी अर्ज करावेत.तर या बाबतीत आता अडचण व्हावयास लागली आहे त्यानंतर याबाबतीत त्यांनी असे सांगितले आहे की, 80 टक्के मार्क्स असलेल्या उमेदवारांना आम्ही बोलवतो. कोर्टाने असे सांगितले आहे की, तुम्ही अट घातल्याप्रमाणे सर्वांना परीक्षेला बसण्याची संधी दिली पाहिजे. त्या संदर्भात केन्द्र सरकारने असे क्लॅरिफिकेशन दिलेले आहे की,ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲन्ड बजेटरी या प्रोव्हीजनचा आधार घेऊन सेवा योजन कार्यालयामार्फत सुध्दा नोकर भरती करता येते. तेव्हा ॲडमिनिस्ट्रेटरव्ह ॲन्ड बजेटरी हे दोन शब्द वापरल्यानंतर .फक्त सेवा योजन कार्यालयाकडून यादी मागविता येते. दोन तीन दिवसाची पूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी अत्यंत महत्वाचे उद्‌गार काढले होते. त्यांनी असे म्हटले होते की, राज्यात मराठी अधिकारी कमी झालेले आहेत. या ठिकाणी जे बिगर मराठी अधिकारी आहेत त्यांनी या निर्णयाचा वेगळा अर्थ लावून या जाहिराती द्यावयास लावल्या आहेत. गुजराथ, तामिळनाडू,आंध्र प्रदेश येथे जी काही भरती करण्यात येत असते. ती सेवा योजन कार्यालयाकडून उमेदवारांची यादी मागवून नंतर भरती केली जाते.जेव्हा त्यांना याबाबतीत विचारले जाते तेव्हा ते ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲन्ड बजेटरी या प्रोव्हीजनसबंधीचा खुलासा देत असतात. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचा व केन्द्र सरकारने केलेल्या डेफिनेशनचा आधार घेऊन त्या ठिकाणी माणसे भरली जातात त्या ठिकाणी जाहिराती देण्याचा प्रश्न येत नाही व इतर राज्यातील माणसे त्या राज्यात लागू शकत नाहीत.सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी ॲकडमिक चर्चा मागितली होती. याचे कारण असे की प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मला जास्त सविस्तर बोलता येणार नाही .ज्या काही घटनात्मक तरतुदी आहेत त्याबद्दल मला सविस्तर बोलावयाचे होते. या संदर्भात आपल्या राज्याला अधिकार आहेत. मी जेव्हा या विभागाचा मंत्री होतो तेव्हा मला यासंबंधीचा कायदा करावयाचा होता परंतु तो कायदा करण्याचे राहून गेलेले आहे.,मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर पब्लिक ग्रीव्हन्सेस ॲन्ड पेन्शन श्रीमती वसुंधरा राजे - शिंदे यानी खासदार श्री.मोहन रावले यांना एक पत्र पाठविले होते आणि त्या पत्रात त्यांनी असे म्हटले होते की. " As informed earlier, the object of this Act is not to restric but to enlarge the filed."



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

म्हणजे तुम्ही एम्प्लायमेन्ट एक्सचेंजमधून उमेदवाराची यादी बोलावली असली तरी त्यांना घ्यावे परंतु इतरांनासुध्दा संधी दिली पाहिजे. असा त्याचा अर्थ आहे.परंतु त्या दिवशी उत्तर देत असतांना असे सांगण्यात आले होते की, एम्प्लायमेन्ट एक्सचेंजकडून यादी मागवली नाही. सन्माननीय मंत्रीमहोदय सुध्दा याच मुशीमधून आलेले आहेत आणि त्यांचीसुध्दा अशीच धारणा आहे की, येथील लोकांना नोक-या मिळाल्या पाहिजेत. सरकारची आता जी धारणा झालेली आहे. ती धारणा जर अंमलात येणार असेल तर त्याचे स्वागत करावे असे मला वाटते.जर कोणी बिगर महाराष्ट्रीयन आला तर त्यांच्या पाटयासुध्दा मराठीतून नसतात ही खंत माननीय मुख्यमंत्र्यांना या राज्यात व्यक्त करावी लागते. ही दुर्देवाची गोष्ट आहे.तेव्हा त्या अधिका-यांचा दबाव आला तर पुन्हा यामध्ये बदल होईल म्हणून सेवा योजन कार्यालय आणि ॲडमिनिस्ट्रेटीव्ह, बजेटरी प्रोव्हीजनसंबंधीची कनसेप्ट घेऊन इतर राज्यातील लोकांची भरती जर हे लोक करीत असतील तर तीच कनसेप्ट आपण का स्वीकारत नाही. ? हा माझा त्या दिवशी प्रश्न विचारण्या मागचा मुख्य उद्देश होता.तेव्हा याबाबत आता माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, भूमिपुत्रांना न्याय मिळाला पाहिजे अशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते याची भावना आहे त्या भावनेच्या विरोधी कोणी असेल असे मला वाटत नाही. सेवा योजन कार्यालयाकडून उमेदवारांची यादी मागवली नव्हती आणि ती यादी दुरुस्त करण्यात आली होती म्हणून हा प्रश्न त्या दिवशी राखून ठेवण्यात आला होता. सुरक्षा रक्षकांची भरती करण्यासंबंधीचे आदेश दिनांक 5.9.2002 रोजी देण्यात आले होते. या ठिकाणी माननीय सदस्यांनी सुप्रीम कोर्टाच्या एका निर्णयाचा उल्लेख केला आहे. ही पदे भरण्यासंबंधीची जाहिरात दिनांक 19.11.2003 रोजी देण्यात आली होती आणि सुप्रीम कोर्टाने त्यानंतर आदेश दिला होता. तरी सुध्दा जी काही भरती झालेली आहे त्यानंतर भरती होणारच नाही असे नाही. सुरक्षा रक्षक मंडळाच्या भरतीच्या बाबतीत यापुढे गंभीरपणाने आणि नीटसपणाने विचार केला जाणार आहे. त्या तालुक्यातील किंवा त्या जिल्हयातील उमेदवारांना जास्तीत जास्त नोकरीची संधी कशी मिळेल हे पाहिले जाणार आहे. भूमिपुत्रांना न्याय नाकारला जाणार नाही आणि जगलरी करुन जर अन्य घटक कोणाच्या हक्कांवर बाधा आणत असतील तर त्याकडेसुध्दा लक्ष दिले जाईल. प्रकल्पग्रस्तांना ,भूमिपुत्रांना न्याय देण्याच्या अनुषंगाने सरकार बांधील आहे.

नंतर श्री.सुंबरे

S

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2015 ...

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, आपण यातून भूमिपुत्रांना न्याय देणार आहात हे ठीक आहे. पण हे आपल्याला पुन्हा अडविणार आहेत. शिवाय घटनेच्या आर्टिकल 16 नुसार "equality of opportunity in the matter of public employment." हे जे सेक्शन आहे ते आपल्या तसे विरोधात आहे. तेव्हा याबाबतची जी कंकरट लिस्ट आहे ती अशी आहे की, राज्याला आपल्या हिताचे धोरण वा निर्णय घेऊन त्याप्रमाणत अमल करण्याचा पूर्ण अधिकार आहे. "Social security and social insurance; employment and unemployment" म्हणजे कंकरंट लिस्टनुसार आपल्याला हे अधिकार दिलेले आहेत. तेव्हा काहीही असले तरी आम्ही आमच्याकडील कोणतीही कर्मचारी भरती करावयाची झाल्यास ती आमच्या एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज मार्फतच करू असा निर्णय घेऊन त्यानुसार नियम केले पाहिजेत. अन्यथा मध्यंतरी ज्याप्रमाणे मेडिकल्सच्या जागांबाबतचा प्रश्न निर्माण झाला त्याप्रमाणे याही बाबतीत होईल. म्हणून आपण आपल्या अधिकारांचा वापर करून धोरणात्मक भूमिका या दृष्टीने आम्ही परवाच्या दिवशी हा प्रश्न राखून ठेवण्याची विनंती केली होती. तरी आता आपण तशी भूमिका घेणार आहात का ?

श्री. गणेश नाईक : अध्यक्ष महाराज, एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजची यादी ही पहिल्यांदा मान्य केली जाईल याबद्दल वादच नाही. पण मी त्याही पलिकडे जाऊन सांगतो की, प्रथम तालुका पातळीवर, तेथे उपलब्ध नसेल तर जिल्हा पातळीवर आणि तेथे उपलब्ध नसेल तर विभाग पातळीवर आणि तेथेही उपलब्ध नसेल तर राज्य स्तरावर मिळविण्याच्या दृष्टीने नियम कसे होतील यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.

****

...... डी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील मोरारजी मिल्स जाजेचा विज ास**

**(1) * 1734 श्री. विलास अवचट, श्री. अ□िल परब, श्री. अरविंद सावंत, श्री. अ□िल तरे, श्री. दिवाज र रावते, डॉ. नीलम जोन्हे** : स-मा-नीय □ाम□ार मंत्री पुढील □ष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-
(1) जायद्यांचे उल्लंघ-ा जरु-ा लालबाजच्या मोरारजी जिरजीच्या व्यवस्थाप-ा-ने जाजेचा विज ास जरीत असल्याबाबतच्या तज्ारी शास-ााज डे आल्या आहेत हे जरे आहे जाय,
(2) असल्यास, सदर जिरजीतील पाच हजार जामजारां-ाा सक्ती-ने सेवा-िवृत्त जरु-ा आता तेथे फक्त 21 जामजार शिल्लज आहेत हे जरे जाय,
(3) असल्यास सदर 21 जामजारां-ाा जोजतेही जाम देज्यात येत -ासू-ा त्यां-ाा पजारही वेळेवर देज्यात येत -ाही हे जरे आहे जाय,
(4) असल्यास, जिरज्यांच्या पु-ार्विजासासंबधी -ियमा-ुसार शिल्लज जामजारां-ाा पर्यायी रोजजार द्यावा अशी तरतूद असतां-ाा व बी.आय.एफ.आर.च्या तत्वा-ुसार भूजंडाचे आरजज -ासता-ाही सदर जिरजीच्या जाजेचा वापर व्यावसायिज विजासासाठी सुरु आहे हे जरे जाय,
(5) असल्यास, उक्त प्रजरजी चौजशी जेली आहे जाय, असल्यास चौजशीचे -िष्जर्ष जाय आहेत व त्या-ुसार पुढे जोजती जार्यवाही जेली वा जरज्यात येत आहे ?

**श्री.बाबा सिद्दीकी, श्री. ज्जेश -ााईज यांचेकरिता** : (1) बृह-मुंबई विजास नियंत्रज -ियमावलीतील -ियम 58 अंतर्जत दिलेल्या परवा-ाजीच्या संदर्भात एज तज्ार प्राप्त झाली आहे.
(2) स-ा 2002 मध्ये झालेल्या स्वेच्छा-िवृत्तीच्या जरारा-ंतर 21 जामजार शिल्लज राहीले होते, त्यापैजी दो-ा जामजारां-ाा पर्यायी जाम देज्यात आले असू-ा एजा जामजाराला चोरीच्या आरोपाजाली चौजशी जरु-ा बडतर्फ जरज्यात आले. सध्या 18 जामजार जामावर असू-ा स्वेच्छा-िवृत्ती घेतलेल्या 3287 जामजारां-ाा त्यांची सर्व देय देजी देज्यात आलेली आहे. स-ा 2002 मध्ये झालेल्या स्वेच्छा-िवृत्तीच्या जरारा-ंतर मिल व्यवस्थाप-ा-ने मिलचे उत्पाद-ा बंद जेले असू-ा सध्या जामावर असलेल्या 18 जामजारां-ाा जामाशिवाय दर महि-याला वेत-ा देज्यात येत आहे. मिल व्यवस्थाप-ा-ने 18 शिल्लज जामजारांपैजी 3 जामजारां-ाा -ााजपूर येथील सिस्टर ज-सर्-ा असलेल्या मिलमध्ये पर्यायी जाम देवू जेले आहे. उर्वरित 15 जामजारां-ाा मुंबई, ठाजे व -ावी मुंबई या ठिजाजी जंप-ीच्या बांधजाम विभाजात लिफटम-ा, वॉचम-ा व माळी या जामाजरिता पर्यायी रोजजार देऊ जेला आहे. तथापि सदर पर्याय जामजारां-ाी अद्याप क्स्वजारलेला -ाही.
प्रश्-ा भाज (4) व (5) प्रश्-ा उद्‌भवत -ाही.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, हे संपूर्ण अधिवेशन मिल्स, मिल्स मालक, गिरणी कामगार यासाठी गाजत असताना या विषयी येथे चर्चाही खूप झाली आहे आणि आता या ठिकाणी पुन्हा मोरारजी मिल्सच्या जागेचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. या ठिकाणी लेखी उत्तरात असे सांगितले आहे की, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील नियम 58 अंतर्गत दिलेल्या परवानगीच्या संदर्भात एक तक्रार प्राप्त झाली आहे. सभापती महोदय, हा सुधारित नियम 58 असे

..... डी 3 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 1734 ...

म्हणतो त्याप्रमाणे मालकाला दिलेल्या जागेमध्ये विकास करीत असताना नियमितपणे, अधिकृतपणे महापालिकेची परवानगी घेऊनच विकास केलेला आहे काय ? आणि आपल्याकडे आलेल्या तक्रारीचे स्वरूप काय आहे आणि ही तक्रार केव्हा आली आणि त्याबाबत आपण काय कारवाई केली ? दुसरा प्रश्न म्हणजे संपूर्ण मुंबईमध्ये ज्या गिरण्यांच्या जमिनी आहेत त्या जमिनी महापालिकेने नाममात्र भावाने सदर गिरणी मालकांना दिलेली होती आणि त्यावेळी त्यांचेबरोबर महापालिकेने करार केला होता. त्यामध्ये अट अशी आहे की, ज्या उद्दिष्टासाठी ही जमीन त्यांना दिलेली आहे, ज्या उद्योगधंद्यासाठी म्हणून ही जमीन त्यांना दिलेली आहे ते उद्दिष्ट बाजूला करून, तो उद्योग बंद केल्यानंतर मालकाने ती जमीन महापालिकेला परत करण्याची गरज आहे. तर असे बंधन सदर गिरणी मालकांवर घातले आहे काय ? नसेल तर तसे बंधन आपण घालणार आहात का ?

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री अवचट जी ने जो प्रश्न पूछा है, उसके बारे में उत्तर यह है कि विकास नियंत्रण नियम 58(6)(बी) के तहत जो प्रावधान है, उसके अन्तर्गत दिनांक 1.4.2003 को परवानगी दी गई है. इस सेक्शन के तहत स्पष्ट लिखा है कि,"Multi-mills aggregation of the built-up areas of existing structures whether an integrated scheme for demolition and re-construction of the existing structures of more than one mills, whether under common onwership or otherwise, is duly submitted, provided that FSI is in balance in the receiving mills land."

दूसरी बात यह है कि दक्षिण कांग्रेस कमेटी के एक सदस्य ने एक प्रश्न उपस्थित किया था कि यह म्हाडा की जो जमीन है, वह कांदीवली में क्यों दी गई है ? तो इसका भी उत्तर यही है कि वह उपरोक्त नियम यानी विकास नियंत्रण नियम 58 (6) के तहत ही दी गई है.

यानंतर श्री जागडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MHM/ SBT/ ता.प्र.क्र. 1734 11:20

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, ज्या कामासाठी ही जमीन नाममात्र भाड्याने गिरणी मालकाला दिलेली आहे. ती उद्दीष्ठ जर या गिरणी मालकाकडून पूर्ण होणार नसेल ही जमीन पुन्हा मुंबई महानगरपालिकेला मिळाली पाहिजे. तेव्हा त्या बाबत आपण कोणती कारवाई करणार आहांत ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, 33 टक्के म्हणजे 4479.37 चौ. मीटर जमीन दिलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे सांगितले आहे की, उर्वरित 15 कामगारांना पर्यायी रोजगार देऊ केला आहे. या मागचे कारण काय आहे ? कशा प्रकारे या कामगारांना शासन रोजगार उपलब्ध करुन देणार आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मिल मालिक ने 15 कामगारों को नई मुंबई में काम दिया गया था लेकिन उन्होंने स्वीकार नहीं किया है, इसलिए उनको आज तक वेतन दिया जा रहा है.

डॉ. दीपक सावंत :उसका कारण क्या है ?

श्री बाबा सिद्दीकी : कारण यह है कि कामगार वहां जाना नहीं चाहते. अब क्यों नहीं जाना चाहते, इसका उन्होंने स्पष्ट कारण नहीं बताया है. लेकिन मिल मालिक व्ही.आर.एस. देने के लिए तैयार है.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, तीन कामगारांना नागपूर येथे पाठविण्यात आले आहे. मुंबईत कायम वास्तव्य असलेल्या कामगारांना नागपूर येथे पाठवून त्यांच्यावर अन्याय केला आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांना वाटत नाही काय? या कामगारांना नागपूर येथे पाठविल्यानंतर त्याची राहण्याची व्यवस्था सदरहू गिरणी मालक करणार आहे काय ? आरएमएमएस व इतर सर्व कामगार संघटनांनी या मिलला आग लावण्यात आली आहे, असे सांगितले आहे. तेव्हा या बाबतची जी चौकशी करण्यात आली आहे, त्यामध्ये काय आढळून आले आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, दो कामगारों को पर्यायी नौकरी दी गई है और उन्होंने खुद स्वीकार की है.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नागपूर येथे या तीन कामगारांना पाठविण्यात आले आहे. त्यांच्यावर अन्याय झाला आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांना वाटत नाही काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, दो कामगारों ने खुद ही नौकरी स्वीकार की है. मिल मालिक नई मुंबई में भी नौकरी देने के लिए तैयार हे. नई मुंबई में कंपनी के कंसट्रक्शन डिपार्टमेंट में पर्यायी रोजगार देने के लिए कंपनी तैयार है.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरात सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, तीन कामगारांना नागपूर येथे पर्यायी काम देऊ केले आहे, असे म्हटले आहे.

श्री. मधुकर चव्हाण : या ठिकाणी आग लागण्याचे कारण काय आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, आग के कारण की जानकारी अभी मेरे पास नहीं है. त्याची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

( गोंधळ )

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनात....

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांकडे याची माहिती नाही. या बाबतची माहिती माननीय मंत्रिमहोदय सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी पाठविण्याबाबतची कायद्यात तरतूद आहे काय ? मुंबईत कायम स्वरुपी वास्तव्य करणारा मुंबईचा कामगार कायद्यानुसार आपण नागपूर येथे पाठवू शकतो काय ?

श्री. बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, अब मिल मालिक मुंबई में काम देने के लिए तैयार है.

श्री. मधुकर सरपोतदार :आपने जो जवाब दिया था, वह गलत था. इसलिए मैंने यह सवाल पूछा है.

श्री. बाबा सिद्दीकी :कौनसा सवाल पूछा है ? कृपया फिर से पूछिए.

श्री. मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले आहे की, या कामगारांना नागपूरमध्ये काम देण्यात येत होते. परंतु हे कामगार त्या ठिकाणी गेले

....3



ASJ/ MHM/ SBT/ ता.प्र.क्र. 1734 11:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, मुंबईत कायम स्वरुपी वास्तव्य करणारा मुंबईचा कामगार कायद्यानुसार आपण नागपूर येथे पाठवू शकतो काय ? कायद्यामध्ये या बाबतची कोणती तरतूद आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय : कामगारों को नागपुर स्थित सिस्टर कन्सर्न मिल में पर्यायी काम देने के लिए मिल मालिक तैयार है और नई मुंबई में भी उन कामगारों को काम देने के लिए तैयार है.

( यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1734...

श्री. मधुकर सरपोतदार : That is not the question.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, कंपनी ॲक्टच्या एकूणच कायद्यात तरतूद आहे की, एखाद्या व्यवस्थापनाच्या जर चार-पाच शाखा असतील तर भरती करीत असतांना त्यांच्याकडून अंडरटेंकींग लिहून घेतलेले असते की, काही कारणास्तव ही कंपनी बंद पडली व इथे काही काम नसेल तर दुसरीकडे त्यांना जावे लागेल. तशाप्रकारे कामगारांवर ते बंधनकारक आहे अशी मी माहिती देतो.

श्री. मधुकर सरपोतदार : माझे असे म्हणणे आहे की, कंपनी ॲक्ट हा उद्योगासंबंधीचा आहे. एखाद्या कामगाराला दुसऱ्या ठिकाणी आस्थापनेवर पाठवावयाचे असेल तर त्यासाठी कायद्यात तरतूद आहे कां? असा माझा प्रश्न आहे. आपण कंपनी ॲक्टबद्दल बोलत आहात, कंपनी ॲक्टमध्ये तशी तरतूद नाही. त्या कामगाराच्या नेमणुकीच्या पत्रामध्ये जर तसा उल्लेख असेल तर आपली तक्रार नाही. नेमणुकीच्या पत्रामध्ये स्पेसिफिक काय तरतूद होती? व त्यांचे डेसिग्नेशन काय होते?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेबांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, त्या गिरणीमध्ये काम उपलब नसल्यामुळे त्या कामगारांना बाजूच्या शहरामध्ये असलेल्या युनिटमध्ये कामासाठी पाठविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी तो नाकारला. परंतु त्या कामगारांचा पगार चालू आहे. आणि त्या कामगारांना देण्यात आलेल्या नेमणुकी पत्रामध्ये तशी अट आहे. या आस्थापनेमधील एका युनिटमध्ये काम नसेल तर त्याने दुसऱ्या युनिटमध्ये गेले पाहिजे. परंतु ती अट जरी असली तरी त्या कामगारांवर सक्ती केली नाही, त्या कामगारांचा पगार चालू ठेवला आहे. कामगार मंत्रालयाने या बाबतीत सर्व जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडल्या आहेत असे माझे मत आहे.

----

**-ॅश-ाल रेयॉ-ा कंपनी व्यवस्थापनाच्या ४५० एकर जमिनी बाबत**

**(२) * ३९८५ श्री. दिवाकर रावते , श्री. अनंत तरे , डॉ. दिपक सावंत :** स-मा-ा-नीय □ाम□ार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल रेयॉन कंपनी व्यवस्थापनाने कामगार वसाहतीसह पडकी असलेली ४५० एकर जमीन विक्रीला काढली असून, बाजारमुल्यांप्रमाणे तिची किंमत ५०० कोटीहून अधिक आहे हे खरे आहे ज ाय,

(२) सदर जमीन खरेदी करण्यासाठी मुंबईतील उद्योग समूह पुढे सरसावले असून, तेथे टोलेजंग इमारती व बंगले असणारा महाकाय प्रकल्प उभारला गेल्यास कामगार वर्ग बेघर होणार आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. बाबा सिद्दीकी**, **श्री.गणेश नाईक यांच्याकरिता** : (१) हे अंशतः खरे आहे. कंपनीकडे असलेल्या जमीनीपैकी ३२५ एकर क्षेत्र विकण्याचा व्यवस्थापनाचा मनोदय आहे.

(२) हे खरे नाही. तथापि कारखान्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी मोठया प्रमाणावर भांडवल उपलब्ध होणे आवश्यक असल्याने काही प्रमाणात जमिन विकणे व्यवस्थापनास गरजेचे आहे. मात्र अद्याप कोणत्याही उद्योग समुहाबरोबर व्यवस्थापनाने जमिन विक्रीची प्रक्रिया सुरु केलेली नाही किंवा वर्तमानपत्रात देखील जाहिरात दिलेली नाही.

कामगारांची वसाहत असलेली जमिन विकण्याचा व्यवस्थापनाचा मनोदय नाही. तथापि खरेदीदाराने तसा आग्रह धरल्यास निवासी कामगारांची पर्यायी जागेवर राहण्याची व्यवस्था करण्यात येईल असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे.

(३) यासंदर्भात शासनाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत -ाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3985...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व कारखान्यांच्या जमिनी विकून त्यामधील कामगारांना रस्त्यावर आणण्याचे प्रकार सुरु असल्यामुळे त्यासंबंधीचे प्रश्न रोज या सभागृहामध्ये येत आहेत. ही बाब मन व्यथित करणारी आहे. नॅशनल रेयॉन कंपनीने 450 एकर जमीन विक्रीला काढली असून तिची किंमत 500 कोटी रुपये आहे. या प्रश्नाचे उत्तर "अंशत: खरे आहे व 450 पैकी 325 एकर जमीन विक्रीस काढली आहे" असे दिले आहे. तसेच, उत्तरामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "खरेदीदाराने तसा आग्रह धरल्यास निवासी कामगारांची पर्यायी जागेवर राहण्याची व्यवस्था करण्यात येईल असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे" गिरणीच्या जमिनीच्या बाबतीत जो अनुभव आहे, आज तो गिरणीतील कामगार देशोधडीला लागला आहे. त्या संदर्भात सरकारला वारंवार इशारे देऊनसुध्दा सरकार त्यांना संरक्षण देत नाही. कोणत्याही कामगाराला आज पुनर्वसित जागा मिळाली नाही. कोणत्याही गिरणी मालकाने हा विषय गांभीर्याने घेतला नाही. या ठिकाणी उत्तर असे दिले आहे की, "कामगारांची वसाहत असलेली जमीन विकण्याचा व्यवस्थापनाचा मनोदय नाही. तथापि, खरेदीदाराने तसा आग्रह धरल्यास निवासी कामगारांची पर्यायी जागेवर राहण्याची व्यवस्था करण्यात येईल असे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे". उद्या त्याला त्या ठिकाणी रहाण्यासाठी जागा मिळाली नाही तर काय करणार? त्याबाबत आपणास खात्री वाटते कां? त्या कामगाराचे भवितव्य काय आहे?

श्री. गणेश नाईक : ठाणे जिल्हयातील कल्याण तालुक्यामध्ये ही नॅशनल रेयॉन कंपनी आहे. या कंपनीकडे एकूण 425 एकर जमीन आहे त्यापैकी 100 एकर जमिनीवर उद्योग आहे आणि 325 एकर जमीन मोकळी आहे. कामगार वसाहत ही पुढील बाजूस आहे आणि मोकळी जागा पाठीमागच्या बाजूस आहे. माननीय सदस्य श्री. रावते साहेबांच्या मनातील भिती साधार आहे. मागील काही अनुभव पहाता त्यांनी व्यक्त केलेली भिती खरी आहे. मी या ठिकाणी माननीय सदस्यांना आश्वासित करतो की, कोणत्याही परिस्थितीत कामगारांना बुडविले जाणार नाही. अतिरिक्त असलेल्या जमिनीवर विकासकामार्फत त्या ठिकाणी इमारत बांधण्याचा मनोदय आहे. त्या कामगारांची वसाहत जरी बदलली तरी त्यांना आजच्यापेक्षा चांगली दर्जेदार रहाण्यासाठी जागा दिली जाईल. त्या वसाहतीमध्ये खेळाचे मैदान, हॉस्पिटल या पैकी कोणतीही तरतूद कमी न करता सर्व गोष्टी केल्या जातील यासाठी हे कामगार मंत्रालय दक्ष राहील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3985...

श्री. मधुकर सरपोतदार : नॅशनल रेयॉन कंपनीमध्ये गेली 20 वर्षे संघर्ष आहे. त्या ठिकाणी दर सहा महिन्यांनी, वर्षांनी, दोन वर्षांनी टाळेबंदी होते व कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळते. युनियन बदली करण्याचा खूप मोठा धंदा त्याठिकाणी असून त्याला कंपनीचे मालक जबाबदार आहेत. युनियन चालविणारे लोक जबाबदार आहेत असे मला म्हणावयाचे नाही. एका युनियनला वापरुन झाल्यानंतर त्याला काढून दुसऱ्याला वापरावयास द्यायचे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3985 . . . .

श्री.मधुकर सरपातेदार . . . .

हे अजब तंत्र सर्व मालक वर्गाने स्विकारलेले आहे आणि हे एक युनिव्हर्सल ट्रुथ आहे की, कोणत्याही गोष्टीचा वापर करावयाचा आणि नंतर ती फेकून द्यावयाची हे जगातील सर्व मालक वर्गाने स्विकारलेले तंत्र आहे. 325 एकर जागा नॅशनल रेयॉन कंपनीने घेतली होती. पण जर त्यांना गरज नव्हती तर तेथील शेतक-यांच्या जमिनी अतिशय कमी दराने, ज्याची बाजारातील किंमत हजारो-कोटी रुपयांची आहे, अशी जमीन विकत घेऊन एवढी मोठी जागा व्यापून या कंपनीने काय साधले ? आज तेथील कामगारांचे पगार वेळेवर मिळतात का ? कंपनीने सध्या तेथे असलेल्या वसाहतीतील लोकांना चांगली घरे बांधून दिली तरी, जोपर्यंत सध्या तेथे असलेले व्यवस्थापन काम करीत आहे, तोपर्यंत तेथील कामगारांची परिस्थिती सुधारेल यावर तुमच्या शासनाचा, लेबर कमिशनर यांचा विश्वास आहे का ? कारण त्यांनी त्यांनाही मॅनेज केलेले आहे. 325 एकर ही काही कमी जागा नाही. त्यांना तेथे स्वतंत्र प्लॅन्ट आहे, स्वतंत्र व्यवस्था आहे. पण तेथील कामगारांना हळूहळू काढून टाकून, तेथे नवीन प्रोजेक्ट सुरु करण्याच्यादृष्टीने त्यांचा प्रयत्न आहे आणि त्यासाठी त्यांना ही 325 एकर जमीन विकावयाची आहे आणि हे शासन चालू देणार आहे का ?

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी दोन प्रश्न विचारलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, नॅशनल रेयॉन कंपनीने 325 एकराची अतिरिक्त जागा, ज्या परपजसाठी घेतली होती, त्यासाठी वापरली नसेल एकतर ती जमीन शेतक-यांना परत करावी किंवा त्यांना मोबदला द्यावा. तर याबाबतीत कायदेशीर बाब तपासली जाईल. खरोखरच ज्या कारणासाठी अतिरिक्त जागा घेतली, ती त्या कारणासाठी वापरली नसेल आणि ती जागा विकून त्यातून मोठया प्रमाणात उद्योगपती नफा कमवित असतील तर अशा वेळी शेतक-यांना काय फायदा मिळू शकेल याचा निश्चितपणे विचार केला जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी एकंदरीतच हया कंपनीच्या व्यवस्थापनाविषयीची त्यांची मानसिकता सांगितली की, युनियन बदलणे वगैरे. पण यामागील त्यांचा उद्देश मला माहिती नाही. पण एक गोष्ट खरी आहे की, ही कंपनी आर्थिकदृष्टया डबघाईस आली आहे. ही जमीन विकल्यानंतर यातून मिळणारा पैसा या कंपनीच्या मूळ अकाऊंटमध्ये टाकून तो भविष्यासाठी सुरक्षित करुन, कामगारांना याचा

. . . .जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फायदा होईल आणि भविष्यात लॉकआऊट किंवा वर्क सस्पेशनसारखी परिस्थिती येणार नाही या दृष्टीने शासन याबाबतीत बारकाईने निरीक्षण करील.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता, माननीय मंत्री महोदय, मला क्षमा करा, पण यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. मुळात येथे जे उत्तर दिलेले आहे, त्यामध्ये कुठेही अभिवचन दिलेले आहे असे दिसत नाही. एका बाजूला एन.आर.सी.चा इंटरेस्ट, दुस-या बाजूला जमीन खरेदी करणा-यांचा इंटरेस्ट आणि यामध्ये कामगारांच्या इंटरेस्टची जपणूक केली जाईल असे काही या उत्तरात दिसत नाही हे आपणही मान्य कराल. आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता जेथे-जेथे कामगारांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आला आहे, तेथे-तेथे आतापर्यंत न्याय मिळालेला नाही ही वस्तुस्थिती नाही. अजूनपर्यंत लेबर रिफॉर्म् ॲक्ट झालेला नसताना आपण कोणत्या आधारावर व्यवस्थापनावर, खरेदीदारावर बंधन घालणार आहात ? अन्यथा हे आश्वासन कोरे राहण्याचा धोका आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना कामगारांच्या भवितव्याची भीती वाटते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगितले आहे की, त्यांनी ज्या परपजसाठी जागा खरेदी केली होती, ती त्यासाठी वापरली गेली नाही. अशा परिस्थितीत एका परपजसाठी घेतलेली जागा, दुस-या परपजसाठी धनिकाला किंवा खरेदीदाराला विकण्याचा अधिकार आहे का ? तसेच या जमिनी ज्या मूळ शेतक-यांच्या आहेत, त्यांना यामधून काही मोबदला देण्याची तरतूद आहे का ? हे निश्चितपणे तपासले जाईल. तसेच ही जमीन विकून जो पैसा येईल, तो दुसरीकडे न वळवता, तो याच कारखान्यासाठी ठेऊन कामगारांच्या भवितव्यासाठी, कंपनीच्या विकासासाठी कसा वापरला जाईल आणि कामगारांच्या कोणत्याही बाबीकडे दुर्लक्ष होणार नाही याची शासन हमी घेईल.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3985 पुढे चालू...

श्री.जितेंद्र आव्हाड : कामगार आयुक्तांचे कार्यालय भ्रष्टाचाराचा मोठा अड्डा बनलेले आहे, हे लपून राहिलेले नाही. मला प्रश्न विचारावयाचा आहे की, 1960 च्या दरम्यान महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती व्हावी या उदात्त हेतूने ठाणे जिल्ह्यातील गरीब शेतकऱ्यांनी आपली जमीनी पोटाला चिमटा काढून शासनाला दिल्या. त्यामधून एन.आर.सी. सारखे प्रचंड उद्योग उभे राहिले. ठाणे जिल्ह्यामध्ये परिस्थिती अशी आहे की, तेथील सगळे उद्योजक धडाधड कारखाने बंद करून बाहेरच्या राज्यात जात आहेत. या ठिकाणचे प्रोडक्शन मात्र त्यांनी चालू ठेवले. फक्त जमीनीच्या माध्यमातून मिळणारा नफा तिप्पट असल्यामुळे महाराष्ट्रातील उद्योग थांबले तर आमचा नफा महत्वाचा आहे, असे मानून उद्योग मालक जमिनी विकण्याचा प्रयत्न करत आहेत. सदर उद्योगाची जमीन शासनाने कोणत्या भावाने दिलीउ त्यांना दिली होती, ही जमीन डायरेक्ट शासनाने शेतकऱ्यांशी मध्यस्थी करुन उद्योजकांना दिली की उद्योजकांनी स्वत: त्या संबंधित शेतकऱ्यांकडून ती घेतलेली आहे ? शासनाने मध्यस्थी करून जमीन दिली असेल तर शासनाला ती परत घेण्याचा अधिकार आहे की नाही ?

श्री.गणेश नाईक : ती जागा मालकाने स्वत: खरेदी केलेली आहे, शासनाची यामध्ये मध्यस्थी केलेली नाही. हे जरी खरे असले तरी ज्या कारणाकरिता जमीन खरेदी केलेली आहे, त्या कारणाकरिता न वापरता त्या जमिनीमधून नफा मिळविला जात असेल तर संबंधित शेतकऱ्याला त्या नफ्यातील काही भाग मिळावा, या दृष्टीने शासनाचा प्रयत्न राहील.

**सभापती** : याबाबतीत पुनर्वसन विभागामध्ये जे प्रकल्पग्रस्त असतात, त्यांना पर्यायी जमीन दिली जाते, त्या व्यक्तींनी जर ती जमीन विकली तर "अदर इन्कम" म्हणून इन्कमच्या 50 टक्के रक्कम सरकारला द्यावी, असे आपण केलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये आपण मघाशी सांगितल्याप्रमाणे "अदर इन्कम" मिळवायचे त्या मालकाने ठरविले असेल तर जो काही व्यवहारातील फायदा असेल त्याच्या 50 टक्के रक्कम त्या संबंधीत शेतकऱ्यांना दिला जाईल काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्या मताशी सहमत आहे. या सर्व बाबी तपासून पाहून त्या शेतकऱ्यांना कसा फायदा मिळेल, हे शासनाकडून पाहिले जाईल.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा छोटासा प्रश्न आहे. ही कंपनी त्या भागामध्ये अग्रगण्य म्हणून ओळखली जाते. या कंपनीमध्ये एकूण किती कामगार कामावर होते, त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3985 पुढे चालू...

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे चालू...

कामगारांची देणी मालकांनी दिलेली आहेत काय ? कामगारांच्या प्रॉव्हीडंट फंडासाठी कंपनीने ट्रस्ट फॉर्म करून त्यामध्ये प्रॉव्हीडंट फंडाची रक्कम जमा केलेली आहे काय ? ते पैसे प्रॉव्हीडंट फंडाकडे वर्ग केलेला आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे यांनी कामगारांच्या संबंधात प्रश्न उपस्थित केला. या उद्योगामध्ये एकूण 4200 कामगार होते. त्यातील 800 कामगार नियमित होते, 300 तात्पुरते कामगार होते आणि 300 असंघटित (कंत्राटी) कामगार होते. कामगारांना प्रॉव्हीडंट फंडाचे पैसे न मिळाल्याबाबतची तक्रार आमच्याकडे आलेली नाही. परंतु याबाबतीत कंपनीचे अकौंट सशक्त केले जातील, त्याकडे बारकाईने पाहिले जाईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : एन.आर.सी.ची जमीन खरेदी करण्यासाठी मुंबईतील काही उद्योग समूह पुढे सरसावले असून तेथे टोलेजंग इमारती व बंगले असणारा महाकाय प्रकल्प उभारला गेल्यास कामगार बेघर होणार आहे, हे खरे आहे काय, या प्रश्नाला उत्तर देताना म्हटलेले आहे की, "कारखान्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी मोठयाप्रमाणावर भांडवल उपलब्ध होणे आवश्यक असल्याने काही प्रमाणात जमीन विकणे व्यवस्थापनास गरजेचे आहे." एकीकडे उत्तर देताना जमीन विक्रीची प्रक्रिया सुरू केलेली नाही. प्रश्न असा आहे की, या उद्योगाच्या आधुनिकीकरण करण्यासाठी भांडवलाची गरज असल्यामुळे जर हा उद्योग जमीन विकत असेल तर आधुनिकीकरण करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, आता पर्यन्त किती निधी उपलब्ध केला गेले, आधुनिकीकरण करण्यासाठी निधीचा वापर खरोखरच झालेला आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांना सांगू इच्छितो की, जमीन विकण्याची व्यवस्थापनाची मानसिकता जरूर झालेली आहे. परंतु अजून जमीन विकण्याच्या अनुषंगाने नोटीशीची प्रक्रिया सुरू झालेली नाही.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार 11:40

ता. प्र.क्र. 3983...

जमीन विक्रीच्या अनुषंगाने काही बाबी सुरु झाल्या आहेत, असे म्हणता येणार नाही. निश्चितपणे आधुनिकीकरणासाठी पैसे वापरले जातील असे म्हटले आहे, ती गोष्ट खरी आहे. ही आऊट डेटेड टेक्नॉलॉजीची कंपनी आहे. त्या यंत्रांमध्ये बदल घडविला नाही तर हा उद्योग नफ्यात राहू शकणार नाही. पर्यायाने बेकारीला सामोरे जावे लागेल म्हणून जमीन विक्रीकरिता परवानगी देणे उचित आहे आणि गरजेचे आहे. फक्त त्यामध्ये शेतक-यांचा असलेला हिस्सा आणि एकूणच त्यावर मॉनिटरिंग करण्याची गरज आहे.शासन त्या अनुषंगाने मॉनिटरींग करेल.

श्री. विलास अवचट :सभापती महोदय, अतिरिक्त जमिनीच्या बाबतीत मंत्रिमहोदयांनी माहिती दिली आहे की, महाराष्ट्र शासनाच्या नागरी जमीन मर्यादित कायद्यान्वये या सभागृहात मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, जर या ठिकाणी अतिरिक्त जमीन असेल तर ती जमीन सरकार ताब्यात घेईल. याबाबतीत मंत्रिमहोदयांची भूमिका काय आहे?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मुंबईच्या जमिनी विषयी माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटलेले आहे. ठाणे जिल्हयातील, ग्रामीण भागातील जमिनी विषयी तसे म्हटलेले नाही. तशा प्रकारचे माननीय मुख्यमंत्र्यांचे म्हणणे असेल तर ती बाब तपासून बघू.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहातील विविध अनुभवातील एक चांगला अनुभव आम्हाला अनुभवायला मिळाला आहे. पिकलेला आंबा गोड कां असतो? अनेक उ-ा-पावसाळे पाहिलेल्या पांढ-या केसांचे मोल काय असते आणि अनुभवाचे बोल काय असतात ते आज आपल्या नेदेशातून दिसले. कामगारांकरिता लावून धरलेल्या प्रश्नाच्या बाबतीत आपण शासनाच्या कायद्यातील तरतूद सांगून शेतक-यांच्या दोन गाष्टी सांगितल्या. आणि एवढया मोठया नफ्यातून कायदेशीर 50 टक्के वाटा शेतक-याला गेला पाहिजे अशा प्रकारची शासनाला जाणीव करुन दिली त्याबबबबद्दल मी मनापासून धन्यवाद देतो. कामगारांच्या प्रश्नातून सुध्दा शेतक-यांचे हीत साधण्याची वेगळी संधी सभागृहाला मिळाली त्याबद्दल मनापासून आपल्याला धन्यवाद देतो.

श्री. जितेंद्र आव्हाड :सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, एन.आर.सी.चा प्रश्न येथे चर्चिला जात असतांना. ठाणे जिल्हयातील बहुसंख्य उद्योग जमीन विक्रीचा व्यवसाय करीत असून बहुतेक कंपन्या बंद होत आहेत.त्यात कलर केम

..2..

श्री. जितेंद्र आव्हाड...

आहे, कोरॅस आहे. कॅडबरी आहे. जेवढया मोठया कंपन्या आहेत तेवढया सगळया कंपन्या आज बंद होत आहेत.. या जमिनीचा व्यवहार जवळ जवळ पूर्णत्वाकडे गेलेला आहे. पैशाची देवाण-घेवाण झ ाालेली आहे. या सगळयाच विक्रीला असलेल्या औद्योगिक जमिनींच्या व्यवहाराची चौकशी करुन शेतक-यांना न्याय देणार काय?

श्री. गणेश नाईक :सभापती महोदय, श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितलेली बाब अतिशय खरी आहे.एकूणच सर्व कंपन्या, जमिनीवर पैसा उपलब्ध आहे म्हणून टॉवर्स आणि मॉल बांधून तेथील कंपन्या बंद करुन दुसरीकडे दूरवर जाऊन आपला उद्योधंदा सुरु करतात आणि पैसे कमवावेत या उद्येशाने ब-याचशा लोकांनी तशा गोष्टी सुरु केल्या आहेत.परंतु सर्वच बाबतीत त्यांचे म्हणणे योग्य आहे असे म्हणता येणार नाही. काही कंपन्या खरोखरच आर्थिकदृष्टया डबघाईला आलेल्या आहेत, काही कंपन्या लॉकआऊटमध्ये आहेत आणि काही कंपन्या क्लोजरमध्ये आहेत. अशा परिस्थितीत सन्माननीय सदस्यांना जी भिती वाटते ती नाहिशी करण्यासाठी मी एकच सांगतो की,पूर्वी ओ. सी. देतांना अडथळा आणण्यात येत होता पण या ठिकाणी सी. सी.देतांना कामगारांचे देणे पूर्ण केले नसेल तर सी.सी. दिली जाणार नाही. आणि एन.ओ.सी.ही दिली जाणार नाही.म्हणून सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या मनात जी भिती आहे ती भिती बाळगण्याची गरज नाही.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सातारा जिल्ह्यातील जुरु-ाथ ॲग्रो हायटेज या ब-ावट**

**जंप-ी-ो बेरोजजार तरुजांची जेलेले फसवजूज**

**(3) * 1819 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : स-मा-ा-ीय उप मुज्य मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) सातारा जिल्ह्यातील जुरु-ाथ ॲग्रो हायटेज ॲज्ड रिसर्च प्रा.लि.या ब-ावट जंप-ीच्या -ावाजाली -ोजऱ्या देज्याचे आमिष दाजवू-ा युवजां-ा लाजो रुपयां-ा फसविजाऱ्या टोळीस सातारा शहर जु-हे प्रजटीजरज शाजे-ो दि.3-1-2004 रोजी वा त्या दरम्या-ा अटज जेलेली आहे हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, उक्त प्रजरजाचा तपास पूर्ज झाला आहे जाय,

(3) असल्यास, तपासात जाय आढळू-ा आले आहे व तद्-ुसार दोषींवर जोजती जारवाई जरज्यात आली वा जरज्यात येत आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता**: (1) होय. तथापि,आरोपीच्या अटजेचा दि-ांज 3.1.2005 आहे.

(2) व (3) जुरु-ाथ ॲग्रो हायटेज ॲज्ड रिसर्च प्रा.लि.या -ावा-ो सातारा येथे दि-ांज 7.12.2004 रोजी ब-ावट जंप-ी स्थाप-ा जरु-ा सुशिजित बेजारां-ा -ोज-या देज्याचे आमिष दाजवू-ा 185 इसमांजडू-ा एजूज रु.37,000/- इतजी रक्जम जोळा जरु-ा फसवजूज जेल्याबाबत सातारा शहर पोलीस ठाजे येथे जु.र.-ं.7/05 दाजल जरज्यात आला आहे. याप्रजरजी ती-ा आरोपीं-ा अटज जरज्यात आली असू-ा जु-ह्याचा तपास चालू आहे.

प्रा.शदर पाटील : सभापती महोदय, राज्यात बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवून फविण्याचे प्रकार मोठया प्रमाणात होत आहेत. निरनिराळया प्रकारच्या बनावट कंपन्या स्थापन करावयाच्या आणि तरुणांना आमिष दाखवून त्यांच्याकडून पेसे उकळून पळून जावयाचे असे व्यवहार मोठया प्रमाणात सुरु आहेत. त्या पैकीच हा एक प्रकार आहे. मी या ठिकाणी प्रश्न विचारु इच्छितो की, ज्यांना अटक झालेली आहे ते कोण आहेत आणि श्री. गुरुनाथ ॲग्रो हायटेक ॲण्ड रिसर्च या कंपनीचे सुत्रधार कोण आहेत?

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1819 ..... प्रा. शरद पाटील ...

आणि त्यांच्यावर जी कारवाई झालेली आहे त्यात कोणती कलमे लावण्यात आलेली आहेत. ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, गुरुनाथ ॲग्रो हायटेक ॲण्ड रिसर्च प्रा. लि. या कंपनीचे सूत्रधार श्री. गुलाबराव रामचंद्रराव जाधव हे आहेत. यामध्ये तीन लोकांना अटक करण्यात आलेली आहे. त्यामध्ये श्री. गुलाबराव रामचंद्र जाधव, वय 48 वर्षे, राहणार शिवसुदर कॉलनी, संगमनगर, सातारा, त्यानंतर श्री. महेश गजानन गोंदकर, वय 35 वर्षे, 146, प्रतापगड पेठ, सातारा, श्री. चंद्रकांत मधुकरराव राऊत, वय 30, सातारा हे आहेत. त्या सर्वांवर कलम 420 आणि 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी तीन आरोपींची नावे वाचून दाखविली. त्यामध्ये श्री. गुलाबराव जाधव, श्री. महेश गोंदकर आणि श्री. चंद्रकांत राऊत यांनी गेल्या चार वर्षापासून सातारा जिल्हयामध्ये त्यांच्यावर जे कर्ज झाले होते ते वसूल करण्यासाठी ही बनावट कंपनी स्थापन केली. श्री. गुलाबराव जाधव यांनी तर एका अपंग मुलाच्या नावावर एका सहकारी बँकेकडून कर्ज घेतले. जेव्हा त्या सहकारी बँकेचे पत्र त्या मुलाच्या घरी गेले तेव्हा गुन्हा उघडकीस आला. श्री. महेश गोंदकर हा मटका व्यवसायाशी संबंधित आहे. त्यांच्यावर अनेक गुन्हे आहेत. श्री. चंद्रकांत राऊत यांनी बनावट मोबाईल कंपनीच्या कनेक्शन्सच्या नावाने लोकांकडून पैसे घेतले. हे एवढे गंभीर गुन्हे आहेत आणि त्यांच्यावर अशी कलमे लावलेली आहेत. त्यांनी 185 इसमांकडूनच नव्हे तर अनेक बेरोजगार इसमांकडून पैसे घेतलेले आहेत. ही रक्कम फार मोठी आहे. त्यांनी कंपनीसाठी ज्या वृत्तपत्रांमध्ये जाहिराती दिल्या त्या वृत्तपत्रांना सुध्दा त्यांनी पैसे दिलेले नाहीत. त्यांच्यावर गंभीर गुन्हे आहेत. त्यांच्यावर अशी कलमे लावून काय निष्पन्न होणार आहे ? त्यांच्यावर आणखी कडक कारवाई करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ही जी घटना घडली त्यासंबंधी ही कलमे लावण्यात आलेली आहेत. आता सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी जी माहिती दिली त्या माहितीच्या आधारे सखोल चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई रे रोड येथील ब्रिटानिया कंपनीने केलेली कामगारांची कपात**

**(४) * ४४०५ श्री. मधुकर सरपोतदार , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनंत तरे : दिनांक १५ डिसेंबर,२००४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या सातव्या यादीतील प्रश्न क्रमांक ४२६६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय कामगार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई रे रोड येथील ब्रिटानिया कंपनीने १९९९ पासून कंपनीची आर्थिक स्थिती ढासळल्याच्या कारणावरुन कामगार कपात केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रिटानिया कंपनीने स्वेच्छानिवृत्ती योजनाही जाहिर करुन काही खाती बंद केली आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार कपातीविरुध्द कामगारांनी औद्योगिक न्यायालयाकडे दाद मागितली असता ती त्यांच्या बाजूने दिल्यावर कंपनी उच्च न्यायालयात गेल्यावर मुंबई उच्च न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाचा निर्णय उचलून धरुन कामगारांना काम व त्यांचे वेतन देण्याचा आदेश देऊनही ब्रिटानिया कंपनीने कामगारांना कामावर घेण्यास नकार दिला हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाबा सिध्दीकी**, **श्री. गणेश नाईक यांच्याकरिता**: (१) हे खरे नसून औद्योगिक विवाद अधिनियम,१९४७ च्या कलम २५ ओ अंतर्गत दि.२४-१२-२००३ रोजी आस्थापना बंद करण्यासाठी कामगार आयुक्तांकडे अर्ज केला होता. त्यावर सुनावणी होवून दि. २३-३-२००४ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त आस्थापना बंद करण्यास परवानगी देण्यात आली होती. तथापि कामगार संघटनेने केलेल्या पुनर्विलोकन अर्जानुसार हे प्रकरण औद्योगिक न्यायाधिकरणाकडे सुपूर्द करण्यात आले असून सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(२) स्वेच्छानिवृत्ती योजना जाहिर केली असून उक्त आस्थापना बंद करण्याबाबतचे प्रकरण औद्योगिक न्यायाधिकरणासमोर न्याय प्रविष्ठ आहे.

(३) उक्त आस्थापना बंद करण्याबाबतचे प्रकरण औद्योगिक न्यायाधिकरणासमोर न्याय प्रविष्ठ असून दि. ३०/४/२००४ च्या अंतरिम आदेशाद्वारे औद्योगिक न्यायाधिकरणाने "जैसे थे स्थिती" ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

व्यवस्थापनाने औद्योगिक न्यायाधिकरणाच्या उक्त अंतरिम आदेशाविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून कामगारांना देय असलेल्या कारखाना बंदच्या नुकसान भरपाईच्या रक्कमेपर्यंत दरमहा वेतन अदा करावे असे आदेश दिले आहेत. त्यानुसार व्यवस्थापन कामगारांना दरमहा मासिक वेतन अदा करीत आहे. तथापि ज्या कामगारांची कारखाना बंदची नुकसान भरपाईची रक्कमेपेक्षा मासिक वेतनाची रक्कम जास्त झाली आहे त्या कामगारांना त्या महिन्यापासून मासिक वेतन देण्याचे स्थगित केले आहे.

(४) होय, चौकशीत दिसून आल्याप्रमाणे व्यवस्थापनाने जाहीर केलेली स्वेच्छानिवृत्ती योजना १७० कामगारांनी स्विकारलेली असून त्यांनी त्यांच्या देय रक्कमा स्विकारलेल्या आहेत. परंतु सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणेच पुढील कार्यवाही होणार आहे.

...३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र.ए 4405 ....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा एक मोठया चमत्काराचा दुसरा प्रश्न आहे. आमचे कामगार आयुक्त आस्थापना बंद करण्यासाठी इतके उत्सुक असतात की, तीन महिन्यांच्या आत त्यांना परवानगी देऊन मोकळे होतात. हा प्रश्न ज्यावेळी औद्योगिक न्यायालयात जातो त्यावेळी औद्योगिक न्यायालय त्यांना स्थगिती देते आणि या गोष्टीला परवानगी देत नाही. हा काय चमत्कार चाललेला आहे ? कामगार आयुक्तांनी या महाराष्ट्रातील, मुंबई शहरातील अनेक कारखाने बंद करण्यास परवानगी दिली. त्याचे निकष काय असतात ? हा कारखाना तोटयात चाललेला आहे हे स्वप्न त्यांना कसे पडले ? कामगार आयुक्तांनी दिलेली जी परवानगी होती ती औद्योगिक कोर्टाने नाकारली. या कामगार आयुक्तांना कामगार आयुक्त न म्हणता त्याचे नाव मालक आयुक्त करुन टाका. एकदा उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करता परत ते प्रकरण तसेच चालू ठेवणे हे कितपत उचित आहे ? तेथील कामगारांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र शासन काय करणार आहे ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, ब्रिटानिया कंपनी ही कंपनी पोर्ट ट्रस्टच्या जागेवर आहे. ज्यावेळी माझ्याकडे हा प्रश्न आला तेव्हा मी सुध्दा हाच प्रश्न विचाराला की, ही परवानगी देत असताना ती परवानगी इतक्या घाईगर्दीत का दिली ? या सभागृहामध्ये कंपन्या बंद होणे, टॉवर, मॉल्स यासंदर्भात प्रश्न उपस्थित होतात तसा प्रकार आहे काय असे मी विचारले. याबाबत माहिती घेतल्यानंतर मला अशी माहिती मिळाली की, ही पोर्ट ट्रस्टची जागा आहे. त्या ठिकाणी वेतन एवढया मोठया प्रमाणावर झाले की, कंपनीला होणारा नफा हळूहळू संपला आणि कंपनी घाटयामध्ये येऊ लागली.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4405... श्री.गणेश नाईक....

कारण या मुंबईच्या बाहेर अन्य उत्पादन करतात त्यांचे वेज स्केल किंवा टर्म्स ॲण्ड कंडिशन्स त्या कंपनीला अतिशय स्वस्तामध्ये पडत होत्या म्हणून ब्रिटानिया कंपनी बंद करण्याची परिस्थिती झाली. औद्योगिक न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिलेली आहे. शासनाची मानसिकता हीच आहे की, जास्तीत जास्त कामगारांना संरक्षण मिळाले पाहिजे. ही आस्थापना आता लॉसमध्ये गेली असेल परंतु पूर्वी त्यांनी फायदा कमविला असेल त्यामुळे संबंधितांचा लेखाजोखा करुन कामगारांना न्याय कसा मिळेल अशी या शासनाची मानसिकता आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : या कंपनीला क्लोजरची तीन महिन्याच्या आत परवानगी देण्यात आली आहे. हे प्रकरण औद्योगिक न्यायालयामध्ये गेल्यावर कामगारांवर अन्याय झाला आहे असे सकृतदर्शनी लक्षात आले म्हणून न्यायालयाने स्थगिती दिली आहे. म्हणजे औद्योगिक न्यायालयातून स्थगिती मिळते आणि कामगार आयुक्त परवानगी देतात हा चमत्कार कसा होतो, त्याला काय कारणे आहेत, कशाच्या आधारावर परवानगी दिली जाते ? त्या कामगारांनी तेथे 25 वर्षे, 30 वर्षे, 40 वर्षे काम केल्यामुळे त्यांचे वेतन वाढणारच. त्या कंपनीला फायदा होत होता म्हणूनच कंपनी त्यांना तेवढे वेतन देत होती. परंतु नंतरच्या काळात फायदा कमी झाल्यामुळे उद्योगधंदा बंद करण्याचे उद्योग सुरु केले आहेत हे उचित आहे काय ?

श्री.गणेश नाईक : मा.सदस्य म्हणतात ते बरोबर आहे. एकूणच या खात्याची मानसिकता योग्य आहे असे मला स्वत:ला सुध्दा वाटत नाही. मी सुध्दा कामगार क्षेत्राचे नेतृत्व करीत असल्यामुळे मालकधार्जिणी भूमिका अधिकारी वर्गाची होती आणि ती लोकशाहीला शोभनीय नाही. आताच्या कालखंडाबाबत अतिशय स्पष्टपणे सांगतो की, कामगार मंत्रालय कामगारांचे हित पाहणारे, त्यांची बाजूचे घेणारे राहील, मालकांची बाजू घेणारे राहणार नाही. आपला कायदा असे सांगतो की, एखाद्याने बंद करण्याची परवानगी मागितल्यावर त्याला 60 दिवसाच्या आत होय किंवा नाही असे उत्तर द्यावे लागते. अन्यथा परवानगी मिळाली असे गृहित धरले जाते. म्हणून त्याच्या खोलात जाऊन चौकशी केली पाहिजे. माझे एवढेच म्हणणे आहे की, कामगारांच्या भावनांची कदर करुन त्यांची कोणत्याही प्रकारे मुस्काटदाबी करणार नाही. अशी या कामगार मंत्रालयाची आणि शासनाची मानसिकता राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.4405....

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या कामगार आयुक्त कार्यालयात तळेकरांचे बाप बसले आहेत हे आता लपून राहिलेले नाही आणि मंत्रिमहोदयांनीही कबूल केलेले आहे. या कंपनीला तीन महिन्याच्या आत क्लोजरची एनओसी कशी काय मिळते ? हा केवळ ब्रिटानिया कंपनीपुरता प्रश्न मर्यादित नाही. ठाणे व मुंबईतील औद्योगिकरणाला खीळ बसविण्याचे काम कामगार आयुक्तांकडूनच केले जात आहे. त्यामुळे कामगार आयुक्तांची सीआयडी किंवा एसीबीमार्फत चौकशी करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रामध्ये कित्येक कायदे करीत असताना शेतक-यांच्या बाजूने निर्णय घेत असताना नाही रे च्या बाजूने उद्देश स्पष्ट करीत असतो. क्लोजरची परवानगी देताना कामगारांचे हित लक्षात घेतले जात नाही. त्या मालकांना कोर्टात जाऊ द्या ना ? कामगारांनी कोर्टात जाण्याची आखणी का केली जाते ? म्हणून गेल्या दोन वर्षामध्ये कामगार आयुक्तांनी किती क्लोजर्सच्या परवानग्या दिल्या आहेत त्याची चौकशी करणार काय आणि त्यामध्ये जे गैरप्रकार निदर्शनास येतील त्याची सीआयडी चौकशी करणार काय ?

श्री.गणेश नाईक : सरकारची मानसिकता बदललेली आहे. मागील कालखंडामध्ये काय घडले या गोष्टीचा उहापोह करण्याकरिता, चुकीचे घडले असेल तर त्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ज्या ज्या संशयास्पद बाबी आहेत अशा गोष्टींबाबत निश्चितपणे लेखाजोखा घेतला जाईल. त्याठिकाणी अधिका-याने चुकीची कार्यवाही केली असेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल परंतु भविष्यामध्ये पारदर्शकपणे कामगारांचे, शेतक-यांचे आणि सर्वसामान्य माणसांचे हित लक्षात घेऊन आपला कारभार चालविल एवढेच आपल्यामार्फत सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री.विलास अवचट : सदर प्रकरण औद्योगिक न्यायालयासमोर न्यायप्रविष्ठ असून दिनांक 30.4.2004 च्या आदेशानुसार जैसे थे स्थिती आहे. याचा अर्थ तेथे एक वर्षापासून स्थगिती आहे. ही स्थगिती उठत नाही तोपर्यंत कामगारांना न्याय मिळणार नाही. याठिकाणी एक वर्षापासून स्थगिती आहे.

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:55

(ता.प्र.क्र.4405... (श्री. विलास अवचट ...)

या एक वर्षाच्या कालावधीत शासनाने स्थगिती उठविण्यासाठी काय प्रयत्न केलेले आहेत? उत्तराच्या भाग 3मध्ये असे म्हटलेले आहे की, "तथापि ज्या कामगारांची कारखाना बंदची नुकसान भरपाईची रकमेपेक्षा मासिक वेतनाची रक्कम जास्त झाली आहे त्या कामगारांना त्या महिन्यापासून मासिक वेतन देण्याचे स्थगित केले आहे." यामध्ये कामगारांची काय चूक आहे ? तेव्हा ही स्थगिती उठवून कामगारांच्या हिताच्यादृष्टीने शासन निर्णय घेईल काय ?

श्री. गणेश नाईक : ही स्थगिती कामगार आयुक्तांच्या निर्णयाला दिलेली आहे. कामगारांची युनियन औद्योगिक न्यायालयामध्ये गेली आणि त्यांनी स्थगिती मिळविलेली आहे. कामगारांचा पगार चालू आहे. स्थगिती उठविण्याची गरज नाही. स्टेटस-को मेन्टेन करण्याची गरज आहे. स्थगिती उठविण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज नाही. कामगारांच्या हिताची जपणूक करण्यासाठी कामगार खाते प्रत्येक गोष्टीत बारकाईने पहात आहे. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात शासन कसे काय हस्तक्षेप करु शकेल ? न्यायालयाच्या निर्णयामध्ये शासनाने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला तर तो कंटेम्प्ट ऑफ कोर्ट होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. हे अधिकार आयुक्तांकडे दिल्यापासून प्रायमाफेसी हे कारखाने आणि कंपन्या बंद पडायला लागलेल्या आहेत. पूर्वी हे अधिकार उद्योग खात्याकडे होते. उद्योग खात्याकडून हे अधिकार आयुक्तांना दिल्यानंतर सर्व कारखाने धडाधड बंद पडू लागले. कारखाने बंद करण्यासाठी कामगार आयुक्ताची परवारनगी घ्यावी लागते. आज मुंबईतील सर्व कारखाने बंद पडलेले आहेत. तेव्हा प्रश्न असा आहे की, कोणताही कारखाना बंद करण्यास आयुक्तांनी परवानगी देण्यापूर्वी तुमचे खाते ती बाब तपासून घेऊन तुमच्याकडून होकार मिळाल्या शिवाय कारखाना बंद करण्याची परवानगी दिली जाणार नाही अशी कार्यपध्दती आपण अवलंबिणार आहात काय ?

श्री. गणेश नाईक : मा. सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, या खात्याचा मी कार्यभार स्वीकारल्या पासून भविष्ययकाळामध्ये कोणतीही कंपनी बंद करण्याकरिता, विक्री करण्याकरिता किंवा डेव्हलप करण्याकरिता अर्ज आलेला असेल तर ती बाब माझ्यापुढे अवलोकनार्थ ठेवल्या शिवाय निर्णय घेऊ नये असे निदेश मी दिलेले आहेत.

..2..

(ता.प्र.क्र.4405...

श्री. डॉ.दीपक सावंत : जर यामध्ये एखादा आयुक्त दोषी सापडला तर त्याच्यावर कारवाई करण्याचे धारिष्ट्य शासन दाखवील काय ?

श्री. गणेश नाईक : कोणत्याही मा.सदस्यांनी अथवा कोणत्याही नागरिकाने तक्रार केल्यानंतर सबळ पुरावा सापडला आणि तक्रारीमध्ये कोणी दोषी आढळले तर त्याबाबतीत चौकशी होऊन कितीही मोठा अधिकारी असला तरी त्याच्यावर कारवाई केल्या शिवाय राहाणार नाही.

--

..3..

अशुध्दारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**रायगड जिल्ह्यातील नितलज-प-ावेल येथील दत्ता बाळाराम जोंधळी यांच्या खूनाच्या चौकशीबाबत**

**(५) * २१९६ श्री. अनंत तरे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. यशवंतराव गडाख , श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे :** सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील ाय :-

(१) माहे नोव्हेंबर, २००४ च्या सुमारास रायगड जिल्ह्यातील नितलज-प-ावेल येथील दत्ता बाळाराम गोंधळी यांच्या झालेल्या खूनाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्याचे मा.उपमुख्यमंत्री यांनी दि.२१ डिसेंबर, २००४ रोजी आदेश दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी तळोजा पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून अज्ञात आरोपीचा कसोशीने शोध चालू आहे.

----------

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, उत्तराच्या भाग 2 व 3 मध्ये मी आपल्या अनुमतीने सुधारणा करु इच्छितो. उत्तराचा भाग (2) व (3) मध्ये दिलेल्या उत्तरा ऐवजी "सदर प्रकरणी तळोजा पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून माननीय उपमुख्य मंत्र्यांनी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने या प्रकरणी आता सीआयडी मार्फत चौकशी चालू आहे." असे उत्तर वाचण्यात यावे.

श्री. संजय दत्त : या प्रकरणी मा. उपमुख्यमंत्र्यांनी सी.आय.डी. चौकशीचे आदेश दिलेले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी किती संशयीत आरोपिंना अटक कलेली आहे आणि त्यांच्यावर कोणत्या कलमाखाली गुन्हा दाखल केलेला आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या प्रकरणी मयताचे वडील म्हणजे फिर्यादी यांनी तीन लोकांवर संशय व्यक्त केलेला आहे. सोमनाथ म्हात्रे, भगवान चौधरी आणि जगदीश म्हात्रे यांची चौकशी चालू आहे. चौकशीमध्ये पोलिसांना ठोस असा पुरावा मिळाला नाही त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली नाही. या गुन्ह्यामध्ये 302 कलम लावलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2196...

श्री. अरविंद सावंत : या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी तीन आरोपींची नावे सांगितली. परंतु हा खून ज्याने केला त्याचे नाव या तीन आरोपींनी सांगितले आहे. ते नाव माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले नाही. या चौथ्या आरोपीचे नाव काय आहे व त्या आरोपीस तातडीने अटक केली जाईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हत्रे : मी मघाशी तीन आरोपींची नावे सांगितली. श्री.सोमनाथ म्हात्र याने श्री.भानुदास म्हात्रे, भरत बाळाराम चौधरी, राम मधुकर चौधरी व चंद्रकांत म्हात्रे या लोकांची नावे सांगितली आहेत. यांची देखील चौकशी करण्यात आलेली आहे. या आरोपींच्या संदर्भात पुरावा गोळा करण्याचे काम चालू आहे.

श्री. अरविंद सावंत : या प्रकरणाची सी.आय.डी. चौकशी चालू आहे असे एका बाजूला सांगितले जात आहे. फिर्यादीने नावे दिल्यानंतर आरोपींना अटक करावयाची. अटक केलेल्या आरोपींनी प्रत्यक्ष ज्या व्यक्तीने खून केलेला आहे त्याचे नाव घेतल्या नंतरही त्यास अद्यापही अटक करण्यात आलेले नाही. या तिन्ही आरोपींनी चंद्रकांत म्हात्रे यांचे नाव सांगितलेले आहे. नाव सांगून सुध्दा त्या आरोपीस अटक करण्यात आलेली नाही. या आरोपीस तातडीने अटक करुन त्यांच्यावर 302 कलमाखाली गुन्हा दाखल केला जाईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.कडे देण्यात आलेली आहे. या प्रकरणाचा पूर्णपणे सी.आय.डी. तपास करीत आहे. सी.आय.डी.च्या तपासात जर काही निष्पन्न आढळून झाले तर त्यांना संबंधिताना अटक करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व.मु.शी. : पॉईंट ऑफ इन्फरमेशनसंबंधी.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, डॉ. दत्ता सामंत यांचा जो खून झाला. त्यात काही संशयीत आरोपींना पकडण्यात आले आहे. त्या गुन्हयाची चौकशी कशी करणार, चौकशीत काय आढळून आले या विषयी निवेदन करावे असे आदेश आपण परवा शासनास दिलेले होते. त्यासंबंधीचे निवेदन अद्याप सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले नाही. कृपया नियम 93 च्या सूचनावरील चर्चा सुरु होण्यापूर्वी शासनास सूचना द्याव्यात की, या विषयासंदर्भातील निवेदन या सभागृहात आज करण्यात यावे.डॉ. दत्ता सामंत हे कामगार नेते होते. म्हणून महाराष्ट्रातील कामगारांच्या दृष्टीने त्यासंबंधीचे निवेदन होणे आवश्यक आहे.

**सभापती** : आज नियम 93 ची निवेदने जवळपास 17 आलेली आहेत. त्यात जर ते निवेदन असले तर प्रश्नच नाही. जर ते निवेदन आले नसेल तर मी आज शासनास यासंबंधी निवेदन करण्यास सांगतो.

-------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी. : अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली,दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहसमोर ठेवणे.

**सचिव** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी,चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबतची यादी छापावी. )

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व.मु.शी. : औचित्याच्या मुद्दयासंबंधी.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गेल्या दोन महिन्यामध्ये मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर सुमारे 207 अपघात झालेले आहेत. या अपघातात 31 व्यक्ती मृत झालेल्या आहेत. सभापती महोदय, आज या रस्त्यावरील अपघाताच्या संदर्भातील 93 अन्वये निवेदन प्राप्त झालेले आहे.परंतु माझा थोडा वेगळा मुद्दा आहे. या एक्सप्रेस हायवेवर 207 अपघात झालेले आहेत. 31 व्यक्ती मृत झालेल्या आहेत. शासनाने या ठिकाणी इर्मजन्सी मेडीकल सर्व्हीस बंद केलेली आहे. स्ट्रर्लिंग हॉस्पीटलची सेवा घेण्याचे शासनाने बंद केलेली आहे. या हायवेवर मोठया प्रमाणात अपघात होत आहेत, अनेक व्यक्ती मृत पावत असताना इर्मजन्सी सेवा घेण्यास शासन एवढे उदासीन का आहे ? या ठिकाणी पालक मंत्री उपस्थित आहेत. मी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात मंत्री महोदय काही खुलासा करतील काय ?

सभापती : ज्यावेळी 93 अन्वये निवेदन चर्चेला येईल त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचे देखील उत्तर देण्यात यावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा याच अनुषंगाने एक मुद्दा आहे. या एक्सप्रेस हायवेवर इर्मजन्सी हॉस्पीटल म्हणून डॉ. कसबेकर यांची सेवा घेतली जावयाची. त्याला जास्त पैसे मिळतात म्हणून त्यांची सेवा अधिका-यांनी रद्द केली. गेल्या आठ महिन्यात जवळपास या रस्त्यावर बरीच माणसे मृत्यूमुखी पडली. शासनाने आ.टी.ओ.ला असे कळविले आहे की, आमच्या आठ गाडया या कामासाठी या रस्त्यावर धावता आहेत. या ठिकाणी सगळा विरोधाभास आहे. शासनाची उदासिनता आणि डॉ. कसबेकर यांची सेवा यांच्यामध्ये संघर्ष त्यातून जवळपास 230 लोकांचा मृत्यू नजिकच्या काळात झालेले आहेत. या गोष्टीस सर्वस्वी शासन जबाबदार आहे. ही महत्वपूर्ण बाब आहे.त्यामुळे या महत्वाच्या बाबीच्या संदर्भात देखील शासनाने 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने उत्तर द्यावे अशा सूचना आपण शासनास द्याव्यात.

सभापती : या संदर्भात नियम 93 अन्वये चर्चा उपस्थित होईल. त्यावेळी याही मुद्याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.गणेश नाईक : यासबंधीचे देखील उत्तर देण्यात येईल.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांच्या कामकाजाचा सन 2003 चा एकतिसावा वार्षिक एकत्रित अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री): सभापती महोदय,मी आपल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन 2003-04 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. राजेश टोपे(नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीचा सन 2003-04 चा सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा सन 1999-2000 व 2000-2001 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: डॉ. दत्ता सामंत यांच्या खुनाबाबत
उपस्थित करण्यात आलेल्या औचित्याच्या
मुद्यासंबंधी गृहमंत्र्यांचे निवेदन.

श्री. आर.आर.पाटील(गृहमंत्री ) : सभापती महोदय, डॉ. दत्ता सामंत यांच्या खुनाच्या चौकशीबाबत आपण निवेदन करण्याबाबत निदेश दिले होते. आतापर्यंत झालेल्या चौकशीत आणखी काही आरोपी सापडले आहेत. त्यांच्याकडून सगळी माहिती घेतली जाईल. सभापती महोदय, केवळ गोळया झाडणारेच नव्हे तर कुणाच्या मेंदुतून ही कल्पना आली याची देखील वरिष्ठ अधिका-यामार्फत अतिशय गांभीर्याने चौकशी करण्यात येईल.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती**: मा.सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी केंद्र सरकारच्या वडाळा येथील वसाहतीमध्ये अनधिकृत लोक रहाणे याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयाबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नवी मुंबई येथे प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के योजनेअंतर्गत भूखंड वाटप.

**मु.शी.**: नवी मुंबई येथे प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के योजनेअंतर्गत भूखंड वाटप याबाबत सर्वश्री अनंत तरे,डॉ.दीपक सावंत,ॲड.अनिल परब व श्री. विलास अवचट,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे(नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री अनंत तरे,डॉ.दीपक सावंत,ॲड.अनिल परब व श्री.विलास अवचट,वि.प.स. यांनी नवी मुंबई येथे प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के योजनेअंतर्गत भूखंड वाटप या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदनानंतर</u>

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, याठिकाणी सकृत दर्शनी 2800 चौ.फू.क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम झालेले आहे असे दिसते. शासनाकडे तक्रार आल्यानंतर याची छाननी निश्चित केली आहे. अनधिकृत बांधकाम झालेले आहे असे सिध्द झाले असताना आणखी छाननी करण्याचे कारण काय ? छाननी पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, साडेबारा टक्के योजनेअंतर्गत पात्रता निश्चित केली जाते. 2800 चौ.फूटापर्यंत अर्जदार पात्र आहे. श्री. शेळके हे सिडकोचे कर्मचारी आहेत. आज त्याठिकाणी त्यांचे घर आहे. अतिक्रमण किती झालेले आहे हे निश्चित करुन 15 दिवसात कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, एखाद्या व्यक्तीला ज्यावेळी भूखंड देण्यात येतो त्यावेळी त्यासाठी काही अटी व शर्थी लावल्या जातात. या अटी व शर्थी पूर्ण केल्यानंतर जेव्हा एखाद्याचा नंबर लागतो तेव्हा त्याला भूखंड देण्यात येतो . या व्यक्तीच्या नावावर दुसरा भूखंड आहे किंवा नाही याची माहिती संबंधित अधिका-यांना असावयाला पाहिजे किंवा त्या व्यक्तीनी ही माहिती द्यावयास पाहिजे होती. या व्यक्तीने जे अतिक्रमण केलेले आहे ते अतिक्रमण दूर करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? त्याचबरोबर निवेदनात जे उत्तर देण्यात आलेले आहे ते गोंधळ व संभ्रम निर्माण करणारे आहे. निवेदनात असे म्हटलेले आहे की, " त्यांना साडेबारा टक्के योजनेअंतर्गत 2800 चो.मी. भूखंड वाटप अनुज्ञेय आहे . तथापि त्यांचे राहते घर पनवेल, सेक्टर 5 मध्ये असून तेथेच त्यांची अनधिकृत बांधकामे 2800 चौ.मी.क्षेत्रात आहेत." सिडकोच्या
अधिका-यांना ही बाब कळली नव्हती काय ? याकडे त्यांनी लक्ष दिले नाही काय ? ते अधिकारी डोळे मिटून कारभार करतात काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय,पनवेलमधील त्यांचे हे जुनेच घर होते. सध्या सर्वच सिडकोने अधिसूचित केलेले असल्यामुळे .त्यांना घरा सहित व जमिनी सहित मोबदला मिळालेला आहे. त्यांचे जुने घर असल्यामुळे साडेबारा टक्क्यामध्ये जो त्यांना भूखंड देण्यात येईल आणि तो दिल्यानंतर अतिक्रमण काढावयाचे किंवा नाही हे तपासून नंतर निर्णय घेण्यात येईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : मानखुर्द येथील संक्रमण शिबिरातील रहिवांशांनी 15 दिवसात पुनर्वसन न केल्यास सामुदायिक आत्महत्या करण्याचा दिलेला इशारा

मु.शी : मानखुर्द येथील संक्रमण शिबिरातील रहिवाशांनी 15 दिवसात पुनर्वसन न केल्यास सामुदायिक आत्महत्या करण्याचा दिलेल्या इशा-याबाबत श्री.अनंत तरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री.अनंत तरे आजारी असल्याबद्दलचे पत्र मला प्रतोदामार्फत पाठविण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी दिलेल्या नियम 93 सुचनेवर माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार नगरविकास राज्यमंत्री आता निवेदन करतील.

श्री.राजेश टोपे (नगर विकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी "मानखुर्द येथील संक्रमण शिबिरातील रहिवांशांनी 15 दिवसात पुनर्वसन न केल्यास सामुदायिक आत्महत्या करण्याचा दिलेला इशारा " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे .निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : नायर रुग्णालयातील लिफ्ट कोसळून तीन जणांचा झालेला मृत्यू

मु.शी : नायर रुग्णालयातील लिफ्ट कोसळून तीन जणांचा झालेल्या मृत्यू बाबत श्री.जयंत पाटील,श्रीमती संजीवनी रायकर,श्री.रामनाथ मोते, डॉ.अशोक मोडक,डॉ.नीलम गो-हे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेश टोपे ( नगर विकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री.जयंत पाटील, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.रामनाथ मोते, डॉ.अशोक मोडक, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "नायर रुग्णालयातील लिफ्ट कोसळून तीन जणांचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे .निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

4..



- निवेदना नंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर :सभापती महोदय, नायर हॉस्पिटलच्या विस्तारीकरणाचे काम चालू असतांना मजुरांची ने आण करण्यासाठी जी लीफट होती ती कोसळून अपघात झाला आहे आणि त्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झालेला आहे.संबंधित कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झला आहे.तेव्हा असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी संबंधित कंत्राटदाराकडून आपल्याला काही हमी घेता येईल काय ? तसेच पुन्हा अशी दुर्घटना घडू नये यासाठी काही प्रतिबंध करता येईल काय ? त्याचबरोबर जे लोक मृत्यूमखी पडलेले आहेत त्यांच्या वारसदारांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :या दुर्घटनेमध्ये एकूण 4 व्यक्ती मृत्युमुखी पडलेले आहेत. या संदर्भात चौकशी करण्यात आली होती आणि चौकशी अंती दोन व्यक्तींना अटक करण्यात आली होती.चंदू कॉन्ट्रॅक्टरकडे हे काम देण्यात आलेले असून त्याचे मालक श्री.जितेन्द्र जैन व साईट इनचार्ज श्री.प्रदिप जैन यांनी हलगर्जीपणा केल्यामुळे आय.पी.सी. कलम .304,304 ए आणि 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचबरोबर एखाद्या ठिकाणी जर लीफट बसवावयाची असेल तर इन्सपेक्टर ऑफ लीफट यांची परवानगी घ्यावयाची असते परंतु यांनी परवानगी न घेता हे काम केलेले आहे.येथुन पुढे कोणतीही लिफट बसविण्यापूर्वी इन्सपेक्टर ऑफ लीफट यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री.रामनाथ मोते : मालकांच्या हलगर्जीपणामुळे या चार व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.तेव्हा या व्यक्तींच्या वारसदासरांना नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत काय योजना आहे ?

श्री.राजेश टोपे :हे काम खाजगी कंत्राटदाराकडून करण्यात येत होते.नायर हॉस्पिटलमध्ये जी कामे चालू आहेत त्या कामाची बरीच देयके या कंत्राटदाराला द्यावयाची आहेत तेव्हा त्यातून मृत व्यक्तीच्या वारसदारांना नुकसानभरपाई देण्याच्या दृष्टीकोनातून शासन निश्चितपणे नायर रुग्णालयाच्या मॅनेजमेन्टला निर्देश देईन.

श्रीमती संजीवनी रायकर : किती नुकसानभरपाई देण्यात येणार आहे ?

श्री.राजेश टोपे.: हा खाजगी कंत्राटदार असल्यामुळे ही रक्कम ठरविता येणार नाही त्या कंत्राटदाराच्या लेबरच्या वारसदासरांना किती नुकसानभरपाई द्यावयाची याचा निर्णय तोच घेणार आहे.

----

5..

**पृ.शी. : मुंबईसह राज्यातील सर्व डान्सबार बंद करणे**

**मु.शाी : मुंबईसह राज्यातील सर्व डान्सबार बंद करण्यासंबंधी माननीय गृहराज्यमंत्र्यांचे निवेदन**

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.** : नागरी क्षेत्रात गुरे पाळणे व त्यांची ने-आण करणे (नियंत्रण) अधिनियम 1976 कोल्हापूर व सांगली-मिरज-कुपवाड महापालिका क्षेत्रात लागू करणे.

**मु.शी.** : नागरी क्षेत्रात गुरे पाळणे व त्यांची ने-आण करणे (नियंत्रण) अधिनियम 1976 कोल्हापूर व सांगली-मिरज-कुपवाड महापालिका क्षेत्रात लागू केल्याबाबत प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

श्री. अनिस अहमद (पशुसंवर्धन मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र.पाटील यांनी "नागरी क्षेत्रात गुरे पाळणे व त्यांची ने-आण करणे (नियंत्रण) अधिनियम 1976 कोल्हापूर व सांगली-मिरज-कुपवाड महापालिका क्षेत्रात लागू केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

...... पी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री.गायकवाड नंतर --- 12:15

( नियम 93 अन्वये मा. पशुसंवर्धन मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

प्रा. शरद पाटील : माननीय सभापती महोदय, या निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे या कायद्यातील तरतुदीनुसार हा कायदा शासन राज्यातील कोणत्याही भागात केव्हाही अधिसूचना काढून लागू करू शकते. त्यानुसार या कायद्याचा अमल कोल्हापूर आणि सांगली-मिरज-कुपवाड महापालिका हद्दीमध्ये लागू करण्यापूर्वी शासनाने सदर महापालिकांना या कायदाचा अमल आपल्या महापालिका हद्दीतील कोठल्या भागांमध्ये करावा अशा सूचना केलेल्या आहेत. त्या या दोन्ही महापालिकांच्या आयुक्तांनी शासनाकडून आलेल्या विचारणा महापालिकांच्या सर्वसाधारणसभेमध्ये न ठेवताच आणि जनतेच्या माहितीसाठी त्यांची प्रसिद्धी न करताच या दोन्ही शहरांच्या संपूर्ण हद्दीमध्ये या कायद्याचा अमल व्हावा अशा रीतीने लागू केलेले आहे. विशेषत: सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेतील बहुतांश भाग हा अर्धग्रामीण भाग आहे आणि तेथील नागरिकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. अशा भागातील शेती व्यावसायिक अशा या नागरिकांवर अन्याय या कायद्याच्या अमलबजावणीमुळे होणार आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूर शहरामध्ये देखील छ.शाहू महाराजां पासून पशुपालनाची मोठी परंपरा आहे आणि कोल्हापूर शहरातील काही भाग तर म्हशीच्या दूधासाठी प्रसिद्ध आहे. तेव्हा हे भाग या कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात यावेत म्हणून या महानगरपालिकांतील जनतेला कोणत्याही प्रकारे या कायद्याची माहिती न देता, हा कायदा आम्ही येथे लागू करीत आहोत याबाबत माहिती न देता आपणच आपल्या अधिकारात अहवाल महापालिका आयुक्तांनी पाठविला आहे त्यामुळे तेथील या पूरक व्यवसाय करणाऱ्या नागरिकांवर अन्याय झालेला आहे तो अन्याय आपण दूर करणार आहात काय आणि त्या भागांमध्ये पशुपालनाचा व्यवसाय हा पूर्वापार चालू असल्याने पशुपालन करणाऱ्या या लोकांवरील अन्याय दूर करणार काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, नए कॅटल एक्ट में से कोल्हापूर और सांगली को छूट देने के बारे में मा. सदस्य ने कहा है. इस बारे में मा. मुख्यमंत्री ने मीटिंग बुलाई है और 2 दिन के बाद मैं खुद कोल्हापूर विजिट करने वाला हूँ. वहां के लोगों को विश्वास में लेकर इस एक्ट के बारे में जरुर विचार किया जाएगा.

प्रा. शरद पाटील : क्या मा. मंत्री महोदय कोल्हापूर विजिट के समय मुझे बुलाएंगे ?

श्री. अनिस अहमद : ठीक है.

........

P-3

**पृ.शी.** : नावंदे (ता.खालापूर,जि.रायगड) येथील झोराबियन चिक्स फार्मच्या कर्मचाऱ्यांनी फेकलेले पशुखाद्य खाल्ल्याने 11 गुरांचा झालेला मृत्यू.

**मु.शी.** : नावंदे (ता.खालापूर,जि.रायगड) येथील झोराबियन चिक्स फार्मच्या कर्मचाऱ्यांनी फेकलेले पशुखाद्य खाल्ल्याने 11 गुरांचा झालेला मृत्यू याबाबत श्री.अनंत तरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी दिलेल्या नियम 93 च्या सुचनेवर मी निदेश दिल्याप्रमाणे मंत्री महोदयांकडून निवेदन आलेले आहे आणि त्याच्या प्रती माननीय सदस्यांना वितरित देखील करण्यात आलेल्या आहेत. परंतु सन्माननीय सदस्य आजारी असल्याने ते आज सभागृहात उपस्थित राहू शकत नसल्याबद्दलचे पत्र त्यांनी मला दिलेले आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य आज अनुपस्थित आहेत. तरी माननीय राज्यमंत्री त्यांच्या सुचनेवर निवेदन करतील.

श्री. हसन मुश्रीफ (दुग्धविकास राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी "नावंदे (ता.खालापूर,जि.रायगड) येथील झोराबियन चिक्स फार्मच्या कर्मचाऱ्यांनी फेकलेले पशुखाद्य खाल्ल्याने 11 गुरांचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

## निवेदन

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. .. )

****

....... पी 4 ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या काळात तेथील शिवसेना उपविभाग प्रमुख श्री.जितेंद्र हजारे यांची झालेली निघृण हत्त्या.

**मु.शी.** : अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या काळात तेथील शिवसेना उपविभाग प्रमुख श्री.जितेंद्र हजारे यांची झालेली निघृण हत्त्या याबाबत श्री.विलास अवचट, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत, श्री.अनिल परब, श्री. मधुकर सरपोतदार यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत, श्री.अनिल परब, श्री.मधुकर सरपोतदार यांनी "अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या काळात तेथील शिवसेना उपविभाग प्रमुख श्री.जितेंद्र हजारे यांची झालेली निघृण हत्त्या." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

...... पी 4ए ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मा.गृहराज्यमंत्र्यांच्या नियम 93 अन्वयेच्या निवेदनानंतर ... )

श्री.विलास अचवट : सभापती महोदय, या विषयावर या सभागृहामध्ये विस्तृत चर्चा झालेली असल्याने आम्ही याबाबत उपप्रश्न विचारू इच्छित नाही.

*****

...... पी 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : कराड येथील नरेश म्हस्के या 7 वर्षाच्या शाळकरी मुलाची अपहरण करून करण्यात आलेली हत्या.

**मु.शी.** : कराड येथील नरेश म्हस्के या 7 वर्षाच्या शाळकरी मुलाची अपहरण करून करण्यात आलेली हत्या याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी " कराड येथील नरेश म्हस्के या 7 वर्षाच्या शाळकरी मुलाची अपहरण करून करण्यात आलेली हत्या " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

..... पी 6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये मा.गृहराज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ....)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या घटनेसंबंधात मला एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, हा नरबळीचा प्रकार असण्याची काही शक्यता आहे काय ? सभापती महोदय, हा मयत कुमार नरेश म्हस्के, माननीय मंत्री श्री.दयानंद मस्के यांचा नातू आहे. आणि अशा अनेक घटना वारंवार घडलेल्यो आहेत तेव्हा याबाबत कोणती प्रतिबंधात्मक कारवाई आपण केलेली आहे आणि हा नरबळीचा प्रकार असण्याची शक्यता आहे का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हा नरबळीचा प्रकार नसून खंडणीसाठी या मुलाचे प्रथमत: अपहरण करण्यात आले असून नंतर त्याचा खून करण्यात आला आहे. या प्रकरणी पाच आरोपी असून त्यापैकी 3 जणांना अटक केलेली आहे व अन्य दोन आरोपींचा शोध चालू आहे.

****

( यानंतर श्री.जागडे .... क्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य असणे.

**मु.शी.**: वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य असणे याबाबत माननीय सदस्य श्री व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, गजेन्द्र ऐनापुरे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, श्री व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, गजेन्द्र ऐनापुरे यांनी वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य असणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हा विषय या सदनात चार ते पाच वेळा आला आहे. मा. उच्च न्यायालयाने निर्णय देताना ज्या शिक्षकांची विविध शाळांत सलत 12 वर्षाची अखंड सेवा झालेली आहे, अशा शिक्षकांची विनाअनुदानित शाळांतील सेवा वरिष्ठश्रेणी देण्यास पात्र ठरविली. या बाबत धोरणात्मक निर्णय शालेय शिक्षण विभागाने घ्यावा असे वित्त विभागाने सूचविले आहे. दि. 2 जून 2004 रोजी माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले होते की, या बाबतचा निर्णय एक महियात घेतो. परंतु याबाबतचा निर्णय झालेला नाही. आता पुन्हा माननीय मंत्रिमहोदय असे सांगत आहे की, या बाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तेव्हा उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विनाअनुदानित शाळांतील सेवा वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी पात्र ठरविण्याबाबतचा निर्णय एक महिन्यात केला जाईल काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सभापती महोदय, या बाबत दोन-तीन वेळा आश्वासन दिले आहे, हे मला मान्य आहे. परंतु आता हा शब्द असेल, याची ग्वाही मी देतो.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, ही दुर्देवाची गोष्ट आहे. हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरही या बाबतचा निर्णय घेण्यास शासनाला बराच वेळ लागत आहे. "हायकोर्टाने या बाबत धोरणात्मक निर्णय दिला आहे काय ?" असा प्रश्न आम्ही विचारला असता माननीय मंत्रिमहोदयांनी "होय " असे म्हटले होते. हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास तीन वर्षाचा कालावधी गेला आहे. हे बरोबर नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन न देता एकदा नाही म्हणून टाकावे. तसे केले तर आम्ही या लोकांची बैठक घेऊन त्यांना सांगू की " आपण कोर्टात जा." माझा या ठिकाणी पॉईन्टेड प्रश्न आहे. हायकोर्टाने शासनाने काढलेला जी.आर. बरोबर आहे म्हंटले आहे. त्याप्रमाणे ही सेवा धरण्यात आली आहे काय ? म्हणून या बाबतचा आदेश आठ दिवसात निर्गमित करील काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही केली जाईल. या बाबतचा निर्णय एक महिन्यात हमखास घेऊ.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : यापूर्वी असे आश्वासन दिले होते. परंतु त्याची पूर्तता झाली नाही. आता पुन्हा तसेच आश्वासन दिले जात आहे. तेव्हा निश्चितपणे एक महिन्यात या बाबतचा निर्णय घेतला जाईल काय ?

.....3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, पूर्वीचे आश्वासन होते. आताचा हा माझा शब्द आहे. एक महिन्यात या बाबतची कार्यवाही पूर्ण करु.

प्रा. बी. टी. देशमुख : एक महिन्यात याबाबतचा निर्णय निर्गमित केला जाईल काय ?

( यानंतर श्री. सरफरे....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या संदर्भात मंत्रिमंडळाची मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे. अहवाल पूर्णपणे सादर केला आहे, तो विषय कॅबिनेटमध्ये येईल.

प्रा. बी. टी. देशमुख : कॅबिनेटमध्ये निर्णय कसा होईल? माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही तर आम्ही आपला निषेध करुन बाहेर जाऊ....

**सभापती** : मंत्रिमहोदयांनी एक महिन्याच्या आत निर्णय घेतो असे सांगितले आहे...

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या संबंधी पॉझिटीव्ह निर्णय घेतला जाईल काय? असा माझा प्रश्न आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, 100 टक्के प्रक्रिया पूर्ण केली आहे. फक्त कॅबिनेटची मान्यता मिळणे क्रमप्राप्त आहे. ती मान्यता मिळाल्यानंतर निर्णय घेऊ.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या बाबतीत सभागृहामध्ये वेळ कमी आहे याचा गैरफायदा मंत्रिमहोदयांनी घेता कामा नये. आणि माझी आपणाला विनंती आहे की, आपण तो घेऊ देऊ नये. जो धोरणात्मक निर्णय आहे त्याबाबतच्या हायकोर्टाच्या निर्णयाची प्रत माझ्याजवळ आहे. दुसरी गोष्ट अशी की, आपण वित्त विभागाचे कौतुक काय करता? हायकोर्टाच्या निर्णयामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, तुमचा शासन निर्णय बरोबर आहे. त्याची तुम्ही अंमलबजावणी करा. तरी पण आपले कौतुक आणि आरत्या चालू आहेत, आपण याठिकाणी गोलगोल उत्तर देऊ नका.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मी कोणतीही दिशाभूल केली नाही. 100 टक्के कारवाई केली जाईल अशाप्रकारची ग्वाही देतो.

प्रा. बी. टी. देशमुख : एक महिन्यामध्ये आपला पॉझिटीव्ह निर्णय घोषित होईल काय? आपण जर या बाबतीत सभागृहाची दिशाभूल करणार असाल तर आम्ही आपला निषेध करतो...

**सभापती** : माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. मंत्रिमहोदय, हायकोर्टाने जो निर्णय घेतला आहे त्याला आपण उत्तर द्यावे असे मी सांगणे बरोबर नाही.परंतु हायकोर्टाच्या निर्णयाच्या बाबतीत वित्तीय मंजूरी घेणे किंवा मंत्रिमंडळाची मंजूरी घेणे या बाबी पूर्ण करुन एक महिन्याच्या आत पॉझिटीव्ह निर्णय आपण घेणार काय? असा माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, न्यायालयाचा आदर राखून एक महिन्याच्या आत निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण या बाबतीत सभागृहाला मार्गदर्शन करावे अशी माझी विनंती आहे. सन्माननीय हायकोर्टाने दिलेला निर्णय शासनावर बंधनकारक आहे की नाही? दुसरी गोष्ट अशी की, हायकोर्टाने दिलेला निर्णय बंधनकारक असेल तर त्या निर्णयासाठी कॅबिनेटची मान्यता घेणे हे लोकशाहीमध्ये न्यायालयाचा अवमान करणारे आहे हे खरे आहे की नाही? हायकोर्टाच्या निर्णयाच्या बाबतीत कॅबिनेटपुढे जायचे कारणच काय? ती कायदेशीर बाब आहे. मी आपल्याला विनंती करीन की, Any decision taking by the High Court is binding on the Government. There is no question of approval of Cabinet. Otherwise, it is a contempt of court.

आपण या विधानपरिषदेचे माननीय सभापती आहात, आपण या बाबत आम्हाला कायदेशीररित्या मार्गदर्शन करा. सन्माननीय हायकोर्टाचा निर्णय सरकारवर बंधनकारक आहे. त्या बाबत कॅबिनेटच्या "होय किंवा नाही" च्या निर्णयाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या बाबतीत आर्थिक तरतुदीची सुध्दा गरज नाही. यापूर्वी अनेक वेळा सांगितले आहे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या हरकतीच्या मुद्दयाबाबत आपला निर्णय पाहिजे...

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हायकोर्टाचा निर्णय शासनाचे अधिकारी वाचत नाहीत, ते काय करीत आहेत? या निर्णयात म्हटले आहे की, प्रेझेंट रेझ्युलेशन जे आहे ते बरोबर आहे, त्याची अंमलबजावणी करा. अतिशय साध्या-सोप्या भाषेत सांगितले आहे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या हरकतीच्या मुद्दयावर आपला निर्णय पाहिजे...

प्रा. वसंतु पुरके : सभापती महोदय, मी पुन्हा सांगतो की, 100 टक्के एक महिन्याच्या आत सकारात्मक भूमिका घेऊन शासन निर्णय घेईल.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा माझ्या लक्षात आला. आपले असे म्हणणे आहे की, उच्च न्यायालयाने किंवा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय शासनावर बंधनकारक आहे कां? या बाबतीत कायदेशीर सल्ला घेतल्याशिवाय त्यासंबंधी मी याठिकाणी निर्णय देणे योग्य नाही. आणि म्हणून मी तो निर्णय राखून ठेवीत आहे.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब, जे सांगत आहेत, ती काही वस्तुस्थिती नाही. हाय कोर्टाने समजा एकदा निर्णय दिला तर त्या निर्णयाच्या अगेन्स्ट जोपर्यंत अपिलामध्ये जाण्याची सोय उपलब्ध आहे.

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : तुम्हाला स्टे मिळाला आहे का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माझे ऐकून घ्यावे. आता तुम्ही ऐकून घ्यावे. जोपर्यंत अपिलामध्ये जाण्याची सुविधा उपलब्ध आहे, तोपर्यंत हाय कोर्टाने दिलेला एखादा निर्णय हा राज्य सरकारवर बंधनकारक आहे असे मानता येणार नाही. राज्य सरकार ही लॉ मेकींग बॉडी आहे. राज्य सरकार निर्णय घेणारी बॉडी आहे. प्रोसीजरमध्ये लागणारा वेळ, राज्य सरकारला निर्णय घेण्यासाठी कॅबिनेटसमोर जावे लागेल, आर्थिक तरतुदींसाठी वित्त विभागाकडे जावेच लागेल आणि त्यामध्ये सुध्दा समजा हाय कोर्टाने एखादा निर्णय दिला आणि सरकारला तो मान्य करावयाचा नसला तर ॲक्टमध्ये सुध्दा किंवा रुल्स्‌मध्ये सुध्दा बदल करण्याचा अधिकार जोपर्यंत सरकारकडे आहे,तोपर्यंत हाय कोर्टाने दिलेला प्रत्येक निर्णय हा जरी कायदा म्हणून राज्य सरकारने स्विकारणे अभिप्रेत असले किंवा बंधनकारक असले तरी सुध्दा या संदर्भात राज्य सरकारला विचार-विनिमय करण्यासाठी मंत्रीमंडळासमोर जाऊच नये असे म्हणणे चुकीचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी जे निवेदन केले. . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील(खाली बसून) : निवेदन नाही, पॉईंट ऑफ प्रोसीजर.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यांनी जे सांगितले ते अयोग्य आहे असे मी म्हणणार नाही.परंतु सोयीनुसार एखादी गोष्ट करण्याची राज्य शासनाची जी प्रवृत्ती आहे, त्यासंदर्भात मी उभा आहे. आपण बरोबर म्हणालात की, कोर्टाने सरकार चालवू नये या मताचा मी आहे. बंधनकारक असलेच पाहिजे तर आपण अपिलामध्ये जाऊ शकतो हे बरोबर आहे. त्याकरता आपण अपिलामध्ये जावयाचे की ते मानावयाचे याकरता मंत्रीमंडळासमोर जाण्याची तुम्हाला मुभा आहे याबद्दलही दुमत नाही. पण हाच प्रश्न जेव्हा हेल्मेटच्या प्रकरणात आला तर हेल्मेटच्या बाबतीत हाय कोर्टाने निर्णय दिल्यानंतर, केंद्राच्या कायद्यात असे म्हटलेले आहे की, कायदा लागू करा, पण हा कसा लागू करावयाचा याचा पूर्ण अधिकार सरकारचा आहे. म्हणून त्यावेळेला युती

. . . .एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

शासनाने महानगरामध्ये हेल्मेट वापरु नये, इतर ठिकाणी हेल्मेटच्या कायद्याचा वापर करावा अशा प्रकारे त्या कायद्याचे इंटरपिटेशन करुन तो कायदा येथे लावला. पुन्हा हाय कोर्टाने जेव्हा आपल्याला तंबी देण्याचा प्रयत्न केला आणि घटनेच्या कलम 129 नुसार सरकारचा जो अधिकार आहे, त्यावर गदा आणण्याचा प्रयत्न केला तर यासंदर्भात हा अधिकार सरकारचा आहे, कोर्ट आपल्याला या अधिकारापासून वंचित करु शकत नाही आणि आमच्यावर जबरदस्तीने अमुक ठिकाणी कराच म्हणजे गल्लीबोळामध्ये हेल्मेट घालून लोकांना फिरावसयास लावा हा सरकारने घेतलेला लोकांच्या हिताचा निर्णय आहे म्हणून मग तुम्ही त्यासंदर्भात सुप्रीम कोर्टामध्ये अपील का केले नाही ? म्हणून सोयीप्रमाणे अपिलाची भाषा करणे, शिक्षकांच्या बाबतीत आपण अपिलाने हा अडथळा . . . .मला ते म्हणावयाचे नाही. पण हेल्मेटच्या बाबतीतही सरकारने अशा प्रकारे का निर्णय घेतला नाही आणि सुप्रीम कोर्टामध्ये अपिला का केले नाही आणि हा आमचा अधिकार आहे आणि त्यावर गदा येत आहे असे का सांगितले नाही. हा येथे विषय आहे.

श्री.बी.टी.देशमुख : सभापती महोदय . . . .

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय,माझा हकरतीचा मुद्दा आहे.

श्री.बी.टी.देशमुख : नाही. मला बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, माझा हरकतची मुद्दा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उभे राहण्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मला हरकतीचा मुद्दा येथे कोणत्याही क्षणी उपस्थित करता येतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एका हरकतीच्या मुद्याचा निर्णय होईपर्यंत दुसरा कोणताही हरकतीचा मुद्दा मांडता येत नाही. सबब माननीय श्री. भुजबळसाहेबांना उभे राहून दुसरा कोणताही हरकतीचा मुद्दा मांडण्याचा अधिकार नाही.

श्री.छगन भुजबळ : सभापजी महोदय, त्यांचा हरकतीचा मुद्दा नव्हता.

**सभापती** : मी आपल्यालाही परवानगी दिली होती.आता हरकतीच्या मुद्याव्दारे त्यांचेही म्हणणे मी ऐकतो.

. . . .एस-3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांना माझ्या हरकतीच्या मुद्याबाबत बोलण्याचा अधिकार आहे. पण त्यांना दुसरा हरकतीचा मुद्दा काढता येत नाही. हे सभागृह नियमाने चालले पाहिजे. त्यांना माझ्या हरकतीच्या मुद्यावर बोलण्याचा अधिकार आहे.

श्री.छगन भुजबळ : तुमच्या हकरतीच्या मुद्यावर माननीय सभापतींनी निर्णय राखून ठेवलेला आहे. त्यामुळे तो हरकतीचा मुद्दा संपला. आता माझा नवीन हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, यांच्या नवीन हरकतीच्या मुद्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा ऐकल्याशिवाय ते कसा हरकतीचा मुद्दा मांडणार.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा यांच्या बोलण्यावर आणि उभे राहण्यावर हकरतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, आपण खाली बसा. प्लीज खाली बसा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला अधिकार आहे. आपण मला संधी दिली पाहिजे. यांनी माझ्या हरकतीच्या मुद्यावर . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय. . . . . .

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : प्लीज, सीट डाऊन.

श्री.छगन भुजबळ : या प्रश्नावर कायदेशीर सल्ला घेऊन मी निर्णय देतो असे आपण सांगितलेले आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब आपण कृपया खाली बसा.

मला असे वाटते की, या निवेदनावर आपण किती चर्चा करावी, याला देखील मर्यादा आहेत.

...(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात.)..

...(अडथळा)...

**सभापती** : मला असे वाटते की,...

श्री.नितीन गडकरी : आपण आम्हाला न्याय देणार नसाल आम्ही सभात्याग करून बाहेर निघून जाऊ.

...(अडथळा)...

**सभापती** : मला असे वाटते की, या निवेदनाच्या अनुषंगाने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी....

प्रा.बी.टी. देशमुख : मला आपण बोलण्याची परवानगी दिली होती. परंतु सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब बोलले...

**सभापती** : कृपया आपण शांतता राखावी. माझे बोलून पूर्ण होऊ द्यावे. सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेबांना मी बोलण्याची परवानगी दिली नाही, त्यांना मी थांबविलेले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्याबाबत आमचे काही म्हणणे नाही, आपण जो निर्णय दिला त्याबद्दलही आमचे काही म्हणणे नाही. आपण निर्णय दिल्यानंतर सन्माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील साहेबांनी निवेदन केले. त्यांनी त्यामध्ये तीन मुद्दे मांडलेले आहेत, ते चुकीचे आहेत. ती चुकीची माहिती रेकॉर्डवर राहील, त्याबाबत मला माहिती द्यावयाची आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेब, मला असे वाटते की, निवेदनाच्या अनुषंगाने...

प्रा.बी.टी.देशमुख : आता सगळे संपलेले आहे. वैधानिक मत दिलेले आहे....

**सभापती** : मी आपल्या हरकतीला उत्तर दिलेले आहे, मी ते रुलिंग राखून ठेवलेले आहे. आता यानंतर 93 चे पुढील निवेदन चर्चेला घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी निवेदन केलेले आहे त्या संदर्भात मला बोलण्यासाठी आपण परवानगी दिली होती.

श्री.नितीन गडकरी : आपण दिलेल्या निर्णयाचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(सन्माननीय सदस्य नितीन गडकरी आणि इतर सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

...(अडथळा)....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

SKK/ KGS/ MAP/

पृ.शी. : नगर परिषद व महानगरपालिकांच्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेच्या लाभापासून वंचित ठेवणे

मु.शी. : "नगर परिषद व महानगरपालिकांच्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेच्या लाभापासून वंचित ठेवणे" याबाबत सर्वश्री नानासाहेब बोरस्ते, व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.डी. खोटरे, गजेंद्र ऐनापुरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री नानासाहेब बोरस्ते, व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री व्ही.डी. खोटरे, गजेंद्र ऐनापुरे यांनी "नगर परिषद व महानगरपालिकांच्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेच्या लाभापासून वंचित ठेवणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

--

प्रा.बी.टी.देशमुख : मला बोलण्याची परवानगी दिली होती. आता अपील करण्याची वेळ निघून गेलेली आहे. हा अन्याय झालेला आहे. मला उचलून न्यावे लागेल.

**सभापती** : मी दरवेळी आपल्याला जास्तीत जास्त प्रश्न विचारण्यास परवानगी देतो. खरे म्हटले तर मी आज असे ठरविले होते की, प्रत्येक निवेदनावर तीन उप प्रश्न विचारण्यास परवानगी द्यायची. परंतु आपल्या निवेदनावर 11 उप प्रश्न विचारण्यास परवानगी दिली. आता कृपया आपण खाली बसावे

प्रा.बी.टी.देशमुख : आपण मला प्रश्न विचारण्यास परवानगी दिली होती. परंतु ज्येष्ठ मंत्री श्री.भुजबळ साहेब यांना बोलण्याची संधी दिली....

**सभापती** : मी सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेबांना मी बसण्यास सांगितलेले आहे. कृपया मी आपल्यालाही बसावयास सांगत आहे...

आता यानंतर निवेदन क्रमांक 13 घेण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : यामुळे असंतोष निर्माण होईल. दुर्दैवाची गोष्ट आहे. मला आपण बोलण्याची परवानगी दिली होती. परंतु ज्येष्ठ मंत्री उभे राहून बोलल्यामुळे ... सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांनी जे सांगितले ते बरोबर नाही. हायकोर्टाचा निर्णय धोरणात्मक आहे. मी या कृत्याचा निषेध करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. देशमुख साहेब मी आपल्याला आदरपूर्वक सांगतो की, आपल्याला सदनामध्ये सगळयात जास्त संधी दिली जाते. ती आज देखील मी दिलेली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : मला दु:ख होते. पाच वर्षे झाली काही निर्णय नाही.

**सभापती** : मलाही दु:ख होते. इतकी संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा... पॉझीटिव्ह निर्णय कसा दिला जाईल, हे त्यांना मी सांगितलेले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : त्यांनी तिन्ही मुद्दे चुकीचे सांगितलेले आहेत.

(मा. विरोधी पक्ष नेते,श्री.पांडुरंग फुंडकर, मा.सदस्य श्री.नितीन गडकरी सभागृहात प्रवेश करतात.)

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 12:40

प्रा. बी. टी. देशमुख :सभापती महोदय, आपण मला परवानगी दिल्या नंतर..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृह नियमाप्रमाणे चालले पाहिजे...

प्रा. बी. टी. देशमुख :सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी परवानबी दिली. त्यानंतर श्री. छगन भुजबळ हे उभे राहिले म्हणून आपण माझी परवानगी काढून घेतली... मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी तीन मुद्दे चुकीचे सांगितलेले आहेत.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

**सभापती** :प्रा. बी. टी. देशमुख साहेब, मी मंत्रिमहोदय, श्री. छगन भुजबळ साहेबांना बसावयास सांगितले, त्याप्रमाणे ते खाली बसले. ते बसले नसते तर तो भाग वेगळा होता. मी तुम्हाला आठ-नऊ वेळा प्रश्न विचारण्याची संधी दिल्या नंतर सुध्दा तुमचे समाधान होत नसेल तर I am very sorry.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय श्री. नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत मी कायदेशीर सल्ला घेतो असे म्हटल्यानंतरही आपण सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील याना बोलायला परवानगी दिली. त्यानंतर प्रा. बी.टीं.च्या बाबतीत ते झाले नाही. असे होत असेल तर आम्ही कामकाजात भाग घ्यावयाचा की नाही?हा प्रश्न आहे. यावर निर्णय झाला पाहिजे. जोपर्यंत ही दुरुस्ती करण्यात येत नाही तापर्यंत आम्हाला सभागृहाच्या कामकाजात भाग घेता येणार नाही आणि म्हणून पुन्हा एकदा आम्ही या विषयावर सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सभागृहा बाहेर जातात )

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या सगळया प्रकरणावर विरोधी पक्षा नेत्यांनी आपले मत मांडले. माझे म्हणणे असे आहे की, या बाबतीत सन्माननीय श्री. नितीन गडकरी यांनी पॉईंट ऑफ ऑर्डर काढला. त्यावर आपण आपला निर्णय राखून ठेवला.त्यामुळे तो पॉईंट ऑफ ऑर्डर डिस्पोजआप झालेला आहे. त्यानंतर श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी आपले म्हणणे मांडल्यानंतर तिकडच्या सन्माननीय सदस्यांनी सुध्दा आपले म्हणणे मांडलेले आहे. ही सगळी चर्चा सुरु असतांना मी नवीन पॉईंट ऑफ ऑर्डर काढू इच्छिता होतो. तो नवीन पॉईंट ऑफ ऑडर्र काढण्याची परवानगी मी मागितली. तो माझा अधिकार आहे.एक पॉईंट ऑफ ऑर्डर डिस्पोजअप झाल्यानंतर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

दुसरा पॉईंट ऑफ ऑर्डरसाठी मला परवानगी मागता येतो. त्यामुळे दुस-या कोणाच्या भाषणामध्ये मी हस्तक्षेप केला असे होत नाही. एकूण सभागृहाचे कामकाज पाहून, आपण सगळयाच गोष्टीला स्थगिती दिली आणि थांबायला सांगितले. त्याप्रमाणे आम्ही थांबलो. आपण दिलेला ओदश आम्ही मान्य केला आहे.  माझा पॉईंट ऑफ ऑर्डर हाच होता की,आपण हया मुद्यवर कायदेशीर सल्ला घेऊन निर्णय देणार आहात. त्यामुळे तो पॉईंट ऑफ आर्डर संपलेला आहे, तेव्हा ही चर्चा थांबवावी,असाच माझा पॉईंट आर्फ ऑर्डर होता.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, नियम 93 अन्वेयच्या निवेदनावर येथे चर्चा सुरु होती. त्यावर श्री. नितीन गडकरी यांनी प्रोसिजरल पॉईंट उपस्थित केला आणि त्याच्यावर अपल्याकडून रुलिंग मागितले. हायकोर्टाने दिलेला एखादा निर्णय सरकारवर बंधनकारक आहे की नाही. त्यामध्ये त्यांनी असेही वक्तव्य केले की,त्यासाठी कॅबिनेटसमोर जाण्याची गरज नाही. फायनान्स विभागाकडे जाण्याची गरज नाही..त्यांनी असा मुद्दा उपस्थित केल्या नंतर आणि सभापती महोदय, आपण त्या विषयी कायदेशीर सल्ला घेतो असे म्हटल्यानंतर या सभागृहाचा सदस्य म्हणून त्याच्यामधील सरकारची जी प्रोसिजर आहे किंवा कायद्यातील ज्या तरतुदी आहेत, त्याच्याबद्दलची फक्त स्पष्टता मी या ठिकाणी केली की, हायकोर्टाने किंवा कुठल्याही कोर्टाने दिलेला निर्णय बंधनकारक जरी असला तरी तोपर्यंत अपिलात जाण्याची प्रोव्हिजन आहे. हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या अंतर्गतसुध्दा सरकारने धोरणातमक निर्णय घ्यायचा असेल तर मंत्रिमंडळाकडे जाणे गरजचे आहे. प्लॅनिंग विभागाकडे जाणे गरजेचे आहे, ही वस्तुस्थिती मी फक्त सभागृहासमोर मांडली. ज्या विषयाशी संबंधित निवेदनावर चर्चा चालू होती. त्याच्या कुठल्याही मेरीटमध्ये, डीमेरीटमध्ये,  हा नियम लागू होतो याच्या खोलात मी गेलेलो नाही. यासंदर्भात मी फक्त एखाद्या कोर्टाने दिलेल्या निर्णयानंतर सराकरमधील प्रॅक्टीस, आणि प्रोसिजर आणि कायद्यातील बाबी थांबविल्या किंवा त्याच्यामध्ये इन्टरफिअर केले अशातला भाग नाही.मी ही कायद्याचा विद्यार्थी आहे. मला थोडीफार कायद्याची माहिती आहे.तेवढे सभागृहासमोर आणण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. ही बाब सभागृहात स्पष्ट असली पाहिजे. यामध्ये सन्माननीय सदस्य बी. टी. देशमुख यांना वाईट वाटण्याचे काही कारण नाही. कुठली असत्य, कुठली चुकीची गोष्ट मी रेकॉर्डवर आणलेली नाही.

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : नियम 93 अन्वये असलेल्या तेराव्या निवेदनावर आपण आलो होतो. यानंतर चौदावे निवेदन सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, विलास अवचट व अनिल परब यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेच्या संदर्भातील आहे. सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करु या.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : आपण आपला हरकतीचा मुद्दा नंतर मांडावा. आता मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 12.45 ते 1.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, आमचा बहिष्कार आहे.

**उप सभापती** : बहिष्कार असेल तर आपण सभागृहामध्ये कसे काय ?

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, निर्णय येईपर्यंत आपण 15 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक तहकूब करावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, 15 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करावी.

**उप सभापती** : ठीक आहे, मी मा.सदस्यांच्या विनंतीला मान देतो, परंतु सभागृहाचे पुढील कामकाज करण्याकरिता मा.सदस्यांनी मला सहकार्य करावे. सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.01 ते 1.15 पर्यंत स्थगित झाली.)

------

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी मा. सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: मा.सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी

**सभापती** : मा.सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जे काही मुद्दे या ठिकाणी प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित केलेले आहेत त्यानुषंगाने मी एवढेच सांगेन की, 2000 सालामध्ये उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यावर त्यानंतरच्या काळात अपील झालेले नाही. त्यामुळे अपिलाची मुदत संपलेली आहे. हायकोर्टाने जो निर्णय दिलेला आहे तो धोरणात्मक पध्दतीने शासनाने जो जी.आर.काढलेला आहे त्यानुषंगाने आणि त्याची जी अंमलबजावणी आहे त्याबाबतीत माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी एक महिन्याच्या आत तो निर्णय राबविण्याच्या दृष्टीने या ठिकाणी सभागृहाला आश्वासन दिलेले आहे.

मा.सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता त्यासंदर्भातील उत्तर मी राखून ठेवलेले आहे. त्यानंतरचे या सभागृहातील कामकाज काढून टाकण्यात येईल. आता मी पुढील कामकाजाकडे वळतो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : हिंदू एज्युकेशन सोसायटीच्या वर्धा रोड, नागपूर येथील शांतिनिकेन ज्ञानपीठ शाळेवर केलेली प्रशासकाची नियुक्ती

**मु.शी** : हिंदू एज्युकेशन सोसायटीच्या वर्धा रोड, नागपूर येथील शांतिनिकेन ज्ञानपीठ शाळेवर केलेली प्रशासकाची नियुक्ती याबाबत सर्वश्री रामनाथ मोते व श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, श्री.रामनाथ मोते व श्रीमती संजीवनी रायकर,वि.प.स. यांनी "हिंदू एज्युकेशन सोसायटीच्या वर्धा रोड, नागपूर येथील शांतिनिकेन ज्ञानपीठ शाळेवर केलेली प्रशासकाची नियुक्ती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : हिंदू एज्युकेशन सोसायटी नागपूर द्वारा संचालित जी शांतिनिकेतन ज्ञानपीठ कान्व्हेन्ट प्राथमिक शाळा आहे त्या शाळेतील संस्थाचालकांनी काही गैरव्यवहार केल्यामुळे प्रशासकाची नियुक्त करण्यात आलेली आहे. या शाळेमध्ये 1ली ते 7वी पर्यन्तचे वर्ग असून 5वी ते 7वीच्या वर्गांना शासनाकडून अनुदान मिळालेले नाही. त्या शाळेमध्ये शिक्षकांची नियुक्ती झालेली नाही. शासनाने त्या शाळेवर प्रशासकाची नियुक्ती केलेली असल्यामुळे संबंधित प्रशासकाला रोस्टर पध्दतीने किंवा आरक्षण बिंदू नुसार शिक्षकांची नियुक्ती करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत. त्यामुळे प्रशासकाने शिक्षकांची नियुक्ती करण्यासंबंधीचा प्रस्ताव शिक्षण संचालकांकडे पाठविलेला असून त्या प्रस्तावाला अद्याप मान्यता मिळालेली नाही. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांकडून जाणून घेऊ इच्छितो की, प्रशासकाने दिलेल्या प्रस्तावाला शासन लवकरात लवकर केव्हा मान्यता देणार आहे ? शाळा अनुदानास पात्र नाही असे म्हटलेले आहे. परंतु त्या शाळेमध्ये 5 वी ते 7व्या वर्गामध्ये 42-43 अशी विद्यार्थी संख्या असल्यामुळे ती शाळा अनुदानास पात्र आहे. तेव्हा या शाळेला अनुदान देण्याच्या बाबतीत शासन किती दिवसात निर्णय घेईल ?

प्रा.वसंत पुरके : सदर संस्थेने बिंदू नामावली न पाळणे, विद्यार्थ्यांची संख्या निश्चित नसणे अशा काही त्रुटीमुळे ही संस्था पात्र ठरलेली नव्हती. सध्या जी विद्यार्थ्यांची संख्या आहे त्यानुसार ती शाळा पुढील वर्षी पात्र ठरते. बिंदू नामावलीप्रमाणे शिक्षकांच्या नेमणुका न झाल्यामुळे गुंता निर्माण झालेला आहे. प्रशासकास रोस्टर प्रमाणे नियुक्ती करण्यासाठी परवानगी देऊ परंतु त्यांना पेमेंट मिळणार नाही. म्हणून शुल्क वगैरे आकारुन त्यांना पेमेंट करण्याची आम्ही मोकळीक देऊ.

...नंतर श्री. नाईक...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, प्रशासकाने प्रस्ताव पाठविलेला आहे. शासनाकडे प्रस्ताव येणे आवश्यक आहे असे आपण निवेदनात मान्य केलेले आहे. प्रशासकाकडून प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे तर शासनाकडून या प्रस्तावास किती दिवसात मान्यता देण्यात येईल ?

प्रा. वसंत पुरके : प्रशासकाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. तो प्रस्ताव आम्ही निश्चित मागवून घेऊ.

श्रीमती संजीवनी रायकर : आपण अनुदान देणार आहात ते किती टप्प्यात देण्यात येणार आहे ?

प्रा. वसंत पुरके : मी सांगतो आहे की, ही संस्था सध्या अनुदानाच्या टप्प्यात होती. परंतु संस्थेच्या काही त्रुटी असल्यामुळे ती टप्प्यात येऊ शकली नाही. परंतु पुढील वर्षाच्या टप्प्यात ही संस्था निश्चित येईल.

श्रीमती संजीवनी रायकर : या संस्थेला अनुदान कशा पध्दतीने देण्यात येणार आहे ?

प्रा. वसंत पुरके : या संस्थेस टप्प्यानिहाय अनुदान देण्यात येईल. ती संस्था शंभर टक्क्याच्या टप्प्यात आली असेल तर शंभर टक्के अनुदान देण्यात येईल.

श्री.जी.एल.अैनापूरे : चुकीच्या व्यक्तींना संस्था चालविण्याची परवानगी देण्यात येत असल्यामुळे संस्थांवर प्रशासक नेमण्याची नामुष्की सतत येत रहाते. अनेक शाळांवर प्रशासक नेमले गेलेले आहेत. अशा संस्थेत प्रशासक नेमण्याची वेळ आली तर त्यांचे विरुध्द तात्काळ कार्यवाही व्हावी अशा प्रकारची शिक्षण मंत्रालयाकडून कायम स्वरुपी व्यवस्था करण्यात येईल काय ? तसेच अशा शाळा ताब्यात घेण्याच्या दृष्टीने शासनास काही करता येईल काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, हा विषय वेगळा आहे. विविध गैरमार्गांचा अवलंब करुन शिक्षण संस्था सुरु करण्याचा प्रयत्न केला असेल तर त्यासंबंधी आम्ही गंभीर दखल घेऊ. ज्या संस्था वीस-वीस वर्षे झाल्यानंतर सुध्दा स्वत:चे स्टॅन्डर्ड मेन्टेंन करीत नाहीत, अशा संस्थांना आम्ही सत्वर नोटीस देऊ. या शाळांना स्टॅन्डर्ड सुधारण्यासाठी काही कालावधी घालून देऊ. त्या कालावधीत त्या संस्थांनी आपले स्टॅन्डर्ड सुधारले नाही तर अशा संस्थांची मान्यता रद्द करण्याचा प्रयत्न करु.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : या संस्थेत इयत्ता पाचवी ते सातवी शिकविण्यासाठी एका बी.ए.बी.एड. शिक्षकांची नियुक्ती झालेली आहे. शासनाने म्हटले आहे की, त्या क्वॉलिफाईड नाहीत म्हणून त्यांना मान्यता देता येत नाही. खरे तर पाचवी ते सातवीच्या वर्गासाठी एक तृतीयांश फॉर्म्यूल्याप्रमाणे चार शिक्षक अनुज्ञेय ठरतात. 25 शिक्षकात एक शिक्षक बी.ए.बी.एड. मान्य होऊ शकतो. त्या शिक्षिका क्वॉलिफाईड आहेत. त्या शिक्षिकेच्या पदास आपण मान्यता देणार आहात काय ?

श्री. वसंत पुरके : इयत्ता पाचती ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी 12 वी डी.एड. शैक्षणिक अर्हता असलेले शिक्षक नेमले जात असतात. या ठिकाणी सदर शिक्षिका हया बी.ए.बी.एड. झालेल्या आहेत. त्या ग्रॅज्यूएट झालेल्या आहेत. ही बाब तपासून त्यासंबंधी विचार केला जाईल.

--------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : पालघर (जि.ठाणे) येथील जंगल रिसॉर्ट अँड वॉटर पार्कच्या तरण तलावात वीजप्रवाह उतरल्याने दोन महिलांचा झालेला मृत्यू.

**मु. शी.** : पालघर (जि.ठाणे) येथील जंगल रिसॉर्ट अँड वॉटर पार्कच्या तरण तलावात वीजप्रवाह उतरल्याने दोन महिलांचा झालेला मृत्यू याबाबत सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे,डॉ.निलम गो-हे,श्री.अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, डॉ. दीपक सावंत,श्री.विलास अवचट, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे,डॉ.नीलम गो-हे,श्री.अरविंद सावंत,ॲड.अनिल परब, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट यांनी पालघर (जि.ठाणे) येथील जंगल रिसॉर्ट अँड वॉटर पार्कच्या तरण तलावात वीजप्रवाह उतरल्याने दोन महिलांचा झालेला मृत्यू या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हे जंगल रिसॉर्ट आहे त्याचा परवाना आपण रद्द केलेला आहे. पालघर तालुक्यात अनेक रिसॉर्ट आहेत. या सर्व रिसॉर्टमध्ये मुलभूत सुविधा आहेत की नाहीत यासंबंधी विशेष तपासणी करण्यात येईल काय ?

श्री. दिलीप वळसे पाटील : जंगल रिसॉर्टमध्ये तरण तलावात वीजप्रवाह उतरल्यामुळे दोन व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे.दोन व्यक्ती जखमी झालेल्या आहेत. या रिसॉर्ट प्रशासनाचा प्रश्न या विभागाच्या अंतर्गत येत नाही. या उत्तरात नमूद करण्यात आलेले आहे की, मालकाच्या चुकीमुळे ही घटना घडली आहे. तरण तलावात विद्युत प्रवाह उतरल्यामुळे दोन महिला व्यक्तींचा मृत्यू झ ाला. त्या रिसॉर्टचा विजेचा पुरवठा खंडीत करण्यात आलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या रिसॉर्टमध्ये तरण तलावात विजेचा शॉक बसून दोन महिलांचा मृत्यू झालेला आहे. या विभागातील अनेक रिसॉर्टला अवैध प्रकारचे विद्युत कनेक्शन दिले गेलेले आहेत. तेथील अनेक रिसॉर्टमध्ये तरण तलाव बांधण्यात आलेले आहेत. या विभागातील रिसॉर्टला विद्युत पुरवठा केला गेला आहे त्याबाबतीत विशेष तपासणी करण्यात येईल काय ? या तपासणीत अवैध मार्गाने विद्युत पुरवठा ज्यांनी घेतला असेल त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. दिलीप वळसे पाटील : या विभागातील ज्या रिसॉर्टने एस.टी.कनेक्शन घेतलेली आहेत, या सर्व रिसॉर्टमध्ये दिलेला वीज पुरवठा नियमाप्रमाणे दिलेला आहे किंवा नाही याची स्वतंत्रपणाने चौकशी इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टरच्या माध्यमातून करण्यात येईल. त्यामध्ये काही त्रुटी असतील तर त्या ताबडतोबीने पूर्ण करुन घेण्यात येतील. चोरुन किंवा बेकायदेशीरपणे विद्युत पुरवठा घेतला असेल अशी प्रकरणे आढळून आली तर त्या रिसॉर्टवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. याबाबतीत कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात म्हटले आहे की, हा अपघात रिसॉर्टच्या मालकाच्या हलगर्जीपणामुळे झालेला आहे. या ठिकाणी दोन महिलांचा मृत्यू झालेला आहे. या मृत महिलांच्या कुटुंबियांना या रिसॉर्ट मालकाकडून नुकसान भरपाई करुन देण्याच्या बाबतीत प्रयत्न करण्यात येतील काय ?

यानंतर श्री. कानडे...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, रिसॉर्टच्या मालकावर भादंवि कलम 304 अन्वये कारवाई करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. तसेच पोलीस केस दाखल करण्यात आली आहे. दोन माणसांचा मृत्यू झालेला आहे. त्यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई मालकाने देणे गरजेचे आहे. या विभागाचा असा प्रयत्न राहील की, जोपर्यंत मृतांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई मिळत नाही तोपर्यंत वीज पुरवठा सुरु करण्यात येणार नाही.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, अनेक रिसॉर्टमध्ये बेकायदेशीरपणाने वीज कनेक्शन घेतलेली आहेत. यासंदर्भात संपूर्ण राज्यभर जाहिरातींद्वारे वीज मंडळ जागृती अभियान घेत आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे मानले जाते. जेव्हा जेव्हा पर्यटक येतात त्यावेळी रिसॉर्टमध्ये वीजेच्या संदर्भात सुरक्षिततता आहे किंवा नाही याबाबत वीज मंडळाने एखादी मोहीम राबविणे आवश्यक आहे. याबाबत शासन काही विचार करील काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, अनधिकृतपणाने कनेक्शन घेतलेले नव्हते. सकाळी शॉर्ट सर्किट झाले. वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी स्थानिक पातळीवर ॲडजेस्टमेंट केली गेली. त्यातून शॉर्टसर्किट झाले. सर्वसाधारणपणे एचटी कंझुमर्स असतात त्यांचे दरवर्षी विद्युत निरीक्षकाकडून तपासणी होत असते. त्यामध्ये काही त्रृटी आढळून आल्या तर त्या दाखवून देण्यात येतात. या रिसॉर्टचे 22.02.05 ला इनस्पेक्शन झाले होते. त्रृटी दाखविण्यात आल्या होत्या. अचानक शॉर्टसर्किट झाले. त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याच्या संदर्भात कळविण्यात आले. कुठल्याही एचटी कंझुमरने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून जी काळजी घ्यावयाला पाहिजे ती काळजी विद्युत निरीक्षकाच्या माध्यमातून घेतली जाते.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषी पंपाच्या विद्युतीकरणामध्ये बुलढाणा जिल्हयाचा समावेश नसणे.

**मु.शी.**: कृषी पंपांच्या विद्युतीकरणामध्ये बुलढाणा जिल्हयाचा समावेश नसणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जामंत्री): सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता,वि.प.स. यांनी कृषी पंपांच्या विद्युतीकरणामध्ये बुलढाणा जिल्हयाचा समावेश नसणे याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवदन छापावे. )

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाने नेमलेल्या निर्देशांक समितीचा अहवाल 1996 साली आला. त्यानुसार जिल्हयातील दर हजारी पिकाखालील क्षेत्राकरिता जिल्हानिहाय ऊर्जीकरण केलेल्या कृषिपंपांच्या संख्येवर आधारित प्रत्येक जिल्हयाकरिता कृषिपंप ऊर्जीकरणाचा अनुशेष निश्चित केला होता. त्यानुसार अमरावती विभागातील बुलढाणा जिल्हयाचा निर्देशांक समितीच्या अहवालात समावेश करण्यात आला नाही. आता अहवाल येऊन जवळपास 9 वर्षे झालेली आहेत. परिस्थिती बदलली आहे. बुलढाणा जल्हयात 25 हजार 765 अर्ज प्रलंबित आहेत. अजून या अर्जदारांना वीज मिळाली नाही. मंत्रीमहोदयांनी उत्तरात सांगितले की फक्त 17 हजार अर्ज मंजूर केले. 8 हजार अर्जदारांना पैसे भरण्याची नोटीस दिलेली आहे. 8 हजार पैकी 4 हजार शेतक-यांनी टेस्ट रिपोर्ट दिलेले असून अजून कनेक्शन मिळालेले नाही. निर्देशांक समितीच्या अहवालाबाबत फेरविचार करुन नवीन परिस्थितीमध्ये बुलढाणा जिल्हयाचा समितीच्या अहवालात समावेश केला जाईल काय ? कृषी पंपांना वीज देण्याबाबत अर्ज मंजूर झालेले आहेत त्यांना किती दिवसात वीज कनेक्शन देण्यात येईल ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने अनुशेषासाठी निर्देशांक समिती नेमली होती त्याचा अहवाल आलेला आहे. अहवालामध्ये बुलढाणा जिल्हयाचा समावेश नव्हता. मा.विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो लक्षात घेऊन निर्देशांक समितीच्या अहवालावर पुनर्विचार करता येत असेल कारण करता येईल किंवा नाही हे मला माहीत नाही तर जरुर ती बाब संबंधितांच्या लक्षात आणून दिली जाईल. अनुशेष दूर करण्याच्या संदर्भात राज्य शासनाने जाणिवपूर्वक पावले टाकली आहेत...

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री.दिलीप वळसे पाटील ..

या वर्षीचे बजेट जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, या वर्षीच्या बजेटम्ध्ये कृषी पंपाचा अनुशेष दूर करण्यासाठी राज्य सरकारने 356 कोटी रुपयांची तरतूद केली होती या 356 कोटी रुपयां पैकी 71 कोटी रुपये उर्वरित महाराष्ट्रातील, 80 कोटी रुपये मराठवाडयातील आणि 204 कोटी रुपये विदर्भातील कृषी ंपपाचा अनुशेष दूर करण्यासाठी ठेवलेले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : अनुशेषाच्या यादीमध्ये बुलढाणा जिल्हयाचा समावेश नाही.

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझे उत्तर पूर्ण झाल्यावर पुन्हा प्रश्न विचारावा. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असे सांगितले आहे की ,वीज मंडळाकडे 25 हजार 765 अर्ज प्राप्त झालेले आहेत . त्यांनी सांगितलेला हा आकडा बरोबर आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, हे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची टेकनिकल स्क्रुटिनी करावी लागते आणि त्यानंतर त्याला टेकनिकल सॅक्शन द्यावे लागते.आतापर्यन्त 17 हजार 578 अर्जांना टेकनिकल सॅक्शन देण्यात आलेले आहेत.टेकनिकल सॅक्शन दिल्यानंतर ंसबंधितांना पैसे भरण्यास सांगितले जाते.आता पर्यन्त 8 हजार 11 लोकांनी पैसे भरलेले आहेत. त्यामुळे तेवढे अर्ज पेड पेन्डीग आहेत.पैसे भरल्यानंतर संबंधित शेतक-यांनी मोटार बसवावयाची असते आणि टी.आर. द्यावयाचा असतो.आतापर्यन्त 4 हजार 388 शेतक-यांनी टी.आर. दिलेला आहे. जोपर्यन्त एखादा वीज ग्राहक टी.आर. देत नाही तोपर्यन्त त्याला वीज पुरवठा करता येणार नाही. बुलढाणा जिल्हयामध्ये 4 हजार 388 टी.आर. पेन्डीग आहेत.त्या साठी आपण एक टर्न की कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. त्याव्दारे जुलै महिन्यापर्यन्त 1500 कनेक्शन्स क्लिअर होतील.आणि उरलेली सर्व कनेक्शन्स या वर्षी देण्याचा शासन प्रयत्न करील.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, निर्देशांक व अनुशेष समितीने या जिल्हयाचा समावेश अनुशेषाच्या जिल्हयात का केला नाही, त्यात त्यांनी कोणती तांत्रिक अडचण आहे हे माझ्या लक्षात येत नाही.नजरचुकीमुळे असे घडले आहे की अन्य कारणामुळे झालेले आहे हे एकदा तपासून पाहण्याची आवश्यकता आहे.25 हजार 765 अर्ज बुलढाणा जिल्हयात प्रलंबित आहेत.या सर्वाना जर विजेचे कनेक्शन्स देण्यात आले तर एक लाख एकर जमीन पाण्याखाली येईल व त्यामुळे 50 ते 60 हजार लोक दारिद्रय रेषेच्यावर येणार आहेत.बुलढाणा जिल्हा पाटबंधा-याच्या बाबतीत

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

मागासलेला असतांना त्या जिल्हयावर अन्याय झालेला आहे.सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख मला याबाबतीत मार्गदर्शन करतील. बुलढाणा जिल्हयाची माहिती का येऊ शकली नाही हे मला तरी समजू शकलेले नाही.त्याबाबतीत मला अडचण येत आहे.या जिल्हयासंबंधीची माहिती आपण तयार केलेली नसल्यामुळे मी त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छित नाही.मला आपल्याला अशी विनंती करावयाची आहे की, या संदर्भात पॉझिटीव्ह नोट देऊन अर्थ मंत्रालयाला असे पुन्हा विचारण्यात यावे की, त्या समितीने या जिल्हयाचा अनुशेष काढून दिला होता किंवा नाही हे तपासून पहावे.यातील कारण समजावून घेण्यात यावे . अनुशेष समितीने जरी निर्णय दिलेला असला किंवा निर्णय दिलेला नसला तरी त्याबाबत शासन अंतिम निर्णय घेऊ शकते.तेव्हा याबाबत शासनाने निर्णय घ्यावा.दुसरी बाब अशी आहे की, या वर्षीच्या बजेटमध्ये 358 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ती तरतूद अत्यंत आवश्यक आहे.परंतु या कामाकडे शासनाने अधिक लक्ष दिले पाहिजे व जास्तीत जास्त तरतूद करण्याच्या कामास प्राधान्य दिले पाहिजे.आदिवासीकरता जो निधी येत असतो तो निधीसुध्दा या कामासाठी आपल्याला देता येऊ शकतो.काही केन्द्र सरकारकडून सुध्दा निधी मिळत येत असतो.त्याचासुध्दा आपल्याला या कामासाठी वापर करता येऊ शकतो. महत्तम इरिगेशनचा बॅकलॉग असलेला हा जिल्हा आहे आणि या सर्वांना विजेची कनेक्शन्स दिली तर एक लाख एकर जमीन पाण्याखाली येऊ शकेल या जिल्हयात कृषी पंपाचे .25 हजार 765 अर्ज प्रलंबित आहेत तेव्हा पुढच्या दोन वर्षाच्या आत बजेट प्रोव्हीजन करुन या सर्वाना वीज कनेकशन्स देण्यात येतील असे ठोस आश्वासन माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावे. दोन वर्षाचा कालावधी मी जास्त सांगितलेला आहे.एक वर्षभरात जर हे काम शासन करु शकले तर फारच चांगले होईल व जिल्हयाला न्याय मिळेल. तेव्हा याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री.दिलीप वळसे- पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अनुशेषाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे.बुलढाणा जिल्हा अनुशेषाच्या जिल्हयाच्या बाहेर का राहिला आहे हे तपासून पाहण्यात येईल.त्यामध्ये त्यांना काही रिलीफ देता येईल किंवा नाही यासंबंधी मला आताच सांगता येणार नाही परंतु ही बाब तपासून पाहिल्यानंतर आपल्याला त्याबाबत कळविण्यात येईल.गुंतवणुकीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.कानडे 13.30

. श्री.दिलीप वळसे पाटील ..

ज्या वेळी आपल्याला कृषी पंपाचे कनेक्शन द्यावयाचे असते त्यावेळी  वीज मंडळाला एका कनेक्शनच्या मागे जवळजवळ 60 ते 70 हजार रुपयापेक्षा जास्त खर्च येत असतो. कारण वीज मंडळाला फक्त वीज कनेक्शन द्यावयाचे नसते तर सब स्टेशन्स, ट्रान्सफॉर्मर्स इत्यादीची व्यवस्थासुध्दा करावयाची आसते.या कामाकरता आपल्याला तीन ठिकाणाहून पैसे उपलब्ध होत असतात.अनुशेषामधून उपलब्ध झालेले पैसे,.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 13:35

श्री.वळसे-पाटील ...

दुसरे म्हणजे वीज मंडळाने स्वनिधीतून किंवा त्यांनी केलेल्या योजनांच्या माध्यमातून म्हणा वा वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन उभी केलेली गुंतवणूक आणि इन्फ्रास्ट्रक्चर आणि तिसरे म्हणजे जिल्हा नियोजन मंडळाकडून देखील आपल्याला या कार्यक्रमासाठी पैसे उपलब्ध होतात. पण साधारणपणे जिल्हा नियोजन मंडळाकडून मिळणारा निधी हा अत्यल्प असतो. आपण जेव्हा जिल्ह्याची योजना फायनल करतो .. त्यामध्ये एक त्रुटी अशी आहे की, जिल्हा नियोजन मंडळाकडून वीजमंडळाला जो निधी दिला जातो तो कर्ज रूपाने दिला जातो. वीज मंडळाची अपेक्षा या संदर्भात अशी आहे की, आम्ही कर्ज घ्यायचे, एक्स्पान्शन करायचे.. पुन्हा सप्लाय कमी पडतो, ट्रान्समीशन इ. साठी देखील पैसे आम्हाला कमी पडतात म्हणून त्यांनी एक टार्गेट ठरविलेले आहे. आतापर्यंत दरवर्षी आपण जवळपास 70 हजार कनेक्शन्स देत होतो. मागील वर्षी यात वाढ होऊन 80 ते 85 हजारापर्यंत कनेक्शन्स आपण देऊ शकलो. कारण त्या ठिकाणी सगळ्यांची मागणीच तेवढी होती. म्हणून यासाठी लागणारा जो निधी आहे त्यासाठी मी वित्त विभागाकडे पाठपुरावा करीत आहे की, डीपीडीसी कडून जाणारा जो पैसा आहे तो कर्ज स्वरूपात जाण्या ऐवजी अनुदान स्वरूपात वीज मंडळाकडे गेला तर या क्षेत्रामध्ये आपल्याला त्यातून अधिक प्रयत्न करता येईल. आता बुलडाणा जिल्हा हा अनुशेषामध्ये आहे किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. पण वीज मंडळाने स्वनिधीतून कर्ज काढून या जिल्ह्यातील जेवढे म्हणून पेड-पेंडींग आहेत .. शेवटी जोपर्यंत तुम्ही टीआर देत नाही तोपर्यंत त्यांना वीज मंडळ कनेक्शन देऊ शकणार नाही. तेव्हा 25 हजार अर्ज पेंडींग असले तरी त्यामध्ये टी.आर.दिलेले असे केवळ 4,300 इतकेच आहेत. मी आपल्याला सांगितले की, येत्या जुलै महिन्यामध्ये यातील दीड हजार कनेक्शन्स दिली जातील आणि या वर्ष अखेरीपर्यंत जेवढे टी.आर. दिलेले आहेत तेवढी सगळीच्या सगळी कनेक्शन .. जवळपास 4000 कनेक्शन्स बुलडाणा जिल्ह्यात दिली जातील. उरलेले जे पेड-पेंडींग असलेले 4000 आहेत त्यांनी टी.आर. दिले तर तेही पुढील वर्षामध्ये पूर्ण केले जातील अशा प्रकारे ही 8000 कनेक्शन्स पुढील वर्षात पूर्ण केली जातील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय., आता या ठिकाणी जो मुद्दा माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी उपस्थित केला, एक तर हा बुलडाणा जिल्हा असा आहे की, या जिल्ह्यात जे मोठे आणि मध्यम प्रकल्प आहेत त्यातून केवळ 8 टक्के सिंचनाची व्यवस्था आहे. या जिल्ह्यामध्ये

...... बीबी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.फुंडकर ....

सिंचन व्यवस्था करावयाची असेल तर ती विहिरीतूनच करावी लागते. त्यामुळे या जिल्ह्यात 50 हजारावर विहिरीं शेतकऱ्यांनी जवाहर रोजगार योजनेतून असो वा अन्य योजनांमधून खोदल्या आहेत. 25 हजार शेतकऱ्यांनी अर्ज केले. तेव्हा आताच्या वीज मंडळाच्या गतीने आपण गेलो, दरवर्षाला 4000 पंप या गतीने आपण गेलो तर या जिल्ह्यातून वीज कनेक्शन्ससाठी जे आज 25 हजार अर्ज केलेले आहेत, त्यांना कनेक्शन देण्यासाठी किती विलंब लागणार आहे हे आपणच लक्षात घ्यावे. तेव्हा आता आपण सांगितले की, या अनुशेषावर आम्ही 200 कोटीच्या वर खर्च करणार आहोत. पण आता हा जिल्हा अनुशेषामध्ये नाही. त्यामुळे त्या 200 कोटीतील हिस्सा काही या बुलडाणा जिल्ह्याला मिळणार नाही. म्हणून या जिल्ह्यासाठी ज्यांनी टेस्ट रिपोर्ट दिलेले आहेत त्यातील 4000 शेतकऱ्यांना एक वर्षात कनेक्शन देण्यात येईल असे आपण सांगितले आहे. त्यातील 1500 शेतकऱ्यांना जुलै पर्यंत कनेक्शन आपण देणार आहात. माझे असे म्हणणे आहे की, काही शेतकऱ्यांच्या बाबतीत तर केवळ लाईन ओढावयाची आहे. तेथे त्यासाठी खांब वगैरे काहीच लावण्याची गरज नाहीत. अशा शेतकऱ्यांना देखील आता वीज पुरवठा लवकर होत नाही. मी अनेकदा या संदर्भात आपल्या कार्यकारी अभियंता यांचेशी चर्चा केली आहे. ते आम्हाला सांगतात की, सामान येऊ द्यात, मग देऊ. अशा पध्दतीने हे सारे 6-6, 8-8 महिने पुढे चालले आहे. तेव्हा बुलडाणा जिल्ह्यासाठी स्पेसिफिक असे धोरण आखून .. हा जिल्हा मागासलेला आहे, या जिल्ह्यामध्ये जवळपास प्रत्येक बाबतीत प्रचंड प्रमाणावर अनुशेष निर्माण झालेला आहे म्हणून वीज पंपाचा जो अनुशेष या जिल्ह्याचा आहे तो भरून काढून हा जिल्हा इतर जिल्ह्यांबरोबर आणण्यासाठी शासन त्वरित खास बाब म्हणून काही विशेष योजना करणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी स्पष्टपणे सांगितले आहे की, विरोधी पक्षनेते जरी म्हणत असले तरी 25 हजार पेंडींग आहेत तरीसुद्धा त्यातील 17 हजार अर्जांच्या बाबतीत तांत्रिक मंजूर दिल्यानंतरही त्यापैकी केवळ 8 हजार लोकांनीच पैसे भरलेले आहेत. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : साहेब, आपले अधिकारी शेतकऱ्यांना याबाबत सल्ला विचारूनदेखील देत नाहीत अशाही आमच्याकडे तक्रारी आहेत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : आजचे रेकॉर्डवरील परिस्थिती लक्षात घेतली तरी आपण 17

...... बीबी 3 ...



KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 13:35

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ....

हजार शेतकऱ्यांचे नंतर पाहू.. आज 8 हजार लोकांना पैसे भरण्यास सांगितल्यानंतर आणि त्यांनी पैसे भरल्यानंतर त्यातील केवळ 4 हजार शेतकऱ्यांनीच टेस्ट रिपोर्ट दिलेले आहेत. आता टेस्ट रिपोर्ट केव्हा द्यायचा असतो. तर जोपर्यंत तो त्याच्या शेतावर मोटार आणून बसविणार नाही ...

श्री. नितीन गडकरी : पण त्यासाठी आपले अधिकारी शेतकऱ्यांना सल्ला देत नाहीत,ख पैसे भरण्यास लोक तयार आहेत...

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, टेक्निकल सँक्शन ज्यांना ज्यांना दिलेली आहे त्या सर्व लोकांच्या डिमांड भरून घेण्यात येतील.

*****

( यानंतर श्री.जागडे ....सीसी 1 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नगरपरिषद व महानगरपालिकांच्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेचा लाभ न मिळणे.

**मु.शी.**: नगरपरिषद व महानगरपालिकांच्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेचा लाभ न मिळणे याबाबत मा. सदस्य सर्वश्री नानासाहेब बोरस्ते, व्ही. यू. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, व्ही. डी. खोटरे, जी. एल. ऐनापुरे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) ( नगर विकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री नानासाहेब बोरस्ते, व्ही. यू. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, व्ही. डी. खोटरे, जी. एल. ऐनापुरे यांनी नगरपरिषद व महानगरपालिकांच्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेचा लाभ न मिळणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय, राज्यातील शासकीय, निमशासकीय, खाजगी व्यवस्थापनातील शिक्षक व श्क्षिकेतर कर्मचा-यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूती व रजा प्रवास योजनेचा लाभ 10 वर्षापासून लागू करण्यात आली आहे. परंतु नगर परिषद व महानगरपालिकोंच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेच्या लाभ मिळत नाही. या शिक्षकांना भेदभावाची वागणूक दिली जात आहे. हा भेदभाव गाडून समन्यायाची वागणूक या शिक्षकांना देण्यात येणार आहे काय ? तेव्हा नगरपरिषद व महानगरपालिकेच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेचा लाभ मिळावा म्हणून तसे आदेश शासन केव्हा निर्गमित करणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या बाबतचा निर्णय होण्याची आवश्यकता होती. परंतु त्या बाबत दिरंगाई झाली आहे. म्हणून आता याबाबतचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे पाठविला आहे. आता या बाबत मी स्वत: पाठपुरावा करुन नगर परिषद व महानगरपालिकोंच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेच्या लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील राहील.

श्री. व्ही. डी. खोटरे : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. राज्यातील शासकीय, निमशासकीय, खाजगी व्यवस्थापनातील शिक्षक व श्क्षिकेतर कर्मचा-यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूती व रजा प्रवास योजनेचा लाभ 10 वर्षापासून लागू करण्यात आली आहे. परंतु नगर परिषद व महानगरपालिकोंच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेच्या लाभ मिळत नाही. या बाबतीत दि. 2 ऑगष्ट 2002 रोजी एक लक्षवेधी सूचना देण्यात आली होती. त्यावेळी मा. मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते. दि.2 जून 2004 रोजी नियम 93 अन्वये हा विषय उपस्थित करण्यात आला होता. त्यावर देखील चर्चा झाली होती. त्यावेळी एक महिन्याच्या आत या बाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील, असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले होते. सभापती महोदय, यातील अनेक शाळा विदर्भातील आहेत. त्यामुळे आता एक महिन्याच्या आत या बाबतचे आदेश काढण्यात येतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा विषय आर्थिक बाबींशी संबंधीत आहे. सर्वच शाळांतील शिक्षकांना ही सवलत देण्याचा शासनाचा विचार आहे. परंतु याबाबत एक महत्वाचा मुद्दा आहे. राज्यातील महानगरपालिकांच्या बाबतीत कर्मचा-यांच्या वेतनावरील खर्च हा त्यांच्या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे.....

उत्पन्नाच्या 35 टक्के मर्यादेपर्यन्त ठेवावा. अ वर्ग नगरपालिकांच्या बाबतीत 50 टक्के, ब वर्ग नगरपालिकांच्या बाबतीत 55 टक्के आणि क वर्ग नगरपालिकांच्या बाबतीत 60 टक्के असे हे प्रमाण आहे. अशा प्रकारचे निर्बंध असले तरी शासन या बाबत प्रयत्नशील आहे. या बाबतचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे पाठविला आहे. मी स्वत: लक्ष घालून एक महिन्याच्या या बाबतच्या प्रस्तावाला संमती घेईन.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, नगर परिषद व महानगरपालिकेंच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेच्या लाभ मिळाला पाहिजे. सभापती महोदय, या शाळांना 100 टक्के अनुदान शालेय शिक्षण विभाग देत असते. त्यामुळे या ठिकाणी आता एक पैसाही देण्याची गरज नाही. तेव्हा नगर परिषद व महानगरपालिकेंच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास योजनेच्या लाभ मिळण्याबाबत आदेश एक महिन्याच्या आत निर्गमित करण्यात येतील, असे स्पष्ट आश्वासन माननीय मंत्रिमहोदय देतील काय ? गेल्या वर्षी एक महिन्यात या बाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील, असे आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी झाली नाही. या बाबतचा आदेश फक्त विभागाला काढावयाचा आहे. अंमलबजावणी त्या त्या शाळांनी करावयाची आहे. यामुळे शासनावर कोणताही बोजा येणार नाही. तेव्हा एक महिन्याच्या आत दोन्ही योजनेच्या आत शासन निर्णय निर्गमित होईल काय ?

( यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंश टोपे : सभापती महोदय, वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या संदर्भातील नस्ती मी अगोदर सांगितली आहे. एल.टी.सी. च्या संदर्भात अजून निर्णय झालेला नाही, तो निर्णय सुध्दा समन्यायी पध्दतीने व्हायला पाहिजे. त्यासाठी जातीने प्रयत्न करुन एक महिन्यामध्ये दोन्ही योजनांच्या संदर्भात निर्णय घेण्याचा प्रयत्न करु.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, वैद्यकीय प्रतिपूर्ती आणि रजा प्रवास सवलत या दोन्ही योजना अनुदानित शिक्षण संस्थांना लागू केल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांनाच नव्हेतर शहरी भागातील नगरपरिषदांच्या शाळांना सुध्दा लागू होणे आवश्यक आहे. शासनाने आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे लागू करता येत नाही असे जरी सांगितले असले तरी त्यांना शालेय शिक्षण विभागाकडून 100 टक्के वेतन अनुदान मिळते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना हा निर्णय तंतोतंत लागू करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाकडून 100 टक्के वेतन अनुदान मिळते हे खरे असले तरी याबाबत नगर विकास विभागाकडून जी.आर. निश्चितपणे काढण्याचा प्रयत्न करु.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : दिल्ली येथील महाराष्ट्र सदन इमारतीला लागलेली भीषण आग.

मु.शी. : दिल्ली येथील महाराष्ट्र सदन इमारतीला लागलेल्या भीषण आगीबाबत श्री. कन्हैयालाल गिडवाणी, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, विलास अवचट, ॲड.अनिल परब यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मा. सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, विलास अवचट, ॲड.अनिल परब यांनी "दिल्ली येथील महाराष्ट्र सदन इमारतीला लागलेली भीषण आग" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, 10 एप्रिल रोजी महाराष्ट्र सदनला रात्री 1 वाजता आग लागली त्यावेळी मी कक्ष क्रमांक 11 मध्ये थांबलो होतो. रात्री 1 वाजता महाराष्ट्र सदनच्या कर्मचाऱ्यांनी सर्व कक्षांच्या बेल वाजवल्यानंतर मी माझ्या कक्षातून लुंगी व बनियनवर पडलो. त्यावेळी नक्की काय झाले आहे हे मला समजत नव्हते. माझ्याबरोबर माननीय सदस्य श्री. देशमुख साहेब सुध्दा त्या महाराष्ट्र सदनमध्ये थांबले होते. अशा परिस्थितीत सदनाच्या बाहेर आम्हाला यावे लागले. सुदैवाने त्या ठिकाणी लागलेली आग काही वेळातच विझविण्यात आली. त्या ठिकाणी अग्निशामक यंत्रणा उभारण्यास शासनाची परवानगी नाही असे समजले. महाराष्ट्र सदनाचे विस्तारीत बांधकाम करण्यासाठी त्या ठिक्राणी जागा उपलब्ध आहे परंतु दिल्ली प्रशासनाकडून त्याला परवानगी मिळत नाही. आपल्याकडे 6 एकर जागा उपलब्ध असतांना त्या ठिकाणी नवीन सदनाचे बांधकाम अजून सुरु झाले नाही. आज त्या ठिकाणी आमदारांना पुरेशी जागा मिळत नाही यासाठी व तेथील सुरक्षिततेच्या दृष्टीने, बरेच प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने सर्वपक्षीय आमदारांची एक उच्चस्तरीय समिती नेमण्याची गरज आहे. ती समिती नेमण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी महाराष्ट्र सदनला लागलेल्या आगीचा प्रश्न उपस्थित केला. मला त्यासंबंधी एवढेच सांगावयाचे आहे की, 15 मीटरच्या वर इमारतीची उंची असेल तर त्या ठिकाणी अग्निशामक यंत्रणेची व्यवस्था करणे बंधनकारक आहे. या इमारतीची उंची 15 मीटरच्या वर नव्हती.यापुढे अशाप्रकारची घटना त्याठिक्राणी घडू नये याकरिता मुख्य इमारतीच्या मागच्या ब्लॉकमध्ये अग्निशामक यंत्रणा ठेवावी यासाठी विशेष आयुक्त श्रीमती झुत्शी यांची बैठक घेऊन सांगितले आहे. दुसरे असे की, त्याठिकाणी आमदारांना रहाण्यासाठी जागा अपूरी पडते म्हणून त्या ठिकाणी नवीन महाराष्ट्र सदन उभारण्यासंदर्भात चिरमूर येथील जुना प्लॉट घेतला असून त्यासाठी विकासक म्हणून नोबल इंडिया कंस्ट्रक्शन कंपनीला नेमले आहे. जागेचे क्षेत्रफळ 6 एकराचे असून ते काम बिल्ट ऑपरेट आणि ट्रान्सफरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्या संबंधी दिल्ली सरकारला काही कागदपत्रांची पूर्तता करुन द्यावयाची आहेत. ती कागदपत्रे पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. नवीन महाराष्ट्र सदन निश्चितपणे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न उपस्थित केला की, त्याठिकाणी अस्तित्वात असलेले जे महाराष्ट्र सदन आहे.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MHM पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:50

श्री.राजेश टोपे . . . .

त्याठिकाणी 1 लाख 68 हजार स्वे.फू.जागा आहे. तेथील 67 हजार स्वे.फू.जागा वापरली आहे आणि अजून बरीच जागा शिल्लक आहे. ती जागा वापरण्यासाठी माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ साहेबांच्या परवानगीने निश्चितपणे अधिका-यांची उच्चस्तरीय समिती नेमण्यात येईल आणि त्या बाबतीत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, गेल्या पाच-सात वर्षापासून केवळ समित्या आणि चर्चा सुरु आहेत. सिरमूरचा जो प्लॉट होता, त्याबाबतीत सांगावयाचे तर एखाद्याने जागा अतिक्रमित करावी, तशा प्रकारे मी मंत्री असताना तेथे जबरदस्तीने बोर्ड लावला आणि महाराष्ट्र शासनाला न मिळणारा प्लॉट माननीय श्री.राम जेठमलानीसाहेबांमुळे मिळाला. या प्लॉटची किंमत 700 कोटी रुपये आहे. एखाद्याने प्लॉट ढापला तर समजू शकतो, पण येथे गुजराथ आणि महाराष्ट्र राज्याच्या बाबतचा मुद्दा होता. गुजराथच्या राज्याच्या बाहेरची जी प्रॉपर्टी होती ती महाराष्ट्राला आणि गुजराथच्या अंतर्गत असलेली प्रॉपर्टी गुजराथला दिली. त्यासाठी हिअरींग झाले आणि त्याबाबतीत ऑर्डर झाल्यावरही केंद्र शासन तो प्लॉट ताब्यात देत नव्हते. मी सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना, तेथे जाऊन जबरदस्तीने बोर्ड लावला. अशा वेळी जास्त एफ. एस. आय. मिळाला तर तेथे सेव्हन्थ स्टार इमारत बांधून तेथे 1600 लोक राहू शकतील असे महाराष्ट्र सदन बांधता येईल. ते बी.ओ.टी.तत्वावर बांधता येईल. सध्याची जी एक्झीस्टींग इमारत आहे, त्यावर सध्या वारंवार खर्च केला जात आहे. याठिकाणी बोलू नये, पण वयस्क महिलेला कितीही मेकअप केला तरी तिला तरुणपण प्राप्त होत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

सभापती महोदय, मी क्षमा मागतो. मी माझे शब्द मागे घेंतो. माझा म्हणण्याचा उद्देश असा आहे की, महाराष्ट्र सदनाच्या एक्झीस्टींग इमारतीची वारंवार दुरुस्ती करणे योग्य नाही. एक्झीस्टींग इमारतीसाठी असलेली जी जागा आहे, ती आणि नवीन जागा एकत्रित केली तर त्या जागेवर महाराष्ट्र सदनाची अतिशय सुंदर इमारत बांधू शकतो. माननीय श्री.छगन भुजबळसाहेब, याचे डिझाईन तयार झाले आहे. आपण या कामासाठी वेळ द्यावा आणि मन लावून या दोन्ही कामांच्या बाबतीत लक्ष घालून निर्णय घ्यावा. महाराष्ट्र शासनाचे दिल्लीमध्ये अतिशय भुक्कड "महाराष्ट्र सदन" आहे. आज जी छोटी-छोटी राज्ये आहेत, त्या राज्यांच्या दिल्लीमध्ये अतिशय चांगल्या

. . . .2 ई-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

इमारती आहेत. हिमाचल प्रदेश या छोटया राज्याची देखील तेथे चांगली इमारत आहे. छत्तीसगढ या राज्याची देखील तेथे फाईव्ह स्टार इमारत आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याबाबतीत सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ साहेबांनी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक घेतलेली आहे. तसेच या कामासाठी बजेटची तरतूद करीत आहोत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, बजेटची तरतूद करण्याची गरजच नाही. जी.ए.डी. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारती आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असते. आपण मुंबई येथील "सहयाद्री" येथे जाऊन पहा. तेथे सार्वजनिक बांधकाम विभागाने काम केले. पूर्वी माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकरसाहेब सांस्कृतिक विभागाचे मंत्री असताना यासंबंधात मागणी करण्यात आली. मी त्यांना सांगितले की, तुम्ही घेऊ नका. पण त्यांचा आदर ठेऊन त्या विभागाकडे ती इमारत देण्यात आली. पण आज तेथील गालिचे खराब झालेले आहेत. कारण जी.ए.डी.कडे निधी नाही. तेव्हा यातून जी.ए.डी.ला बाहेर काढा आणि भुजबळसाहेब, तुम्हीच निर्णय घ्या. गेल्या सात वर्षापासून फाईल इकडून-तिकडे जात आहे. फुटबॉलसारखा खेळ सुरु आहे. भुजबळसाहेब, तुम्ही स्वत: सार्वजनिक बांधकाम मंत्री आहात. तुम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याची गरज नाही. तुम्ही तीन-चार महिन्यात याबाबतीत योजना तयार करुन, त्याचे भूमीपूजन करुन ही योजना सुरु करा.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, आपल्या ताब्यात सिरमूरचा नवीन प्लॉट आल्या नंतर त्याठिकाणी बी.ओ.टी.तत्वावर एका विकासकाला अगोदरच कंत्राट दिलेले आहे. त्याचे काम सुरु आहे. त्यासंबंधीचा प्लॅन मंजूर करण्याच्या संबंधात जी कागदपत्रे लागतात, त्याची पूर्तता करण्याच्यादृष्टीने विकासकाकडून काम सुरु आहे. महाराष्ट्र शासन त्याला पूर्णपणे मदत करीत आहे. तीन महिन्याच्या आत त्याने काम सुरु करावयास हवे होते. ते सुरु का झाले नाही म्हणून ताबडतोब याबाबतीत चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ (पुढे चालू...

पायाभूत सोईच्या संबंधात मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समिती आहे, त्यांच्या समोर पुन्हा हे प्रकरण नेण्यात आले. असे आढळून आले की, खरोखरच त्याला काम करण्यास वेळ लागतो आहे, त्या मागची कारणमिमांसा आहे ती योग्य आहे. म्हणून त्याला आणखी तीन महिन्याची मुदत वाढवून देण्यात आली. लवकरच बांधकाम निश्चितपणे सुरू होईल. ते बांधकाम सुरू झाल्यानंतर आम्ही सर्व सन्माननीय सदस्यांना रहाण्यासाठी नवीन महाराष्ट्र सदन उपलब्ध झाल्यानंतर .. मग जुन्या महाराष्ट्र सदनाचा जो काही एफएसआय शिल्लक आहे, असे जे आपण म्हणता ते बरोबर आहे. परंतु आता ज्या पायावर आज 'महाराष्ट्र सदन' उभे आहे, त्यावर 60-70 हजार रुपयाचे काम करणे शक्य नाही. त्यामुळे ते 'महाराष्ट्र सदन' पूर्णपणे पाडून त्या ठिकाणी नवीन दुसरा प्रकल्प आपल्याला उभा करावा लागेल, परंतु आताच आपण ते पाडले तरे तर कोणालाही रहाण्याची सोय उपलब्ध होऊ शकणार नाही. म्हणून ज्या क्षणी सिरमूर प्लॉटवरील हे काम पूर्ण होईल, त्या क्षणी जुन्या महाराष्ट्र सदनाच्याबाबतीत देखील विचार करता येईल. या बाबतीतध्ये मी स्वत: जातीने लक्ष घालीन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र सदनामध्ये मराठी बोलणारे अधिकारी आणि कर्मचारी सरकार ठेवणार आहे काय ? त्याचबरोबर तेथील अधिकारी, लोकप्रतिनिधींबरोबर सौजन्याने वागणार आहेत काय ? मी एकदा महाराष्ट्र सदनमध्ये गेलो असतांना, एका माजी आमदारांना एकदम वाईट वागणूक तेथील अधिकारी देत असताना पाहिले. त्यावर मी त्या ठिकाणी हस्तक्षेप केला, माझ्या पध्दतीने त्या ठिकाणचे रजिस्टर वगैरे फेकून देऊन रजिस्टर भरणार नाही असे सांगून पहिल्यांदा खोलीची किल्ली द्या असे सांगितले. त्या दृष्टीने शासन या सगळ्या यंत्रणेची सुधारणा करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : हे निश्चित आहे की, वर्ग 'ड' मधील कर्मचारी रहायला स्वत: तयार होत नसतात. त्यामुळे त्या ठिकाणची जी मंजूर पदे आहेत, त्यामध्ये अधिकाधिक मराठी वर्गच असावा अशाप्रकारचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जाईल. आय.टी.डी.सी.कडून त्या ठिकाणच्या कर्मचारी वर्गाला अभ्यांगताबरोबर कसे वागावे, हे प्रशिक्षण देखील दिले जाते, ही सगळी व्यवस्था त्या ठिकाणी आहे. तरी देखील त्याबाबतीत अधिक दक्षता घेतली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, त्या ठिकाणी जाणारे जे आमदार आहेत किंवा माजी आमदार आहेत, त्यांना उच्च पदस्थ या दृष्टीने जी वागणूक द्यायची आहे, त्याची काळजी घेण्याकरिता राज्य सरकारने संबंधितांना सूचना देणे गरजेचे आहे.

श्री.राजेश टोपे : तशा निश्चित सूचना देण्यात येतील.

श्री.सुरेश देशमुख : मी आणि सन्माननीय सदस्याननीय सदस्य श्री.गिडवाणी महाराष्ट्र सदनामध्ये होतो. ते खोली क्रमांक 11 मध्ये होते मी खोली क्रमांक 10 मध्ये होतो. त्यावेळेस त्या ठिकाणी आग लागली होती, ही वस्तुस्थिती आहे. बाजूलाच काम चालले होते, त्या ठिकाणी ही आग लागलेली होती. परंतु तेथील कर्मचारी आमच्याशी बरोबर वागत नाहीत. त्यांच्यात वागणुकीचा अभाव आहे. त्या ठिकाणी मराठी भाषिक कर्मचारी असले पाहिजेत. आम्ही जे काही बोलतो ते तरी त्यांना समजले पाहिजे. आपण त्यांना फोनवरुन काही आणण्यास सांगितले तर दुसरेच काही तरी आणतात. त्या दृष्टीकोनातून सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी नवीन महाराष्ट्र सदन व्हावे, या दृष्टीकोनातून प्रयत्न करणार आहात. सन्माननीय राज्यमंत्री श्री.टोपे साहेबांनी समिती नेमण्याच्या संबंधात सांगितले. ही समिती अधिकाऱ्यांची गठीत न करता आमदारांची गठीत करावी, अशी मी विनंती आहे.

श्री.राजेश टोपे : मा.श्री.भुजबळ साहेबांनी उत्तर दिलेले आहे की, नवीन महाराष्ट्र सदन बांधण्यात येईल. महाराष्ट्र सदनाचा जो काही एफ.एस.आय. शिल्लक आहे, त्याबाबतीत विचार करण्यासाठी मा.भुजबळ साहेबांच्याच अध्यक्षतेखाली सन्माननीय आमदारांनाच घेऊन समिती गठीत करण्यात येईल.

श्रीमती सुधा जोशी :महाराष्ट्र सदन येथील उपहारगृहाच्या संदर्भामध्ये म्हटलेले आहे की, उपहारगृहातील विविध पदार्थांचा आपण आस्वाद घेऊ शकतो. पण या पदार्थांचे दर वाढविलेले आहेत, हे बाहेरच्या लोकांसाठी आहेत की कोणासाठी आहेत ? सर्व आमदारांना त्याच दराने पदार्थ दिले जातात, त्याचा काही विचार करण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, उपहारगृहाची परिस्थिती अत्यंत खराब होती. पण आता वातानुकुलीत उपहारगृह केलेले आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ...

ख-या अर्थाने महाराष्ट्रीयन माणसाला त्या ठिकाणी जाऊन त्यांना जसे पाहिजे त्यादृष्टीकोनातून खाद्यपदार्थात विविधता असावी या दृटीकोनातून आणि रेटच्या संदर्भात..

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, आमदारांची समिती नेमली आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडे जाऊन याबाबत तक्रार करावी. या गोष्टीसाठी सभागृहाचा वेळ कशाला घेता.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी रेटचा मुद्दा उपस्थित केला त्यासंदर्भात विचार करण्यात येईल.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे म्हणजे मृत्यूंचा महामार्ग बनणे.

**मु. शी.** : मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे म्हणजे मृत्युंचा महामार्ग बनल्या बाबत श्री मधुकर सरपोतदार वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रविशेट पाटील ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री मधुकर सरपोतदार यांनी "मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे म्हणजे मृत्यूंचा महामार्ग बनणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.... 3 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदार... 14:00

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. त्या पैकी पहिला प्रश्न असा की, दिनांक 1-7-2002 ते दिनांक 1-8-2004 या कालखंडामध्ये या हायवेवर कोण सर्व्हिस देत होते आणि त्या कालखंडामध्ये किती अपघात झाले, किती लोक मृत्यूमुखी पडले आणि त्या संपूर्ण कालखंडामध्ये किती लोकांना डॉक्टरांकडून फर्स्ट्एड उपचार मिळाले आहेत?

श्री. रविशेट पाटील : सभापती महोदय, या कालखंडामध्ये 7 लोक मयत झाले आहेत आणि 21 लोक जखमी झाले आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, मी या ठिकाणी तारीख देऊन त्या कालखंडातील माहिती विचारलेली आहे. दिनांक 1-7-2002 ते दिनांक 1-8-2004 या कालखंडातील प्रश्न विचारला आहे.डॉ. कसबेकरांची सेवा बंद केली त्यानंतरच्या कालखंडामध्ये नेमके काय घडले याचा मला शोध घ्यावयाचा आहे.

श्री रविशेट पाटील : सभापती महोदय, या तारखांची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री. मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, माझा अतिशय स्पष्ट प्रश्न आहे. मी तारखा सांगितलेल्या आहेत आणि त्या कालखंडामध्ये किती अपघात झाले, किती लोक मृत्यूमुख्री पडले यासंबंधीची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी. त्यांच्याकडे ही माहती नसेल तर ही माहिती नाही असे सांगावे.

श्री. रविशेट पाटील :सभापती महोदय सन 2000 साली एकूण अपघात 122 झाले.गंभीर जखमी 68 आहेत आणि मृत्यू 25 आहेत. 2001 साली एकूण अपघात 307 आहेत. गंभीर जखमी 162 आहेत आणि मृत्यू 65 आहेत. 2002 साली एकूण अपघात 404 आहेत. गंभीर जखमी 104 आहेत आणि मृत्यू 82 आहेत.2003 साली एकूण अपघात 440 आहेत. गंभीर जखमी 113 आणि मृत्यू 83 आहेत. 2004 साली एकूण अपघात 536 आहेत. गंभीर जखमी 110 आहेत आणि मृत्यू 73 आहेत. मार्च, 2005 पर्यंत एकूण अपघात 164 आहेत. गंभीर जखमी 64 अहेत आणि मृत्यू 31 आहेत अशी, ही माहिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



15-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) GG-3

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, डॉ. कसबेकरांनी ही सेवा विना मूल्य देण्यास तयार असल्याचे महसमंडळास लेखी कळविले. माननीय मंत्रिमहोदय, श्री. गणेश नाईक यांच्याकडे याच्या विरोधात तक्रार केलेली आहे की, माझ्यावर अन्याय झालेला आहे. एवढे बिल मिळालेले नाही. आणि हे बिल न मिळाल्यामुळे मी सेवा देऊ शकत नाही.लोकांचे प्राण वाचवू शकत नाही. जखमिंना ट्रिटमेंट देऊ शकत नाही.या दोन्ही मध्ये विसंगती दिसते. तेव्हा यातील नेमके सत्य काय आहे?

श्री. रविशेट पाटील :सभापती महोदय, सन 2000 मध्ये मुंबई द्रुतगती मार्गावर डॉ. कसबेकरांचे स्टर्लिंग हॉस्पिटल घेण्याचे ठरले. त्यांच्याबरोबर करार झाला. त्यांना महिन्याला रुपये 9 लाख 71 हजार मासिक शुल्क देण्याचे ठरले. दोन वर्षा नंतर सूपर्ण अपघाताची संख्या आणि डॉ. कसबेकरांचे हॉस्पिटलचे काम यांचा आढावा घेतला. त्यावेळी भाडे 9 लाख 71 हजार रुपये परवडत नाही म्हणून ही सेवा बंद करण्याच्या बाबतीत डॉ. कसबेकरांना लेखी सूचना देऊन सेवा बंद करण्यात आली.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील....

नंतर ही सेवा डॉ. कसबेकर यांनी विनामूल्य देण्याचे कबूल केले. तसे पत्र डॉ. कसबेकर यांनी दिले. आम्हाला तुमची सेवा परवडत नाही असे त्यांना सांगितल्यानंतर डॉ. कसबेकर यांनी मोफत सेवा देऊ असे मान्य केले. त्यानंतर त्यांनी दोन वर्षे मोफत सेवा देण्याचे मान्य केले आणि नंतर त्यांनी पुन्हा मला एवढी एवढी रिकव्हरी मिळाली पाहिजे असे बिल पाठविले. त्यानंतर तातडीने एक बैठक घेतली. बैठक घेतल्यानंतर आम्हाला हे परवडत नसल्यामुळे महामंडळाने दोन ठिकाणी गांधी हॉस्पीटल आणि लोकमान्य टिळक हॉस्पीटल यांना दरमहा 20 हजार रुपये याप्रमाणे देणे परवडेल म्हणून त्यांना सेवा करण्याची संधी दिली. त्या ठिकाणी दोन हॉस्पीटलला परवानगी दिल्यानंतर आणि त्यांची सेवा उपलब्ध झाल्यानंतर डॉ. कसबेकर यांचे काम परवडत नाही म्हणून ते रद्द करण्यात आले.

श्री. जितेंद्र आव्हाड : उत्तरामध्ये सांगण्यात आले की, डॉ. कसबेकर यांना दरमहा 9 लाख 71 हजार रुपये देण्याचे ठरविले होते. हे महाग आहे असे कोणत्या कारणास्तव ठरविले ? अमूक इतके प्राण गेले तर एवढा खर्च झाला पाहिजे असे काही पॅरामीटर शासनाने ठरविले आहे काय ? 9 लाख 71 हजार रुपये परवडत नाहीत म्हणून त्यांचा कंत्राट रद्द केला. त्या ठिकाणी मरणाऱ्यांची संख्या, जखमी झालेल्यांची संख्या पाहून हे परवडत नाही असे ठरविले आहे काय ? पैसाच जर सर्वस्व असेल तर सर्व हॉस्पीटल्स बंद करा. जे लोक मरत आहेत त्यांना मरु द्या. मूत्युचे आणि मुत्यूवर केलेल्या खर्चाचे काही पॅरामीटर्स ठरलेले असतील तर ते निदर्शनास आणावेत.

श्री. रविशेठ पाटील : सध्या दोन हॉस्पीटल्सचे जे भाडे आपल्याला आले ते फार कमी प्रमाणात आले. त्यामुळे 9 लाख 71 हजार रुपये देणे परवडत नसल्यामुळे त्यांची सेवा बंद केली.

श्री. अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी जे विचारले होते ते माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आले नाही. आपण डॉ. कसबेकर यांच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करुन देत होतो ती सेवा 1 जुलै, 2002 ला बंद केली आणि या मधल्या काळामध्ये मोफत सेवा उपलब्ध होती की, कोणाचीही सेवा उपलब्ध नव्हती हा विषय होता. डॉ. कसबेकर यांना खूप पैसे दिले जातात असा अधिकाऱ्यांचा समज आहे. त्या ठिकाणी एमएसआरडीसीने गाडया दिल्या होत्या.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. अरविंद सावंत ...

9 लाख 71 हजार रुपये हे केवळ भाडे नाही. 9 लाख 71 हजार रुपये हे भाडे आहे आणि बाकीचे चार्जेस वेगळे आहेत असे आहे काय ? 9 लाख 71 हजार रुपये ही रक्कम त्यांच्या सेवेचे मानधन आणि बाकीचे चार्जेस धरुन आहेत काय की निव्वळ हॉस्पीटलचे भाडे आहे ? यामध्ये रुग्णांचे जीवनमूल्य, त्यांचे प्राण वाचविणे जास्त महत्वाचे आहे. आता आपण गांधी हॉस्पीटल आणि लोकमान्य टिळक हॉस्पीटल यांची नावे वाचून दाखविली. ते किती लोकांचे प्राण वाचवू शकले हे महत्वाचे आहे. डॉ. कसबेकर यांच्यासाठी आपण पुन्हा चौकशी नेमणार काय ? डॉ. कसबेकर यांनी किती प्राण वाचविले ? ऑगस्ट 2002 पासून 2003 पर्यन्त म्हणजे नवीन सेवा सुरु करण्यात येईपर्यन्त मधल्या काळात जे लोक मृत्यू पावले त्याला जबाबदार कोण ? त्याची जबाबदारी कोणावर आहे ? त्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, ही जी दोन हॉस्पीटल्स निवडली आहेत त्यांच्याकडूनही तेवढीच सेवा मिळते. म्हणून या दोन हॉस्पीटल्सना सेवा करण्याची संधी दिलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या रस्त्यावर एवढे अपघात का होतात हा खरा प्रश्न आहे. त्यावर उपाययोजना केली तर अपघात टाळता येतील. त्याकरिता काय करणार ? आपण बांधकाम विभागातर्फे निवृत्त सचिव श्री. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली अपघात निवारण समिती तयार केली होती.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

या अपघात निवारण समितीने 2500 अपघातांची ठिकाणे शोधून ते दुरुस्त केले होते. हया रस्त्यावर अपघात होण्याचे मुख्य कारण म्हणजे हा संपूर्ण रस्ता सिमेंटचा आहे. या रस्त्यावर ताशी 120 कि.मी.च्या गतीने गाडया चालतात. परंतु ज्या जुन्या गाडया आहेत त्यांचे टायर घासलेले असतात, मारुती ही गाडी सुध्दा हलकी आहे, ही गाडी 120 च्या गतीने चालण्यासाठी केलेली नाही. हया गाडयांच्या टायरचे घर्षण झाल्याने ते फुटतात व गाडया उलटतात. जगामध्ये कॉंक्रिटवर मॅस्टिक केले जाते. त्यामुळे त्या गाडयांच्या टायरला कुशन मिळते आणि त्यामुळे घर्षण होत नाही, त्यामुळे वीज तयार होत नाही, म्हणून या रस्त्यावर मॅस्टिक केले पाहिजे. त्यासाठी पैसे लागतात. काही ठिकाणी आपण ते करतो आहे. माझी विनंती आहे की, अपघात न होण्यासाठी अपघातांचे निवारण समितीकडून सगळया अपघातांचा अभ्यास करुन त्याची कारणे शोधून सरकारने त्याठिकाणी वैज्ञानिकदृष्टया उपाययोजना करावी. वैद्यकीय सुविधा डॉ.कसबेकर देतात की, लोकमान्य टिळक रुग्णालयात मिळते हा प्रश्न महत्वाचा नाही. अपघात झाल्यानंतर त्याला वाचविणे हे महत्वाचे आहे, हा प्रश्न आहे. उद्या वेळ आली तर तेथे हेलिपॅडची व्यवस्था करुन हेलिकॉप्टर ठेवता येईल. त्यात कठीण नाही. अपघात झाल्यानंतर लोकांना लगेच हॉस्पिटलमध्ये नेता आले पाहिजे हे महत्वाचे आहे. या रस्त्यावर रिलायन्सचे धीरुभाई अंबानींच्या पत्नीच्या नावे हॉस्पिटल आहे तेथे एमएसआरडीने कॉन्ट्रॅक्ट केले तर तेथे सुध्दा व्यवस्था होऊ शकते, चांगली हॉस्पिटल सुविधा मिळाली पाहिजे यासाठी शासन काय करणार आहे ? अन्याय होऊ नये म्हणून सांगतो. हा रस्ता तयार होण्यापूर्वी जो जुना मुंबई-पुणे हायवे होता त्याच्यावर 3450 ते 3600 अपघात दरवर्षी होत असते. त्यामुळे बाहेर असे चित्र उभे राहिले की, एक्सप्रेस हायवे हा मृत्यूचा सापळा असल्यामुळे तेथे अपघात होतात. अपघाताची तुलना करणे बरोबर नाही. अपघात व्हावयास नको. मुंबई-पुणे या जुन्या रस्त्यावर होणा-या अपघातांची संख्या लक्षात घेता हे प्रमाण आता खूप पटीने कमी झालेले आहे. आता अपघात होतात तेही होऊ नयेत यादृष्टीने आपण ठोस काय उपाययोजना करणार आहात ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरीसाहेबांनी ज्या सूचना मांडल्या आहेत त्याचा निश्चित विचार करुन आणि लवकरात लवकर जेवढे करता येईल तेवढे करु.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबई-पुणे हा द्रुतगती महामार्ग ऑगस्ट, 2004 पासून मे.आयडीयल रोड बिल्डर्स यांना 15 वर्षाकरिता दिलेला आहे. डॉ.कसबेकर यांचे बिल जास्त येते म्हणून त्यांना दोन वर्षात बाहेर काढले आहे. आता त्यांना कोणते निकष लावले आहेत ? जास्तीत जास्त अपघात होईल, अपघातग्रस्तांना ते कोणतीही ट्रिटमेंट देणार नाहीत, दुर्लक्ष करील अशा व्यक्तीसाठी 15 वर्षाची मुदत ठेवली आहे काय ? हया मे.आयडीयल रोड बिल्डर्सवर कोणत्या सेवा, शर्ती टाकलेल्या आहेत ? अपघात होऊ नयेत म्हणून कोणती काळजी घेतली जाणार आहे ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी अशाप्रकारे उत्तर देणे बरोबर नाही.

श्री.दिवाकर रावते : आपण एखादे रुग्णालय बांधतो तेव्हा त्यात जास्तीत जास्त रुग्ण यावेत यासाठी बांधत नाही तर आलेले रुग्ण बरे होऊन लवकर घरी जावेत आणि खाटया रिकाम्या रहाव्यात यासाठी बांधले जाते. एखाद्या डॉक्टरची भरभराट व्हावी म्हणून त्यांना बोलवितो अशातील भाग नाही. या शासनाची एक गोष्ट कळली नाही. त्या हायवेवर होत असलेल्या अपघातांची संख्या आणि शासन देत असलेले पैसे हयांचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे पैसे जास्त होत असल्यामुळे आम्ही रद्द करीत आहोत याला कोणता शहाणपणा म्हणावयाचा ? अपघातग्रस्त माणसाला व्यवस्था मिळणे हे महत्वाचे आहे. मंत्रिमहोदय आपण त्या भागातील आहात. एकदा पेण-पनवेल सोडले की अपघात जास्त होतात. ही सेवा चालू ठेवण्यासाठी आपण निर्देश द्यावेत. त्याचा व्याप वाढला तर पैसे वाढवून द्यावेत. कारण लोकांना सेवा उपलब्ध होणे महत्वाचे आहे. तुमचे अधिकारी कसले गणित मांडत बसतात की, एवढे मृत झाले, एवढे पैसे द्यावे लागले ? हे पैसे जास्त आहेत. ही तुलना न करता ही सेवा ताबडतोब उपलब्ध होण्यासाठी आपण निर्देश द्यावेत अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेट पाटील : यासंदर्भात आम्ही डॉ. कसबेकर यांच्याबरोबर बसून चर्चा करु आणि परवडत असेल तर त्याबाबतीत निश्चित विचार करु.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

**पृ.शी.** : ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील टाटा कंम्पाऊंड येथील गोदामावर छापा टाकून जप्त केलेला तेलसाठा

**मु.शी** : ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील टाटा कंम्पाऊंड येथील गोदामावर छापा टाकून जप्त केलेला तेलसाठा याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. गणेश नाईक (उत्पादश्न शुक्ल व कामगार मंत्री) : सभापती महोदय, श्री. जयंत पाटील. वि.प.स. यांनी "ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील टाटा कम्पाऊंड येथील गोदामावर छापा टाकून जप्त केलेला तेलसाठा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : मे. गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लि. पुर्णा, ता. भिवंडी यांच्या गोदामावर धाड टाकून ज्या नमुन्यांची तपासणी केली त्यामध्ये 6 नमुने अप्राणित आढळून आलेले आहेत. त्याबद्दल संबंधितांवर कोणता गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे ? भिवंडी परिसरामध्ये असलेल्या गोदामामधून अशा प्रकारे भेसळीच्या घटना घडत आहेत, त्या रोखण्यासाठी अशा गोडाऊनच्या बाबतीत शासन कोणती ठोस कारवाई करणार आहे ?

श्री. गणेश नाईक : मे. गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लि. यांनी परदेशातून तेल मागविले होते. त्यामध्ये तिळाचे तेल नसल्यामुळे त्या तेलाची प्युअर घीमध्ये मिलावट करण्याची शक्यता आहे असे समजून ते तेल ताब्यात घेण्यात आले आणि नमुने तपासण्यात आले. जे नमुने योग्य आढळले तो माल परत दिलेला आहे. परंतु जे नमुने अप्रमाणित आढळले तो माल ताब्यात घेतलेला आहे. त्या मालावर प्रक्रिया करुन खात्यामार्फत त्यासंदर्भात कारवाई होईल. अशा प्रकारे ज्यांनी भेसळ करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : मालकाचे नाव काय आहे ?

श्री. गणेश नाईक : कंपनीचे नाव मे. गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लि. असे आहे. मालकाचे नाव आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अमरावतीतील कठोरा मार्गावरील टेलि नेटवर्क या दुकानात महाराजा कंपनीच्या शीतपेयात आढळलेले मासांचे तुकडे व शेवाळ

**मु.शी** : अमरावतीतील कठोरा मार्गावरील टेलि नेटवर्क या दुकानात महाराजा कंपनीच्या शीतपेयात आढळलेले मासांचे तुकडे व शेवाळ याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. गणेश नाईक ( उत्पादन शुल्क व कामगार मंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी "अमरावतीतील कठोरा मार्गावरील टेलि नेटवर्क या दुकानात महाराजा कंपनीच्या शीतपेयात आढळलेले मासांचे तुकडे व शेवाळ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : अशा प्रकारच्या विविध घटनांसंबंधीचे विषय या सदनामध्ये मागील तीन वर्षापासून सातत्याने उपस्थित करण्यात आलेले आहेत. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाच्या अमरावती कार्यालयातील अधिका-यांनी मुलांच्या खाद्य पदार्थांची तपासणी केलेली आहे. परंतु ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडलेल्या आहेत त्या त्या ठिकाणी अशा प्रकारे किती वेळा तपासणी केली गेली? निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, " औपचारिक नमुने घेण्यासाठी पुरेसा साठा नसल्याने सदर पेप्सीचा अनौपचारिक नमुना घेण्यात आलेला आहे" तेव्हा अनौपचारिक नमुना म्हणजे काय याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री. गणेश नाईक : श्रीराम रेफ्रिजरेशन या कंपनीमध्ये ही पेप्सी बनलेली होती. त्या पेप्सीमध्ये शेवाळ सापडले, त्यामुळे मुलांना त्रास झाला. या प्रकरणी श्रीचंद वसंतवाणी आणि मुरली आहुजा या दोघांवर कारवाई केलेली आहे. ज्या मुलांना उलट्यांचा त्रास सुरु झाला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार केल्यानंतर त्यांना घरी पाठवण्यात आले. मुलांनी जी पेप्सी सेवन केली त्या पेप्सीचे नमुने मिळू शकले नाहीत. त्यामुळे स्टोरमधील नमुन्यांची तपासणी केली आणि त्यामध्ये शेवाळ सापडले.

--

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : द्राक्षांच्या वाईनला व्हॅटमधून मुक्त करणे

**मु.शी** : द्राक्षांच्या वाईनला व्हॅटमधून मुक्त करणे याबाबत प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. डॉ.सुनील देशमुख (अर्थ व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी "द्राक्षांच्या वाईनला व्हॅटमधून मुक्त करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : महाराष्ट्र शासनाने सन 2001 साली शेतीपूरक उद्योग म्हणून द्राक्षांवर आधारित वायनरींचे प्रकल्प उभे करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. नाशिक जिल्ह्यामध्ये एक आणि सांगली जिल्हयामध्ये एक असे दोन वायनरींचे प्रकल्प शासनाच्या पुढाकाराने सुरु झाले. कोट्यवधी रुपयांचे कर्ज घेऊन नवीन वायनरींचे प्रकल्प सुरु करण्यात आले. आता व्हॅटच्या अंमलबजावणी मुळे या वायनरींवर 20 टक्के कराची आकारणी होत असल्यामुळे या उत्पादकांना आपली वाईन बाजारात विकणे कठीण झाले आहे. कारण या वाईन पेक्षा परदेशातून आयात केलेली वाईन स्वस्त पडते.जी मोठ मोठी हॉटेल्स चालविली जातात त्यामधूनही परदेशी वाईन खरेदी करणे पसंत केले जाते. त्यामुळे वायनरीजमध्ये ज्यांनी गुंतवणूक केलेली आहे त्यांना मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागत आहे. कोट्यवधी रुपयांची वाईन पडून आहे. तेव्हा त्यांच्यावर लावलेली 20 टक्के कराची आकारणी शासन रद्द करणार आहे काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 14:20

प्रा. शरद पाटील...

जी प्रदत्त समिती आहे, त्या प्रदत्त समितीच्या बैठकीमध्ये हा विषय मांडून हा विक्रीकर कमी करण्याचा मनोदय शासनाने या ठिकाणी व्यक्त केलेला आहे. ही प्रदत्त समिती राज्य स्तरावरची आहे की केंद्र स्तरावरची आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. आणि या प्रदत्त समितीमध्ये महाराष्ट्रातील वाईन उद्योजकांची बाजू मांडून त्यांच्यावरील कराची आकारणी रद्द करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, यासबंधीचा निर्णय घेण्याचा अधिकार आपल्या अखत्यारित होता. त्यावेळस आपण राज्यातील वाईनरीज ज्या आहेत त्यांना सवलती देण्याचा तसेच त्यांना उत्तेजन देण्याचे धोरण आखले होते. त्याप्रमाणे या व्यवसायाच्या सेल टॅक्स 20 टक्क्यांवरुन 4 टक्क्यांवर आणला होता. आता आपण 31 मार्च नंतर व्हॅट सिस्टीमवर गेलो आहोत. या संदर्भात भारतातील सर्व वित्तमंत्र्यांची एक इंम्पॉवर्ड कमिटी आहे. त्या कमिटीच्या समोर वेगवेगळया राज्याच्या वेगवेगळया गोष्टी आलेल्या आहेत. सर्व विचार करुनच यासंबंधीचा निर्णय घेतला गेलेला आहे. करा आकारणी कमी जास्त करण्याचे अधिकार आता आपल्याकडे राहिलेले नाहीत. आपल्याला हा कर 20 टक्क्यावरुन 4 टक्क्यावर आणावयाचा असेल तर आपल्याला त्यासाठी इंम्पॉवर्ड कमिटीच्या समोर हा विषय मांडावा लागेल. आम्ही निवेदनात स्पष्ट म्हटले आहे की, ही बाब त्या कमिटीच्या समोर मांडू. त्यावेळी त्या कमिटीचा जो निर्णय होईल तो आपल्याला मान्य करावा लागेल. आपली भावना यासंदर्भात पॉझीटीव्ह आहे. हा मुद्दा त्या कमिटीसमोर सकारात्मक भूमिकेतून मांडणार आहोत.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : व्हॅट आपल्या राज्यात लागू करण्यात आलेला आहे. राज्यातील बरेच विषय आहेत की त्यासाठी इंम्पॉवर्ड कमिटीच्या समोर जावे लागणार आहे. सुरुवातीलाच आपण सर्व गोष्टींचा विचार करावयास पाहिजे होता. नाशिक, सांगली, सातारा, या विभागात मोठया प्रमाणात द्राक्षाचे उत्पादन होते. द्राक्ष हा ॲग्रीकल्चरल प्रॉडक्ट आहे. अग्रीकल्चरलवर कोणत्याही प्रकारचा टॅक्स नाही. ज्यांनी द्राक्षांचा साठा करुन ठेवलेला आहे. त्या साठयावर त्या उत्पादकास 20 टक्के कर भरावा लागला तर त्यांना मिळालेल्या दरापेक्षा कमी दर त्या द्राक्ष उत्पादक शेतक-याला मिळेल. यामध्ये द्राक्ष उत्पादक शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान आहे. राज्यात व्हॅट आणत असताना आापल्याला ज्या अडचणीच्या गोष्टी आहेत त्या गोष्टीचा समावेशङ

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी...

करताना आपली बाजू त्यांनी का मांडली नाही. प्रत्येक वेळेला सांगितले जाईल की, इंम्पॉवर्ड कमिटी समोर आम्ही यासंदर्भातील बाजू मांडू. या राज्यात व्हॅट लागू होईल की नाही अशी परिस्थिती राज्यात निर्माण झालेली आहे.पेट्रोल, डिझेल, यावरील कराचा प्रश्न आहे. द्राक्ष तर शेतक-यांचा महत्वाचा प्रश्न आहे. मागील वर्षाच्या दुष्काळात द्राक्ष उत्पादक शेतक-यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. राज्य सरकारने इंम्पॉवर्ड कमिटीचा आसरा घेऊ नये.त्या ठिकाणी अशा ज्या काही अडचणीच्या गोष्टी आहे त्या निदर्शनास आणून देऊन हे प्रश्न सोडविले पाहिजे. कमिटी जर हे प्रश्न सोडविणार नसेल तर आम्ही व्हॅटमध्ये सामील होणार नाही. अशी भूमिका शासनाला घ्यावी लागेल. इंम्पॉवर्ड कमिटीमध्ये आपले हे अडचणीचे मुद्दे सुटत नाहीत तो पर्यन्त आपण व्हॅटला विरोध करणार काय ?

डॉ. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्यांना मला सांगावयाचे आहे की, वाईनचे कंझम्प्शन सर्वसाधारण माणूस करीत नाही. आर्थिक उच्च घटकातील व्यक्ती आहेत त्यांच्याकडून यासंबंधीचे कंझम्शन होत असते. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला त्याच्याशी आम्ही सहमत नाही. यासंबंधीचे कंझम्प्शन सर्वसाधारण गरीब माणूस करीत नाही....

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : वाईन तयार होते हा पुढचा भाग आहे. द्राक्ष उत्पादक शेतक-यावर खरा परिणाम होणार आहे. द्राक्ष उत्पादक शेतक-यांनी साठविलेल्या मालास दर अतिशय कमी मिळणार आहेत...

डॉ. सुनील देशमुख : या संबंधीचे कंझम्प्शन उच्च आर्थिक घटकाकडून होते. या घटकावर थोडा जास्त ताण पडला. यानंतरही आम्ही सांगितले आहे की, यासंदर्भातील निर्णय एकमताने झ ाालेला आहे. न्यूनत्तम धोरणानुसार यासंदर्भात ऑलरेडी निर्णय झालेला आहे. त्यामध्ये काही बदल करावयाचे असतील तर त्या कमिटीच्या समोर जाणे अनिवार्य आहे. आम्ही या कमिटी समोर जाऊ त्यावेळी या विषयाच्या बाबतीत सकारात्मक भूमिका मांडणार आहोत. याचे रॉ मटेरियल हे ॲग्रीकल्चरल प्रॉडक्ट आहे. या ठिकाणी ही बाब उपस्थित करुन त्यासंदर्भाती उत्तर मी देऊ शकणार नाही. यासंदर्भात इंम्पॉवर्ड कमिटी समोर जाणे अनिवार्य आहे. सकारात्मक भूमिका घेऊन आम्ही त्या ठिकाणी हा मुद्दा उपस्थित करणार आहोत....

यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 14:25

श्री. नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय, द्राक्षाचे उत्पादन अतिशय नाजूक,रिस्की आणि खर्चिक आहे. शासनाने द्राक्ष उत्पादकांसाठी विशेष हमी आणि सोई-सवलती उपलब्ध करुन दिल्या आणि त्यावर विश्वास ठेवून अतिशय रिक्स घेऊन वाईन निर्माण करण्यात आली. मंत्रीमहोदय म्हणतात त्याप्रमाणे दारुचा उपयोग उच्च आर्थिक घटक करतात. तरीसुध्दा उच्च आर्थिक घटकाची चिंता न करता उत्पादन करणा-या शेतक-याची चिंता शासनाने केली पाहिजे. म्हणून यासंदर्भात कर कमी करुन शासन द्राक्ष उत्पादक शेतक-यांना दिलासा देईल काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की, एन्पॉवर्ड समितीपुढे शासन सकारात्मक भूमिकेतून जाणार आहे. सभागृहातील सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन शासन आपली भूमिका निश्चित करील. मी निगेटीव्ह उत्तर दिलेले नाही. मी पूर्वीच सांगितल की निर्णय बदलावयाचा असेल तर समितीपुढे जावेच लागेल. शासन निश्चितपणाने सकारात्मक भूमिका समितीपुढे सादर करील.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, नाशिक जिल्हयामध्ये दारुची निर्मिती करणारे कारखाने आहेत. वाईन म्हणजे दारु नाही. ते फरमेंटेड ड्रींक आहे. सर्वात कमी अल्कोहोल असणारी वाईन हार्टला चांगली आहे. शासनाचा सकारात्मक दृष्टिकोन आहे असे सांगितले. 4 टक्के विक्रीकर लावायचा आहे. जोपर्यंत हा इफेक्ट लागू होत नाही होपर्यंत कराच्या वसूलीस शासन स्थगिती देईल काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी मधीच म्हटले नाही की वाईन ही दारु आहे. राज्य सरकारच्या अखत्यारितील विषय होता तोपर्यंत 20 टक्क्यावरुन 4 टक्क्यापर्यंत कर आणला. आता आपण एका सिस्टीमधून दुस-या सिस्टीमध्ये गेलो आहोत. फ्रेमवर्कमध्ये बदल करण्याचा अधिकार शासनाला नाही. तो बदलण्यासाठी समितीपुढे जावे लागेल. फ्रेमवर्कच्या बाहेर जाऊन शासन पुन्हा सकारात्मक भूमिका घेऊन समितीपुढे जाणार आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आताच मंत्रीमहोदयांनी सांगितले की, वाईन ही दारु नाही. दारु नसेल तर दारु विक्रीच्या दुकानांना वाईनशॉप असे का म्हणतात ?

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, वाईन ही दारु नसेल तर वाईन किरकोळ दुकानांतून विक्रीसाठी उपलब्ध करुन दिली जाईल काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, धोरणात्मक बाब आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : याठिकाणी या प्रश्नाच्या अनुषंगाने शेतक-यांच्या उत्पादनावरील असलेली ही पक्रिया आहे. सदस्यांची भावना अशी आहे की, याबाबतचा विचार त्याच वेळी झाला असता तर शेतक-यांना त्याचा फायदा मिळाला असता. आता यासंदर्भात विचार करण्याचे अभिवचन मंत्रीमहोदयांनी दिलेले आहे. राज्य शासनाच्या पातळीवर शक्य नसेल तर राष्ट्रीय पातळीवर याचा विचार करुन शेतक-यांच्या या वाईनरी प्रकल्पाचा फायदा व्हावा यादृष्टीने शासनाने काळजी घ्यावी.

यानंतर श्री. गायकवाड ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी .: अकोला येथील एका महिलेवर भोंदूबाबाने केलेला बलात्कार

मु.शी : अकोला येथील एका महिलेवर भोंदूबाबाने केलेल्या बलात्कारा बाबत डॉ.नीलम गो-हे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी " अकोला येथील एका महिलेवर भोंदूबाबाने केलेला बलात्कार " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांमध्ये आणि शहरांमध्ये अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असतात.आचार्य अत्रे यांचे "बुवा तेथे बाया " हे गाजलेले नाटक याच विषयावरचे आहे.दुर्दैवाने महिलांवर अनेक वर्षापासून अत्याचार होत आहेत. ही अत्यंत चिंताजनक गोष्ट आहे. या प्रकरणामध्ये या महिलेचा तिच्या कुटूंबियांनी मानसिक छळ केलेला आहे.यासंबंधी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. ज्या महिलेचा एवढा मानसिक छळ करण्यात आला होता तसेच बलात्कार करण्यात आला होता ती महिला सध्या कोठे आहे ?तिचे समुपदेशन करण्यात आले होते काय ? तिला संरक्षण देण्यात आले होते काय ?महिलांवर घडणा-या अत्याचारांच्या गुन्हयांचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरावर उप महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. ज्या महिलांवर अत्याचार होतात किंवा भोदूबाबा महिलांना फसवतात अशा प्रकरणांचा आढावा घेण्याकरता एक महिला कक्ष नेमण्यात आला आहे. महाराष्ट्रातील दहा जिल्हयामध्ये हा कक्ष स्थापन करण्यात आला असून सामाजिक सुरक्षा समितीपेक्षा हा कक्ष वेगळा आहे.त्या कक्षांमध्ये समुपदेशक असतात आणि त्यांच्या मार्फत या महिलांचे समुपदेशन केले जाते.तेव्हा राज्य स्तरावर उप महानिरीक्षक दर्जाच्या अधिका-यांमार्फत या महिलेचे पुनर्वसन करण्यासंबंधी प्रयत्न केले जाणार आहेत काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ही अत्याचार पीडित महिला तिच्या माहेरी म्हणजे वारा,तालुका मंगरुळपीर येथे सध्या आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी असे विचारले की ,अत्याचार पीडित महिलांचा आढावा उच्च अधिका-यांच्या मार्फत घेऊन संबंधित महिलांचे पुनर्वसन करता येईल काय ? त्याबाबत मी सांगू इच्छितो की, त्यासाठी उच्च अधिका-याची नेमणूक करण्यात येऊन त्यासंबंधीचा विचार करण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, श्री.नागोराव खटारे नावाच्या साधूने या महिलेवर अत्याचार केला आहे या महिलेने स्वत: तक्रार केली म्हणून संबंधित महिलेच्या सासरच्या व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे. परंतु ही केस उघडकीस आल्यानंतर इतरही भागात अशा काही घटना घडल्या आहेत किंवा नाहीत यासबंधी काही चौकशी केली आहे काय ? मध्यंतरी को-ल्हापूर येथे तोडकर महाराजांचे प्रकरण उघडकीस आले होते.त्यामध्ये अनेक मुलींना व महिलांना वाईट अनुभव आला होता .हे प्रकरण तर अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहे त्या महिलेच्या सासरच्या

3..

15-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) MM 3

VTG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.कानडे 14.30

श्रीमती कांता नलावडे .....

लोकांनीच तिला साधूच्या ताब्यात दिले होते.तेव्हा कोल्हापूरच्या प्रकरणापासून अशा किती घटना उघडकीस आल्या आहेत ? आणि त्या महिलांचे पुनर्वसन कशा पध्दतीने करण्यात येणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :या प्रकरणा व्यतिरिक्त इतर कोणत्याही महिलांची तक्रार आलेली नाही. या संदर्भात चौकशी करण्यात आल्यानंतर इतर कोणत्याही महिलांनी काहीही सांगितलेले नाही.दिनांक 2.3.2005 रोजी या महिलेच्या पतीनेच त्या साधुबरोबर तिला यात्रेकरता पाठविलेले होते.त्यावेळी त्याने या महिलेवर अत्याचार केला होता.या संदर्भात फक्त एकाच महिलेची तक्रार आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे उत्तर मी मघाशीच दिलेले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) MM 4
VTG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.कानडे 14.30

पृ.शी : नागाव,ता.उरण,जि.रायगड येथील ओएनजीसी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे

मु.शी नागाव,ता.उरण,जि.रायगड येथील ओएनजीसी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) :सभापती महोदय,श्री.जयंत प्र.पाटील यांनी " नागाव,ता.उरण,जि. रायगड येथील ओएनजीसी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदना नंतर -

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पग्रस्तांची जमीन पुन्हा काढून घेण्यात आली आहे. या प्रकल्पग्रस्तांना पहिल्यांदा विस्थापित केले होते.व त्यांना जी जमीन दिली होती ती जमीन पुन्हा त्यांच्याकडून शासन ताब्यात घेत आहे.या संदर्भात जे निवेदन करण्यात आलेले आहे त्यामुळे

माझे समाधान झालेले आहे. परंतु मला फक्त एका गोष्टीचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांकडून हवा आहे. कालच जिल्हा परिषदेचे सदस्य श्री.चारुदत्त पाटील यांच्या नेतृत्वाखाली त्या भागातील प्रकल्पग्रस्त शेतक-यानी निदर्शने केली होती तसेच उपोषण केले होते त्यांचे पुनर्वसन करण्यासबंधी जिल्हाधिका-यांनी त्यांना आश्वासन होते..माझी एकच मागणी आहे की त्या नागाव आणि म्हातवली ग्राम पंचायतीमधील सर्व्हे नंबर,139 व 140,147 याच ठिकाणी होणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

`

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 14:35

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, 13.4.2005 रोजी माननीय व्यवस्थापकीय संचालक, सिडको आणि जॉईंट एम.डी. या सगळ्यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापनाची बैठक झाली आणि त्या सगळ्यांचे त्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात येणार आहे. आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी जो सर्व्हे नंबर सांगितला किंवा त्या पंचायतीच्या दृष्टीकोनातून तेथे त्यांचे पुनर्वसन केले जाईल काय असे विचारले आहे तर जरूर संपूर्णत: त्या सगळ्यांना विश्वासात घेऊनच त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल इतकेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

**सभापती** : नियम 93 खालील सुचनांवरील निवेदने आता संपली आहेत. यानंतर पुढील विषय घेतला जाईल.

****

**औचित्त्याच्या मुद्याबाबत** ......

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला आपल्या परवानगीने एक औचित्त्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी नियम 93 अन्वये 30 कोटीच्या भ्रष्टाचारासंबंधात एक सूचना दिली होती आणि त्यावर शासनाने निवेदन करावे असे निदेश आपण शासनाला दिले होते. खरे तर त्याच दिवशी निवेदन पटलावर ठेवले जावे अशी मागणी मी केली होती. परंतु आपण नंतर निवेदन करण्यात येईल म्हणून सांगितले. त्याप्रमाणे निवेदन आज होणार होते. याच संदर्भात संबंधित उप अभियंता श्री.शेळके यांनी मला दूरध्वनी केला व त्यांचा विषय सभागृहात मी उपस्थित करू नये असे मला त्यांनी सांगितले. परंतु मी आज सभागृहात उपस्थित राहणारच आहे असे मी त्यांना सांगितल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, ठीक आहे. मग आज हे निवेदन सभागृहामध्ये होणारच नाही अशी व्यवस्था मी केलेली आहे. सभापती महोदय, जिल्हा परिषद, सा.बां.विभाग, सांगोला चे उपअभियंता श्री.शेळके हे अशा प्रकारे मला सांगत होते आणि खरोखरी तसेच आज होत आहे. आज हे निवेदन या ठिकाणी होत नाहीए. ....

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जे सांगितले ते अत्यंत गंभीर आहे. तेव्हा याबाबतीत मी इतकेच सांगतो की, संबंधित विभागाने, मंत्री महोदयांनी आज सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी दिलेले नियम 93 अन्वयेच्या सुचनेसंबंधात जी काही आतापर्यंत माहिती त्यांचेकडे असेल ती घेऊन निवेदन करावे.

...... एनएन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

सन्माननीय राज्यमंत्री श्री.टोपे यांनी संबंधित विभागाच्या.. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना किंवा राज्यमंत्र्यांना सदनामध्ये मी आता जे निदेश दिले आहेत त्याची माहिती द्यावी. या संबंधात पूर्ण माहिती आता तुमच्याकडे नसेल तरी जेवढी काही माहिती उपलब्ध असेल तेवढी माहिती सदनाला आजच्या आज देणे हे आपले काम आहे. दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले ती अतिशय गंभीर अशीच बाब आहे. एक म्हणजे परवानगीशिवाय या विभागामध्ये येणे हेसुद्धा नियमबाह्य आहे. असे असतानाही संबंधित उपअभियंता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना भेटले आणि त्यांना सभागृहात उपस्थित राहू नये असे सांगितले आणि त्या उपरही आज निवेदन होणारच नाही अशी व्यवस्था मी केली आहे, मी हे सारे मॅनेज केलेले आहे असे सांगणे म्हणजेच याचा अर्थ ते बेफाम आहेत. तेव्हा त्या उपअभियंता यांना बडतर्फ करण्याचीही व्यवस्था संबंधित विभागाने, सार्वजनिक बांधकाम विभागाने करावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपण दिलेले निदेश निश्चितपणे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना कळविण्यात येतील आणि त्या संदर्भात कारवाई करण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, याच अनुषंगाने मी देखील एक बाब आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. गेल्या काही दिवसापूर्वी एका प्रामाणिक इंजिनिअरच्या बदलीचा प्रस्ताव पुढे आल्यामुळे मी स्वत: संबंधित मंत्री महोदयांना भेटून सदर इंजिनिअरची बदली न करण्याची विनंती केली होती आणि त्यासंबंधात त्याने केलेल्या चांगल्या कामांचा दाखला देखील मी त्यांना दिला. त्यांनी तो मान्य केला. पण तुम्ही राजकीय दबाव आणून आम्हाला काम करण्यापासून रोकता आहात हे कारण देऊन त्या संबंधित अधिकाऱ्याला शोकॉज नोटीस देण्यात आली. सभापती महोदय, आता आमदारांचे काही अधिकार असतात, लोकप्रतिनिधी म्हणून ते काम करीत असतात म्हणून ते काही प्रश्न घेऊन अधिकाऱ्यांकडे जाणार असतील आणि त्यावर अशा प्रकारे जर कारवाई होणार असेल तर आमच्या अधिकारांवर ती एक प्रकारे गदा आहे. तेव्हा कृपया आपण शासनाला या बाबतीत काही आदेश वा निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, बदली किंवा अशा काही गोष्टींबाबत या सदनाने किंवा मी स्वत: येथे फार काही नोंद घ्यावी असे मला वाटत नाही. परंतु आपण या संदर्भात माझ्या दालनामध्ये आलातर जरूर आपण याबाबत चर्चा करू आणि या संदर्भात आपणास काही मदत करता आली तर ती मी जरूर करीन. .....एनएन 3 ..



KBS/ MAP/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 14:35

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : ठीक आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना देखील मी सांगू इच्छितो की, त्यांनी जी बाब येथे उपस्थित केली आणि जे काही येथे सांगितले, त्याबाबतची जी काही वस्तुस्थिती आहे ते कथन करणारे लेखी पत्र देखील आपण मला द्यावे.

श्री. मधुकर चव्हाण : ठीक आहे.

**सभापती :** नियम 93 अन्वये आलेल्या सुचनांपैकी ज्या सुचनांसंबंधात मी शासनाला निवेदन करण्यास सांगितले होते त्यापैकी 4-5 सुचनांवरील निवेदने अद्याप प्राप्त झालेली नाहीत. मी शासनाला याबाबत सांगतो की, कामकाज संपेपर्यंत ही निवेदने सभागृहात येतील या दृष्टीने कारवाई करावी. वाटल्यास त्या सूचना कोणत्या आहेत याची यादी मी आता देतो ती आपण लक्षात घ्यावी. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उद्या निवेदने आली तरी चालेल. ...

**सभापती :** उद्या केवळ आपल्याकडे विधेयके घेतली जाणार आहेत. तर मी येथे कोणाकोणाच्या सुचनांवर निवेदने यावयाची आहेत त्यांची यादी सांगतो. 1) श्री.अनंत तरे यांनी 'चक्री वादळात झालेला मृत्यू' यासंबंधातील सूचना आहे, 2) डॉ.दीपक सावंत यांची 'कुपोषणाने झालेले मृत्यू', 3) श्री.नितीन गडकरी यांची 'गैर कृषी आकारणी' , 4) श्री.मधुकर चव्हाण यांची 'सांगोला येथील 30 कोटीचा भ्रष्टाचार' याबाबत आणि 5) श्री.पांडुरंग फुंडकर यांची 'डान्स बार बंद करण्यासंबंधात श्री.मनजितसिंग सेठी यांनी केलेले वक्तव्य' या बाबत सूचना आहे. या पाच सुचनांसंबंधातील निवेदने अजून आलेली नाहीत. तरी आता यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

( यानंतर श्री.जागडे .... ओओ 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील विना अनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या फ्री शीप बाबत, परीक्षा फी बाबत तसेच शिष्यवृत्तीबाबत निर्णय घेण्यात यावा, अशा प्रकारचे निदेश आपण दिले होते. परंतु त्या निदेशांचे अजूनही पालन इ ाालेले नाही. या बाबत माननीय सभापती महोदय, मी आपणाला एक पत्रही दिले आहे.

**सभापती** : होय. आपले पत्र मला मिळाले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 15 दिवसापूर्वी हा विषय या ठिकाणी चर्चेला आला होता. शासकीय महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत आहे. परंतु विना अनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ही सवलत मिळत नाही. गेल्या वर्षी ही सवलत देण्यात आली होती. परंतु या वर्षी ही सवलत देण्यात आलेली नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी या बाबत असे सांगितले होते की, " यासाठी जवळ जवळ 80 कोटी रुपये लागणार आहेत. तेवढा निधी उपलब्ध नसल्यामुळे आम्ही सवलत देऊ शकत नाही. " त्यावेळी माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे तसेच दोन्ही बाजुच्या सदस्यांनी जोरदार मागणी केली. त्यावेळी शासनाने या बाबत 15 दिवसात निवेदन करण्यात येईल, असे सांगितले. माननीय सभापती महोदय, आपण या बाबतचे निवेदन 15 दिवसात करण्याबाबतचे निर्देश दिले होते. राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या एक लाखाच्या वर आहे. त्यांना ही सवलत मिळाली पाहिजे. म्हणून अधिवेशन संपण्यापूर्वी या बाबतचे निवेदन झाले पाहिजे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय मिळाला पाहिजे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांचे पत्र मला प्राप्त झाले आहे. 15 दिवसापूर्वी या बाबत धोरणात्मक निर्णय करण्यात येईल, असे मा. ओ.बी.सी. आणि भटक्या विमुक्त जाती-जमाती मंत्र्यांनी सभागृहाला आश्वासन दिले होते.

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, या बाबत आपण निदेश दिले होते. या बाबतचे निवेदन करावयाचे नसून या बाबत कॅबिनेटकडे जाऊन निर्णय करावयाचा आहे. तशी नोट तयार करुन पाठविण्यात आली आहे. त्याबाबत आम्ही सारखा पाठपुरावा करीत आहोत. एका कार्यकमानिमित्त श्री. सुधाकर गणगणे आणि मी भेटलो असता, मा. मुख्यमंत्र्यासमोर हा प्रश्न

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरुपसिंग नाईक....

माननीय सदस्य श्री. गणगणे यांनी उपस्थित केला होता. आठ दिवसाच्या आत या बाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो मा. मुख्यमंत्र्यांकडे गेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या बाबत मान्यता दिल्यानंतर कॅबिनेटसमोर हा विषय जाईल. त्यानंतर कॅबिनेटने या बाबतचा निर्णय घ्यावयाचा आहे.

( यानंतर श्री. सरफरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर: सभापती महोदय, आपण 15 दिवसाच्या आत झाले पाहिजे असे निदेश दिले. तर मग मंत्रिमहोदय 15 दिवसामध्ये कॅबिनेटपुढे कां गेले नाहीत?

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, 15 दिवसामध्ये कॅबिनेटची बैठक झाली नाही काय? शाहू, फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये काय चालले आहे?

**सभापती** : या ठिकाणी शाहू छत्रपतींचा संबंध काय? या सभागृहामध्ये 15 दिवसात मंत्रिमंडळाच्या निर्णयासह जे निवेदन होईल ते करतो असे आपण सांगितले आहे. आपण माननीय मुख्यमंत्र्यांकडे एका कामासाठी गेलात त्यावेळी त्यांच्याकडे यासंबंधीचा पाठपुरावा केला. माननीय मंत्रिमहोदयांना मी एवढेच निदेश देतो की, या बाबतीत आपण उद्यापर्यंत काही करता येणे शक्य असेल ते करुन त्यासंबंधीचे निवेदन करावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : त्यासाठी आपण माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करावी...

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, ही नवीन बाब आहे...

(गोंधळ)

श्री. पांडुरंग फुंडकर : ही नवीन बाब नाही...

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, मी या ठिकाणी जबाबदारीने निवेदन करतो की, ही नवीन बाब आहे. ही जुनी बाब नाही. विना अनुदानित शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फी माफीचा प्रश्न आहे ही नवीन बाब आहे, जुनी नव्हे. अनुदानित संस्थांच्या शाळांना फी माफी आहे. परंतु विना अनुदानित संस्था आहेत त्यांना फी माफी नाही. त्यामुळे हा नवीन विषय आहे एवढेच मी जबाबदारीने सांगतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी ही नवीन बाब असल्याचे वक्तव्य केले परंतु ही नवीन बाब नाही. 2003-04 साली महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होत्या त्यावेळी मागासवर्गीयांची मते पाहिजेत, ओ.बी.सी. ची मते पाहिजेत म्हणून एक वर्षासाठी आपण सवलत दिली. या वर्षी निवडणुका संपल्याबरोबर ही सवलत आपण बंद केली त्यामुळे ही नवीन बाब नाही. मागील वर्षी आपण सवलत दिली ती या वर्षी बंद केली. ती ताबडतोब सुरु करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय देण्याचे काम करणार काय?

श्री. सुरुपसिंग नाईक : त्यांना आपण शिष्यवृत्ती देत होतो, परिक्षा फी देत नव्हतो...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : मागील वर्षी परिक्षा फी सुध्दा दिली आहे...

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, मी आपणासमोर जबाबदारीने निवेदन करीत आहे की, मागील वर्षी त्यांना शिष्यवृत्ती देत होतो. शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क देत नव्हतो. ही नवीन बाब असल्यामुळे त्यासाठी मंत्रिमंडळापुढे जाणे गरजेचे आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये कबूल केले आहे की, मागील वर्षी ही सवलत दिली आहे आणि या वर्षी देऊ शकत नाही. परंतु त्यांचे अधिकारी त्यांना वेगळी माहिती देत आहेत...

**सभापती** : गेल्या वेळी जी चर्चा झाली किंवा जी प्रश्नोत्तरे झाली ती रेकॉर्डवर आहे. शासनातर्फे जे उत्तर दिले आहे ते रेकॉर्डवर आहे. त्यावेळी या प्रश्नाचा पाठपुरावा दोन्ही बाजूने अत्यंत तीव्रतेने केला गेला तो देखील रेकॉर्डवर आहे. मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यासाठी करावी लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन आपण 15 दिवसामध्ये या संबंधी निर्णय घेणार आहात त्या अनुषंगाने आपण उद्या सभागृहामध्ये निवेदन करावे.

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, आपण निदेश दिले त्याचा आदर राखून सांगतो की, या सन्माननीय सभागृहाच्या भावनेशी व मताशी 100 टक्के नाही तर 101 टक्के सहमत आहे. परंतु ही आर्थिक बाब असल्यामुळे तिला मंत्रिमंडळाच्या मान्यतेची गरज आहे. त्यासाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये जो निर्णय होईल त्या प्रमाणे निवेदन होईल.

**सभापती** : मंत्रिमहोदय आपण सभागृहाच्या भावनेशी सहमत आहात हे चर्चेमध्ये आले आहे. परंतु हा निर्णय इंम्प्लिमेंट होण्याच्या दृष्टीने मंत्रिमंडळापुढे जाण्यासाठी आवश्यक असलेल्या फॉर्मालिटीज आपण पूर्ण केल्या पाहिजेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, हया फॉरमॅलीटीज् उद्यापर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा आणि त्याचा निर्णय येथे द्यावा.

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, आपल्यालाही माहिती आहे की, मंत्रीमंडळा पुढे जाण्यासाठी जी नोट द्यावयाची होती, जी फाईल द्यावयाची होती पण त्यापूर्वी ती नोट माननीय वित्त मंत्र्यांकडे जावयाची आहे आणि त्यानंतर ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे जावयाची आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सही केल्याशिवाय ती नोट मंत्रीमंडळापुढे येणार नाही. मंत्रीमंडळापुढे नोट येणार नाही तर त्यावर चर्चा होणार नाही. मग त्याबाबतीत मी येथे कसे सांगणार ? की, आज आम्ही याबाबतीत निकाल देऊ. तेव्हा याबाबतीत आपली तातडी आहे, गरज आहे हे लक्षात घेऊनच आम्ही याबाबतीत कार्यवाही करीत आहोत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, हरकतीचा मुद्दा आहे. त्यादिवशी देखील या विषयावर साधकबाधक आणि अत्यंत तीव्र चर्चा झाली आणि सभापती महोदय, आता आपण सांगितले, पण त्यादिवशी माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारचे आश्वासन दिले होते की, हा विषय मंत्रीमंडळासमोर नेऊन निर्णय घेऊ आणि लागू करु. आता माननीय मंत्री महोदय असे म्हणतात की, 2004 ला जी सवलत सुरु होती, त्यावेळी आम्ही फक्त शिष्यवृत्ती देत होतो. पण माझ्र यामाहिती प्रमाणे त्यादिवशी जे छापील उत्तर दिले होते, त्यामध्ये 2004 पर्यंत विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये ओ.बी.सी.विद्यार्थ्यांना देखील अशा प्रकारे फी माफीची आणि परीक्षा शुल्काची सवलत होती. जेव्हा आपण विना अनुदानित महाविद्यालयातील ओ.बी.सी.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊ शकतो, तर फी माफी का देऊ शकत नाही ? परीक्षा शुल्क का माफ करु शकत नाही ? शिष्यवृत्तीच्या रकमेमध्येच परीक्षा फीचा देखील समावेश होतो. हे माननीय मंत्री महोदयांना माहिती आहे का ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, आपण जे निदेश दिलेले आहेत, त्याप्रमाणे आम्ही सर्व माहिती एकत्रित करुन ती मंत्रीमंडळापुढे ठेऊ आणि त्याबाबतीत निर्णय झाल्यावर तो येथे सांगू.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडेसाहेबांनी एक मुद्दा मांडला आणि या सदनामध्ये गेल्या आठवडयात आणि त्यापूर्वीच्या आठवडयात चर्चा झाली

. . . .2 क्यु-2

श्री.दिवाकर रावते . . . .

होती. आताचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, हे त्यावेळी विरोधी पक्षनेते नव्हते. पण त्यांनीही त्यावेळी तीव्रतेने हा प्रश्न मांडला होता. सदनाच्या भावना लक्षात घेऊन, समजा जर एखादा कायदा करावयाचा असेल तर कायदा होईपर्यंत आपण त्याबाबतीत अध्यादेश काढतो. अशा प्रकारे माननीय मंत्री महोदयांनी आपले वजन वापरावे. कारण आपल्यालाही या प्रश्नाची जाणीव आहे. आम्ही त्याबाबतीत काही म्हणत नाही. या महाराष्ट्रातील या कॅटॅगरीतील विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न असल्याने आपल्यालाही त्याची जाणीव आहे,जाण आहे. या सदनाच्या भावना लक्षत घेऊन माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय अर्थमंत्र्यांची तातडीने एक बैठक बोलवावी आणि या अधिवेशनाच्या निमित्ताने दोन्ही सदनामध्ये या विषयाच्या संदर्भात आपण काही जाहीर करु शकलात तर याठिकाणी व्यक्त केलेल्या भावनांचा आदर केल्यासारखे होईल. माननीय सभापती महोदयांनीही याबाबतीत निदेश दिलेले आहेत.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आह.

**सभापती** : आता मी हरकतीच्या मुद्यासाठी कोणालाही परवानगी देणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मघाशी उपस्थित केलेल्या विषयाच्या बाबतीत काय झाले ?

**सभापती** : मी मघाशी सांगितले आहे की, उद्या अधिवेशन संपण्याच्या अगोदर या बाबतीतील कार्यवाही पूर्ण केलेली आहे याचे त्यांनी निवेदन करावे.

-----

. . . .2 क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/KGS/MAP/ 14:50

पृ.शी./मु.शी.:नियम 93 च्या सूचनांवरील निवेदनांच्या

संदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.चंद्रकांत हांडोरे(सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे आणि इतर विधान परिषद सदस्य यांनी विधानपरिषद नियम 93 अन्वये "अनुदानित अपंगांच्या विशेष शाळांमधील कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत" दिलेल्या सूचनेनुसार दि.30-3-2005 रोजी सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने, आपण दिलेल्या आदेशाप्रमाणे आवश्यक त्या तीन मुद्यांबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो. माहितीच्या प्रती सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात येत आहे.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

. . . .2 क्यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे(नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबईतील बांद्रा रेक्लेमेशन भागातील हजारो झोपडयांना लागलेली भीषण आग" या विषयावरील श्रीमती नीलम गो-हे व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेबाबत दिनांक 14 डिसेंबर 2004 रोजी केलेल्या निवेदनावरील अनुपूरक प्रश्नोत्तरांच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हांडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विना अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत" या विषयावरील सर्वश्री बी.टी.देशमुख व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेबाबत दिनांक 7 एप्रिल 2005 रोजी केलेल्या निवेदनावरील अनुपूरक प्रश्नोत्तरांचे वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : प्रश्नोत्तराचे वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KGS/ MAP/ MHM/

**लक्षवेधी सूचना**

**पृ. शी.** : गुटखा विक्रीवर बंदी घालण्याबाबत.

**मु. शी.** :गुटखा विक्रीवर बंदी घालण्याबाबत यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी, विलास अवचट, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"देशातील एकूण गुटखा उत्पादनापैकी 40 टक्के गुटख्याचे उत्पादन महाराष्ट्रात होत असून त्याची वार्षिक उलाढाल 1500 कोटी रुपये एवढी असून, या उद्योगातून राज्याला कोट्यावधी रुपयांचा मिळत असलेला महसूल, तथापि राज्यात विक्री होणाऱ्या अनेक गुटख्यांमध्ये "मॅग्नेशियम कार्बोनेट" या आरोग्यास धातक पदार्थांचा समावेश असल्याचे उघडकीस येणे, राज्य शासनाने तेरा बँडच्या गुटखा व पानमसाला उत्पादकांचे उत्पादन व साठे ताबडतोब जप्त करण्याचे दिलेले आदेश, परंतु अद्यापही त्याची अंमलबजावणी झालेली नसणे, आदेश केवळ कागदोपत्री असून राज्यात गुटख्याची सर्रासपणे होत असलेली विक्री, गुटखा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांच्या मालकांवर देखील शासनाने अद्यापपर्यन्त कोणतीही कारवाई केलेली नसणे, परिणामी केवळ दिशाभूल करणारे आदेश काढणाऱ्या शासनावरचा जनतेचा उडालेला विश्वास व पसरलेला तीव्र संताप आणि असंतोष, सबब राज्य शासनाने राज्यात गुटखा उत्पादन व विक्रीस बंदी घालावी व गुटखा विक्री करणाऱ्या कंपन्यांवर तात्काळ कारवाई करावी अशी लोकप्रतिनिधींमार्फत करण्यात येत असलेली मागणी, सबब याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून केलेली अथवा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाबा सिद्दीकी ( अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, काही दिवसापूर्वी शासनातर्फे गुटखा बंदी घालण्यात आली होती परंतु पुन्हा राज्य शासन गुटखा सुरु करण्याच्या मार्गावर आहे. निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा व त्याखालील नियमाखाली "गुटखा" या पदार्थातील घटकांच्या प्रमाणाविषयी तरतूद विहीत नसल्याने व ही बाब पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने गुटखा विक्री बाबत दीर्घकाळासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करणे शक्य नाही, तथापि, मॅग्नेशियम कार्बोनेट सारखा पदार्थ अस्तित्वात असलेल्या गुटखा व गुटखासदृश उत्पादनाची नमुना तपासणी करून अशा पदार्थात "मॅग्नेशियम कार्बोनेट"चा वापर झाल्याचे आढळून आल्यास अशा उत्पादनावर अन्न भेंसळ प्रतिबंधक कायद्याखाली कारवाई केली जाते." असे म्हटलेले आहे. राज्य शासनाने मॅग्नेशियम कार्बोनेट सारखा पदार्थाचे प्रमाण 5 टक्के आढळून येते. याचे प्रमाण प्रमाणित करण्यासाठी आणि मॅग्नेशियम कार्बोनेट पदार्थाचा यामध्ये किती समावेश असावा याबाबत राज्य शासनाने 4 फेब्रुवारीला केंद्र सरकारला पत्र पाठवून कळविलेले आहे, हे खरे आहे काय ?

श्री.बाबा सिद्दीकी : होय.

श्री.मधुकर सरपोतदार : निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत न्यायालयाने दि.2-8-2004 रोजी दिलेल्या निवाड्यानुसार अन्न व भेसळ प्रतिबंधक अधिनियम 1954 व त्या खालील नियम 1955 मधील तरतुदी विचारात घेता कोणत्याही अन्न पदार्थावर दीर्घकाळ बंदी घालण्याचे अधिकार राज्य शासनास नसल्याचे नमूद करून महाराष्ट्र शासनाने घातलेली बंदी रद्दबादल ठरविली." बंदी घालण्याचा अधिकार राज्य शासनाला नसल्याने, हा जो कायदा 1954 साली कायदा केला.त्यामध्ये काही त्रुटी राहिलेल्या आहेत. या त्रुटी सुधारून अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये त्याचा समावेश करणार आहात काय ? शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा व त्या खालील नियमाखाली "गुटखा" यापदार्थातील घटकांच्या प्रमाणाविषयी तरतूद विहीत नसल्याने व ही बाब पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने गुटखा विक्री बाबत दीर्घकाळासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करणे शक्य नाही." मॅगनेशियम कार्बोनेट" आढळून आले तर त्याबाबत अन्न व औषध भेसळ कायद्याखाली कारवाई केली जाते. असे असेल तर महाराष्ट्रामध्ये याबाबत कारवाई का होऊ शकत नाही, कोणती कारवाई केली जाते ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यहां पर गुटखा के ऊपर जो कार्रवाई हुई है, मैं चाहूँगा कि यह वरिष्ठ सभागृह राज्य सरकार का साथ दे. 1954 में यह कायदा बना और उस समय उसमें गुटखा नहीं था, यह बात सत्य है. मगर इसके लिए पिछले 5 साल से बार बार राज्य शासन सी.सी.एफ.एस. के साथ पत्र व्यवहार किया है. मा. सदस्य की यह बात भी सत्य है कि सुप्रिम कोर्ट ने कहा है कि हमें बॅन नहीं करना है, मगर 1962 के रुल 3 के हिसाब के अनुसार " The Director of public Health for the State of Maharashtra (being the Chief Officer in charge of the Health Administration in the State of Maharashtra shall be the Food (Health) Authority (hereinafter referred to as the Authority). The Authority shall be responsible for the general superintendence of the administration and enforcement of the Act."

या नंतर सौ. थोरात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री बाबा सिद्दीकी .....

अगर कोई चीज़ हानिकारक है तो राज्य सरकार को उसका लाईसेंस रद्द करने का पूरा अधिकार है.इसलिए इसी अधिकार के तहत हमने लाईसेंस रद्द किए हैं.चूंकि गुटखे का सेम्पल लेने के बाद उसमें 3.88 मॅग्निशियम कार्बोनेट पाया गया जो कि हानिकारक है. इसीलिए लाईसेंस सस्पेंड किया गया है. सुप्रीम कोर्ट ने बॅन करने का आदेश दिया है. Because, it is a Central Act But the power of license superintendence lies with MPFA Rules 1962.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय, कॉन्ट्राव्हर्शल बोलत आहेत. सुप्रिम कोर्टाने सांगितले आहे की, यावर बॅन आहे. आणि राज्य सरकारमध्ये यावर बॅन नाही. "मॅग्नेशियम कार्बोनेट" कारसियोजिनिक आहे. म्हणजे कॅन्सर होऊ शकतो असे आपण म्हणता. श्री. कन्हैयालाल गिडवाणी साहेबांच्या प्रश्नाला उत्तर देतांना आपण "होय" म्हटलेले आहे. कमिशनर साहेबांनी डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिसेसला पत्र लिहिले आहे की, तुम्ही ॲप्रुव्ह करा की, गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट आहे. त्यापासून कोणत्याही प्रकारची हानी नाही असे सर्टिफाय करा. म्हणून शासनाला नेमका गुटखा बॅन करावयाचा आहे की नाही, सुप्रिम कोर्टाचा निर्णय राज्यामध्ये लागू करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे की नाही ?

श्री बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, मैंने पहले ही कहा है कि यह जो ॲम्बिग्युटी है

Dr. Deepak Sawant: The ambiguity is created.

Shri Baba Siddiqui: It is a problem of the law. The Supreme Court has banned it. We are not banning it; we are supervising and regulating Gutkha under Section 3 of MPFA Act, 1962. We have got all the right to prohibit it under MPFA Act, 1962. I will read it. It says, "No anti-caking agents shall be used in any food except where the use of anticaking agents is specifically permitted. Provided that table salt, onion powder, garlic powder, fruit powder and soup powder may contain the following anticaking agents in quantities not exceeding 2%". तो यह जो है, उसे बॅन नहीं किया है. हमने लाईसेंस रद्द किया है. जो भी चीज़ हानिकारक है, उसका लाईसेंस रद्द करने का सरकार को पूरा अधिकार है.





डॉ. दीपक सावंत :मेरे पहले प्रश्न का उत्तर बाकी है.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, आपके पहले प्रश्न का उत्तर यह है कि हमने पत्र लिखा है.पत्रव्यवहार चालू है, बैठक चालू है और हम सी.सी.एफ.एस. से स्पष्टीकरण मांग रहे है.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "प्रशासनाने दि.29.1.2005 पासून एकूण 53 नमुने घेतले असून त्यापैकी 10 नमुन्यांच्या विश्लेषण अहवालानुसार सदर उत्पादनात "मॅग्नेशियम कार्बोनेट" आढळून आले आहे. प्रस्तुत प्रकरणी अन्न व भेसळ प्रतिबंधक अधिनियमानुसार कारवाई करण्यात येत आहे. या प्रकरणी सुमारे रु. 46,20,2000/- किंमतीचा गुटखा व पान मसाल्याचा साठा जप्त केला आहे.सभापती महोदय 29-1-2005 पासून तीन महिन्याचा अवधी झालेला आहे. एकूण 10 नमुने मिळाल्यानंतर आज तागायत कारवाई का करु शकला नाहीत? जे दहा नमुने मिळाले आहेत ते कोण आहेत?

श्री बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, 10 नमूने जो मिले हैं, वे इस प्रकार के हैं - शिमला, राजश्री, आरएमडी, पान पराग, गोवा, संकेत, लगाम, स्टार, तुलसी, शिकार एवं पुकार.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, तीन महिन्याचा कालावधी झालेला आहे. नमुने आपल्याकडे आलेले आहेत. तर मग कारवाईला विलंब कां होतो ?

श्री बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, कार्रवाई की गई है. अब तक 46 लाख 20 हजार कीमत का गुटखा जब्त किया गया है. 9 एफ.आई.आर. दर्ज की गई है और 18 व्यक्तियों को गिरफ्तार किया गया है.

यानंतर श्री बरवड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/ प्रथम कु. थोरात 15:05 वा.

**उप सभापती** : यानंतर दुसरी लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

( काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, शासनाकडून प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री. अनिल परब : सभापती महोदय, मला प्रश्न विचारावयाचा आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय द्यावा. आपण आम्हाला संरक्षण द्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या बारबाला सारखा नवीन पिढीला नासविणारा हा विषय आहे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, आपण अन्याय करता. आम्ही जे विचारले आहे त्याचे उत्तर शासनाकडून आलेले नाही.

**उप सभापती** : तुम्ही अन्याय करता असे जे शब्द वापरलेले आहेत ते आधी परत घ्यावेत.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, ते शब्द मी मागे घेतो. आपण आम्हाला न्याय द्यावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपली न्याय देण्याची क्षमता पाहूनच आम्ही हट्ट करतो.

श्री. अनिल परब : सभापती महोदय, यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट सारखा घातक पदार्थ आहे. त्या पदार्थामुळे नशा येते. त्यामुळे विक्री वाढविण्यासाठी हा पदार्थ कारणीभूत ठरतो. त्यामुळे हा पदार्थ गुटख्यामध्ये जास्त टाकला जातो. माझी विनंती आहे की, जर या पदार्थावर पूर्णपणे बंदी केली आणि हा पदार्थ जर गुटख्यातून पूर्णपणे काढून टाकला तर त्यासंदर्भात शासन विचार करणार काय ? मॅग्नेशियम कार्बोनेट त्यातून काढून टाकण्यासाठी आपण बंदी घालणार काय ?

श्री. बाबा सिध्दीकी : सभापति महोदय, मैंने पहले भी कहा है कि मॅग्नेशियम कार्बोनेट की वजह से ही इसे हमने रेगूलेट किया है और अगर गुटखे में मॅग्नेशियम कार्बोनेट नहीं डालेंगे तो शासन उस पर विचार करेगा.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, केंद्र शासनाला पत्र पाठविले काय असे मी विचारले त्याबाबत होय असे उत्तर देण्यात आले आहे. 4 फेब्रुवारीला केंद्रीय आरोग्य सचिव यांना

...2

श्री. कन्हैयालाल गिडवाणी....

पत्र दिलेले आहे. त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की,"I will be grateful to DGS as Apex Court to examine...." यामध्ये थोडेसे सेंट्रलाईज करुन मॅग्नेशियम कार्बोनेट मिक्स करण्याची परवानगी किती असावी याबाबतीत प्रयत्न सुरु आहे. मॅग्नेशियम कार्बोनेट न वापरता शासन त्याचा विचार करणार आहे काय ? ते कायम स्वरुपी वापरणार नाही याबाबतीत शासन विचार करील काय ?

श्री. बाबा सिध्दीकी : सभापति महोदय, मॅग्नेशियम कार्बोनेट इस्तेमाल करने की आज्ञा शासन कभी नहीं देगा और मॅग्नेशियम कार्बोनेट बिना अगर कोई गुटखा आएगा तो उसकी जांच की जाएगी. हमारी अगली पीढ़ी बर्बाद न हो इसलिए महाराष्ट्र शासन ने गुटखा बंद करने का जो निर्णय लिया है, उसके लिए महाराष्ट्र शासन पर गर्व होना चाहिए कि इस शासन ने पूरे देश को दिशा दी है कि गुटखे पर बॅन लगाना चाहिए. अगर कोई गुटखे में मॅग्नेशियम कार्बोनेट इस्तेमाल नहीं करता है तो पहले हम उसकी जांच करेंगे और उसके बाद ही विचार करेंगे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडीधारकांचे पुनर्विकास योजनेंतर्गत करण्यात येत असलेले पुनर्वसन.

**मु. शी.** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडीधारकांचे पुनर्विकास योजनेंतर्गत करण्यात येत असलेले पुनर्वसन यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, डॉ. वसंत पवार, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री जगन्नाथ शेवाळे, वसंतराव चव्हाण व राजेंद्र जैन, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जितेंद्र आव्हाड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील हजुरीगांव, सिध्दार्थनगर (ठाणे पूर्व) तसेच शहरातील इतर ठिकाणी असलेल्या झोपडीधारकांचे पुनर्विकास योजनेंतर्गत करण्यात येत असलेले पुनर्वसन, नगरविकास योजना क्र.1 मधील अंतिम भूखंड क्र. 128 व 129 या जागेवर सुरु असलेल्या आनंदकृपा गृहनिर्माण सोसायटी (लि.) मध्ये सुमारे 50 वर्षापासून वास्तव्यास असलेल्या झोपडीधारकांची नावे वगळून याठिकाणी वास्तव्यास नसलेल्या अपात्र झोपडीधारकांना सदर योजनेचा लाभ देण्याचा महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने सुरु असलेला धक्कादायक प्रकार, यामध्ये लक्षावधी रुपयांचा सुरु असलेला गैरव्यवहार, सदरची योजना एस.आर.डी. योजनेंतर्गत न करता एस.आर.ए. अंतर्गत करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी व परिसरातील गृहनिर्माण सोसायटीतील रहिवाशांनी ठाणे महानगरपालिकेवर नेलेला मोर्चा, मा. मुख्यमंत्री, मा. गृहनिर्माण मंत्री तसेच मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे जानेवारी,2005 तसेच वेळोवेळी मागणी करुनही कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिसरातील झोपडीधारकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, ठाणे शहरातील गोरगरीब पात्र झोपडीधारकांवर होत असलेला अन्याय, या सर्वच प्रकरणांची उच्चस्तरीय सखोल चौकशी होऊन

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. जितेंद्र आव्हाड ...

त्वरीत □रवाई □र□याची अत्यावश्य□ता, याबाबत शास□□ तातडी□ □रावयाची □रवाई व उपाययोज□ आ□ शास□ची प्रति□या.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे महापालिकेचा यापुढचा विकास या झोपडपट्टयांच्या माध्यमातून होणार आहे. यासभागृहामध्येच आम्ही वारंवार एसआरडी योजना रद्द करुन मुंबईच्या धर्तीवर एसआरए योजना करावी अशी मागणी केली होती आणि त्याबाबतीत काही महिन्यांपूर्वी अनुकूल प्रतिसाद देऊन तत्कालीन राज्यमंत्री श्री. नवाब मलिक यांनी सभागृहात आश्वासन दिलेले आहे. एसआरए रद्द करण्याच्या बाबतीत अशा प्रकारच्या बैठका आमदार आणि संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांबरोबर झाल्या. त्याचे पुढे काय झाले हे आजही समजलेले नाही. हा प्रश्न केवळ एकाच संस्थेपुरता मर्यादित नसून या पुढच्या ठाणे शहराच्या विकासामध्ये झोपडपट्टीवासीयांना न्याय मिळणार आहे की नाही या प्रश्नाचे उत्तर शासनाकडून हवे आहे. शासनाने दिलेले उत्तर अतिशय चुकीचे आहे. यामध्ये सगळयांना न्याय मिळालेला आहे, सर्व पात्र लोकांना घरे दिलेली आहेत असे म्हटले आहे. मी आपल्याला नावासह या ठिकाणी सांगतो. श्री. मनोहर रामचंद्र गायकर- अनुक्रमांक 23, श्री. राजेश मोरेश्वर गोडिवले- अनुक्रमांक 97, श्रीमती आनंदी शंकर कांबळे- अनुक्रमांक 125, श्रीमती रामदुलारी जगेश्वर कोळी- अनुक्रमांक 48,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड.....

वनिता मोरे, अनुक्रमांक 86, रामकली भगिरथ कोळी असे अनेक पात्र, अपात्र सदस्य आहेत ज्यांना या विकासकाने घर दिलेले नाही. त्यासंबंधी हायकोर्टामध्ये दावा दाखल झाल्यानंतर तो मान्य करण्यात आल्यावर या विकासकाने ठाणे महापालिकेकडे 34 लाख रुपये देतो असे सांगितले. ते पैसेही त्याने दिलेले नाहीत. या पात्र, अपात्र सदस्यांच्या यादीतील ज्यांना सदनिका मिळाल्या नाहीत त्यांना ताबडतोब सदनिका देणे आवश्यक आहे त्या त्यांना दिल्या जातील काय आणि ज्यांना सदनिका मिळाल्या नाहीत त्या कोणाला दिल्या याची शासन मला माहिती देईल काय ?

श्री.राजेश टोपे : मा.सदस्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. ठाणे जिल्हयासाठी एसआरए योजना लागू केली जाईल काय असा एक प्रश्न विचारला आहे. नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ठाणे या शहरांना एसआरए योजना लागू करण्याचे शासनाने तत्वत: लागू करता येईल यादृष्टीने मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. त्यासाठी महापालिकेने प्रस्ताव पाठवावयाचा असतो. प्रस्ताव पाठविल्यानंतर तो निश्चित प्रकारे तपासून सकारात्मक दृष्टीकोनातून एसआरए योजना लागू करण्याबाबत महिन्याभरात लागू करण्याचा निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे अनेक पात्र लाभार्थ्यांना संधी मिळाली नाही आणि सदनिका मिळाली नाही, अपात्र व्यक्तींना सदनिका मिळाली अशी त्यांनी तक्रार केली आहे आणि त्यांनी यादीनिहाय माहिती सांगितली आहे. याबाबत सभागृहाला सांगू इच्छितो की, अशाप्रकारे पात्र, अपात्र यादी तयार केली जाते तिला खरे म्हणजे आयुक्त, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांची एक कमिटी आहे तिच्या माध्यमातून एसआरडीला मंजुरी मिळते. अशाही परिस्थितीमध्ये सन्माननीय सदस्यांजवळ यादी असेल आणि ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे त्याबाबत जरुर विभागीय आयुक्तांना ही यादी दाखविण्यात येईल आणि जर पात्र लाभार्थी राहिले असतील त्यांना पात्र करुन घेतले जाईल. अपात्र लाभार्थ्यांना लाभ मिळाला असेल तो काढून घेतला जाईल. जी योग्य कार्यवाही करावयाची असेल ती नियमांच्या अधीन राहून विभागीय आयुक्तांच्या स्तरावर केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, आनंदकृपा गृहनिर्माण संस्था संघर्ष समिती या संदर्भात आमचे मित्र श्री.जितेंद्र आव्हाड यांनी महत्वाची लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. जी निर्वासित कुटुंबे या संस्थेची आहेत त्यांना 22.3.2000 ते 1.5.2004 पर्यंत विकासकाकडून तात्पुरत्या भाडयाची रक्कम द्यावयाची होती ती दिलेली नाही. याबाबत मुंबई उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्यात आला त्याचा क्रमांक 19352/2004 असा आहे. यामध्ये विकासक श्री. अनिलकुमार सुरसदास सिंग यांनी हमी पत्र लिहून दिले त्यामध्ये नमूद करण्यात आले की, बगिचा आणि हनुमान मंदिर या सोसायटीला बहाल केले जाईल आणि 34 लाख रुपये ठाणे महापालिकेकडे भरले जातील आणि निवासी दाखला मिळविला जाईल. परंतु श्री.अनिलकुमार सुरसदास सिंग यांनी हायकोर्टाला हमी पत्र लिहून दिल्यानंतरही ते पैसे ठाणे महापालिकेकडे भरलेले नाहीत. त्या आनंदकृपा सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे जे रहिवासी आहेत त्यांना त्यांच्या सदनिकांचा अद्याप ताबा मिळालेला नाही यासंबंधी शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.राजेश टोपे : त्या विकासकाने ॲफिडेव्हिट केले असेल त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसेल तर त्यांना निर्देश देऊन ॲफिडेव्हिटप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : हे एकूण प्रकरण भ्रष्टाचाराकडे बोट दाखविणारे आहे. पुढच्याला ठेच मागचा शहाणा. ठाणे शहराचा यापुढे विकास करावयाचा असेल तर तो एसआरए योजनेखालीच करावा लागेल कारण त्याचे मुख्य कारण म्हणजे या शहरामध्ये झोपडपट्ट्यांची व्याप्ती वाढत आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जितेंद्र आव्हाड पुढे सुरु...)

त्याठिकाणी लक्ष केंद्रीत करुन शासनाने डिसिप्लिनरी ॲक्शन घेतली तरच हे शक्य आहे. महानगरपालिकेतील अधिकारी बिल्डरशी संगनमत करुन भ्रष्टाचार करतात हे यावरुन सिध्द होते. माझा नेमका प्रश्न आहे की, या एसआडी स्कीममध्ये 7 सदनिका महानगरपालिकेला द्यावयाच्या होत्या आणि माझी खात्रिलायक माहिती आहे की, या 7 सदनिका बिल्डरने परस्पर विकून टाकल्या. पात्र सदस्यांवर झालेल्या अन्यायाची मी आपणास माहिती दिली. याठिकाणी पात्र अपात्र सदस्यांची नावे देखील दिलेली आहेत. तेव्हा या सदनिका कुणाला दिलेल्या आहेत ? यामध्ये केवळ पात्र-अपात्र हा भाग नाही तर एक्सेस एफएसआय, अनधिकृत बांधकामे असे मोठे गुंतागुंतीचे हे प्रकरण आहे. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्यात येईल काय ? यामध्ये फक्त बिल्डर्स् दोषी नाहीत तर यामध्ये झारीतले शुक्राचार्य म्हणजेच महानगरपालिकेतील अधिका-यांचा मोठा हात आहे. या एसआरडी प्रकरणामध्ये या अधिका-यांनी आपले हात धुवून घेतले आहेत. आपणाला जर झोपडपट्टीवासीयांना न्याय द्यावयाचा असेल तर या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करा. असे केले तरच हे जे 15 लाख झोपडपट्टीवासीय एसआरडीच्या माध्यमातून स्वत:च्या विकासाची गंगा ओढून आणीत आहेत त्यांना न्याय मिळेल. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करावी अशी माझी मागणी आहे.

श्री. राजेश टोपे : मा.सदस्यांनी 7 सदनिकांचा उल्लेख केला. त्या सदनिका प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेल्या आहेत. मा.सदस्यांनी सीआयडी चौकशीची देखील मागणी केलेली आहे. हा पात्र-अपात्र यांचा विषय आहे. या प्रकरणी आम्ही विभागीय आयुक्तां मार्फत सर्व गोष्टींची शहानिशा करुन घेत आहोत. त्यामध्ये मोठे दोष किंवा त्रुटी आढळल्या तर यानंतरची कारवाई जरुर सीआयडीकडे देण्यात येईल. परंतु पहिला टप्पा म्हणजे पात्र-अपात्र यांची शहानिशा करुन घेण्यासाठी विभागीय आयुक्त स्तरावर ही चौकशी केली जाईल आणि त्यांचा रिपोर्ट आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : 231 पैकी 183 सदस्यांनी निवेदन दिलेले आहे. म्हणजे 70 टक्क्यापेक्षाही जास्त लोकांनी निवेदन दिलेले आहे. 70 टक्के लोक मागणी करीत असतील तर ती मागणी एसआरडी/एसआरअे अंतर्गत मान्य करावयाची असे शासनाचे नियम आहेत. पात्र-अपात्र सदस्यांच्या संदर्भात आपण विभागीय आयुक्तां मार्फत चौकशी करणार आहात. माझी अशी सूचना आहे की, या संपूर्ण प्रकरणाची आपण चौकशी करा. याचे कारण असे की, ती जमीन कशा प्रकारे ताब्यात घेतली गेली, मार्केट कसे आले, मार्केटमधील गाळे कोणाला विकले, ते प्रकल्पग्रस्त कोण आहेत, यातील पार्टनर कोणकोण आहेत, ओ.सी.नसताना चाव्या कशा देण्यात आल्या इत्यादी सर्व मुद्यांबाबत विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : होय.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) VV-3

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.खंदारे 15:15

**पृ. शी.** : मुंबईतील घाटकोपर येथील किरोळ येथील उद्यानाचे वगळलेले आरक्षण

**मु. शी** : मुंबईतील घाटकोपर येथील किरोळ येथील उद्यानाचे वगळलेले आरक्षण यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे व श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे  मंत्र्यांचे लक्षवेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

मुंबईतील घाटकोपर येथील किरोळ गाव येथील न.भू.क्रमांक 1271/ए, 1271/ए (भाग) व 1271 बी धारण करणाऱ्या जमिनीवरील उद्यानाचे आरक्षण वगळून सदरहू जमीन निवासी पट्टयात समाविष्ट करण्याचा तसेच आ[illegible]र्ली गावातील न.भू.क्र. 171 ते 173, 175 ते 180, 183 ते 201 धारण करणाऱ्या जमिनीवरील नागरी विकास पट्टयातील 50204 चौ. मी. क्षेत्रफळ भाग वगळून तो निवासी पट्टा ठेवणे व मनोरंजन मैदानाचे आरक्षण 20,000 चौ.मी. क्षेत्रफळाचा भाव वगळून तो निवासी पट्टयात समाविष्ट करण्याचा महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 1966 च्या कलम 37 (1) अन्वये शासनाने मुंबई महानगरपालिकेला बंधनकारक आदेश देणे, मुंबईतील उद्याने व मोकळ्या जागा शहरातील प्रदूषणाची पातळी कमी करुन शहरातील फुफ्फुसेच निकामी करणे, परिणामत: मुलांना खेळण्यासाठी उद्याने उपलब्ध न होणे, परिणामत: शहरात प्रदुषणाची पातळी उंचावणे, या प्रकरणी नागरिकांच्या मनात निर्माण झालेला संताप व असंतोष, व असुरक्षिततेची भावना, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : यामध्ये घाटकोपर आणि आकुर्ली हे दोन भाग आहेत. 5204 चौ.मी.क्षेत्रफळाचा भाग अनिवासी पट्टयातून निवासी पट्टयात आणलेला आहे. 20 हजार चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग जो लहान मुलांच्या मनोरंजनासाठी, मैदानासाठी राखून ठेवलेला होता तो देखल आपण निवासी पट्टा केलेला आहे. निवेदनातील उत्तर विसंगत आहे. आपण महानगरपालिकेकडे जो प्रस्ताव केला त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, 8 जानेवारी 2004ला बृहन्मुंबईतील जमीन आरक्षणे ही शासनाने पुनर्रचित विकास आराखडयाकरिता केलेल्या नियोजन क्रमंका नुसार आहेत आणि संदर्भांतर्गत जमिनींच्या सभोवताली राहाणा-या जनतेच्या आवश्यकते नुसार ठेवलेले आहे. निवेदनाच्या पान क्रमांक 2वर असे म्हटलेले आहे की, "सदर सेथंने त्यांच्या जमिनीवर आरक्षणाखालील क्षेत्र एकूण क्षेत्राच्या तुलनेने जास्त असल्याने त्यांना विकासासाठी कमी क्षेत्र उरत असल्याने आरक्षणाची संख्या कमी करण्याची तसेच जागेसभोवतालचा सर्व परिसर झोपडपट्टीने व्यापलेला असल्याने..." ही आरक्षणे कशा प्रकारे आहेत हे आपण निवेदनामध्ये सांगितलेले आहे. 1984 मध्ये किंवा त्यानंतर विकास आराखडा मंजूर झाला, त्याबाबतीत मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. जेथे आरक्षण ठेवायची गरज नाही तेथे आरक्षण ठेवलेले आहे. काही लोकांनी ब्लॅकमेल केलेले आहे. एखाद्याची जमीन असेल तर त्याला नंतर आपल्या पायाजवळ आणण्यासाठी रिझर्व्हेशन ठेवले गेले. म्युनिसिल प्राथमिक शाळेसाठी 8 आरक्षणे ठेवलेली आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

खेळाच्या मैदानासाठी 14 आरक्षणे ठेवली आहेत. मुंबई शहरामध्ये पुढील 25 वर्षांनी जी लोकसंख्या होईल त्यांना खेळाची मैदाने पुरेशी होतील असे तुम्ही म्हणता काय ? जी जमीन शासनाने स्वत:साठी ठेवली आहे. हाऊसिंग फॉर डिस हाऊस याची तुम्हाला गरज नाही काय ? आपण शेवटी असे म्हटले आहे की, या दोन्ही प्रकरणामध्ये सर्वकंष विचार करुन कुठे भ्रष्टाचार झाला असेल, आरक्षण बदलण्याचे आदेश तुम्ही महानगरपालिकेस दिले आहेत. ते जर जनहिताच्या विरुध्द असतील, मुंबईतील जनतेच्या विरोधी असतील तर त्यासंबंधीचा पूर्ण अभ्यास करुन पुनर्विचार करण्यात येईल आणि आवश्यक ती खेळाची मैदाने असतील, हाऊसिंग फॉर डिस हाऊसिंग अशा त-हेचे असेल तर शासन त्याचा गांभीर्याने विचार करुन त्याचा फेरविचार करील काय ?

श्री. राजेश टोपे : या ठिकाणी गोरक्ष मंडळाची एकूण 85 हेक्टर जमीन आहे. त्या ठिकाणी शासनाने अनेक रिझर्व्हेशन लावलेली आहेत. त्या रिझर्व्हेशन्सला डि-रिझर्व्ह करुन निवासी आरक्षणात वळविण्याचे 37(1) अन्वये निदेश दिले होते. सभापती महोदया, या गोष्टीस ताबडतोब स्थगिती देण्यात आलेली आहे. आता या रिझर्व्हेशनच्या संदर्भात लोकप्रतिनिधी असतील त्यांची मते घेण्यात येतील, स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मत लक्षात घेतले जाईल, सर्वसामान्य जनतेकडून हरकती, सूचना मागविल्या जातील या सगळया गोष्टींचा विचार करुनच यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल. सगळयांना विश्वासात घेऊनच या आरक्षणासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल. यासंदर्भात वैधानिक प्रक्रिया असते ती पूर्ण केल्यानंतरच यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल. यासंदर्भात स्थगिती असल्यामुळे हे आरक्षण वगळण्याचा सध्या तरी शासनाचा विचार नाही.

श्री. मधुकर चव्हाण : या ठिकाणी नाव घेऊन सांगावयाचे झाले तर तत्कालिन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे असताना जे निर्णय घेतले गेले. त्यांच्या कालावधीत या भूखंडासंबंधी निर्णय झालेला होता त्या निर्णयास तुम्ही स्थगिती दिली आहे.याचा अर्थ त्यांचा निर्णय चुकीचा होता असा त्याचा अर्थ होऊ शकतो. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 कलम 37 अन्वये महानगरपालिकेला जे मॅडेंटरी आदेश दिले आहेत. मागच्या शासनाने चुकीचे आदेश दिले असे वाटले म्हणून स्थगिती दिली आहे. आपण स्थगिती देतानां सर्वंकष विचार करण्यात येईल असे या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

ठिकाणी सांगितले आहे. मागच्या सरकारचे रिझर्व्हेशनचे आदेश चुकीचे आहेत असे लक्षात आल्या नंतर पुन्हा जनहितासाठी जी आरक्षणे आहेत ती तशीच ठेवणार आहात असा याचा अर्थ झाला आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, गोरक्ष मंडळाच्या बाबतीत मी निवेदनात म्हटले आहे. प्लॅनिंग स्टॅर्डर्डचा देखील उल्लेख केलेला आहे. एखाद्या भूखंडावर आरक्षण असेल त्याच्या 30 ते 35 टक्के जमिनीवर आरक्षण असावे.परंतु गोरक्ष मंडळाच्या जमिनीवर आरक्षण आहे ते 61.96 टक्के एवढयापर्यन्त गेलेले आहे. काही प्रमाणात आरक्षण कमी करावे अशी गोरक्ष मंडळाची मागणी आहे. त्यासंदर्भात शासनाने निदेश दिले होते. परंतु आज त्यास स्थगिती दिलेली आहे. सर्वांना विचारात घेऊनच या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदया, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, या गोष्टीस स्थगिती दिलेली आहे. या ठिकाणचे 5024 चौरस मीटर क्षेत्र आहे त्याचे रुपांतर निवासी पट्टयात करणार आहात. आताच मुंबईतील जनतेला पुरेसे पाणी उपलब्ध नाही. मुंबई शहरात पुरेशी मलनिस्सारण व्यवस्था नाही. मुंबई शहरातील वाहतूक व्यवस्थेची आपल्याला चांगली माहिती आहे. एवढे मोठे क्षेत्र निवासी पट्टयात आणणार आहात. मुंबईतील जनतेवर त्याचा मोठा गंभीर परिणाम होणार आहे. या परिणामाचा शासन काहीही विचार करीत नाही काय ? मुंबई शहरात सार्वजनिक उद्याने, क्रिडांगणे यासाठी आरक्षित भूखंड आहेत. त्या ठिकाणी बेकायदेशीर बांधकामे झालेली आहेत. भूखंडावरील आरक्षणे उठविली जात असल्यामुळे मुंबईत सार्वजनिक उद्याने, क्रिडांगणे कमी होत चालली आहेत. मुंबई शहरात आता असलेल्या लोकांना पुरेशा नागरी सुविधा उपलब्ध नाहीत. अशी परिस्थिती असताना अशा प्रकारचे निर्णय घेऊन तुम्ही मुंबई शहराला शांघाय कशी काय करणार ?

श्री. राजेश टोपे : मी सुरुवातीलाच सांगितले की, या प्रकरणास स्थगिती दिलेली असल्यामुळे या निर्णयाचा लागलीच विचार होऊच शकत नाही. वैधानिक प्रक्रिया असते त्या प्रक्रियेप्रमाणे हरकती, सूचना मागविल्यानंतरच निर्णय घेतला जात असतो. त्याचे प्रमाणके असतात. खेळासाठी मैदान किती चौरस मिटरचे असावे, गार्डन किती चौरस मिटरचे असावे. यासंदर्भात प्लॅनिग स्टॅन्डर्ड असते. प्लॅनिंग स्टॅन्डर्डच्या अनुषंगाने शासन यासंदर्भात पुढील निर्णय घेईल.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : मुंबई शहरात सार्वजनिक उद्यान, किडांगणे यासाठी आरक्षित भूखंड आहेत. त्या भूखंडांवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. तेथील अतिक्रमणे हटवून त्या जागा शासन मोकळया करुन देईल काय ? मुंबई शहरातील उपनगरातील अनेक भूखंड अनधिकृत अतिक्रमणाने व्यापलेले आहेत. मुंबई शहरात क्रिडांगणे आणि उद्यानांसाठी जागा नाहीत. त्यामुळे या भूखंडावरील अतिक्रमणे हटविण्याच्या बाबतीत शासन शासन काही कार्यवाही करील काय ?

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3 पुढे सुरु...

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मुंबईमध्ये वेगवेगळे प्रभाग आणि वॉर्डप्रमाणे नवीन नवीन विकास योजना प्लॅनिंग स्टँडर्ड प्रमाणे दर 10 वर्षांनी केल्या जातात. आरक्षित जागेवर अतिक्रमणे झ ाालेली असतील ती पुनर्वसित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. नवीन आरक्षणे करावयाची असतील तर प्लॅनिंग स्टँडर्डप्रमाणे केली जातील.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, मोकळया मैदानावर ट्रॅझीट कॅम्प बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे. अशी परवानगी कोणत्या नियमाखाली दिली ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेशी संबंधित हा प्रश्न नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शहरामध्ये असलेली आरक्षणांमध्ये ज्यावेळी फेरबदल करावयाचा असतो त्यावेळी सहसा असे लक्षात येते की, काही विशिष्ट प्रभावशाली लोकांसाठी अशा प्रकारचे आरक्षणे बदलण्याची किंवा रद्द करण्याची कार्यवाही केली जाते. यासंदर्भात शासन काही निर्णय घेणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा जनरल प्रश्न आहे. आरक्षणे बदलण्याबाबत प्रमाणक ठरलेले आहे. प्लॅनिंग स्टँडर्ड आहे त्याला धरुनच निर्णय घेतले जातात.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकणातील कुणबी समाजाच्या बेदखल कुळांचे प्रश्न.

**-मु.शी.**:कोकणातील कुणबी समाजाच्या बेदखल कुळांच्या प्रश्नासंबंधी सर्वश्री डॉ. अशोक मोडक,विनोद तावडे,रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने मा.सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे,अशी विनंती करतो.

"कोकणातील ठाणे,रायगड,रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये कुणबी समाजाची संख्या मोठया प्रमाणात आहे व या समाजाचे बेदखल कुळांचे प्रश्न,शासकीय सेवेमध्ये आरक्षण व अन्य मागण्यांसदर्भात सन 1974 पासून मोर्चे,आंदोलने व या मार्गाने प्रयत्न झाले,शासनाने सुध्दा कै.शामरावजी पेजे यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास समिती स्थापन केली व समितीचा अहवाल शासनाकडे दिनांक 15 सप्टेंबर 1982 रोजी सादर झाला व त्यामधील शिफारशींचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी कै.शरद पालव समिती स्थापन करणे व या समितीने दिनांक 30 जून 1986 रोजी सादर केलेल्या अहवालावर शासनाने अद्याप कार्यवाही न करणे,त्याऐवजी सन 1997 मध्ये तत्कालिन मा.मुख्यमंत्री यांनी एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्याची घोषणा केल्यानंतर प्रत्यक्षात ही समिती दिनांक 11 सप्टेंबर 2001रोजी अस्तित्वात येणे,त्यानंतर दिनांक 3 ऑगस्ट 2004 व दिनांक 6 डिसेंबर 2004 रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदने देणे,तथापि गेल्या 30 वर्षात मागण्यांसंदर्भात काहीही कारवाई न होणे,यामुळे कुणबी समाजामध्ये शासनाबद्दल तीव्र संताप निर्माण होणे,शासनाने तातडीने कारवाई करुन या समाजाला न्याय देण्याची आवश्यकता,शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सुरुपसिंग नाईक (परिवहन,बंदरे,इतर मागासर्गीय कल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या प्रती मा. सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** ( श्रीमती सुधा जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेद्वारे एका अत्यंत महत्वाच्या आणि ज्वलंत अशा प्रश्नाकडे मी शासनाचे लक्ष वेधतो आहे. गेली 30-35 वर्षे या कुणबी समाजातील माणसे न्यायासाठी भांडत आहेत परंतु सरकार मात्र पूर्णपणे उदासिन आणि एका अर्थाने निष्काळजी आहे. जो माणूस कष्ट करुन जमीन कसतो त्याच्या नावावर जमीन होत नाही आणि जी माणसे रहात आहेत त्यांची जमीन देखील त्यांच्या नावावर होत नाही. विशेषत: ठाणे,रायगड,रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या संपूर्ण कोकणपट्टयात खोतीच्या माध्यमातून हा प्रश्न निर्माण झालेला आहे. निवेदनातील पृष्ठ क्र. 3 वर शंकरराव म्हसकर समितीच्या शिफारशींचा उल्लेख करण्यात आला आहे. हे उत्तर दिलेले आहे ते ठोकळेबाज उत्तर आहे. उत्तरात म्हटले आहे की बेदखल कुळांच्या प्रश्नाबाबत महसूल व वन विभागाकडे पत्रव्यवहार सुरु असून त्या विभागामार्फत बेदखल कुळांच्या प्रकरणी त्वरेने निकाल लावण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे. एखाद्या कुळाला ही जमीन माझी आहे असे तलाठयाकडे जाऊन लक्षात आणून दिले तर तो प्रश्न मिटतो. जमीन मालकानेच त्याच्या नोंदीला हरकत घेतली तर प्रकरण पुढे जाते. कूळ आणि दावा करणारी व्यक्ती यांची शहानिशा करावी लागते. तहसीलदार कोर्टात जाते आणि दोन्ही माणसांची बाजू ऐकून घेऊन तहसीलदार निर्णय घेतो. त्यानंतर अपिल होते. कुळाच्या बाजूने निकाल लागत नाही. त्यामध्ये अनेक गडबडी होतात आणि पुरावे उपलब्ध होतात. पालव समितीचे कागदपत्र मिळालेच नाहीत असे म्हटले आहे. परंतु या समितीचा रिपोर्ट माझ्याकडे आहे. त्यात स्वच्छपणे असे म्हटले आहे की, याप्रश्नाचे व्यापक स्वरुप लक्षात घेऊन अद्यापि बेदखल कुळांच्या प्रश्नाच्या संदर्भात सुलभ आणि सोपी कारवाई उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. गरजूंची असहाय्यता लक्षात घेऊन उपाय करण्याची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड

डॉ.अशोक मोडक ...

त्यांनी असे उपाय सुचविलेले आहेत की, "1964 च्या दुरुस्त आकारफोड पत्रकाच्या तयारीसाठी करण्यात आलेल्या चौकशी पाहणी प्रमाणे मोजणी पाहणी खात्यामार्फत पुन्हा एकदा नव्याने पोट हिस्सा मोजमापाचे काम हाती घेण्याची गरज आहे. असे जर काम हाती घेतली तर हे आकरफोड पत्रक तयार होईल व कुळाचे अस्तित्व आणि त्याच्या वहिवाटीखालील प्रत्यक्ष जमीन याचा ग्राहय पुरावा त्यातून उपलब्ध करता येईल. " मला माननीय मंत्रिमहोदयांना एक प्रश्न विचारावयाचा आहे,मूळात निवेदनामध्ये अत्यंत व्हेग आणि स्टिरिओटाईप उत्तर दिलेले आहे.त्याचा आपण काय अर्थ लावत आहात?. मी जो अर्थ सांगितलेला आहे तोच अर्थ आपल्याला अभिप्रेत आहे काय ? निवेदनात असे सांगण्यात आलेले आहे की, " लॅन्ड सीलिंग ॲक्ट लागल्यामुळे जमीन अतिरिक्त ठरलेली आहे. " तेव्हा ही जमीन अतिरिक्त ठरली आणि जमीन मालकाने त्यामध्ये काही खोडे घातले तर आपण काय करणार आहात ? अशा प्रकारचे अनेक प्रश्न आता निर्माण झालेले आहेत. या जमीन मालकाकडून अतिरिक्त झालेली जमीन काढून घेऊन योग्य कुळाला देण्याच्या बाबतीत शासन काय करणार आहे ? या बाबत मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी ज्या अहवालाचा उल्लेख केलेला आहे तो अहवाल प्राप्त झालेला नाही असे निवेदनात सांगण्यात आलेले आहे.परंतु श्री.शंकरराव म्हसकर यांनी जो अहवाल दिलेला आहे त्यात सहा बाबी सांगितलेल्या आहेत. बेदखल कुळांचा प्रश्न हा महसूल विभागाच्या अखत्यारातील आहे.परंतु सामाईक जबाबदारी असल्यामुळे त्याचे उत्तर मला द्यावे लागणार आहे. या सबंधी मी प्रामाणिकपणे मान्य करतो की हा विभाग नव्याने झाल्यामुळे या प्रश्नामध्ये जेवढे लक्ष देणे आवश्यक होते तेवढे लक्ष मी देऊ शकलो नाही.परंतु सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून त्या विषयाकडे माझे लक्ष वेधलेले आहे. त्यामुळे मी पूर्ण लक्ष त्याकडे केन्द्रित करुन हा प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न करीत आहे. या संदर्भात जर नोटिफिकेशन काढावयाचे असेल तर त्याला माननीय राष्ट्रपतींची मान्यता घ्यावी लागणार आहे.महसूल विभागाने त्यासबंधीचे कागदपत्र तयार केलेले आहे आणि माननीय राष्ट्रपतीकडे मंजुरीसाठीसुध्दा ते पाठविलेले आहे.ही मंजुरी आल्यानंतरच पुढच्या प्रश्नाच्या बाबतीत मी उत्तर देऊ शकतो.हा प्रश्न अनेक वर्षापासूनचा असून तो गुंतागुंतीचा आहे. तेव्हा हा प्रश्न त्वरित सुटला पाहिजे हीच भूमिका विभागाची आहे त्याचबरोबर माझीसुध्दा व्यक्तिगत तीच

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरुपसिंग नाईक ...

भूमिका आहे.त्यामुळे मी प्रामाणिकपणे कबूल केलेले आहे की, या प्रश्नमध्ये मी लक्ष घालीन त्याचबरोबर जर आवश्यकता पडली तर याबाबतीत सन्माननीय सदस्यांचासुध्दा सल्ला घेईन.या प्रश्नाशी संबंधित जे जे कोणी असतील त्यांनाही बोलाविण्यात येईल. हा प्रश्न मार्गी लागला पाहिज असे शासनाचे आणि माझे मत आहे

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,माननीय मंत्रीमहोदय हा प्रश्न जितक्या सहजतेने घेत आहेत. तितका हा प्रश्न सहज नाही.रत्नागिरी,सिंधुदूर्ग, रायगड आणि ठाणे या चार जिल्हयातील कुणबी समाजाच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आलेली आहे.माननीय मंत्रिमहोदयांना हे माहीत आहे काय की या चारच जिल्हयात कुणबी समाज राहत नाही. उत्तर महाराष्ट्रात तसेच विदर्भातील अकोला,अमरावती,यवतमाळ,बुलढाणा,भंडारा,गोदिंया,चन्द्रपूर या जिल्हयात कुणबी समाज राहतो.या कुणबी समाजाचे वेगवेगळे प्रश्न आहेत. मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते ऐकल्यानंतर कुणबी समाजाबद्दाल हे सरकार किती उदासीन आहे हे लक्षात येते.1974 सालापासून हा समाज आपल्या प्रश्नासाठी सरकारशी झगडत आहे. हया समाजाने मोर्चे काढले होते व आंदोलने केली होती. त्यांनी वेगवेगळया माध्यमातून आपले प्रश्न सरकारपुढे मांडले होते परंतु सरकारने त्या संदर्भात काहीही निर्णय घेतलेले नाहीत. सरकारने फक्त एकच गोष्ट केली होती की शामराव पेजे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती.ही समिती नेमूनसुध्दा आता 25 वर्षे झाली आहेत. दुर्देवाने शामराव पेजे यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांची पुण्यतिथी आपण आता साजरी करीत आहोत. त्यांच्या समितीने अहवाल दिला आहे. या समाजाकरता फक्त महामंडळ नेमण्यात आले होते ...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री.गायकवाड नंतर --- 15:35

श्री. फुंडकर ....

नुसते महामंडळ दिले, पण त्यासाठी एक पैसा देखील दिलेला नाही. केवळ महामंडळ देऊन या कुणबी समाजाची मते आपण घेतली. जणू महामंडळाचा एक तुकडा टाकून त्या समाजातची मते आपण घेतली आहेत. त्यांचा एक प्रकारे आपण विश्वासघात केलेला आहे. सभापती महोदय, बेदखल कुळांचा हा प्रश्न आहे. त्यांच्या नावे ते कसत असलेली जमीन करण्याचा हा प्रश्न आहे. परंतु तेही आपल्याकडून होत नाही. त्यासाठी मोर्चे काढावे लागतात या लोकांना. या संदर्भात शासनानेच पालव समिती नेमली आहे आणि तरीही उत्तरामध्ये सांगितले जाते की, त्या समितीची कागदपत्रे आम्हाला मिळाली नाहीत, दिसत नाहीत. म्हणजे आता शासनाची कागदपत्रे देखील चोरी होऊ लागली आहेत. त्या समाजाच्या उत्कर्षासाठी आपण समिती नेमली आणि त्या समितीच्या अहवालाची कागदपत्रेच आपल्याला मिळत नाहीत का ? आपण इतक्या बेफिकीरपणे याकडे पहाणार असाल तर ते उचित नाही. आता मंत्री महोदय येथे आम्हाला सांगत आहेत की, मला या प्रश्नाची माहिती नाही आणि मी यापुढे या प्रश्नामध्ये लक्ष घालेन. स्वातंत्र्यानंतर 20 वर्षांपासूनचा हा प्रश्न आहे. त्या खात्याचे मंत्री आहेत आणि हा कुणबी समाज साऱ्या महाराष्ट्रभर राहतो आहे हे आपल्या लक्षात आलेले नाही का ? ही लक्षवेधी सूचना आली नसती तर कदाचित आपल्याला या कुणबी समाजाची माहितीच झाली नसती. हा कुणबी समाज जसा आहे तसाच वैदू समाज आहे, भंडारी समाज आहे, त्यांच्याही जमिनींचा प्रश्न मोठा आहे. वर्षानुवर्षे या लोकांच्या नावे जमिनी होत नाहीत. त्या जमिनी अनेक वर्षांपासून ते कसत अहेत आणि मूळ मालक त्यांची अडवणूक करतात. कसत असलेल्या जमिनी त्यांच्या नावे करण्याचा प्रश्न आला की मग शेजारच्याचे प्रतिज्ञापत्र आणा वगैरे सारख्या जाचक अटी टाकल्यामुळे त्या जमिनी त्यांच्या नावे होऊ शकलेल्या नाहीत. तेव्हा ताबडतोबीने याबाबत निर्णय घेऊन, केवळ या समाजासाठी एक महामंडळ निर्माण करून चालणार नाही तर या समाजाच्या उत्कर्षासाठी काय करणार आहात ? ते आम्हाला येथे आपण सांगावे. सभापती महोदय, या कुणबी समाजाच्या बाबतीत केवळ बेदखल कुळांचाच प्रश्न नाही तर इतरही अनेक प्रश्न आहेत. त्यामध्ये या समाजाचा शैक्षणिक प्रश्न आहे. आता या ठिकाणी मघाशी सन्माननीय सदस्य श्री.कवाडे यांनी विनाअनुदानित शाळांसंबंधात प्रश्न उपस्थित केला होता तसाच हाही प्रकार आहे. अनुदानित शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्याला फी माफीची सवलत देता ते काही

...... झेडझेड 2 ...

श्री. फुंडकर ....

आपण उपकार करीत नाही. मग त्या मागासवर्गीयांच्या सवलती आहेत त्याच यांनाही का नाही ? सभापती महोदय, हा जो बेदखल कुळांचा प्रश्न आहे तो ताबडतोबीने निकालात काढण्यासाठी ... आम्हाला या संबंधात व्हेग उत्तर नको आहे, शासन किती दिवसात निर्णय घेणार आहे ?

श्री. सुरूपसिंग नाईक : सभापती महोदय, बेदखल कुळांचा जो प्रश्न आहे त्या जमिनींच्या संदर्भात मुंबई कूळ वहिवाट कायदा 1948 चा आहे त्यात दुरूस्ती करावयाची आहे आणि ती दुरूस्ती करण्यासाठी उशीर झालेला आहे हे मी प्रामाणिकपणे कबूल केले आहे, तसे मी मान्य देखील केलेले आहे. याचा अर्थ या कुणबी समाजाकडे आमचे दुर्लक्ष आहे असे नाही. आता या प्रश्नाच्या बाबतीत आपण लक्ष वेधले आहे म्हणूनच मील सांगितले की, यासाठी अध्यादेश काढावा लागणार आहे. ..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यासाठी अध्यादेश काढण्याची गरज नाही. 12 वर्षे कूळ जमीन कसत असेल तर ती आपोआपच त्याच्या नावावर होईल हा कायदा आहेच. तेव्हा यासाठी आता आणखी कोठली दुरूस्ती आपण कायद्यात करणार आहात ?

श्री. सुरूपसिंग नाईक : सभापती महोदय, कूळ कायद्याच्याबाबतीत काही दुरूस्ती करावयाची झाल्यास त्यासाठी राष्ट्रपतींची संमती पाहिजे आणि तो प्रस्ताव राष्ट्रपतींच्या संमतीसाठी गेलेला आहे. तो आल्यानंतर त्याला मान्यता मिळेल.

श्री. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागातून तीन विभाग एकत्र आले आहेत. तेव्हा निरनिराळे कायदे त्या तिन्ही विभागा असणे शक्य आहे. त्यात काही भागामध्ये यासाठी सवलत आहे आणि काही भागामध्ये ही सवलत नाही, ही गोष्ट खरी आहे का ?

( यानंतर श्री. जागडे ....3ए 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत माझ्याकडे आता माहिती नाही. मी त्या बाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कुणबी समाजाच्या बेदखल कुळांचे प्रश्न गेल्या 30 वर्षापासून रेंगाळलेले आहेत. निवेदनात या बाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. असे असतानाही माननीय मंत्रिमहोदय असे म्हणत आहेत की, या बाबतची माहिती मला माहिती नाही. हे बरोबर नाही. सभापती महोदय, निवेदनात असे म्हटले आहे की, " मा. मुख्यमंत्री यानी स्व.शामराव पेजे स्मृती न्याय आणि रायगड जिल्हा कृति समिती यांच्या संयुक्त विद्यमाने माणगांव येथे आयोजित केलेल्या सहाव्या पुण्यतिथी समारंभात दि. 16.11.1997 रोजी एक उच्चाधिकार समिती स्थापण्याची घोषण केली. " याचा अर्थ 1997 सालापासून या प्रश्नाची माहिती शासनाला आहे. निवेदनात पुढे असेही म्हटले आहे की, " त्यानुसार दि. 1 एप्रिल 1999 शा.नि. अन्वये समितीची स्थापना व त्यावर श्री. अनंत गिते, खासदार यांची अध्यक्षपदी नियुक्तीबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले." याचा अर्थ 1999 सालापासून तरी प्रश्न शासनाला माहिती आहे. सभापती महोदय, कुणबी समाजाच्या अस्तित्वाचा हा प्रश्न आहे. सभापती महोदय, निवेदनात पुढे असेही म्हटले आहे की, " श्री. शंकरराव म्हसकर यांनी सादर केलेल्या अहवालातील प्रश्न खालील प्रमाणे आहेत :-

1) बेदखल कुळांचा प्रश्न.
2) वहिवाटीत असलेल्या परंतु अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या जमिनी कुळाच्या नावे करणे.
3) मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती.
4) वसतिगृहे चालविण्याबाबत व प्रवेशाबाबत असलेल्या जाचक अटी शिथील करणे.
5) कुणबी समाजाच्या विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी वसतिगृहे."

सभापती महोदय, या शिवाय कुणबी समाजाचे अनेक प्रश्न आहेत. त्यांचे प्रश्न अनेक वेळा या सदनात मांडण्यात आले आहेत. श्री. नाईक हे ज्येष्ठ मंत्री आहेत, जुनेजाणते मंत्री आहेत. असे असताना त्याना या बाबतची माहिती नाही, असे म्हणणे बरोबर नाही.

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, बेदखल कुळांच्या प्रश्नाबाबतची माहिती आता मला नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, तीन भागात तीन वेगवेगळे कायदे अस्तित्वात आहेत काय ? असा प्रश्न मी विचारला असता, त्याची माहिती मा. मंत्रिमहोदयांना नाही. मी आता दुसरा प्रश्न विचारीत आहे. माननीय मंत्रिमहोदयांकडे माननीय राष्ट्रपतींकडे काय पाठविले आहे ? तसेच ते केव्हा पाठविले आहे ?

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, मुंबई कुळ वहिवाट अधिनियम 1948 नुसार कुळांना त्यांचे दावे शिथील करण्यासाठी तसेच त्यामध्ये सुधारणा करणारे विधेयक माननीय राष्ट्रपतींकडे महसूल विभागामार्फत पाठविण्यात आले आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील कुळांच्या ताब्यात अजून जमिनी आहेत काय ? ही कुळं या जमिनी कसत आहेत काय ? श्री.शंकरराव म्हसकर यांनी ज्या शिफारशी शासनाला केल्या आहेत, त्याची माहिती शासनाला आहे काय ? कुळ वहिवाट कायद्याच्या अख्यत्यारित बेदखल कुळ हे सिध्द होऊ शकते काय ?

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, बेदखल कुळांचा मुद्दा माननीय सदस्यांनी उपस्थित केला होता. त्याचे मी स्पष्टीकरण केले आहे.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कुळ कायदा अस्तित्वात आहे काय? असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कसेल त्याची जमीन हा कायदा या राज्यामध्ये अस्तित्वात आहे...

श्री. दिवाकर रावते : सभापतीं महोदय, आदिवासींच्या जमिनी बळकाविल्या जात आहेत, त्यांना त्या खात्याचे मंत्री देखील न्याय देऊ शकत नाहीत. कुणब्यांना न्याय देण्याबाबत सुध्दा मंत्रिमहोदयांकडे उत्तर नाही. माझ्याकडे ही माहिती नाही, माझ्याकडे ती माहिती नाही असे सांगून मंत्रिमहोदय या समाजाचा अवमान करीत आहेत...

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय,माझ्या विभागाची सर्व माहिती माझ्याजवळ आहे. मी या मध्ये कोणत्याही समाजाचा अवमान करण्यासाठी उभा राहिलेलो नाही. माननीय सदस्यांनी जी माहिती विचारली आहे ती या क्षणी माझ्याजवळ उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवायला तयार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील कुणबी समाजाला न्याय देण्याबाबत हे सरकार गेली 30 वर्षे उदासीन आहे. मंत्रिमहोदयांना माहिती विचारली तरी ते देत नाहीत. या आघाडी सरकारचा कुणबी समाजासंबंधी असलेल्या उदासीन धोरणाचा निषेध करुन आम्ही बर्हिगमन करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सर्व माननीय सदस्य सभात्याग करतात.)

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सांगली जिल्हयातील कृष्णा व्हॅली सहकारी बँकेच्या संचालकांनी केलेला कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार.

मु. शी : सांगली जिल्हयातील कृष्णा व्हॅली सहकारी बँकेच्या संचालकांनी केलेला कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य प्रा. शरद पाटील यां-ी दिलेली लजवेधी सूच-ाा.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-ो ि-ायम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीजडे स-मा-ा-ीय सहकार मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी ि-ावेद-ा जरावे, अशी वि-ांती जरतो.

"सांजली जिल्हयातील जृष्जा व्हॅली सहजारी बँजेच्या संचालजां-ी जेलेल्या जोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार व अपहार उघडजीस आल्यामुळे सांजली जिल्हयात ि-ार्माज झालेली जळबळ, या बँजेच्या ठेवीदार व्यक्ती व पत संस्थांच्या जोटयावधी रुपयांच्या ठेवी धोक्यात येजे, लेजापरिजजां-ी वर्षा-ुवर्षे चाललेल्या जैरजारभाराजडे डोळेझाज जरु-ा बँजेला अ वर्ज देजे, बँजेतील भ्रष्टाचार उघडजीस आल्या-ांतर देजील भ्रष्टाचारास जबाबदार असलेल्या संचालज मंडळावर जायदेशीर जारवाई जरज्याबाबत शास-ााच्या सहजार जात्याजडू-ा झालेली दिरंजाई या बँजेतील घोटाळयास जबाबदार असजाऱ्या संचालजाविरुध्द पोलीस जारवाईस होत असलेली ढिलाई, उलट ठेवीदारां-ााच वेठीस धरज्याचा पोलिसाचा प्रयत-ा, त्यामुळे बँजेच्या सभासदांमध्ये व ठेवीदारांच्या म-ाामध्ये ि-ार्माज झ ाालेला संशय व भितीचे वातावरज याबाबत शास-ाा-ो जेलेली वा जरावयाची तातडीची उपाययोज-ाा व शास-ााची भूमिजा."

डॉ. पतंगराव कदम ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, लजवेधी सूच-ोसंबंधीच्या ि-ावेद-ााच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ाा आधीच वितरीत जेल्या असल्यामुळे मी ते ि-ावेद-ा आपल्या अ-ुमती-ो सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : ि-ावेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

ि-ावेद-ा
( प्रेस : येथे सोबतचे ि-ावेद-ा छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील कृष्णा व्हॅली सहकारी बँकेत कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार संचालकांनी केला आहे. सहकार खात्याच्या लेखा परिक्षणानंतर फेर लेखा परिक्षण करण्यात आले व दि.23.3.2005 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी बँकेचे संबंधित दफ्तर जप्त केले आहे असे निवेदनात म्हटले आहे. लेखा परिक्षणामध्ये झालेल्या गैर व्यवहाराबाबत संचालकांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई सुरु केली आहे. तथापि, या संचालकांना पकडण्याची कारवाई करण्याऐवजी ज्या संस्थेने बँकेत ठेवी ठेवल्या आहेत त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी बोलावून जणू काही ते गुन्हेगार आहेत अशा प्रकारे प्रश्न विचारुन त्यांना वेठीला धरण्याचे प्रयत्न होत आहेत. ज्या सामान्य लोकांनी ठेवी ठेवल्या आहेत त्यांनाही बोलावून त्यांच्याकडून माहिती मिळविण्याचा पोलीस प्रयत्न करीत आहेत. म्हणजे चोराला सोडून संन्याश्याला बळी देण्याचा प्रकार चालू आहे. त्यासाठी राज्य सरकार काय करणार आहे? दुसरा प्रश्न असा की, ज्या संचालकांनी गैर व्यवहार केला त्या संचालकांना जबाबदार धरण्याऐवजी काही कर्मचाऱ्यांना वेठीला धरण्याचा प्रयत्न चालू आहे ते योग्य नाही. चुकीच्या पध्दतीने धोरण राबविण्यास संचालक मंडळ जबाबदार असल्यामुळे संचालक मंडळावर कारवाई झाली पाहिजे. जे संचालक फरारी असल्याचे दाखविले आहेत त्यांचे पत्ते व माहिती पोलिसांना असली पाहिजे.तेव्हा त्यांना पकडण्याची कारवाई ताबडतोब झाली पाहिजे. ज्या ठेवीदारांनी ठेवी गुंतविलेल्या आहेत त्यांना त्यांच्या ठेवी परत मिळण्यासाठी सहकार खात्याने रिझर्व्ह बँकेची परवानगी घेऊन गोरगरीब ठेवीदारांना ठेवी परत करण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, शासनाचा ऑडिट रिपोर्ट आल्यानंतर संचालक मंडळावर कारवाई केली आहे. त्या बँकेवर डेप्युटी रजिस्ट्रार यांना प्रशासक म्हणून नेमले आहे. तसेच, पोलीस केस दाखल केली असून पुढील कारवाई पोलीस करीत आहेत.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, संचालकांना पकडण्याऐवजी ठेवीदारांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. ठेवीदारांना बोलावून त्यांना हॅरॅस करण्याचा प्रयत्न सुरु आहे तो होता कामा नये. ज्यांनी बँकेत ठेवी ठेवल्या आहेत त्यांना त्यांच्या ठेवी परत करण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, वसुलीसाठी सगळयांवर केसेस केलेल्या आहेत. त्यामध्ये कलम 91 खाली 27 केसेस केलेल्या असून त्यामध्ये 5 कोटी 44 लाख इतकी रक्कम आहे. त्यानंतर 84 केसेसमध्ये 34 कोटी 55 लाख आणि निगोशिएबल इन्स्टयुमेंट ॲक्टखाली 20 केसेस केलेल्या आहेत आणि त्यामध्ये 28 लाख रुपये आहेत. तसेच पोलीस कोणाला चौकशीसाठी बोलवित आहेत याची माहिती घेऊ. पण आमच्या खात्याने याबाबतीत पोलिसांना काही सांगितलेले नाही, तर बँकेच्या संचालक मंडळावर कारवाई करण्यासाठी केस केलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी बँकेने ज्यांना कर्ज दिलेले आहे, ते वसूल होण्याची शक्यता आहे का ? ज्यावेळी या बँकचे ऑडीट करण्यात आले, तेव्हा ऑडीटरने या बँकेला "अ" वर्ग दिला आहे आणि ते बेकायदेशीर होते. म्हणून त्या लेखापरीक्षकावर शासन कारवाई करणार आहे का ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, जेव्हा याबाबतीत चौकशी झाली. तेव्हा ऑडीटरने तक्रार केली आहे. तेव्हा अगोदरच्या तपासणीमध्ये या बँकेला "अ" वर्ग का दिला ? याची चौकशी करु.

-----

. . . .3 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचनेबाबत

**उप सभापती** : सहाव्या क्रमांकावर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, दुष्काळात भरडल्या जाणा-या शेतक-यांच्या संबंधात मी लक्षवेधी सूचना दिली असून ती अतिशय महत्वाची आहे. तेव्हा ती पुढे ढकलण्याचे कारण काय आहे ?

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी अशी माननीय सभापतींना विनंती केली होती आणि त्यांच्या अनुमतीने ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

----

. . . .3 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी.: विद्यमान उप संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण

प्रादेशिक कार्यालय,अमरावती यांनी केलेला गैरव्यवहार.

मु.शी.: विद्यमान उप संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,अमरावती यांनी केलेला गैरव्यवहार यासंबंधी श्री.सुधाकर गणगणे,प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री. व्ही.यू.डायगव्हाणे,वसंतराव खोटरे,नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापूरे,उल्हास पवार वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुधाकर गणगणे(विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"विद्यमान उप संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, अमरावती (श्री.आर.आर.आसावा) हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था,अकोला येथे प्राचार्य पदावर कार्यरत असताना त्यांच्या हातून खरेदी प्रकरणात झालेला गैरव्यवहार होणे, वित्तीय अधिकारांचे उल्लंघन होणे, नियमबाहय देणग्या स्विकारणे,पदाचा दुरुपयोग करणे, शासन निर्णयाचे उल्लंघन करणारे मनमानी वर्तन करणे, चौकशी अधिका-यास असत्य माहिती देणे इत्यादी अनेक बाबतीत प्राथमिक चौकशीत दोषी आढळल्याने त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी जुलै 2004 मध्ये करण्यात आली असली तरी याबाबत तत्परतेने कारवाई न होणे, गंभीर स्वरुपाचे आरोप असल्याने व चौकशी पूर्ण होण्यास अक्षम्य विलंब होत असल्याने निर्माण झालेले संशयाचे वातावरण व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.सुरेश शेट्टी(उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने-संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .3 सी-4



श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, शासनाने जे निवेदन केलेले आहेत, ते अत्यंत दिशाभूल करणारे आहे. ही घटना शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी आहे. याठिकाणी एका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासकीय अधिका-याने प्राचार्य पदावर काम करीत असताना फार मोठा भ्रष्टाचार केल्यानंतरही त्याला डेप्युटी डायरेक्टरच्या पदावर बढती दिली जाते. तेव्हा ही पदोन्नती देण्यामध्ये चुक झालेली आहे हे शासन मान्य करेल का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या अधिका-याविरुध्द ज्या तक्रारी आल्या होत्या, त्यावर प्राथमिक चौकशी झाली आणि आता विभागीय चौकशी सुरु आहे. या चौकशीचा जो अहवाल येईल, त्याप्रमाणे आम्ही नेसेसरी ॲक्शन घेणार आहोत.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, प्राचार्य पदावर असताना त्या अधिका-यानाने फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केला होता. त्याची शासनाकडे रितसर तक्रार दिली होती. त्यानंतर देखील शासनाने त्याला पदोन्नती का दिली ? असा माझा स्पेसीफीक प्रश्न आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याबाबतीत तक्रार आल्यानंतर शासनाने संबंधितांच्या विरुध्द प्राथमिक चौकशी सुरु केली होती. त्याचा रिपोर्ट आला असून आता जी. ए. डी.मार्फत विभागीय चौकशी सुरु आहे. आजच मी याबाबतीत माहिती घेतली असता असे सांगण्यात आले की, याबाबतचा अहवाल लवकरात लवकर शासनाला देत आहोत. हा अहवाल आल्यावर आम्ही लगेच ॲक्शन घेऊ.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, प्राथमिक चौकशीमध्ये ते दोषी आहेत हे शासनाने मान्य केलेले आहे. तेव्हा दोषी असतानाही त्यांना बढती देण्यात आली आहे. याबाबतीत शासनाने चुकीचे धोरण स्विकारलेले आहे. त्यामुळे शासन त्यांना निलंबित करणार आहे का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, विभागीय चौकशीचा रिपोर्ट आल्यावर, त्यामध्ये ते दोषी ठरले तर या अधिका-यांवर आपण नक्की कारवाई करु.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे...... 15:55

श्री.पांडुरंग फुंडकर : उत्तरामध्ये म्हटलेले आहे की," चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासन ज्ञापन क्रमांक व्यशिअ 2903/1198/(प्रक्र.109) व्याशि-1, दिनांक 30 जुलै 2004 रोजीच्या अन्वये दोषारोप बजावण्यात आलेले आहेत. चौकशी होऊन आरोप सिध्द झालेला आहे. दोष आढळून आलेला आहे. आता आपण विभागीय चौकशी करत आहात, या अगोदरची चौकशी कोणी केली, त्यांच्यावर आरोप कोणी ठेवला ? हा आरोप सिध्द झाला तर त्यांना प्रमोशन देण्याचे कारण काय ?

श्री.सुरेश शेट्टी : प्राथमिक चौकशी झालेली आहे, त्याचा अहवाल शासनाकडे आलेला आहे. त्यानंतर विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. त्यांचा रिपोर्ट आल्यानंतर तो तपासून योग्य कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : प्राथमिक चौकशी कोणी केली ?

(उत्तर आले नाही.)

प्रा.जोगेंद्र कवाडे : उप संचालकांनी भ्रष्टाचार केलेला आहे, त्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो की काय, अशाप्रकारचा संशय या प्रकरणामध्ये यायला लागलेला आहे. म्हणून ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्या उप संचालकांचे नाव श्री.आर.आर. आसावार असे आहे. सभापती महोदय, अकोला येथे श्री.आसावार हे प्राचार्य पदावर असतांना, त्यांनी अनेक प्रकारची अनियमितता केलेली आहे. भ्रष्टाचाराच्या संबंधात शासनाला चौकशी अहवाल देखील प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने चौकशी झाली. माझा पॉईन्टेड प्रश्न असा आहे की, भ्रष्टाचार करणारे हे उप संचालक आहेत, अधिकार आहेत, त्यांना पदोन्नती देण्याचे शासनाचे धोरण आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : मी वारंवार सांगितलेले आहे की, प्राथमिक चौकशी झाली. त्यानंतर विभागीय चौकशी चालू आहे. विभागीय चौकशीचा अहवाल आल्यानंतर मी आश्वासन देऊ इच्छितो की, जो काही अहवाल येईल, त्याबाबतची संपूर्ण कारवाई करणार आहोत, यामध्ये कोणाला संरक्षण देणार नाही.

प्रा..जोगेंद्र कवाडे : आय.टी.आय.मध्ये प्रवेश देताना गैरव्यवहार केलेला आहे. ते दोषी आहेत...

श्री.सुरेश देशमुख : प्राथमिक चौकशीमध्ये दोषारोप सिध्द झालेला आहे, तेव्हा त्यांना आता निलंबित करायला काय अडचण आहे ? त्यांना ताबडतोब निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी करावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/

श्री.सुरेश शेट्टी : विभागीय चौकशी चालू आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर निलंबन किंवा अन्य जी काही कारवाई आहे ती करण्यात येईल.

श्री.सुरेश देशमुख : दोषारोप ठेवलेला आहे, त्यामुळे त्यांना निलंबित करून विभागीय चौकशी करण्यास काय हरकत आहे ?

...(अडथळा)...

श्री.पांडुरंग फुंडकर : उत्तरामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, "दोषारोप बजावण्यात आलेले आहेत. तसेच, या दोषारोपांच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,1979 खाली च्या नियम 8 अन्वये कार्यवाही करणे आवश्यक असल्याने त्यानुसार कार्यवाही करून तदनंतर या प्रकरणी शासन आदेश क्रमांक व्यशिअ 2903/1198/(प्र.क्र.109) व्यशि-1,दिनांक 5 ऑक्टोबर,2004 अन्वये नियमानुसार विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत विभागीय चौकशी चालू आहे." हे स्वतंत्ररित्या चौकशीला प्रकरण दिल्यानंतर त्यांना प्रमोशन देण्याची गरज काय आहे ? म्हणून या अधिकाऱ्यांना आपण निलंबित करणार आहात काय ?

श्री.सुरेश शेट्टी : मी वारंवार सांगत आहे की, विभागीय चौकशी चालू आहे, ती चौकशी झाल्यानंतर त्याबाबतचा जो काही अहवाल येईल, त्याप्रमाणे ताबडतोब कारवाई करण्यात येईल, त्यामध्ये निलंबनाचीही ॲक्शन घ्यायची असेल तर ती घेण्यात येईल.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( काही सदस्य एकाचवेळी बोलत असतात )

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, डिपार्टमेंटल चौकशी योग्यरीतीने व्हावी यासाठी त्याची दुस-या विभागात बदली करण्यात येईल काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, श्री. सुधाकर गणगणे साहेबांनी प्रश्न विचार-ल्याप्रमाणे आजच्या आज त्याची बदली करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : ट्रान्सफर करुन तो अधिकारी पुन्हा दुस-या ठिकाणी भ्रष्टाचार करणार असेल तर अशा अधिका-याला संरक्षण देण्यास काय अर्थ आहे.

श्री. सुरेश शेट्टी :सभापती महोदय, त्या अधिका-याची ट्रान्स्फर करु. त्याला निलंबित करु शकत नाही. त्याची डिपार्टमेंटल चौकशी चालू आहे. त्यामुळे त्याला निलंबित करता येत नाही. नाही तर तो परत उद्या कोर्टात जाऊन स्टे ऑर्डर घेईल.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, आजच्या आज त्याची ट्रान्स्फर करु. ट्रान्स्फर ही पनीशमेंट नाही. ठीक आहे, तुम्ही आजच्या आज त्याची ट्रान्स्फर करा. सभापती महोदय, हे गंभीर प्रकरण आहे. तेथे इतका त्रास आहे तो सारा त्रास रेकॉर्डवर येणार नाही. पण रेकॉर्डवर आलेला त्रास सांगतो. तीन शिक्षकांच्या बाबतीत त्याने काही ऑर्डर्स पास केलेल्या आहेत. दिनांक 16.11.2001 ला हायकोर्टाने इन्टेरियम स्टे दिला. त्यानंतर त्याने पुन्हा दिनांक 20.8. ला हायकोर्टात ॲप्लीकेशन केले. दि.20.8.2002 ला हायकोर्टाने पुन्हा स्टे ऑर्डर कन्टीन्यू केली. त्यानंतर हे शासनाकडे सांगून सुप्रिम कोर्टात गेले. दि.22.10.2002 ला सुप्रिम कोर्टाने सांगितले, की हायकोर्टाच्या ऑर्डरमध्ये आम्ही इन्टरफिअर करणार नाही,त्यांचे बरोबर आहे. मग पुन्हा ते हायकोर्टात गेले. दि.6.3.2003 ला हायकोर्टाने सांगितले की,आमची ऑर्डर कन्टीन्यू राहील. पुन्हा ते हायकोर्टात गेले. आता हायकोर्टाने, In civil application No.732/05, Writ Petition No.7387 of 2001 मध्ये ऑर्डर दिलेली आहे. आपल्याला अचंबा वाटेल. हायकोर्टाने असे म्हटलेले आहे की, सुप्रिम कोर्टात तुम्ही गेलात ही गोष्ट हायकोर्टापासून लपवून ठेवली त्यामुळे आता आम्ही स्टे देणार नाही. आणि त्यांनी असा शेरा पास केला आहे की, "It is not pointed out to this court that the apex authority has refused to interfere with the order passed by this court granting interim bail. In these

..3E-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

circumstances, we are constrained to observe that not only the present application is mis-concieved but is at the interest of some of the government officer who is bent upon to harass the petitioner. We are, therefore, inclined to saddened exemplary cost of Rs.5000/- on the state government. We may observe that the state government is at liberty to inquire into the matter to find out as to which officer is responsible for this unnecessary litigation and recover the cost from the officer, if found responsible." हे अधिकारी तेच आहेत काय ?असा माझा प्रश्न आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दिनांक 5 ऑक्टोबर, 2004 ला त्याच्या विरुध्द डिपार्टमेंटल चौकशी सुरु झाली. आम्ही परत जी.ए.डी.ला पत्र लिहिले आहे. त्या पत्राला जी.एस.डी.कडून उत्तर आले की, आमच्याकडे खूप काम आहे. पण आम्ही प्रॅयॉरिटीने या प्रकरणासंबंधीचा अहवाल तुमच्याकडे पाठवू. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितलेले आहे ते सर्व चौकशी समितीसमोर आहे. जी.ए.डी. ने लेखी पत्र दिले आहे की, आमच्याकडे खूप प्रकरणे पडली आहेत. तुमचे प्रकरण प्रॅयॉरिटीवर घेऊन तपासणी करुन अहवाल देऊ. सभापती महोदय, जया दिवशी जी.ए.डी.कडून अहवाल येईल त्या दिवशी त्याच्यावर योग्य कारवाई करु.

----------

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निर्मिती अंतर्गत बायोडिझेल प्रकल्प पडीत जमिनीवर जट्रोपा नावाच्या वनस्पतीची मोठया प्रमाणावर लागवड करण्याची केलेली घोषणा.

**मु. शी** : अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निर्मिती अंतर्गत बायोडिझेल प्रकल्प पडीत जमिनीवर जट्रोपा नावाच्या वनस्पतीची मोठया प्रमाणावर लागवड करण्याची केलेली घोषणा.यासंबंधी स-मा-ा-नीय सदस्य सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, विनायकराव मेटे, जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजिया खान, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील वि.प.स.यां-ी दिलेली लज्ञवेधी सूच-ा.

श्री. विनायकराव मेटे ( महाराष्ट्र विधानसा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-ने नियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वज-िज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-नीय अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे लज्ञ वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी निवेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

" राज्यात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निर्मिती अंतर्गत बायोडिझेल प्रकल्प पडिक जमिनीवर जट्रोपा नावाच्या वनस्पतीची मोठया प्रमाणावर लागवड करण्याचा सन 2005-06 च्या अर्थसंकल्पात अलिकडेच मा.वित्त मंत्र्यांनी केलेली घोषणा, वास्तविकदृष्टया शहरी भागातील औद्योगिक क्षेत्राकडे बेरोजगारांचे वाढत असलेले लोंढे नियंत्रणात आणण्यासाठी उक्त योजनेची अंमलबजावणी कार्यान्वित करण्याची होत असलेली अहमहिका, विशेषत्वाने खाजगी प्रवर्तकांना त्यात भरीव प्रोत्साहन देण्याची केलेली घोषणा, या संदर्भात राज्यातील विशेषत: अवर्षण प्रवण क्षेत्रातील किंवा घोषीत/संरक्षीत वानिकी क्षेत्रात आणि त्याचबरोबर अल्पभूधारक शेतक-यांच्या दैनंदिन रोजगाराचा प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने सदर योजना कार्यान्वित ठेवण्याची सततची होत असलेली मागणी, याबाबतीत विशेषकृती आरखडा व धडक कार्यक्रम कर्यान्वित करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रया."

श्री. विनय कोरे ( अपारंपारिक ऊर्जा मंत्री ) : : सभापती महोदय, लज्ञवेधी सूच-ेसंबंधीच्या निवेद-ााच्या प्रती मा-ा-नीय सदस्यां-ाा आधीच वितरीत ज्ेल्या असल्यामुळे मी ते निवेद-ा आपल्या अ-ुमती-ने सभाज्ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेद-ा सभाज्ृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

निवेद-ा

( प्रेस : येथे सोबतचे निवेद-ा छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायकराव मेटे :सभापती महोदय, उत्तरात सांगितले आहे की, ही योजना शासन कार्यान्वीत करण्याचा विचार करीत आहे. या माध्यमातून मला विचारावयाचे आहे की, या आर्थिक वर्षात ही योजना कार्यान्वीत करणार काय?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, उत्तराच्या सुरुवातीलाच दिलेले आहे की, महाराष्ट्र राज्याच्या अपारंपारिक ऊर्जा धोरण एकत्रितरित्या कॅबिनेटसमोर येत आहे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे ...

आणि त्यामध्ये हा विषय आहे. त्यामुळे याच आर्थिक वर्षात या कामाची सुरुवात होणार आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, जे रिझर्व्ह फॉरेस्ट आहे किंवा ज्या वन जमिनीमध्ये प्रायव्हेट फॉरेस्ट आहे त्या जमिनीमध्ये लागवड करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. अशा प्राव्हेट फॉरेस्टला तसेच बेरोगार युवक संघटना स्थापन झालेल्या आहेत किंवा एन.जी.ओ. आहेत त्यांना किती हेक्टरपर्यन्तची मागणी केल्यास आपण देणार याबाबतीत अटी, शर्ती आणि नियम तयार आहेत काय ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, याबाबतीत एकत्रित धोरण तयार होत असताना सर्व नियम आणि अटी तयार होणार आहेत. प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये 22 लाख हेक्टर पडजमीन महाराष्ट्र शासनाकडे उपलब्ध आहे आणि सुरुवातीला महाराष्ट्र शासनाच्या या पडजमिनीवर हा प्रयोग राबविण्यात येणार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांना आणि विशेषत: ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची योजना आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये 22 लाख हेक्टर वेस्ट लँड आहे. आमच्याकडे डब्ल्यू. सी. एल. आहे. त्यांनी कोळसा काढल्यानंतर त्या ठिकाणी अनेक जागा वेस्ट लँड म्हणून पडलेल्या आहेत. त्या ठिकाणी अडचणी अशा आहेत की, प्रत्यक्षात आज वर्तमान स्थितीमध्ये ज्यांनी बायोडिझेलचे प्लॅन्ट टाकलेले आहेत त्यांना आपल्या राज्यामध्ये टोळ किंवा जट्रोपा हे जर कोठून वेचावयाचे असेल किंवा न्यावयाचे असेल तर त्याला परवानगी नाही. त्यामुळे यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी येत आहेत. तेव्हा कॅबिनेटमध्ये निर्णय करीत असताना ज्या ठिकाणी असे बायोडिझेलचे प्लँट आहेत त्यांना ते विकत घेण्याचे अधिकार देणे याचाही अंतर्भाव त्यात केला पाहिजे. ते आपण करणार काय ? 22 लाख हेक्टर जमिनीवर आपल्याला हे लावावयाचे असेल तर त्याकरिता आपल्याला नर्सरी लागतील. रोजगार हमी योजनेच्या पैशातून प्रत्येक तालुक्यामध्ये जट्रोपाची नर्सरी होणे आवश्यक आहे. बायो टेक्निकचा उपयोग करुन जास्तीत जास्त ऑइल परसेंटेज असेलेले जट्रोपाचे सीड आणि रोपे जनतेला, एन.जी.ओ.ना आणि बेरोजगार युवकांना आणि सरकारला मिळावे म्हणून प्रत्येक तालुक्यामध्ये नर्सरीज स्थापन व्हावयास

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. नितीन गडकरी ....

पाहिजेत. या दोन्ही बाबी केल्याशिवाय याला प्रोत्साहन मिळणार नाही. हे डिझेल तयार करणे हे काम तीन वर्षाने होईल. याबाबतीत आपल्या विभागाने महाराष्ट्राला मार्गदर्शन केले पाहिजे. आता डायरेक्ट जट्रोपा लावला तर तीन वर्षे उशीर लागणार म्हणून काही लोकांनी जट्रोपा लावावयाचा आणि आंतरपीक म्हणून दुसरे पीक घ्यावयाचे आणि त्याप्रमाणे काम करावयाचे अशा काही योजना केलेल्या आहेत. आपल्या विभागातर्फे याबाबतीत योग्य सीड आणि योग्य रोपे देणे आणि पुढे आपल्याला साईडपीक घ्यावयाचे असेल तर काही मार्गदर्शन देणे तसेच सर्व बेरोजगार युवकांना आणि विशेषतः महाराष्ट्रातील एन.जी.ओ. ना या जागा उपलब्ध होतील त्याबाबत तसेच हे काम करण्याच्या दृष्टीने अनुदान, मदत करणे तसेच त्यादृष्टीने योग्य तांत्रिक मार्गदर्शन करणे यासंबंधी आपले खाते काय करणार आहे ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, ही योजना आणत असताना प्रामुख्याने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी नर्सरीज उभ्या करणे, त्याचे प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन लोकांपर्यन्त पोहोचविणे, भारत देशातील पहिला बायो-ट्रेन्ड पार्क महाराष्ट्र राज्यामध्ये निर्माण करणे आणि अतिशय वेगाने हा कार्यक्रम महाराष्ट्रभर राबविणे या सगळया गोष्टींचा अंतर्भाव यामध्ये करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी जी सूचना या ठिकाणी मांडली की, सध्या जे बायो डिझेलचे प्रकल्प झालेले आहेत त्याच्या तेलबिया विकत घेण्याच्या दृष्टीने ज्या अडचणी आहेत त्यासाठी या धोरणामध्ये तेलबिया वित घेण्यासाठी जी काही सुधारणा करावी लागेल ती सुधारणा हा विभाग करण्यास तयार आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अपारंपारीक ऊर्जेच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न आलेला आहे. कालपरवा राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि गुजरात या राज्यांचे चारही मुख्यमंत्री नागपूरला येऊन गेले. नागपूरच्या जवळ बुटीबोरी नावाचे औद्योगिक क्षेत्र आहे, एमआयडीसी आहे त्या ठिकाणी अपांरपारीक स्वरुपाचे पेट्रोल निर्माण करण्याचा एक प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ श्री.बरवडनंतर 16:10

प्रा.जोगेंद्र कवाडे....

या लक्षवेधीच्या अनुषंगाने मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे की, वनस्पतीपासून बायो डिझेल तयार करणारी ही योजना आहे. परंतु प्लॅस्टिकपासून पेट्रोल व डिझेल तयार करण्याचा प्लान्ट बुटीबोरी येथे तयार करण्यात आला आहे. या लक्षवेधीच्या माध्यमातून अशाप्रकारची माहिती आपल्याला आहे काय, असल्यास त्यासंदर्भात आपण काय करणार आहात ?

श्री.विनय कोरे : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यासंबंधी मी दोनच दिवसापूर्वी या सभागृहामध्ये मी निवेदन केले आहे की, महाऊर्जातर्फे नवी मुंबईमध्ये 100 मे.वॅ. क्षमतेचा प्लॅस्टिकपासून वीज तयार करण्याचा प्रकल्प नागपूरच्या श्रीमती झाडगांवकर यांनी शोध लावला त्यांच्याबरोबर एमओयू करुन तयार करण्याचे ठरविले आहे. त्यासंबंधीची येथे घोषणा केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मघाशी प्रश्न उपस्थित केला होता त्याबाबत सांगतो की, फलोत्पादन विभागामार्फत यावर्षी 50 हजार हेक्टर क्षेत्रावर रोहयोखाली 100 टक्के अनुदानावर जट्रोपाची लागवड करावी असे सुचविण्यात आले आहे.

श्री.अरविंद सावंत : सर्वसाधारण प्रश्न येतो तेव्हा अवर्षणप्रवण क्षेत्रातील असतो. कोकणाच्या सीमेवर जट्रोपा, टोळ आणि करंजीची झाडे मिळतील. यामध्ये दोन भाग आहेत. ज्या शेतक-यांकडे वरकस जमीन आहे ती आणि शासकीय जमीन. कोकणामध्ये सुध्दा याच्या बिया आहेत. त्या उपलब्ध करुन देण्यासाठी हा कार्यक्रम कोकणासाठी राबविणार काय ? कोकणामध्ये याचे उत्पादन भरपूर मिळेल. कोकणात शेती आहे परंतु कोकणातील शेती सधनतेकडे नेणारी नाही, तेथे पोट भरेल इतका भात पिकतो. कोकणातील शेतक-यांसाठी हा चांगला व्यवसाय उपलब्ध होईल. तेथे पाण्याची उपलब्धता आहे, वरकस जमीन आहे, जंगल आहे याची आपणास माहिती आहे. म्हणून यामध्ये अवर्षणप्रवण असा क्लॉज न ठेवता जेथे शक्य होईल तेथे ही रोपे उपलब्ध करुन दिली जातील काय ?

श्री.विनय कोरे : महाराष्ट्रामध्ये सगळीकडे उपलब्ध करुन देण्यामध्ये अडचण नाही. अवर्षणप्रवण क्षेत्र एवढयासाठी म्हटले आहे की, पीक म्हणून आर्थिकदृष्टया शक्य होईल असे नाही. परंतु ज्याठिकाणी पाणी आहे त्याठिकाणी इतर पिके होऊ शकतात, म्हणून त्याठिकाणी कदाचित शेतक-यांना कदाचित परवडणार नाही. परंतु महाराष्ट्रात ही योजना राबविण्यासाठी या खात्याची कोणतीही अडचण नाही.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्रीमती कांता नलावडे : सुशिक्षित बेरोजगारांबरोबरच महाराष्ट्रामध्ये प्रत्येक जिल्हयात महिला बचत गट आहेत. या महिला बचत गटांना शासकीय पडीक जमिनीवर याची लागवड कशी करावयाची, बियाणे कसे मिळणार यासंबंधात जिल्हानिहाय प्रशिक्षणाचे आयोजन करणार काय ?

श्री.विनय कोरे : होय.

श्री.नितीन गडकरी : ज्यांचे सध्या डिझेल उत्पादन सुरु आहे असे महाराष्ट्रातील एक-दोन प्रकल्प सुरु आहेत. याला डिझेल म्हणता येत नाही आणि बायो-डिझेलही म्हणता येत नाही. कारण डिझेल म्हटले की, त्याच्यावर विक्रीकर लागतो. एक्ससाईज लागतो. हे इम्पोर्ट सबस्टिटयूट आहे. तेव्हा मंत्रिमंडळामध्ये नोट पाठवाल तेव्हा अपारंपारिक स्त्रोत्रापासून जेव्हा डिझेल तयार होईल ते सर्व करांपासून मुक्त राहील असे सरकारने धोरण ठेवले पाहिजे. सरकारने याला प्रोत्साहन दिले पाहिजे, इंडियन ऑईल, रिलायन्स, एस्सारला कशाची गरज आहे, हे शेतक-यांचे आणि आदिवासींचे डिझेल आहे. याबाबत केंद्र सरकारच्या प्रचलित कायद्याप्रमाणे डिझेल विकण्यामध्ये काही लोक खुसपट काढून अडचणी निर्माण करतात. म्हणून याचे पंप उभे राहिले पाहिजेत आणि ते पंप उभे करण्यासाठी केंद्र सरकारने कोणतीही अडचण आणता कामा नये, राज्यशासनाने कोणतीही अडचण आणता कामा नये, त्याची प्रोसिजर नक्की करुन तिला अनुमती देणे, कारण अनुमती मिळविता मिळविता वर्षे निघून जातात, हे जे बायोडिझेल तयार होईल तेव्हा आपण पुढील वर्षी नागपूरला याल तेव्हा तुमचा दोन दिवसाचा प्रवास या डिझेल गाडीतून करावा. तुम्हाला माझे आमंत्रण आहे, शासनाच्या डिझेल ॲम्बेसिडरमध्ये आम्ही बायोडिझेल भरुन देतो तुम्ही पूर्ण प्रवास करा. मा.श्री.विलासराव देशमुखसाहेब याच्यातून आले होते त्यावेळी आपल्याला आमंत्रण दिले होते त्यावेळी आपण येऊ शकला नाही. तेव्हा या उत्पादनाला विक्रीकर व केंद्राच्या अबकारी करातून मुक्त करावे यासाठी धोरण ठरवावे. तसे केले तर आतापासूनच आदिवासी, शेतक-यांना प्रोत्साहन देणारे होईल. आपण यासाठी शिफारस करणार आहात काय ?

नंतर श्री.शिगम.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे : या डिझेलला स्टेट एक्साईज आणि सेल्स टॅक्समधून वगळावे अशा प्रकारची नोट आमच्या विभागाने केलेली आहे. याबाबतीत वित्त विभागाचाच प्रश्न आहे. या बायो-डिझेलला नाव नसल्यामुळे कोणत्या कमॉडिटीमध्ये त्याचा अंतर्भाव करावयाचा याबाबत चर्चा होण्याची गरज आहे. तरीही आमचा विभाग याबाबतीत सकारात्मक विचार करील.

श्री. नितीन गडकरी : मी आपणास धन्यवाद देतो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बौध्द तसेच नवबौध्दांना अनुसूचित जातीसाठी असलेल्या योजनांपासून वचिंत होण्याची निर्माण झालेली परिस्थिती

**मु. शी** : : बौध्द तसेच नवबौध्दांना अनुसूचित जातीसाठी असलेल्या योजनांपासून वचिंत होण्याची निर्माण झालेली परिस्थिती. यासंबंधी सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. जितेंद्र आव्हाड, डॉ. वसंत पवार, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा. फौजिया खान, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. जोगेंद्र कवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्षवेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

राज्याची लोकसंख्या सन 1991 ते 2001 या कालावधीत 22.57 टक्के या दराने वाढली असतानाच अनुसूचित जातींच्या टक्केवारीमध्ये प्रचंड घट झाल्याची मार्च, 2005 मध्ये उघडकीस आलेली धक्कादायक माहिती, या जनगणनेच्या सर्व्हेदरम्यान ज्या व्यक्तींनी बौध्द अथवा नवबौध्द जात असल्याची माहिती दिली अशा सर्वच व्यक्तींचा अनुसूचित जाती या प्रवर्गात समावेश करण्याऐवजी इतर प्रवर्गामध्ये समावेश केल्यामुळे राज्यातील लक्षावधी बौध्द तथा नवबौध्द व्यक्तींवर झालेला प्रचंड अन्याय, राज्य शासनाच्या अनुसूचित जातीच्या अधिकृत यादीत बौध्द वा नवबौध्द या जातींतील नागरिकांनी शासनाकडे वेळोवेळी केलेली मागणी, या गंभीर प्रकरणी कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील बौध्द तसेच नवबौध्द जातीच्या व्यक्तींमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसचे चिडिची भावना, पसरलेले चिंतेचे वातावरण, सदर प्रकरणी लक्षावधी बौध्द तथा नवबौध्द व्यक्तींना अनुसूचित जातीसाठी असलेल्या योजनांपासून वंचित होण्याची निर्माण झालेली चिंताजनक परिस्थिती, त्यातून

==3==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे पुढे सुरु...)

सामाजिक शांतता बिघडण्याचा धोका होण्याची शक्यता लक्षात घेता तसेच बौध्द तसेच नवबौध्दांना अनुसूचित जाती या प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्याच्या दृष्टीने त्वरीत कार्यवाही करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

श्री. चंद्रकांत हंडोर ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : या लक्षवेधीच्या संदर्भात देण्यात आलेले छापील उत्तर दिशाभूल करणारे आहे. लेखी निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "अनुसूचीत जातीच्या घटकांना 13 टक्के घटनात्मक आरक्षण देण्यात आलेले आहे. सदरहू आराणाचा लाभ बौध्द धर्मातरीत घटकांनाही अनुज्ञेय आहे. बौध्द/नवबौध्द घटक अनुसूचित जातीसाठी असलेल्या सर्वप्रकारच्या सवलतींचा लाभ घेत आहेत." हे मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर दिशाभूल करणारे आहे. 3 जून 1990ला केन्द्र शासनाने अनुसूचित जातीच्या संदर्भात घटनादुरस्ती केली. 1990 च्या दुरुस्ती नुसार अनुसूचित जातीच्या संदर्भात 1950 मध्ये सुधारणाकरुन अनुसूचित जातीच्या संबंधातील आदेश बौध धर्मियांना लागू करण्याचे घोषित केलेले आहे. परंतु 1990मध्ये हे आदेश लागू केल्यानंतर इतर सवलती देण्यात आलेल्या आहेत. परंतु महाराष्ट्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केल्यानंतर धर्मांतरापूर्वी राज्यामध्ये विधानसभेच्या एकूण 36 जागा होत्या आणि अनुसूचित जाती करीता लोकसभेच्या 6 जागा होत्या. धर्मांतरानंतर विधानसभेच्या 36 जागावरुन 18 जागा करण्यात आल्या आणि लोकसभेच्या 6 जागावरुन 3 जागा करण्यात आल्या. ह्या सुधारणेनंतर धर्मांतरीत बौध्दांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये झाल्यानंतर विधानसभेच्या 18 जागावरुन 36 जागा आणि लोकसभेच्या 3 जागावरुन 6 जागा व्हायला पाहिजे होत्या. परंतु असे झालेले नाही. त्यामुळे याबाबतीत ताबडतोबीने कार्यवाही करुन वर्षानुवर्षे झालेला अन्याय शासन दूर करणार आहे काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : 2001च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 9,68,78,627 इतकी आहे. त्यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या 98,81,656 इतकी आहे. बौध धर्मियांची लोकसंख्या 58,38,710 इतकी आहे. सन 2001च्या जनगणनेनुसार राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 10.20 टक्के इतकी लोकसंख्या अनुसूचित जातीची आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची एकूण लोकसंख्या 1,57,20,366 इतकी होईल. मा.सदस्यांनी राजकीय सवलतीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, अनुसूचित जाती आणि नवबौध्द यांची एकूण लोकसंख्या 1,57,20,366 इतकी होते. यासंदर्भात जनगणना विभाग, भारत सरकार यांच्याकडून माहिती मागविण्याचे प्रयत्न सुरु केलेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.गिते 16:20

श्री. चंद्रकांत हंडोरे.....

हा थोडासा राजकीय प्रश्न उदभवू शकतो. महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करुन महाराष्ट्र शासनाचे यासंदर्भात जे काही मत असेल ते केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल. केंद्र सरकारने डि-लिमिटेशनसाठी कारवाई सुरु केलेली आहे. केंद्र शासनाकडून डि-लिमिटेशन झाले तर ज्या 18 जागा कमी झालेल्या आहेत, त्या 18 जागांच्या 36 जागा होतील. लोकसभेच्या 3 जागा कमी झालेल्या आहेत कदाचित त्या 6 होतील. यासंदर्भात सरकारच्या माध्यमातून निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. 1957 च्या धर्मांतरानंतर जागा कमी झाल्या ही गोष्ट आपण जर मान्य केली तर 1990 साली मा.श्री.व्ही.पी.सिंग हे पंतप्रधान झाले होते, त्यावेळी त्यांनी नवबौध्दांचा समावेश अनुसूचित जातीत केला. ही गोष्ट सर्वांना माहिती आहे.असे असताना आपण त्यांचा समावेश या जनगणनेमध्ये एकत्रित न करणे याचे परिणाम ऑलरेडी या समाजाला भोगावे लागत आहेत. आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, मध्यंतराच्या काळात ग्रामपंचायतीच्या निवडणूका झाल्या. त्यांची गणसंख्या नाही म्हणून 1000 जागा त्यांना गमवाव्या लागल्या. हा महाराष्ट्राचा राजकीय -हास होत आहे. 1991 च्या जनगणनेमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या 87 लाख 57 हजार होती. ती 11.10 टक्क्यांनी वाढत होती. 2001 साली 98 लाख 81 हजार एवढी झाली. ती फक्त 10.20 टक्क्यांनी वाढली आहे. या समाजाच्या लोकसंख्या वाढीमध्ये 90 टक्के घाटा दाखविला जात आहे. ही गोष्ट शॉकींग आहे. जनगणना करणारे तुमचे कर्मचारी होते. ते जनगणनेच्या वेळी सांगत होते की, तुम्ही बौध्द असाल तर तुम्ही तुमची जात सांगा. इतर प्रवर्गामध्ये तुम्हाला सामील करुन घेतो अशा प्रकारची अमिषे आमच्या मागासवर्गीय समाजाला दाखविली गेली. हा सगळा प्रकार धक्कादायक आहे. यामुळे अनुसूचित जातीच्या लोकांवर प्रचंड प्रमाणात अन्याय झालेला आहे. 40 वर्षे त्यांचा राजकीय -हास झाला. परंतु यापुढच्या काळात जास्त -हास होण्याची शक्यता आहे. या जातींचा जो गोंधळ झालेला आहे तो नाहीसा करावा. माननीय व्ही.पी.सिंग यांनी जो आदेश दिला होता त्या आदेशाची अंमलबजावणी करुन अनुसूचित जातीची लोकसंख्या 98 लाख 81 हजार आहे असे जाहीर करुन त्यांना यापुढच्या राजकीय सवलती देण्यात येतील काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, 1991 साली अनुसूचित जातीची लोकसंख्या 87 लाख होते. 1991 ते 2000 या दहा वर्षामध्ये 98 लाख 81 हजार एवढी लोकसंख्या झाली. 11 लाख 24 हजार एवढी लोकसंख्या वाढली. त्यात 12 टक्के लोकसंख्येचे प्रमाण वाढले. नवबौध्दांची लोकसंख्या 1991 या वर्षी 50 लाख होते. ते 2001 या वर्षी 58 लाख झाले. त्यात 7 लाख 98 हजार एवढी लोकसंख्या वाढलेली आहे. या दोन्ही लोकसंख्या एकत्रित केल्या. 11 लाख आणि 7 लाख 98 हजार यांची संख्या एकत्रित केली तर 20 लाखाच्या आसपास ही लोकसंख्या वाढलेली आहे. आपल्याला घटनेनुसार 13 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. ते आरक्षण 14.33 टक्के एवढे होते. त्यामुळे या धर्मियांवर कुठल्या प्रकारचा अन्याय होतो आहे असे मला काही वाटत नाही. तरी सुध्दा मी आपल्याला सांगू इच्छितो की, यासंदर्भात आपल्या तीव्र भावना लक्षात घेऊन आम्ही या लोकसंख्येचा का समावेश करण्यात आलेला नाही यासंदर्भातील माहिती जनगणना विभाग, भारत सरकार यांच्याकडून मागविलेली आहे. ती माहिती आल्यानंतर यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, त्या संदर्भात मी त्यांना सूचित करु इच्छितो की, माझ्याकडे अशी माहिती आहे की, एकूण लोकसंख्येच्या तुलनेत टक्केवारी घसरल्यामुळे 10 एप्रिलला होणा-या निवडणुकीत संपूर्ण राज्यात अनुसूचित जातीच्या हजारापेक्षा जास्त जागा कमी झाल्या आहेत. हा काय प्रकार आहे ? आपण या प्रवर्गास मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व प्रयोग केलेले आहेत. या प्रयोगाला खीळ घालण्याचा हा प्रकार आहे. एक हजार जागा कमी झाल्या, त्याचा परिणाम पंचायत समित्यांमध्ये होईल, त्याचा परिणाम जिल्हा परिषदेमध्ये होईल. सगळया स्थानिक स्वराज्य संस्था आहेत त्यात अनुसूचित जातीला फटका बसेल. ते मुख्य प्रवाहात येण्यापासून वंचीत होतील. या प्रकाराची गांभीर्याने दखल घ्यावयास हवी. या गोष्टीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावयास हवे.

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 9 पुढे सुरु..

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मा.सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. ज्यावेळी जनगणना झाली त्यावेळी प्रपत्र भरुन घेतली जातात त्याच्यामध्ये वेगवेगळे कॉलम्स् असतात. हिंदू,मुस्लीम,शीख,इसाई इ. तसेच अनु.जातीमध्ये हिंदू,शीख,नवबौध्द असा उल्लेख असतो. शिरगणती झाली त्यावेळी जात लिहिताना वेगवेगळया कॉलमध्ये ही नांवे समाविष्ट केल्यामुळे नुकसान झालेले आहे हे मान्य आहे. जनगणनेची माहिती शासनाने मागविलेली आहे. त्यानुसार यासंदर्भात भारत सरकारकडे राज्य सरकार निश्चितपणाने पाठपुरावा करील आणि योग्य ती कार्यवाही करील.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, राज्यात लोकशाही आघाडीचे सरकार आहे आणि थोर पुरुषांची नांवे घेऊन हे सरकार राज्याचा गाडा हाकीत आहे. महाराष्ट्र शासनाची अनु.जातीची जी अधिकृत यादी आहे त्यामध्ये 59 जातींचा समावेश आहे. या यादीमध्ये बौध्द आणि नवबौध्द अशा जातींचा समावेश नसल्यामुळे 2001 च्या जनगणनेमध्ये ज्यांनी आपली जात बौध्द आणि नवबौध्द अशी सांगितली त्यांचा समावेश त्यामध्ये न करता इतर प्रवर्गात करण्यात आला आणि अशा प्रकारे ग्रामपंचायतीच्या 1000 जागांना म्हणजे अनु.जातींच्या लोकांना निवडणुकीपासून वंचित रहावे लागले. हा फार मोठा अन्याय आहे. अनु.जातीची टक्केवारी त्यामुळे घसरली आहे. राजकीय नुकसान हे शासनाच्या चुकीमुळे झालेले आहे ते लवकरात लवकर दुरुस्त करण्यासाठी शासन युध्द पातळीवर प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मा.सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. नुकसान झाले आहे हे खरे आहे. या त्रृटी दूर करण्यासाठी निश्चितपणाने राज्य शासन केंद्र शासनाकडे शिफारस करील. तसेच डिलिमिटेशन कमिशनच्या माध्यमातून देखील अडचण दूर करण्याचा प्रयत्न निश्चितपणाने केला जाईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई शहरात दुधामध्ये होत असलेली भेसळ

**मु.शी.**: मुंबई शहरात दुधामध्ये होत असलेली भेसळ यासंबंधी सर्वश्री संजय दत्त,धनाजी साठे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) :सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने मा.औषधी द्रव्ये मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मुंबई शहरात दुधामध्ये पाणी मिसळून मोठया प्रमाणात भेसळ होणे,ही घटना दिनांक 27 फेब्रुवारी 2002 रोजी किंवा त्या सुमारास उघडकीस येणे,हया भेसळीमुळे राज्य शासनास सुमारे 36 कोटींचा फटका बसणे,हयावर शासनाने ठोस उपाययोजना आखण्याची गरज,हयासाठी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री. बाबा सिद्दीकी ( अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री ): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सन 2003-04 आणि 2004-05 यिा आर्थिक वर्षामध्ये भेसळीचे प्रमाण वाढलेले दिसून येते. यावरुन दुधातील भेसळीकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. निवेदनात उल्लेख केल्याप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना निरर्थक ठरल्या आहेत. दिनांक 24.3.05 रोजी यासंदर्भात सभागृहात चर्चा झाली होती. भेसळ करणा-या तथाकथित टोळयामध्ये कोण आहेत आणि कुठे कार्यरत आहेत याच्यामध्ये दुग्ध विकास खात्याचे अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासन विभागाचे निरीक्षक तपासणी करीत असतात. परंतु यामध्येच भ्रष्टाचार असल्यामुळे याबाबतीत कठोर कारवाई होत नाही. दिनांक 24.03.05 पासून आजपर्यंत दूध भेसळ होणा-या किती ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या ? मंत्रीमहोदयांनी उत्तरात म्हटले आहे की 2005 मध्ये गुन्हयात वाढ झालेली आहे परंतु संबंधितांना अटक करुन केसेस दाखल करण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. या सर्व गुन्हयांच्या तपासासाठी टास्क फोर्सची नियुक्ती शासन करील काय ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मैं मा. सदस्य श्री. संजय दत्त को बताना चाहता हूँ कि इस कार्य के लिए जॉइन्ट कमिश्नर दर्जे के एक सीनियर आई.पी.एस. अधिकारी को 15 मार्च 2005 को अपॉइन्ट किया गया है जो कि जॉइन्ट कमिश्नर, विजिलेन्स का कार्य करेंगे.

सभापति महोदय, दूध में मिलावट होती है और यह बहुत ही गंभीर बात है. इसको रोकने के लिए कुछ डायरेक्टिव्स दिए गए हैं. दूध का कारोबार महानंदा, गोकुल और वारणा जैसी डेरी के पास कोपरेटिव सेक्टर में है और इनको दूध में मिलावट रोकने के लिए डायरेक्टिव्स दिए गए हैं. इन सब से साथ बार बार मीटिंग ली गई है और निर्देश भी दिए गए हैं. उनसे कहा गया है कि आपका दूध मुंबई या ठाणे शहर में 3 बजे के पहले आ जाए और उसकी बिक्री 3 बजे के बाद शुरु हो और वह 5 बजे तक खत्म हो जाए. इसके साथ साथ उनसे यह भी कहा गया है कि प्लास्टिक की थैली को दोनों तरफ से एक-एक सेंटीमीटर सील किया जाए. चूंकि दूध का वितरण कोपरेटिव सेक्टर में है, इसलिए इन लोगों को प्लास्टिक की मशीनरी डालने में थोड़ा वक्त लगेगा. उनसे यह भी कहा गया है कि जो आपके रिटेलर हैं, उनको यूनिफॉर्म दिया जाए.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय,मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, अन्न भेसळ निरिक्षकाच्या किंवा दुग्ध विकास अधिका-यांच्या कार्यक्षेत्रात जर भेसळ युक्त दूध आढळून आल्याचे सिध्द झाल्यास संबंधित अधिका-याच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय. अगर एफ.डी.ए. का कोई भी अधिकारी या कर्मचारी दोषी पाया गया तो उसके ऊपर सख्त से सख्त कार्रवाई होगी.

-------

2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : अपत्य प्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या पेशी निर्माण करण्याच्या उपचार पध्दतीस शासनाकडून परवानगी न मिळणे

मु.शी : अपत्य प्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या पेशी निर्माण करण्याच्या उपचार पध्दतीस शासनाकडून परवानगी न मिळण्याबाबत सर्वश्री विनायक मेटे,अरविंद सावत,श्रीमती मंदा म्हात्रे, डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनायक मेटे (विधान सभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो .

" केवळ भारतातच नव्हे तर जगात प्रथमच व वेगवेगळया चाचण्यांव्दारे सातत्यपूर्ण संशोधन करुन जन्मत:च अपत्यहिनता असलेल्या स्त्री जातीला वरदान देणारे डॉ.प्रवीण म्हात्रे या संशोधकाने अपत्य प्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या पेशी ( हार्मोन्स ) निर्माण करण्याची तसेच गर्भाशय बदलण्याची शोधून काढलेली उपचार पध्दती व शस्त्रक्रिया, या उपचार पध्दतीला शासनाने परचानगी देण्यास टाळाटाळ करणे, डॉ. म्हात्रे यांनी एका महिलेवर उपचार केल्यानंतर ती यशस्वी होऊनही ही उपचार पध्दती राज्यात,देशात व परदेशात त्याचा उपयोग करण्याबाबत राज्याच्या विद्यमान आरोग्य संचालकांचा व पर्यायाने आरोग्य खात्याचा सातत्याने होत असलेला विरोध, निर्माण करण्यात येत असलेल्या अडचणी, वेळकाढूपणा व अडवणूक करणे, अवमानित करणे,त्यामुळे एका संशोधकाच्या समाजोपयोगी कार्याचे व अपत्यहिनता असलेल्या स्त्रियांना आशेचा किरणा ठरण्याच्या पध्दतीचे होत असलेले खच्चीकरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व त्याबाबतची शासनाची प्रतिक्रिया ."

श्री.रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) :सभापती महोदय,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायकराव मेटे :मी ज्या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना आणलेली आहे त्या सदर्भात मी माननीय मंत्रिमहोदयांना असे सांगू इच्छितो की,या राज्यात आणि देशात अशा लाखो महिला आहेत की ज्यांना मूल होत नाहीत. निपुत्रिक आहेत या कारणामुळे अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त झालेले आहेत किंवा अनेक महिलांचे संसार मोडलेलेसुध्दा आहेत.या महिलांच्या दृष्टीने वरदान ठरणारे संशोधन डॉ.प्रवीण म्हात्रे यांनी केलेले आहे. आपल्याला एक तरी मूल व्हावे असे ज्यांना वाटते त्यांच्या दृष्टिकोनातून हा विषय अत्यंत महत्वाचा आहे.जगामध्ये या संदर्भात आतापर्यन्त संशोधन केले जात होते परंतु ते यशस्वी होत नव्हते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे समाज सुधारक आहेत.परवाच्या दिवशी या सदनामध्ये महिला व बाल कल्याणाच्या संदर्भात अडीच तास चर्चा झाली होती.अनाथ मुलांच्या संदर्भात समाजाची आणि शासनाची जबाबदारी या संदर्भात चांगली चर्चा झाली होती.ज्यांना मूल होत नाहीत अशा लाखो माता सन्माननीय सदस्यांना येऊन भेटतात.तेव्हा सामाजिक सुधारणेचा प्रभाव या महिलांवर टाकून आज असंख्य मुले अशी आहेत की ज्यांना आई वडिलांचे प्रेम हवे असते तेव्हा अशी मुले दत्तक घेण्यासाठी सन्माननीय सदस्य या मातांना का प्रवृत्त करीत नाही?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, ज्यांना मूल होत नाही अशा लाखो महिला आहेत त्यांना न्याय मिळवून देण्यासबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे.

श्री.वसंतराव काळे : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या अध्यक्षतेखाली मुलांना दत्तक घेण्यासबंधीची एक समिती नेमावी..

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेसबंधी गांभीर्याने प्रश्न विचारावा..

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री.गायकवाड नंतर --- 16:35

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, डॉ.प्रवीण म्हात्रे ज्या महिलांना मूल होत नाही, त्यांच्यामध्ये त्यासाठी आवश्यक त्या पेशी नाहीत त्यांच्यासाठी तसेच ज्यांना गर्भाशय नाही अशा दोन्हीसाठी गेल्या 20-25 वर्षांपासून संशोधन करीत होते आणि त्यात त्यांना यश आले. 1994 साली त्यांना आपल्या संशोधनामध्ये यश आले आणि त्याबद्दल त्यांना खात्री झाली तेव्हा त्यांनी त्यासाठी सरकारकडे परवानगी मागितली. त्यासाठी त्यांनी शासनाच्या आरोग्य संचालकांकडे अनेकदा अर्ज केले, खेटे घातले. परंतु 1994 पासून 2001 पर्यंत आपल्या आरोग्य संचालकांनी त्यांना साधे उभे देखील करून घेतले नाहीत, त्यांचे म्हणणेही ऐकून घेतले नाही. ऑर्गन्स ट्रान्स्प्लांटेशनची केस आहे तुम्ही आम्हाला याबाबत काही सांगू नका, असे काहीही होऊ शकत नाही असे सांगेन त्यांना सारखे नाउमेद केले जात होते, हतोत्साही केले जात होते. या संबंधात मी स्वत: देखील त्यांना भेटलो, डॉक्टरांसह भेटलो. 2001 साली तत्कालीन आरोग्य मंत्री श्री.दिग्विजय खानविलकर यांनाही आम्ही भेटलो होतो आणि त्यांचेसमोर या संदर्भात डॉ.प्रवीण म्हात्रे यांनी प्रेझेंटेशन केले. तेव्हा त्यांचे अधिकारी देखील तेथे उपस्थित होते. याशिवाय या संदर्भात आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांचीही भेट घेऊन त्यांनाही विनंती केली होती. इतकेच नाही तर सन्माननीय श्री.शरद पवार यांनाही भेटलो आणि त्यांनी सांगितल्यानंतर 2002 सालामध्ये ऑर्गन्स ट्रान्स्प्लांटेशनसाठी परवानगी दिली गेली. एवढी दीर्घकाळ या डॉ.म्हात्रे यांनी आपल्या आरोग्य संचालकांनी आणि त्यांच्या अन्य अधिकाऱ्यांनी जीवघेणी छळवणूक केलेली आहे. ही परवानगी त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी एका महिलेवर शस्त्रक्रिया केली आणि आता त्या महिलेला चांगल्या पध्दतीने दिवसही गेलेले आहेत. सभापती महोदय, मी ही सारी माहिती येथे जाणीवपूर्वकच सांगत आहे जेणे करून आपणा सर्वांनाच त्याबाबत माहिती होऊ शकेल. 2 मे 2001 रोजी तत्कालीन आरोग्य मंत्र्यांनी हे सारे ऐकून आणि पाहून घेतल्यानंतर जाहीर केले की अशा पध्दतीने शस्त्रक्रिया झाल्या तर महिला वर्गाला त्याचा निश्चितच फायदा होणार आहे. आणि महाराष्ट्र शासनाला देखील याचा गर्व आहे. परंतु तरीही एक वर्षानंतर त्यांना परवानगी देण्यात आली. त्यानंतर आता 2004 साली गर्भाशय ट्रान्स्प्लांटेशनसाठी देखील त्यांनी परवानगी मागितली पण तीही दिलेली नाही. महिलांच्या दृष्टीने इतका महत्त्वाचा हा विषय आणि निर्णय असताना आणि महिलांच्या उपयोगाचा असताना, त्यांना वांझोटेपणाच्या कलंकापासून मुक्त करण्याची वेळ आली असताना आरोग्य संचालकांनी जाणीवपूर्वक डॉ.म्हात्रे यांची अडवणूक केली, ....

.....3एल 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मेटे .....

छळवणूक केली. आरोग्य संचालक श्री.सुभाष साळुंखे आणि त्यांचे इतर अधिकारी यांनी हे केले आहे तेव्हा त्या लोकांवर आपण काय कारवाई करणार आहात ? डॉ. म्हात्रे यांना गर्भाशय ट्रान्स्प्लांटेशनसाठी परवानगी देणार काय ? तसेच अशा प्रकारचे संशोधन करण्यासाठी सध्या शासनाकडे एकही समिती नाही तर या संदर्भात एखादी उच्चाधिकार समिती आपण निर्माण करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ट्रान्स्प्लांटेशन ॲक्ट 1994 मध्ये पास झाला आणि महाराष्ट्रात तो 1995 मध्ये अमलात आला. सन्माननीय सदस्यांना मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, डॉ.कोठारी हॉस्पिटलला यासाठी आपण परवानगी दिली आहे. ही परवानगी वैयक्तिक डॉक्टरला दिली जात नाही त्यामुळेच ती हॉस्पिटलचे नावे दिली आहे. यासाठी त्यांनी 9.2.2002 ला अर्ज केला होता आणि 2.3.2002 ला म्हणजे एक महिन्याच्या आत आपण त्यांना परवानगी दिली आहे. या शिवाय बीजांड बँकेसाठी ....

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, मी बँकेसंबंधात विचारलेलेच नाही. उलट डॉ.म्हात्रे यांनी ऑर्गन्स ट्रान्स्प्लांटेशन साठीचा अर्ज केला असता तो अर्जच स्वीकारला नाही, त्याबद्दल आपण काय तो खुलासा करावा. ... अडथळा ....

( यानंतर श्री. जागडे ..... 3एम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, मी जे विचारले आहे, त्याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी. दुसरी माहिती ते या ठिकाणी का देत आहेत ?

( गोंधळ )

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी व्यक्तिगत स्वरुपाचे प्रश्न विचारु नयेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या विषयाची संपूर्ण माहिती असलेली माणसे शासनामध्ये कमी आहेत. त्यामुळे तंज्ज्ञ डॉक्टरांची एक समिती नेमून या ठिकाणी जो अहवाल देण्यात आला आहे, त्याची तपासणी करण्यात येईल काय ? तसेच या समितीला आपले काम करण्यासाठी तीन महिन्याची मुदत देण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ॲक्ट स्पष्ट आहे. थेरिपेटीकला परवानगी देण्याचा अधिकार शासनाला आहे. एक्सपर्ट रिसर्च ॲप्रुव्हल ॲथोरिटीकडे ते अर्ज करु शकतात.

डॉ. दीपक सावंत : सभापत महोदय, तीन महिन्याच्या कालावधीसाठी तंज्ज्ञ डॉक्टरांची एक समिती नेमून या ठिकाणी जो अहवाल देण्यात आला आहे, त्याची तपासणी करण्यात येईल काय ? If it is Universally accepted then what is your problem?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हे युनिव्हर्सली ॲक्सेप्टेड नाही. जगामध्ये दोन-तीन केसेसच यशस्वी झाल्या आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय असे सांगत आहेत की, हे युनिव्हर्सली ॲक्सेप्टेड नाही. चुकीची माहिती रेकॉर्डवर राहू नये.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी असे म्हटले आहे की, दोन-तीन केसेस यशस्वी झाल्या आहेत. तसेच त्यांचा रिजेक्शनचा रेट हाय आहे. एक्सपरीमेंटच्या स्टेजवर हे आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, दि. 11.2.2002 रोजी तंज्ज्ञाची एक समिती स्थापन केली होती. त्या समितीमध्ये कोण सदस्य होते ? समितीची कार्यकक्षा काय होती ? त्या समितीने आपला अहवाल शासनाला केव्हा सादर केला आहे ? दुसरी तंज्ज्ञ समिती दि. 2.3.2005 रोजी स्थापन करण्यात आली होती. त्या समितीने कोणत्या शिफारशी केल्या आहेत ? या दोन्ही समितीने गर्भरोपण शस्त्रक्रियेबाबतची माहिती घेतली होती काय ?

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

आणि जर घेतली नसेल तर आता तांत्रिक बाबीसंबंधी माहिती विचारण्याची कां आवश्यकता निर्माण झाली? 1.3.2002 ला कोठारी रुग्णालयास मान्यता दिलेली असतांना आता आदेश निर्गमित करण्यात आले असे कां म्हटले आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, त्रिसदस्य समिती नेमली होती. त्यामध्ये डॉ. श्रीमती मंदाकिनी मेघे, असिस्टंट डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिसेस, डॉ. श्रीमती आर.जी. दावर, हेड ऑफ दी डिपार्टमेंट, ऑब. अँड गायनाकॉलॉजिस्ट, जे.जे. हॉस्पिटल, मुंबई, डॉ. बी.जी. रागडे, असिस्टंट डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिसेस हे सदस्य होते. ही समिती ओव्हेरियन ट्रान्सप्लाँटसाठी नेमली होती. ओव्हेरियन ट्रान्सप्लाँट सक्सेसफुल झाले आहे हे खरे आहे. ते सिध्द झाले आहे. त्यानंतर आपण 2004 मध्ये नेमलेल्या समितीचा उल्लेख केला ती ओव्हेरियन बँकींगसाठी नेमली होती. त्या समितीमध्ये डॉ. पंडीत चव्हाण,डेप्युटी डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिसेस, डॉ. अशोक पोतदार, असिस्टंट डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिसेस, डॉ. श्रीमती साधना तायडे, सुपरिटेंडेंट कामा हॉस्पिटल, मुंबई अशी तीन जणांची एक्सपर्ट समिती नेमली. तसेच आपण ओव्हेरीजला फ्रीज करु शकतो व नंतर ते वापरु शकतो हेसुध्दा सिध्द झाले. आपण युटेरियन ट्रान्सप्लाँटेशनच्या बाबतीत म्हणत आहात, ते आजपर्यंत सिध्द झाले नसून फक्त एकच केस सौदी अरेबियामध्ये आहे. But, that case has been failed. त्यांचे मेन कॉज ब्लड क्लॉटींग होते हे आहे. It is a rejection. आतापर्यंत ते सिध्द झाले नाही. It is still under research.

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. ओव्हेरियन बँकींगच्या बाबतीत दोन-तीन वेळा सांगितले आहे. ओव्हेरियन बँकींगचा उल्लेख लक्षवेधी सूचनेत केला नव्हता. आम्ही जे विचारले नाही ते आमच्यावर थोपविण्याचे काम सुरु आहे, त्याची आवश्यकता नाही. ओव्हेरियन ट्रान्सप्लाँटचा एक प्रश्न आहे आणि दुसरा युटेरस ट्रान्सप्लाँटेशनचा प्रश्न आहे. ओव्हेरियन ट्रान्सप्लाँटसाठी त्यांना सहा वर्षे रखडवायला लावली. किमान 50-60 वेंळा त्यांनी चकरा मारल्या. त्यांच्याकडे आपण लक्ष दिले नाही. एकेक दिवस त्यांना डायरेक्टरच्या ऑफिसच्या दारावर बसवून ठेवले. त्यांना साधी भेट सुध्दा दिली नाही. त्या ठिकाणी त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायकराव मेटे....

अवमानित करण्याचे काम केले. व नंतर परवानगी दिली. आणि युटेरस ट्रॅान्सप्लॉटकरिता आजतागायत परवानगी दिली नाही. अशा लोकांची चौकशी करुन त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय? आणि युटेरस ट्रान्सप्लॅाटला परवानगी देणार काय? अशी पध्दत अंमलात आणण्याकरिता आपण हाय पॉवर कमिटी स्थापन करणार काय?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सदस्यांनी जे जे प्रश्न विचारले आहेत त्याची योग्य उत्तरे माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेली आहेत. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व मा. सदस्य श्री. विनायकराव मेटे यांनी या ठिकाणी हाय पॉवर कमिटी नेमणार काय? अशी मागणी केली. या बाबत रिसर्च करण्यासाठी आपल्याकडे आय.सी.एम.आर. आहे. परंतु आपल्याकडे महाराष्ट्रामध्ये एथिकल समिती असली पाहिजे अशी आमची धारणा आहे. अशाप्रकारची मेडिकल रिसर्च साठी एथिकल समिती लवकरात लवकर नेमण्यात येईल. आणि दुसरे असे की, ओव्हेरियन बँकींगसंबंधी सांगितले असले तरी संपूर्ण इंप्लांटेशन असेल, युटेरियन ट्रान्सप्लॉटेशन असेल या सर्व गोष्टींशी संबंधित जे संशोधन केले गेले त्यामध्ये ते सक्सेस झाले आहे. युटेरियन ट्रान्सप्लॉटेशनच्या बाबतीत आतापर्यंत एकही केस सक्सेस झालेली नाही असे सांगितले आहे. त्या बाबत संशोधन करणे आवश्यक आहे. त्या बाबत आमच्याकडून कोठेही विलंब झालेला नाही. म्हणून याबाबत हायपॉवर कमिटी लवकरात लवकर नेमण्यात येईल एवढेच मी यानिमित्ताने सांगू इच्छिते.

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, माझ्याकडे प्रुफ आहे...

**उपसभापती** : आपण ते प्रुफ मंत्रिमहोदयांना द्या...

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, माझ्याकडे प्रुफ आहे. अशा पध्दतीने आपण किती लोकांना छळणार आहात ते सांगा? याबाबत विलंब झाला आहे त्याबाबत आपण काय करणार?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, अशाप्रकारचा विलंब झाला असेल तर त्या बाबत चौकशी करुन संबंधितावर योग्य ती कारवाई करु.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेतील बाब क्र. चार(ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 274 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 274 ही निवेदने कृपया छापावी.)

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MAP पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:50

**विशेष उल्लेख**

पृ.शी.: राज्यातील अनुकंपा तत्वावरील नोक-यांसाठीच्या ज्येष्ठता यादीमध्ये होणारी वाढ.

मु.शी.: राज्यातील अनुकंपा तत्वावरील नोक-यांसाठीच्या ज्येष्ठता यादीमध्ये होणारी वाढ याबाबत माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील अनुकंपा तत्वावरील नोक-यांसाठीची ज्येष्ठता यादी वर्षानुवर्षे वाढत आहे. घरातील कमावती व्यक्ती गेल्यानंतर घर पोरके होते. मुले लहान असतात, महिला शिकलेल्या नसतात. अशा वेळेला या कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. शासनाकडे संबंधित कार्यालयाकडून प्रस्ताव आल्यानंतर 2-2,3-3 वर्षे हेलपाटे करुनही शासन निर्णय घेत नाही. जोपर्यंत शासन तातडीने नोकरीत सामावून घेण्याचे धोरण राबवित नाही, तोपर्यंत या कुटुंबाची चाललेली हालअपेष्टा,शासनाकडून होत असलेली पिळवणूक थांबणार नाही. शासनाने अनुकंपा तत्वावरील कर्मचा-यांच्या नियुक्त्यांमध्ये शीघ्रता आणण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयाने पाठविलेल्या प्रस्तावावर शासनाने व संबंधित विभागाने तीन महिन्याच्या आत मान्यता देऊन किमान 90 दिवसात दिवंगत कुटुंबातील व्यक्ती शासकीय, निमशासकीय, शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक वा इतर सर्व क्षेत्रात नोकरीत सामावून घेण्याबाबतचा कायदा विनाविलंब केला पाहिजे, असे मी या सभागृहाच्या माध्यमातून शासनाला सुचवित आहे. यासाठी सभापती महोदय, आपण त्वरीत याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात ही नम्र विनंती."

-----

. . . .3 ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई उपनगरातील अंधेरी,विलेपार्ले व सांताक्रुझ या भागात होणारी वाहतुकीची कोंडी.

मु.शी.: मुंबई उपनगरातील अंधेरी,विलेपार्ले व सांताक्रुझ या भागात होणारी वाहतुकीची कोंडी याबाबत मा. सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मुंबई शहरातील वाहतूक कोंडी हा काही नवीन विषय नव्हे, पण मुंबई उपनगरातील अंधेरी(पू./प.), विलेपार्ले (पू./प.), सांताक्रुझ (प.) या भागात वाहतुकीची कोंडी प्रचंड प्रमाणात आहे. या भागात असलेले खाद्यपदार्थाचे स्टॉल,रिक्षा पार्कींगमुळे रस्त्यावरील बराच भाग व्यापला जातो. मोठमोठया हॉटेल्स्नी गाडी पार्कींग रस्त्यावरच केल्यामुळे फूटपाथही व्यापले जातात. विलेपार्ले (प.) येथील एस.व्ही.रोड ते कूपर हॉस्पीटल या रस्त्यावर अल्फा शॉपिंग सेंटरमुळे वाहतुकीची कोंडी होते व त्यामुळे रुग्णवाहिकांना या रस्त्यावर रुग्णवाहिका नेणे दुरापास्त होते. यामुळे रुग्णांचे फार हाल होतात. याबाबत वेळोवळी आर.टी.ओ.अधिकारी यांच्याकडे तक्रार करुनही ते दुर्लक्ष करतात. याकरीता या रस्त्यांवरील अनधिकृत फेरीवाले, अवैध रिक्षा पार्कींग काढून टाकणे, तसेच पार्कींग झ ोन नियुक्त करणे याबाबत शासनाने निवेदन करावे."

सभापती महोदय, जर आपण पश्चिम उपनगरात गेलात तर अंधेरी, पार्ला, सांताक्रुझ येथे प्रचंड वाहतुकीची कोंडी होते. वास्तविक पाहता एस.व्ही.रोड किंवा या भागतील स्टेशन रोडवर कोणत्याही प्रकारचे रस्त्याचे काम सुरु नाही. पण केवळ ट्रॅफीक अधिकारी कमी असल्यामुळे तेथे ट्रॅफीकची समस्या उद्‌भवत आहे. आपण जर सांताक्रुझ पश्चिमला गेलात तर आपल्याला एस.व्ही.रोडवरुन सांताक्रुझ स्टेशनपर्यंत येणा-या रस्त्यावर अवैध रिक्षा पार्कींग आणि अवैध स्टॉल्स्मुळे तेथे प्रचंड प्रमाणात ट्रॅफीक जाम होतो.तसेच तेथे गुरुवारी भरणारा बाजार यामुळे आपण गुरुवारी तेथे चालू देखील शकत नाही. हे फेरीवाले आहेत, ते त्याठिकाणी तात्पुरते

. . . .3 ओ-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येतात, त्याठिकाणी आपले बस्तान बसवितात आणि त्यातील काही लोकांनी प्रचंड मोठया प्रमाणावर शेडस् उभ्या करण्यास सुरुवात केली आहे. याबाबत मी अनेकदा तक्रार केल्यानंतर असे सांगण्यात येते की,आमच्याकडे म्हणजे आर.टी.ओ.कडे स्टाफ कमी आहे. आर.टी.ओ.च्या व्हॅन्स् नाहीत. तर माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, आपण या सांताक्रुझ, पार्ला आणि अंधेरी या भागात आर.टी.ओ.चा स्टाफ किती आहे याबाबत विचारणा करावी. मी याविषयीचे निवेदन श्री.माथूर साहेबांकडे दिलेले आहे. त्यांनी मला याबाबतीत असे उत्तर पाठविलेले आहे की, आमच्याकडे स्टाफ कमी असल्यामुळे याठिकाणी वाहतुकीची कोंडी होते. तर या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून या भागातील ट्रॅफीकची व्यवस्था व्यवस्थित करण्यासाठी स्टाफ उपलब्ध करुन देण्याची विनंती करतो.

-----

. . . .3 ओ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी.: पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण पाटील यांचे प्रमाद.

मु.शी.: पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण पाटील यांचे प्रमाद

याबाबत माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी
दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण पाटील यांचे प्रमाद" रुपये पाचशेच्या बनावट नोटा, संगणक अपहार, खोटे खटले दाखल करणे इ."

सभापती महोदय, मुरबाडचे माजी पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण पाटील यांचे प्रमाद हा माझ्या आजच्या विशेष उल्लेखाचा विषय आहे. एकतर माझ्या भाग्याने सन्माननीय गृहमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्याकडेही याबाबतीत ऑलरेडी दोन-तीन निवेदने गेलेली आहेत. श्री.बाळकृष्ण पाटील हे जेव्हा मुरबाड येथे पोलीस निरीक्षक म्हणून होते, त्यावेळी 500 रुपयांच्या बनावट नोटांचे ढीग त्याठिकाणी सापडले. यासंबंधात स्टेट बँकेचे अधिकारी मुरबाड येथे गेले, पण श्री.बाळकृष्ण पाटील यांनी जाणीवपूर्वक कर्तव्यात कसूर केली, पण त्यांच्या गुन्हा दाखल करण्याचे टाळले. त्यापूर्वी हे गृहस्थ पालघर येथे होते. पालघर येथे त्यांनी पोलीस स्टेशनला मिळालेले संगणक स्वत:च लंपास केले आणि दुस-या कोणीतरी चोरी केली आहे असा आरोप करुन चोराच्या उलटया बोंबा म्हणजे काय याचा प्रत्यय आणून दिला. जेव्हा प्रत्यक्ष चौकशी झाली आणि श्री.बाळकृष्ण पाटील दोषी आहेत, त्यांची उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.राठोड यांनी यासंबंधात चौकशी करुन स्वाभाविकपणे त्यांच्यावर ठपका ठेवलेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक (पुढे चालू...

लियाकत शेख यांना मुरबाडला याच श्री.बाळकृष्ण पाटील या पोलीस निरीक्षकांनी गौण खनिजाची चोरी केल्याबद्दल खोटा आरोप लादून तुरुंगात रवानगी केली. याबाबत गृह खात्याचे राज्यमंत्री श्री.म्हेत्रे यांनी आमच्याशी चर्चा केल्यानंतर, या संबंधात आम्हा मंडळींबरोबर सहमती दर्शविली. कारण गौण खनिजावरील महसूलाबाबत खरे म्हणजे राज्याचा अधिकार असतो. त्यामध्ये ग्रामपंचायतीचा काही अधिकार नाही. कलेक्टरांनी, मामलेदारांनी पत्रे दिलेली आहेत. त्यामध्ये स्वच्छ असे म्हटलेले आहे की, कोणत्या कलमाखाली कोणत्या अधिकाराखाली या श्री.लियाकत शेख यांना अटक करण्यात आली, हे अनाकलनीय आहे. आमची अनुमती विचारली नव्हती, अशा तऱ्हेने बेबंद शाहीसाठी प्रख्यात असलेले श्री.बाळकृष्ण पाटील, हे पुन्हा मुरबाडला येऊ चाहतात. त्यांनी त्याबाबत मिठाई वाटलेली आहे, आपण कृपया त्याची नक्की दखल घ्यावी, अशी मी विनंती करतो आणि माझे बोलणे संपवितो.

श्री.आर.आर.पाटील : मिठाई कोणी घेतली, मिठाई कोणी खाल्ली या सगळ्या गोष्टींची चौकशी केली जाईल. कोणाला मिठाई मिळाली नाही, याचीही चौकशी करण्यात येईल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/

**पृशी**. : कळंब तालुक्यातील देवळाली येथील रोजगार हमी योजनेवरील महिला मजुराचा झालेला मृत्यू.

**मु.शी**. : कळंब तालुक्यातील देवळाली येथील रोजगार हमी योजनेवरील महिला मजुराचा झालेला मृत्यू, याबाबत श्री.वसंतराव काळे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.वसंतराव काळे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.वसंतराव काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कळंब तालुक्यातील देवळाली येथे रोजगार हमी योजनेच्या कामावरील मालनबाई तुकाराम कोळी, वय वर्षे 50 या महिला मजुराचा दिनांक 10-5-2004 रोजी दुपारी 1-30 वाजता झालेला मृत्यू, रोजगार हमी योजनेच्या ठिकाणी पिण्याचे पाणी नसल्यामुळे व प्रथमोपचाराची कोणतीही सोय नसल्यामुळे तिचा तडफडून झालेला मृत्यू, याबाबत चौकशी होऊन दोषी व्यक्ती विरुध्द कारवाई होण्याची व मयताच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता."

औरंगाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील देवळाली गावी कृषी खात्यामार्फत रोजगार हमी योजनेचे जे काम चालू आहे, त्या कामावर औषधे, किंवा निवारा, प्रथोपचाराची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे त्या ठिकाणी काम करणारी श्रीमती मालनबाई तुकाराम कोळी या महिलेचा 'सन स्ट्रोक'मुळे 10 तारखेला दुपारी 1-30 वाजता मृत्यू झाला. म्हणजे केवळ निष्काळजीपणामुळे तिला कोणतेही मदतीचे साधन उपलब्ध नसल्यामुळे त्या महिलेला आपल्या प्राणाला मुकावे लागले. या संबंधाने जिल्हाधिकाऱ्यांकडे दूरध्वनीवरून मी जेव्हा चर्चा केली. मला आता असे कळलेले आहे की, 10 हजार रुपयाचा चेक त्या महिलेच्या वारसांना दिलेला आहे. काही तरी आपण दखल घेतो आहोत, असे दर्शविलेले आहे. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांना विनंती करू इच्छितो की, रोजगार हमीचे कृषी खात्याचे काम आहे, हे काम अतिशय भ्रष्टाचाराने बरबटलेले, लुटमार करणारे काम आहे, त्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. मजुरांना एका अर्थाने अंकित ठेवून, दहशतीखाली ठेवूनच काम केले जाते. अशाप्रकारच्या सुविधांची विचारणा केली तर त्या मजुरांना कामावर घेतले जात नाही. त्यामुळेच या महिलेला प्राणास मुकावे लागले. त्या महिलेच्या प्राणाची किंमत म्हणून सरकारने 10 हजार रुपये दिल्याचे मला कळले. आपल्याच महाराष्ट्रामध्ये विषारी दारू पिऊन मेलेल्या लोकांच्या प्राणाची किंमत 1 लाख रुपये दिले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव काळे (पुढे चालू...

गेलेले आहेत. कष्ट करणारी खेड्यातील महिला मृत्यू पावली तर तिच्या प्राणाची किंमत 10 हजार रुपये केली जाते. सभापती महोदय, खेड्यातील नागरिक हा दुय्यम दर्जाचा नागरिक आहे, सेकंडरी सिटीझन आहे, तो कष्ट करतो, म्हणून 10 हजार रुपये ? म्हणजे 1 लाख रुपये मिळविण्यासाठी खेडयातील लोकांनी विषारी दारू प्यायला पाहिजे काय ? असा प्रश्न आमच्यासारख्याला पडलेला आहे. हे राज्य कोणासाठी आहे? दारू पिऊन मृत्यू पडणाऱ्या लोकांना अभय देणे, त्यांना मदत करणे यासाठी सरकार पुढे येत असेल तर कष्ट करणाऱ्या श्रमजीवी वर्गासासाठी ग्रामीण भागातील लोकांसाठी विशेषत: महिला या मृत्यूमुखी पडत असतील तर 10 हजार रुपयाच्या मदतीची बोळवण करून चालणार नाही, तर त्यांना देखील तेवढ्याच सन्मानाने त्यांच्या मृत्यूची दखल घेऊन, तेथे होत असलेला गैरकारभार रोखण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे आणि त्या महिलेच्या मृत्यूची 1 लाख रुपये भरपाई करण्यासाठी मदत दिली पाहिजे, हे आपल्यामार्फत शासनाला सांगू इच्छितो.

--

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/

**पृ.शी.** : मुंबईतील वर्सोवा येथील नाना-नानी पार्क जवळच्या बीचवरील तिवराच्या झाडांची तोड करून बिल्डरने त्या प्लॉटवर केलेले अतिक्रमण.

**मु.शी.** : "मुंबईतील वर्सोवा येथील नाना-नानी पार्क जवळच्याबीचवरील तिवराच्या झाडांची तोड करून बिल्डरने त्या प्लॉटवर केलेले अतिक्रमण" याबाबत श्री.अरविंद सावंत,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"वर्सोवा मुंबई येथील नाना-नानी पार्क जवळील बीचवरील तिवराची झाडे तोडून त्या ठिकाणी एका बिल्डर्सने तेथील प्लॉटवर केलेले अतिक्रमण, सदर भागातील सर्वे वर्सोवा नागरिकांनी अतिक्रमण हटवून तेथे 30 फुटाचे घातलेले कुंपण, सदर बिल्डर्सच्या माणसांनी हटविण्यात येणे, हा प्रकार सर्वे वर्सोवा समितीच्या बसीन यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी वर्सोवा पोलीस स्टेशनमध्ये केलेला तक्रार, परंतु डयुटी ऑफीसरने तक्रारदारांची स्टेटमेंट रेकॉर्ड करुन अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद करून सदर बिल्डर्सच्या माणसांना तोंडी ताकीद देऊन सोडण्यात येणे, वर्सोवा येथील ओपन प्लॉट जवळून बिल्डर्सने रस्ता बांधणे, सदर रस्ता नकाशात नसतांना तो बांधण्यात येणे, अशाप्रकारे मुंबईतील वर्सोवा बीच जवळील तिवरांची झाडे तोडून ती नष्ट करणाऱ्या बिल्डर्सवर शासनाने व पोलिसांनी कोणतीही कारवाई तक्रारी करुनही करीत नसल्याने मुंबईच्या खाडी किनारपट्टीची होणारी मोठया प्रमाणावर धूप, याबाबत शासनाने दिवेदन करावे."

सभापती महोदय, मुंबईच्या वर्सोवा कांजुरमार्ग ,गोराई मालवणी या सागरी किनाऱ्यावर तिवराची झाडे आहेत,खार फुटीची झाडे आहेत. वर्सोवा येथील तिवराच्या झाडांचे संरक्षण करावे म्हणून तेथील नाना-नानी पार्कमध्ये येणाऱ्या सर्व वृध्दांनी एकत्र येऊन त्या ठिकाणी कंपाऊंड घातले.ते तारेचे कुंपण बिल्डरनी तोडून टाकले, तेथून रस्ता तयार करण्याचा प्रयत्न केला.त्याची तक्रार पोलीस स्टेशनला घेऊन गेल्यानंतर ती तक्रार पोलीस स्टेशन घ्यायला तयार नाही,अशी अवस्था आहे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आपण ॲक्टिव्हिजम ऑफ ज्युडिशियरी असे जेव्हा म्हणतो तेव्हा त्यांनाच न्याय देण्याची पाळी आलेली आहे. हायकोर्टाने सांगितले की, तिवराची झाडे आहेत त्याचे ताबडतोब संरक्षण करा. सभापती महोदय, या निमित्ताने एवढेच सांगतो की, नव्या मुंबईमध्ये पानबिच रस्ता आहे. त्याठिकाणी असणारी तिवराची झाडे, त्या ठिकाणी बिल्डर जे काम करतात त्यातून निर्माण होणारे डब्रीज खारफुटीवर आणून टाकतात आणि तेथून रस्ता तयार करतात. म्हणून शासनाने वेळीच दक्षता घेणे गरजेचे आहे. मध्यंतरी त्सुनामी लाटा आल्या. या त्सुनामी लाटांमुळे नागपटणम भागात 6 हजार लोक दगावले.तेथून जवळ असलेल्या पिचवाम या ठिकाणी खारफुटी आणि तिवराची झाडे होती. तेथील सगळी माणसे सुरक्षित राहिली. एवढे ज्याचे पर्यावरणाच्या आणि सुरक्षिततेच्यादृष्टीने महत्व आहे. ते पर्यावरण सरकार राखेल काय? या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी मागणी करतो की, पर्यावरण सरंक्षक झाडांच्या परिसराचे उपग्रह मॅपिंग 1997 पासून झालेले नाही. श्री. शरद बोबडे आणि दलवीर भंडारी ऑनरेबल हायकोर्ट जज्ज यांनी शासनाला निर्देश दिलेले आहेत की, गेल्या आठ-दहा वर्षात मॅपिंग केलेले नाही. ते ताबडतोब मॅपिंग करावे आणि ते झाडे तोडण्याचे प्रकार तातडीने थांबवावेत अशी आग्रहाची विनंती या विशेष उल्लेखाच्यामार्फत शासनाला करतो.धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढवून देणे.

**मु.शी.**: माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढवून देण्याबाबत माजी सैनिक कल्याण मंत्र्यांचा प्रस्ताव.

श्री. सतीश चतुर्वेदी ( माजी सैनिक कल्याण मंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो

"माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावा"

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 17:00

**पृ. शी.** : श्री. मनजितसिंह सेठीने श्री. साटम नावाच्या गृहस्थावर केलेले आरोप.

**मु. शी.** : श्री. मनजितसिंह सेठीने श्री. साटम नावाच्या गृहस्थावर केलेल्या आरोपाबाबत श्री दिवाकर रावते वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये

सूचना.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण मला एक निवेदन करायला सांगितले होते. त्यासंदर्भात मी पत्र दिले होते.श्री. मनजितसिंह सेठीने साटम नावाच्या ग्रहस्थावर जे आरोप केले होते त्यासंदर्भात विधानसभेत एकमताने विशेष हक्क भंगाची सूचना दाखल झालेली आहे. ती विशेष हक्काची सूचना दाखल झालेली असतांना सरकारने त्यासंदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करणे योग्य ठरेल काय याची विचारणा केली असता. त्यात हस्तक्षेप होणार नाही अशा पध्दतीने निवेदन करण्यात येईल असे सांगण्यात आले. त्यामुळे लेखी निवेदन नाही पण श्री. रावते साहेबांना पाहिजे असेल तर माहिती सांगायला मी तयार आहे. तसेच उद्या लेखी निवेदनही मी करु शकतो. आणि आता तोंडीही सांगू शकतो. आपल्याला पाहिजे त्या पध्दतीने सागण्याची शासनाची तयारी आहे.

**उपसभापती** : या ठिकाणी श्री. दिवाकर रावते साहेब आहेत. श्री. मधुकर चव्हाण साहेब आहेत. तेव्हा उद्या कशाला आजच तोंडी सांगितले तरी चालेल.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, बार संघटनेच्या अध्यक्षांनी काही आरोप केले होते. त्यात पहिला आरोप असा होता की, दोन बारच्या संदर्भात त्यांना अनुकूल निर्णय दिल्यामुळे त्यांचा विश्वास बसला. आणि या साटम बरोबर काही रकमेची त्यांनी बोलणी केली. ज्या दोन बारच्या संदर्भात त्यांनी उल्लेख केला होता त्याचे सगळे रेकॉर्ड पाहिजे तर आपण लिहून घ्या. आणि येथेही ते रेकॉर्ड होत आहे. त्या दोन्ही बारची चौकशी केल्या नंतर एका बारच्या सदर्भात अपीलच नव्हते. आणि दुस-या बारच्या संदर्भात माझ्याकडून निकाल दिला गेला नव्हता. निवडणुकीच्या दरम्यान सचिवांना आणि राज्य मंत्र्यांना पॉवर्स डेलिगेट करण्यात आल्या होत्या. त्या दरम्यान कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे निकाल देण्यात आले होते. त्यामुळे मी निकाल दिला होता आणि त्यांचा विश्वास बसला हे धादांत खोटे आहे. ज्या विलास साटम बद्दल तक्रार करण्यात आली आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 17:00

श्री. आर.आर.पाटील...

तो मुंबई शहर सेवा दलाचा उपाध्यक्ष असल्याचे सांगण्यात आले आहे. तो उपाध्यक्ष होता. दिनांक 17-2 ला माझ्याकडे तक्रार आली आहे. आणि ती तक्रार रीजवान शेख, नेहरुनगर तालुका व विशेष दंडाधिकारी, या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याने तक्रार केली होती. त्यांनी दिलेल्या तक्रारीत या साटमने फसविले आहे, अशा स्वरुपाची तक्रार मला प्राप्त झाली होती. त्याची प्रत आदरणीय पवार साहेबांनाही दिली होती.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ......

सभापती महोदय, मागील महिन्यात श्री. सेठी यांनी हा आरोप करण्यापूर्वी "अत्यंत महत्वाचे, D. C. P. ( Kurla Zone ), Please, do the inquiry and report me" असे म्हणून पुढच्या कारवाईसाठी ही तक्रार पाठविण्यात आली होती. त्याप्रमाणे श्री. साटम यांना अटकही करण्यात आलेली आहे आणि 20 तारखेपर्यन्त पोलीस कस्टडी मिळविण्यात आलेली आहे. हेच श्री. साटम एअर इंडियामध्ये लोडर होते. त्याही काळात काही प्रवाशांचा माल चोरल्याचा गुन्हा त्यांच्यावर होता. मध्यंतरीच्या काळात ते अन्य पक्षात होते. मुंबई शहर राष्ट्रवादी सेवादलाच्या अध्यक्षांनी त्यांची नेमणूक केली होती. सेवादलाच्या राज्यभर शाखा आहेत. तोंडी कोठे तरी बघितलेला पण संपर्क ठेवण्याइतपत हा पक्षामध्ये कोणताही पदाधिकारी नव्हता. त्याच्या या करणीमुळे आणि या तक्रारीमुळे सन्माननीय श्री. अरुण गुजराथी, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी त्याला पक्षातून काढून टाकण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि विशेष हक्क समितीने जी मोशन दाखल करुन घेतलेली आहे त्यामध्ये याही गोष्टीची चौकशी होणार आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. प्रमोद नवलकर ...

सभापती महोदय, मुंबई हा कधीही न संपणारा विषय आहे. जवळजवळ पंधरा दिवसाने या विषयावर आपण सविस्तर चर्चा करतो आणि त्या चर्चेचा शेवट कधी होतच नाही. याचे कारण असे की, रोज सूर्य उजाडल्याबरोबर मुंबईमध्ये एक नवीन प्रश्न देखील उजाडतो. त्यामुळे जेवढे बोलावे तितके थोडेच आहे. मी हा सगळाच विषय या ठिकाणी हाताळणार नाही. आज मुंबईमध्ये आपल्या माननीय गृहमंत्र्यांच्या कृपेमुळे जो विषय सातत्याने चर्चिला जात आहे तो विषय मी प्रथम घेतो. तो विषय म्हणजे आपली बार संस्कृती. गेल्या आठवडयामध्ये त्यांनी या ठिकाणी घोषणा केली की, मुंबईतील बार देखील बंद होणार आहेत. त्याबद्दल आम्ही सर्वांनी त्यांचे अभिनंदन कले. पण अजूनही ते बार बंद होत नाहीत. ते अजूनही चालू आहेत. याबाबत जी. आर. काढावयाचा आहे याची मला कल्पना आहे. परंतु हे सर्व करीत असताना आपला मान राखून सांगू इच्छितो की, कोणतीही कृती अज्ञानातून होता कामा नये. मी गेल्यावेळी बोललो होतो की, मुंबईमध्ये आपण जे बार म्हणता म्हणजे जे मुजराबार आहेत ते हिमनगाचे टोक आहे. व्यभिचाराचे असे किती तरी उकिरडे या मुंबई शहरामध्ये पसरलेले आहेत. त्या सगळयांचा आपल्याला एकत्रित विचार करावा लागणार आहे. नाही तर एकीकडे बंद केले तर ते दुसरीकडे जाणार आणि दुसरीकडे बंद केले की तिसरीकडे जाणार आणि काहीही बंद होणार नाही. त्यामुळे ही उपाययोजना अतिशय प्रभावीपणे व्हावी असे प्रामाणिकपणे वाटत असले तरी आणि आपण जो निर्णय घेतलेला आहे तो अतिशय महत्वाचा असला तरी तो निर्णय पुन्हा बुमरँग होऊ नये म्हणून मी आपल्याला काही गोष्टी सांगू इच्छितो. ही बार संस्कृती मुंबईमध्ये आज आलेली नाही. आज ज्याला आपण मुजरा बार म्हणतो ते उद्या कदाचित बंद होतील परंतु त्या स्वरुपाचे अनेक बार या मुंबई शहरामध्ये आहेत याची आपल्याला जाणीव नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर....

म्हणून गेल्यावेळी बोललो होतो की एक दिवस माझ्याबरोबर चला मी तुम्हाला सर्व दाखवितो. यामध्ये काही धोका नाही आणि कोणी काही बोलणार नाही, आपण वेषांतर करुन जाऊ या.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात मा.सदस्यांना निर्देश दिले पाहिजेत. मी त्यांच्याबद्दल नेहमीच आदर बाळगतो, ते सांगतात ते ऐकतो. एकदा त्यांनी बोलविल्यावर मी गेलो होतो परंतु त्यांनी मला नाना-नानी पार्कमध्ये नेले.

**उप सभापती** : मा.उपमुख्यमंत्र्यांनी आपल्याला निर्देश द्यावेत असे म्हटले आहे म्हणून मी आपल्या दोघांनाही असे निर्देश देतो की, जेव्हा अशा ठिकाणी जाल तेव्हा सभागृहाच्यावतीने मला घेऊन जावे.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, ते बिघडू नयेत म्हणून मी त्यांना नाना-नानी पार्कमध्ये नेले होते. परंतु आता मुंबई दाखविली पाहिजे अशी वेळ आलेली आहे. मंत्रिमहोदय आपल्याला कल्पना नसेल आपण मुजरा बार म्हणतो ते केवळ हॉटेलमधील म्हणतो. मुजरा बार अनेक ठिकाणी वेगवेगळया स्वरुपामध्ये आहे. तुम्ही कायदा करणार आहात किंवा ऑर्डर काढणार आहात ती त्यांना लागू होणार आहे काय ? लागू झाली नाही तर किती पंचाईत होईल म्हणून आपल्याला सावध करु इच्छितो. सभापती महोदय, मुंबई शहरातील पहिला मुजरा बार नरिमन पॉईन्ट येथील राम जेठमलानी यांचे ज्या इमारतीमध्ये कार्यालय आहे तेथे सोनिया महाल या नावाने सुरु झाला. त्यानंतर तो बंद पडला. त्याचवेळेला पूनम चेंबरच्या पाठीमागे केवढा मोठा फिशरमॅननेट म्हणून त्या ढोलकिया यांचा मुजरा बार होता, त्या ढोलकियाचा खून झाला हा विषय सोडून द्या. परंतु आजही मुंबई शहरामध्ये सुरुवातीला मुजरा बारची संस्कृती कोठे चालू असेल तर ती पॉवर हाऊससमोर आहे. त्या 4 इमारती आहेत, तेथे कम्पाऊंड आहे आणि त्या चारही इमारती मुजरा बारसाठीच प्रसिध्द आहेत. अर्थात बार हा शब्द सौम्य आहे. याचे कारण सगळेच त्याठिकाणी बियर घेतात असे नाही. मुजरा मात्र रात्री 12 वाजेपर्यंत चाललेला असतो. तो बंद करावा असे म्हणणार नाही. परंतु या सगळया परिस्थितीची जाणीव व्हावी म्हणून मी आपल्याला सांगतो. अगदी फॉरस रोडला म्हणजे रेड लाईट एरियामध्ये गेलात तर आज त्याठिकाणी 11

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.प्रमोद नवलकर....

इमारती आहेत, ज्याठिकाणी मुजरा चालतो. पहिल्या आणि दुस-या मजल्यावर मजुरा चालतो. थोडेसे ड्रिंक्स वगैरे चालते. सगळीकडे हे पसरलेले असल्यामुळे तुम्ही नेमके काय बंद करणार आहात हे माहीत नाही. मलबार हिलला मंत्र्यांच्या बंगल्याच्या आजुबाजूला मलबार अपार्टमेंट शिवाय शिमला हाऊस आहे. तेथे देखील बार होते. शबनम नावाची बाई त्याठिकाणी मुजरा चालवित होती. आता ते सुध्दा बंद पडले असावे कारण बरेच वर्षे मी गेलो नाही. परंतु बंद पडलेले असावे. चौफुल्याला काय म्हणणार हे माहीत नाही. कारण शेवटी तेथे देखील मुली नाचत असतात. पुरुष असतात. एखादा घोट घेतात, त्याच्या फारकत करुन नाव वेगळे जरी असले तरी फार अवघड आहे. पंचतारांकित हॉटेलमध्ये आपण शिरलेलो नाही. तेथे मुजरा बारमध्ये प्रकार चालतात त्याच्यापेक्षा भयंकर प्रकार नग्नता, अश्लिलता जाहिरात करुन होत आहेत. तेथे काय काय घडते ते कधीतरी सांगेन. हे नियम करीत असताना सर्व्हिस बारला हे लागू नये. जेथे सर्व्हिस बार आहेत तेथे मुली सर्व्हिस करीत आहेत. आपण एक दिवस चला हे सर्व्हिस बार अतिशय वाईट आहेत. सर्व्हिस बारमध्ये ज्या मुली काम करतात त्या मुजरा बारपेक्षा वाईट मुली आहेत. तेथे तर त्या आपल्या बाजूला येऊन बसतात, मांडीला हात लावतात, आपल्या ग्लासातील बियर पितात. हे सगळे प्रकार डीम लाईटमध्ये चालतात त्याला आपला आक्षेप नाही. म्हणून सर्व्हिस बार म्हणजे काय हे एक दिवस जाणून घ्या आणि मी आपल्याला विनंती करतो की ते बार देखील आपण बंद करुन टाका. डान्सिंग स्कूल हा एक विषय आहे. मुंबई शहरामध्ये डान्सिंग स्कूलच्या नावाखाली डान्सिंग चालतात. मुजरा म्हटला नाही तर डान्सिंग स्कूल या विषयावर लिहित होतो त्यावेळी ताडदेवच्या ए.सी.मार्केटमध्ये एका इमारतीमध्ये 21 डान्सिंग स्कूल सापडले. त्याच्या पलिकडे जाऊन सांगतो. हे विचित्र आहे. कारण आपल्याला हे सर्व फेस करावे लागणार आहे. या मुजरा बारमध्ये मुली नाचतात, गि-हाईके एका ठिकाणी बसतात. परंतु डिस्कोमध्ये गेलात तर तेथे मुली आणि पुरुष एकत्र नाचतात. डिस्कोच्या डान्समध्ये दोघे एकत्र नाचतात. म्हणजे उद्या मुजरा बारमध्ये आलेली गि-हाईके त्या मुलीबरोबर नाचायला लागली तर त्याला डिस्को म्हणावे लागेल. त्या डिस्कोला आपण हात लावलेला नाही, परंतु हे सर्व एकमेकांशी गुंतलेले आहे.

नंतर श्री.शिगम.

(श्री. प्रमोद नवलकर पुढे सुरु...

डिस्को कशाला म्हणायचे, मुजरा बार कशाला म्हणायचे, बार कशाला म्हणायचे हे काही कळत नाही. या पलीकडचा भाग म्हणजे मसाज पार्लर्स. मसाज पार्लर हा मुंबईमध्ये शिरलेला एक भयानक प्रकार आहे. पुण्यामध्ये देखील तो हळूहळू सुरु झालेला आहे. मसाज पार्लर्स म्हणजे बहुतेक ते ब्रॉथल्स आहेत. वाईट गोष्ट अशी की, काही डॉक्टर्स्‌नी आपल्या दवाखान्यामध्ये मसाज पार्लर सुरु करुन व्यवसाय सुरु केलेला आहे. अशा प्रकारचे पार्लर्स कोठे कोठे आहेत ते सांगायचे म्हटले तर ती मोठी यादीच तयार होईल. परंतु काही नावांचा मी मुद्दाम उल्लेख करणार आहे. विवा, शिवानी, हिना, रंभा, आलिशान, गॅलक्सी, उर्वशी, बॉलीवर ब्युटी, गौरी, धन्वंतरी ही सगळी पार्लर्स मुंबई मध्ये जोरदारपणे चालू आहेत. हा व्याभिचाराचा उकिरडा मुंबई शहरामध्ये वाढलेला आहे. त्याचे क्लासिफिकेशन आहे. फोरास रोड येथील वस्ती फार जुनी आहे. पण ज्याला हायक्लास व्याभिचार म्हटले जाते अशा प्रकारचा व्याभिचार गेल्या सात-आठ वर्षामध्ये फार फोफावलेला आहे. तो इतका फोफावलेला आहे की, तुम्हाला मी एक धक्कादायक बातमी देऊ इच्छितो. मुंबईमध्ये अशा जागा आहेत की, त्यांचे टेलिफोन नंबर्स आहेत. त्या टेलिफोन नंबरवर आपण टेलिफोन केला तर त्यांची प्रतिनिधी मुलगी तुमच्याकडे येते. तिला आपण 1000 रु. दिले तर ती जवळ जवळ 10 टेलिफोन नंबर्स आणि 10 मुलींची नावे देते आणि त्या टेलिफोन नंबर्सवर आपण फोन करायचे. त्याठिकाणी फोन केल्यानंतर तासाभरात मुली येतात. आता मी टेलिफोन नंबर्स देत नाही. कारण त्यातील काही टेलिफोन नंबर्स बदलले आहेत. त्या मुलींची आपण नावे पहा. फराह, रेखा, शरण, शर्ली, मोना, ऋतिका, मनिषा, मोनिका, अशी नावे आहेत. त्या टेलिफोनवर आपण "आकाश" नावाचा परवलीचा शब्द उच्चारला तरच ती मुलगी तुमच्याशी बोलेल. नंतर कुठे भेटी-गाठी घ्यायच्या याचा तपशील सांगितला जातो. ह्या गोष्टी तपासण्यासाठी पोलीस खात्याकडून खास नेमणूक केली पाहिजे. हे मी याठिकाणी काही विशेष सांगत नाही. आपण वर्तमानपत्रामध्ये माझ्या नजरेने पहाल तर तुम्हाला सर्व सापडेल. वर्तमानपत्रामध्ये सर्वांच्या जाहिराती येतात. फक्त तुम्हाला त्या कळल्या पाहिजेत एवढेच. वर्तमानपत्रातील एक जाहिरात आहे. सॉफ्ट टच - लोखंडवाला कॉम्प्लेक्स, टेलिफोन नंबर 30962851. फिलगुड- टेलिफोन नंबर 30956274, जोगेश्वरी. डॅनियल हा प्रकार म्हणजे 24 तासात होम डिलिव्हरी. तुम्ही फोन

(श्री. प्रमोद नवलकर पुढे सुरु...

केल्यानंतर तुमच्या घरी ती मुलगी येते. ब्रुथॉल्स, ह्याची देखील होम डिलिव्हरी आहे. टेलिफान नंबर 56828581 असा आहे. त्यानंतर मरीना - एलाइट फिमेल ॲट युवर डोअर स्टेप. सोफिया हा चांगला बार आहे. सभापती महोदय, मी सर्व यादी आपणास नंतर देईन. हे प्रकार 24 तास सुरु झालेले आहेत. तुम्ही तुमच्या बार्सवर देखील निर्बंध घातलेले आहेत. काहींना रात्री 10ची वेळ आहे, तर काहींना रात्री 12.00 वाजेपर्यन्तची वेळ आहे. हॉटेल्सवर वेळेचे निर्बंध टाकलेले आहे. पण या प्रकारामध्ये 24 तासात तुम्ही कधीही फोन करु शकता. तुम्हाला होम डिलिव्हरी ॲट युवर डोअर स्टेप. मालविका म्हणून एक बाई आहे. तिला फोन केल्यानंतर तिच्या प्रतिनिधीला दोन हजार रु. द्यायचे .

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 17:20

श्री.प्रमोद नवलकर..

त्यांनी मला सांगितले की, आम्ही तुम्हाला एकूण नऊ नंबर देऊ. त्यांनी मला सांगितले ते ऐकून मला धक्का बसला. नऊ नंबरपैकी तीन नंबर जे असतील ते मनी माईंडेड मुलीचे असतील. मनी माईंडेड मुलींकडे जावयाचे असेल तर तुम्हाला पैसे द्यावे लागतील. हे आतापर्यन्त आपल्याला माहिती होते. दुसरा जो वर्ग आहे तो नॉन चार्जींग असा आहे. ते नंबर तुम्हाला देऊ. ज्या मुलींना पुरुषाची आवश्यकता भासते. त्या मुलींना तुम्हाला पैसे द्यावे लागणार नाहीत. त्याने तिसरा वर्ग सांगितला तो म्हणजे हाय सोसायटी क्लास आहे. त्या ठिकाणी तुम्ही गेलात व तेथील एखाद्या महिले बरोबर संबंध ठेवले तर ती तुम्हाला पैसे देईल. हे सगळे प्रकार नवीन आहेत. माझ्या ऐकीवात ही गोष्ट कधीच आली नव्हती. पहिला वर्ग मनी माईंडेड म्हणजे तुम्हाला पैसे द्यावे लागतात. दुसरा नॉन चार्जिंग वर्ग आहे. त्या ठिकाणी तुम्हाला पैसे द्यावे लागणार नाहीत. आणि तिसरा वर्ग हाय सोसायटी क्लास आहे. तो वर्ग तुम्हाला पैसे देईल. हा सगळा प्रकार या मुंबई शहरात राजरोसपणे चालला आहे. मी काही तिकडे कधी गेलेलो नाही. मी यासंदर्भातील फक्त माहिती घेतलेली आहे. हा भयानक प्रकार मुंबईत आलेला आहे. केंव्हा ना केव्हा या प्रकाराला तुम्हाला आळा घालावा लागेल. मी सगळया विषयावर बोलणार नाही. मी मुद्दाम या विषयावर आज बोललो याचे कारण आपण गृहमंत्री म्हणून अतिशय चांगले काम करीत आहात. पण आपण सावधगिरीने पाऊले टाकली नाहीत तर सर्व तुम्हाला विचारत राहतील की, हे का बंद केले नाही ? ते का बंद केले नाही ? यांच्या ॲक्टीव्हीटीज अतिशय वाईट आहेत. त्यातील पळवाटा आपण लक्षात ठेवा. आता तुम्ही बार बंद केल्या नंतर घरोघरी पाटर्या होतील. त्या पाटर्यांना या मुलींना बोलाविले जाईल, घरोघरी मुजरे सुरु होतील. पैसे देऊन या मुली तुमच्या घरात, माझ्या घरात नाचावयास येतील. या सर्व गोष्टी बंद करावयाच्या असतील तर त्यासाठी आपल्याला सगळयांना एकत्रितपणे बसावे लागेल. तुम्हाला निर्णय घेताना सगळयांना सोबत घ्यावे लागेल. हे प्रकार मुंबई शहरातून मोडून काढले पाहिजेत. या गोष्टीमुळे मुंबईची किर्ती अतिशय वाईट झालेली आहे. मी मुंबई टुरिस्ट गाईड पुस्तक वाचले. त्या टुरिस्ट गाईडमध्ये मुंबईचा उल्लेख काय केला आहे. Bombay is the largest flesh market in the world. जगातील सगळयात मोठे फ्लॅश मार्केट मुंबई आहे आणि ते खरे ठरावयास लागले आहे. मुंबई शहरात विचित्र प्रकार सुरु झालेले आहेत. आता परदेशातील मुली आपल्याकडे मोठया प्रमाणात येऊ लागलेल्या आहेत.---

2...

श्री. प्रमोद नवलकर..

रशिया, जर्मनी या देशातील मुली मोठया प्रमाणात मुंबई शहरात येऊ लागल्या आहेत. मुंबई शहरात जेवढा काळा पैसा आहे तेवढा पैसा दुसरीकडे कुठे असेल असे मला वाटत नाही. मला धक्का बसला की, परदेशातील एक मुलगी कधी कधी दोन लाख रुपये घेते. ती मुलगी विमानातून ग्राहका बरोबर बेंगलोर येथे जाते. विमानाने पुण्यास जाते, दिल्ली येथे ग्राहका बरोबर विमानाने जाते. मुंबई शहरात उदंड पैसा असल्यामुळे या गोष्टीस आवर घालणे फार कठीण आहे. मुंबई शहर अतिशच विचित्र होत चालले आहे. मुंबईत व्यभिचार वाढत चालले आहे. चांगल्या चांगल्या घरामध्ये हे प्रकार वाढीस लागलेले आहेत. बारच्या मुलीच्या गोष्टी मी आपल्याला सांगू शकत नाही. पूर्वी मुंबईत अशी एकच वस्ती होती. तेथे वेश्या व्यवसाय चालायचा. परंतु आता सर्व मुंबई तशी झालेली आहे. मला मुंबईतल्या कुठल्याही वस्तीत घेऊन चला. कुठे काय चालले आहे ते मी तुम्हाला दाखवून देतो. सुसंस्कृत घरामध्ये देखील या गोष्टी पसरत चाललेल्या आहेत. मुंबईतल्या प्रत्येक पालकांना काळजी लागली आहे की, आपल्या मुली काय करतील. हे प्रकार कशा पध्दतीने थांबवावयाचे यावर तुम्हाला फार मोठा गंभीर विचार करावा लागेल. फक्त मुजरा बार बंद करुन या गोष्टी थांबणार नाहीत. सभापती महोदय, मी दोन तीन बारची नावे सांगितली. सोफिया बारच्या जाहिरातीमध्ये लिहीले होते की, इंडियन, रशियन आणि जर्मन या तीन्ही देशाच्या मुली उपलब्ध आहेत. संपर्क नंबर 56825917 असा आहे. मी दुस-या बारची जाहिरात वाचनात आली त्या ठिकाणी स्पॅनीश मुली आहेत. हेवन म्हणून बार आहे तेथे अमेरिकन मुली आहेत. बटरफ्लॉय बार आहे तेथे अरेबियन मुली आहेत. मला समजू शकत नाही की, मुंबईची किर्ती किती अफाट पसरलेली आहे. जगातल्या मुली या शहरात धंदा करावयास येतात. आपण आता मुजरा बार बंद करीत आहोत ही चांगली गोष्ट आहे. तेवढयावर थांबून चालणार नाही. प्रथम मुजरा बारपासून सुरुवात होऊ द्या. मुंबई शहर हिमनगाचे एक टोक आहे. मुंबई शहराच्या इतर समस्या भरपूर आहेत. या शहराच्या बाबतीत अनेक सदस्य बोलणार आहेत म्हणून मी जास्त काही बोलणार नाही. मुंबईमध्ये मराठी माणसाची होत असलेली पिछेहाट हा विषय मागे चर्चेला आलेला होता. हा वेगळा विषय आहे. मराठी माणसे मुंबईत कशी थांबविणार आहात यासंबंधी तुम्ही काही तरी आम्हाला आश्वासन द्या. आज मुंबई शहरात मराठी माणसांची संख्या 22 ते 28 टक्क्यांपर्यन्त आलेली आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अजून पाच-दहा वर्षांनी औषधाला मराठी माणूस तुम्हाला दिसणार नाही. मराठी माणसांच्या सगळया वस्त्या धडाधड हुसकाविता आहेत. आज मला या ठिकाणी सिरियस तक्रार करावयाची आहे की, गिरगाव ही मराठी माणसांची राजधानी आहे. मुंबईत जी जी आंदोलने झाली ती झ ाववावाडीतून झाली. या झाववावाडीतून अंदोलनाची पहिली ठिणगी पडली. त्या झाववावाडीमध्ये एक टावर बांधला गेला आहे...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 17:25

श्री. प्रमोद नवलकर ...

सभापती महोदय, 22 मजल्याचा टॉवर आहे. या टॉवरमध्ये मराठी माणसाला प्रवेश नाही. मध्यमवर्गीय अशा मराठी माणसांच्या वस्तीमध्ये हा टॉवर उभा राहिला आणि त्याच ठिकाणी मराठी माणसाला जागा देणार नाही असे राजरोसपणे सांगितले जात आहे. असे प्रकार घडत असतील तर मराठी माणूस ते किती काळ सहन करणार ? उपनगरामध्ये देखील आज जवळजवळ 50-60 बिल्डींग अशा आहेत की ज्याठिकाणी मराठी माणसाला जागा दिली जात नाही. हे सर्व प्रकार थांबले पाहिजेत. मध्यंतरी अशाच एका बिल्डींगला आग लागली होती. 22 मजल्याच्या या बिल्डींगमध्ये 12 व्या माळयावर आग लागली आणि फायर ब्रिगेडचे बंब त्याठिकाणी पोहोचू शकले नाहीत. माझी शासनाला विनंती आहे की, मराठी माणसाला याबाबतीत काही तरी ठोस आश्वासन द्या. मराठी माणसांची मुंबई आपण कशी वाढविणार ? मुख्यमंत्र्यांनी सुध्दा चिंता व्यक्त केली. त्यांच्या अवती-भवती अमराठी लोक आहेत असे त्यांनी परवाच एका ठिकाणी सांगितले. पूर्वी मुंबईमध्ये 56 टक्के मराठी माणूस होता हे प्रमाण आता 22 टक्क्यांवर आले आहे. म्हणजे मेजॉरिटीमधून आपण आता मायनॉरिटीमध्ये आलो आहोत. मघाशी मी ज्या टॉवरचा उल्लेख केला त्या टॉवरचे नांव आहे दर्शन हाईटस्. या टॉवरमध्ये मराठी माणसाला प्रवेश नाही असे स्पष्टपणे सांगतात. माझ्या घराजवळच हा टॉवर आहे. हा अपमान अन्याय मराठी माणूस किती दिवस सहन करणार ? त्याच्या सहनशीलतेचा उद्रेक झाला तर केव्हा दंगा होईल हे सांगता येणार नाही. कारण शेवटी सहनशीलतेला सुध्दा मर्यादा आहेत. उद्या आमच्या स्वयंपाकघरात येतील आणि आम्हालाच जेवायला वाढणार नाहीत. आपण नेहमी सांगता की याठिकाणी टूरिस्ट येतात. परंतु आमच्या मोहल्ल्यामध्ये येऊन आम्हांला घरे देणार नसतील तर याबाबत खबरदारी घ्यावी लागेल. सहनशीलतेचा अंत होत आहे. याचा आम्हांला मुकाबला करावा लागेल. मराठी माणूस तो जरुर करील परंतु गृहमंत्री म्हणून आपण काय कारवाई करणार हे कृपा करुन ठरवावे. मराठी माणसाला ठोस आश्वासन द्या की मराठी माणूस मुंबईबाहेर जाणार नाही. याठिकाणी आणखी दोन गोष्टींचा उल्लेख करणार आहे. एक म्हणजे सागरी मार्गाचा विषय आहे. वरळी ते नरीमन पॉइंट हा सागरी मार्ग होणार याबाबत अनेक दिवस चर्चा चालू आहे. परंतु कुठून येणार आणि कुठे व कसा जाणार याची नेमकी माहिती माझ्यासारख्याला सुध्दा कळत नाही. दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे उड्डाण पुलांच्या बाबतीत आहे. पेडर रोडचा उड्डाण पूल जीव गुदमरुन टाकत आहे. पलिकडचा उड्डाण

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर ...

पूल 8 पदरी झाला आहे. सहा वर्षापूर्वी पेडर रोडचा उड्डाण पूल बांधू नका असे सांगितले. बांधू नका पण बांधणार नसाल तर दुसरी योजना सांगा. याबाबतचे धोरण निश्चित असले पाहिजे. जनतेच्या हिताच्या ज्या योजना आहेत त्याबाबतीत शासनाने कठोरपणे निर्णय घ्यावेत. आमच्या एका सहका-यांनी सांगितले की, मुंबईसाठी स्वतंत्र मंत्रालय हवे. याला विरोध आहे. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्यासाठी हे सगळे भांडण आहे. सगळे भांडवलदार,बिल्डर यांना मराठी माणूस आणि मुंबई या महाराष्ट्राबाहेर काढायची आहे. शांघाय नको. शांघाय केले तर औद्योगिक राजधानी देशाची होईल. मराठी माणूस मुंबईत राहणार नाही. झोपडपट्टयांच्या बाबतीत आपण एकदम तलवार चालविली. परंतु सध्या आपण एकही झोपडी पाडत नाही. जनतेने काय समजायचे ? एका विमानाने दिल्लीला गेलात आणि दुस-या विमानाने परत आलात. झोपडपट्टी तोडण्याची मोहीम जोरात चालली होती. काँग्रेस पक्षाने 1976 साली धोरण ठरविले होते की 1976 पूर्वीच्या झोपडया मुंबईत ठेवायच्या त्यानंतरच्या ठेवायच्या नाहीत.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर ...

प्रभाकर कुटे यांनी प्रत्येक झोपडयांवर नंबर टाकला होता.परंतु 1976 नंतर 1980 च्या झोपडयांना संरक्षण देण्यात आले. त्यानंतर 1990 च्या झोपडयांना संरक्षण देण्यात आले होते असे करीत करीत आता आपण शरणागती पत्करली असून 2000 पर्यन्तच्या झोपडयांना संरक्षण देण्यापर्यन्त आपण आला आहात.झोपडया तोडण्याची कारवाई आपण का थांबवली आहे ?या ठिकाणी आपली सत्ता असतांना, आपले सरकार असतांना आणि दिल्लीमध्ये आपल्या पक्षाचे पंतप्रधान असतांना आपण एकदा निर्णय घेतलेला असतांना तसेच माननीय पंतप्रधानांनी त्यावर शिक्कामोर्तब केलेले असतांना एक व्यक्ती दिल्लीत जाऊन हा निर्णय फिरवणार असेल तर त्याला लोकशाही म्हणत नाही.आपण एकदा या बाबतीत काय करावयाचे आहे ते ठरवा आणि सरकार म्हणून वागा.एखाद्या व्यक्तीने काही तरी सांगावयाचे आणि तुम्ही मात्र कळसुत्री बाहुल्यांप्रमाणे निर्णय बदलावयाचा हे काही योग्य नाही.त्यामुळे मुंबईचा सत्यानाश होणार आहे.झोपडया तोडण्याच्या संदर्भात परवा मोठी घोषणा करण्यात आली होती की, यापुढे मुंबईमध्ये एकही झोपडी उभी राहू दिली जाणार नाही.परंतु या झ ोपडया मात्र सतत बांधल्या जात असतात .त्याविरुध्द मात्र कोणतीही कारवाई केली जात नाही.शासनाकडून घोषणा भरपूर करण्यात येतात परंतु त्या घोषणांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणतीही वेगळी यंत्रणा निर्माण केली जात नाही.त्यासाठी कोणाला पेनल्टी लावली जात नाही वा पनीशमेन्ट दिले जात नाही. पोलीस अधिका-याच्या विरुध्द कारवाई करण्यात येत नाही.जो वॉर्ड ऑफिसर असतो त्याच्याविरुध्द सुध्दा कारवाई करण्यात येत नाही.वरळीच्या पलीकडील रस्ता 2001 साली बांधण्यात आला होता.त्याठिकाणी मोठया प्रमाणावर झोपडया उभ्या राहिल्या आहेत त्या ठिकाणी जर आपण जाऊन पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की त्यांच्याकडे 1995 च्या अगोदरची रेशन कार्डस आहेत.कायद्यात ज्या काही पळवाटा आहेत त्या पळवाटांचा प्रथम अभ्यास करण्यात आला पाहिजे. मला पुन्हा हेच सांगावयाचे आहे की, मुंबई शहर हे जगातील अत्यंत महत्वाचे असे शहर आहे.मुंबई शहरासाठी 105 हुतात्मे झालेले आहेत.मुंबईवर आम्ही फार प्रेम करतो.मुंबई ही महाराष्ट्राचीच नव्हे तर संपूर्ण देशाची सांस्कृतिक राजधानी आहे.जे काही चांगले आहे ते मुंबईतच पेरले गेले आणि मुंबईतच मोठे झाले आहे.मुंबईचा इतिहास मी आपल्याला सांगेन की, कोणत्याही मोठ मोठया व्यक्तींची नावे आपण घ्या ही सर्व मोठी माणसे आमच्या मुंबईतीलच आहेत. पु.ल.देशपांडे आणि त्यांच्या संस्था मुंबईतील आहेत. आपल्या माहिती

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करता मी हे सांगू इच्छितो की, राजीव गांधी यांचा जन्मसुध्दा मुंबईतील गिरगाव येथे झाला होता. हुतात्मा चाफेकर, वासुदेव बळवंत फडके,माननीय बाळासाहेब ठाकरे,कॉ. डांगे ही सर्व मोठ मोठी माणसे मुंबईतील आहेत.परंतु आज मुंबई शहरामध्ये मोठी टॉवर्स बांधण्यात येत आहेत आणि त्या ठिकाणी मराठी माणसांना प्रवेश दिला जात नाही.मुंबईतील मराठी माणसे देशोधडीस लागली आहेत.तेव्हा ज्या काही रिकाम्या होणा-या जागा आसतील त्या मराठी माणसाला दिल्या पाहिजेत बिगर मराठी माणसाला देता कामा नये यासाठी आपण कोणता तरी उपाय करा असे मला आपल्याला सांगावयाचे आहे.या संदर्भात जर आपण काही कायदा केला तरच मराठी माणूस या ठिकाणी राहील .नाही तर भविष्यामध्ये दहा ते पंधरा वर्षात मराठी माणूस मुंबईमध्ये औषधाला सुध्दा सापडणार नाही.म्हणून मी आपल्याला सांगतो की आपला बाणा चांगला आहे,आपला हेतू चांगला आहे,आपल्यावर जनतेचा विश्वास आहे "मॅन ऑफ ॲक्शन "म्हणून जनता आपल्याकडे पाहत आहेत.त्यामुळे आपली पहिली ॲक्शन यासंबंधीची असली पाहिजे मराठी माणसाला जगवावयाचे, मराठी माणसाला स्वाभिमानाने जगवावयाचे आहे हे आपले कर्तव्य आहे व त्या कर्तव्याला आपण निश्चितपणे जागाल अशी इच्छा व्यक्त करुन मी आपली रजा घेतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

(सभापतीस्थानी : तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री.गायकवाड नंतर --- 17:35

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापती महोदया, आमच्या युतीतील एक नेते आणि या सदनातील एक ज्येष्ठ सदस्य माननीय श्री.प्रमोद नवलकर यांनी अतिशय योग्य शब्दामध्ये मुंबई संबंधात या ठिकाणी आमच्या सगळ्यांच्याच व्यथा मांडल्या आहेत. जवळपास सर्वच सर्वंकष अशा मुद्यांना त्यांनी स्पर्श केलेला आहे. आज हे मुंबई शहर ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेले आहे. आपण सर्वांनी मिळून या शहराच्या भवितव्याचा विचार केला नाही तर या शहराचे ब्लॅक शिकागो झाल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकेमध्ये शिकागो शहराचे जसे दोन भाग आहेत. एका अर्ध्या भागामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचे पालन केले जाते आणि दुसऱ्या अर्ध्या भागामध्ये कायदा व सुव्यवस्थेचे कोठल्याही प्रकारे पालन केले जात नाही. तेथे माणसांना, सभ्य नागरिकांना, नियम पाळणाऱ्या नागरिकांना साधे फिरणे देखील कठीण झालेले आहे. या मुंबई शहरामध्ये, या मुंबई बेटावर तीन जिल्हे नव्हे लोकसभेचे मतदारसंघ आहेत आणि त्यात सुमारे 18 विधानसभा क्षेत्रे आहेत. सभापती महोदया, भारतीय जनता पार्टीचे अतिशय स्पष्ट मत आहे की, कायदा आणि घटनेप्रमाणे या मुंबई शहरामध्ये कोणालाही येण्याची परवानगी असली तरी मुंबईतील जो भूमिपुत्र आहे ...मराठी माणूस आहे, त्याला येथे स्वाभिमानाने जीवन जगता आले पाहिजे, जे आज दिवसेंदिवस त्याच्यासाठी कठीण झाले आहे आणि त्याच बाबतीत या ठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नवलकर यांनी चिंता व्यक्त केली आहे की जी चिंता येथे बसणाऱ्या सर्वच सदस्यांच्या मनामध्येदेखील आहे. सभापती महोदया, माझी आमच्या समोरच्या बाजूला बसलेल्या मंडळींना विनंती आहे की, या विषयासंबंधात कोठलाही राजकीय अभिनिवेश न ठेवता, किंबहुना राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून या मुंबईच्या भवितव्याचा विचार केला नाही तर निवडक अशी क्षेत्रे असतील की ज्या ठिकाणी मानाची नाही तर केवळ कष्टाची आणि केवळ कसे तरी जीवन जगणाऱ्यांचीच पदे, नोकऱ्या किंवा व्यवसाय आमच्या मराठी माणसाच्या वाट्याला येतील. सन्माननीय सदस्य श्री.नवलकर यांनी या ठिकाणी सांगितलेली एक व्यथा अगदी बरोबर आहे, त्यांनी गिरगाव भागातील व्यथा सांगितली आहे. पण आमच्या लालबाग, परळ भागामध्ये जे विकासक येत आहेत ... आम्ही सगळे हिंदुत्व मानणारे आहोत, सगळ्या देशातील हिंदू आम्ही एक आहोत असे आम्ही मानणारे असलो तरी भाषावार प्रांत रचना जेव्हा या देशामध्ये निर्माण करण्यात आली त्याचा मुलभूत आधारच असा होता की, त्या त्या भाषिकांनी आपापल्या प्रांतामध्ये राहून आपला आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास करावयाचा आणि एक सौहार्दाचे वातावरण

....... 3एक्स 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

ठेवावयाचे आणि आपण सारे हिंदू आहोत या तत्त्वाने त्याने कोठेही जायचे. परंतु याचा हा अर्थ नाही की, तेथे गेल्यानंतर तेथील भूमिपुत्रावर ते बाकीचे अन्याय करतील. आज आमच्या लालबाग, परळ आदी भागामध्ये अशा अनेक वसाहती आहेत की तेथे केवळ एका विशिष्ट समाजातील लोकांनाच प्रवेश मिळतो. राणीबाग परिसरामध्ये तर बोहरी आणि खोजा या एकाच समाजातील लोकांना तेथे जागा दिली जाईल असे सांगितले जाते आणि त्यांच्या दुर्दैवाने एखादा त्या शिवाय अन्य समाजातील कोणी भाडेकरू पुनर्वसित असेल, ज्याला हक्काने त्या ठिकाणी पुनर्वसनाची जागा मिळाली असेल तर त्यालाही तो ती जागा कशी सोडून जाईल या दृष्टीने पाहिले जाते. म्हणून आपण सर्वांनी मिळून या मुंबईमध्ये या दृष्टीने एक कायदा करण्याची आवश्यकता आहे. ही एक आमची महत्त्वाची व्यथा आहे. या मुंबई शहरामध्ये असा एक कायदा वा नियम करावा लागेल की, कोणालाही या शहरात येऊन रिक्षा, टॅक्सी परवाना घ्यावयाचा असेल, काही व्यवसाय करावयाचा असेल तर महाराष्ट्रात, मुंबईत त्याचा जन्म तरी झालेला असला पाहिजे किंवा 25 वर्षे त्याचे कमीत कमी वास्तव्य असले पाहिजे. आज एखाद्या रिक्शॉ अथवा टॅक्सी ड्रायव्हरला विचारले.. तो 18-20-22 वर्षाचा मुलगा असतो., त्याला विचारले की, तुम कहाँ से आए हो ? तो तर सांगतो, यूपी से आए, बिहार से आया हूँ. कब आए ? 2 साल के पहले आए. आता मला एक तत्त्व म्हणून वा व्यक्ती म्हणून मान्य आहे की, कोठलेही कष्ट कितीही करण्याची त्याची तयारी असते. परंतु त्याच बरोबर या सगळ्या गोष्टी अमराठी माणसाने व्यापल्यामुळे केवळ आ वासून खिन्न मनाने या सर्वांकडे बघितल्याखेरीज आमच्या मराठी माणसापुढे दुसरी स्थिती नाही अशी वेळ आलेली आहे. सभापती महोदया, सकाळी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी एक घटनात्मक मुद्दा काढला सुरक्षा रक्षकांसंबंधात. आज मुंबई शहरामध्ये एकही सुरक्षा रक्षक नाही, मुंबईमध्ये आज लालबाग, परळ येथेच नाही तर मुंबई आणि मुंबई उपनगरामध्ये देखील ज्या नवीन नवीन इमारती उभ्या राहिल्या आहेत, सोसायट्या झालेल्या आहेत तेथे वॉचमन देखील आमचा मराठी माणूस असत नाही. म्हणून त्या दृष्टीने या मुंबईतील मराठी माणूस किमान चाळीमध्ये राहील.. यासाठी म्हाडाचे घरदुरूस्ती मंडळ आहे, पण त्याचीसुद्धा आता वाताहत होत चालली आहे. मुळात काँग्रेसच्या राज्यामध्ये 1960 साली हे घरदुरूस्ती मंडळ निर्माण करण्यात आले. पण 1960-70 नंतर या मुंबईमध्ये एकही मध्यम वर्गीयांसाठी, मराठी माणसासाठी वसाहत निर्माण झालेली नाही. काळाचौकी येथील अभ्युदय नगर,

.... 3एक्स 3 ...



KBS/ MHM/ SBT/ श्री.गायकवाड नंतर --- 17:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

मोतीलाल नगर, नेहरू नगर, आदर्श नगर, कन्नमवार नगर, टागोर नगर ही जी नगरे किंवा वसाहती आहेत .. महाराष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर म्हणजे 1960 नंतर या वसाहती निर्माण झालेल्या आहेत त्यानंतर मुंबई शहरामध्ये मध्यम वर्गीयासाठी ज्याला आपल्या कुटुंबासह, मुलाबाळांसह राहू शकू आणि आपल्या पगारामध्ये परवडेल, त्याच्या आर्थिक उत्पन्नाच्या शक्तीला परवडेल अशा प्रकारची घरबांधणी या शहरात झाली नाही. ....

( यानंतर श्री.जागडे .... 3वाय 1 ...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्याच्या श्रमातून मुंबईची जडणघडण झाली, तो मराठी माणूस दिसला नाही. आज रिपेअर बोर्डाची स्थिती अतिशय भयानक आहे. मुंबईत 16 ते 17 हजार इमारती रिपेअर बोर्डाच्या आहेत. 35 ते 40 लाख लोक या रिपेअर बॉर्डाच्या इमारतींमधून राहत आहेत. यामध्ये 8 आमदार आणि 3 खासदारांचा मतदार संघ तयार होतील. या 16 ते 17 हजार इमारतींसाठी 45 ते 50 संक्रमण शिबिरे या मुंबईत बांधण्यात आली आहेत. 1971 साली हे संक्रमण शिबिरे बांधण्यात आली होती. लोकांच्या इमारती पडल्या की, त्या इमारतीत राहणारी माणसे या संक्रमण शिबिरात 10 ते 20 वर्षापासून राहत होती. 1971 सालापासून युतीचे शासन येईपर्यन्त मेंटनन्ससाठी वर्षाला सहा लाख रुपये ठेवण्यात आले होते. 1995 च्या अर्थसंकल्पात 10 लाख रुपये ठेवण्यात आले होते. यामध्ये नागरी सुविधा देणे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, सांडपाण्यांची व्यवस्था करणे, पावसाळी गटारांची व्यवस्था करणे, दिवाबत्तीची व्यवस्था करणे यासाठी अतिशय कमी रक्कम ठेवण्यात आली होती. युती शासन आल्यानंतर आम्ही याबाबतचा एक कायदा केला. या जुन्या चाळींच्या तसेच इमारतींच्या माध्यमातून जो उपकर मिळतो, तो सुध्दा सरकार म्हाडाला देत नाही. सेसच्या माध्यमातून आणि अन्य मार्गाने आलेले पैसे हे रिपेअर बोर्डाला दिले जात नाहीत. पूर्वी उपकराच्या माध्यमातून 15 ते 20 कोटी रुपये मिळायचे. एक रुपया उपकराच्या माध्यमातून गोळा झाला तर त्यातील 90 पैसे भाडेकरु देत असतो. यातील फक्त 10 पैसे जमीन मालक देत असतो. शासन यामध्ये एकही पैसा देत नाही. यामध्ये पध्दत अशी आहे की, हा उपकर महानगरपालिकेने गोळा करावयाचा. 5 ते 10 टक्के रिकव्हरी चार्जेस गोळा करायचे. आणि नंतर सरकारच्या तिजोरीत ते सर्व पैसे भरले जात होते. त्यानंतर ते पैसे म्हाडाला मिळायचे. आमची सत्ता आल्यानंतर आम्ही या बाबतचा एक कायदा केला. आम्ही या उपकराची रक्कम वाढविली. 40 कोटी रुपये उपकराच्या माध्यमातून गोळा झाल्यानंतर तेवढीच मॅचिंग ग्रॅण्ड शासनाने द्यावी. यामध्ये 80 कोटी जमा होतील. त्यानंतर महानगरपालिका 10 कोटी रुपये देईल. म्हाडा 10 कोटी रुपये देईल. या पैशाच्या माध्यमातून आमच्या मध्यमवर्गीयांची घरे निर्माण होतील. आम्ही त्यावेळी 125 कोटी रुपयाचे बजेट केले होते. आमचे शासन असताना यातील एक पैसाही दुसरीकडे वर्ग केला नाही. परंतु गेल्या पाच वर्षात उपकराच्या माध्यमातून जे पैसे गोळा झाले, ते पैसे वेळेवर रिपेअर बोर्डाला देण्यात आले नाहीत. सुखथनकर समितीच्या अहवालामध्ये असे म्हटले होते की, 2.5 चा एफ.एस.आय. द्यावयाचा. सुखथनकर समितीचा जो शेवटचा कनक्लूजीव्ह पार्ट आहे, त्यामध्ये जे म्हटले आहे.

..2..

एएसजे )                                                                                    ( 5.40

श्री. मधुकर चव्हाण.....

त्याचा आम्ही स्वीकार केला होता. माननीय सदस्य श्री. नवलकर यांनी ज्यांच्याकडे गडगंज संपत्ती आहे, त्याबाबत आपले विचार मांडले आहे. आता ज्या डेव्हलपर्सना आपण अडीचचा एफएसआय देणार आहोत, त्यांना आपणाला सांगावे लागेल यातील 50 टक्के घरे 400 ते 500 चौ. फुटाची बांधावीत. जास्तीत जास्त 600 चौ. फुटाची बांधावीत. ही घरे आमच्या मध्यमवर्गीयांना मिळतील. अशी अट घालण्याचे ठरले होते. सभापती महोदय, मुंबई शहरात 1940 पूर्वीच्या अनेक इमारती आहेत. काही इमारती तर 1896 सालच्या आहेत. या इमारतींचे आयुष्य पूर्णत: संपलेले आहे. या सर्व इमारतींची पुनर्बान्धणीची योजना येत्या 10 वर्षात आखावी आणि यासाठी 500 कोटी रुपयाची तरतूद शासनाने करावी.

( यानंतर श्री. सरफरे..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

ते कुठल्याही शासनाला शक्य झाले नाही, आम्हालाही शक्य झाले नाही. एका विशिष्ट बजेट हेडखाली केवळ रिपेअर बोर्डासाठी वर्षाला 500 कोटी रुपये ठेवावेत असे आम्हालाही झाले नसते. आणि जे 100-125 कोटी रुपये ठेवले होते तेही यांच्या शासनाने परत दिले नाहीत. यावेळी गृह खात्याचे जे बजेट आहे त्यामध्ये 40 कोटी रुपये वसूल झाले असे लिहिले आहे, 35 कोटी रुपये 32 कोटी रुपये त्या ठिकाणी दिले गेले. राष्ट्रवादी कॉंग्रेसने परवा श्री. सचिन अहीर यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसचा मेळावा घेतला आणि मोठया रुबाबात जाहीर करुन टाकले की, या मुंबई शहरामध्ये येणाऱ्या पाच वर्षामध्ये 17 हजार इमारतींचे पुर्नवसन करणार आहोत. त्या ठिकाणी कुणाला तुम्ही भूलथापा मारता? मुळात सर्व इमारती 16498 आहेत, आणि 17 हजार इमारतींचे पुर्नवसन 5-6 वर्षाच्या काळात करणार? जर दरवर्षी 500 कोटी रुपये खर्च केले गेले तर दहा वर्षात हा कार्यक्रम संपणार आहे. म्हणून गेल्या वर्षभरामध्ये 201 कोटी 88 लाख रुपये या मुंबई शहरामध्ये जुन्या इमारतीसाठी जमले. त्यातील अजूनपर्यंत 112 कोटी या शासनाने रिपेअर बोर्डाला दिले नाहीत. आज इमारतीच्या दुरुस्तीसाठी पैसे नाहीत, आमदारांकडे भाडेकरु जातात, खासदारांकडे भाडेकरु जातात. त्या ठिकाणी श्री. उत्तम खोब्रागडे यांनी फतवा काढायचा. या गृहस्थाचे कधी लक्ष नाही. या मुंबई शहराला, म्हाडाला जर वाचवायचे असेल तर पहिल्यांदा 24 तासाच्या आत श्री.उत्तम खोब्रागडे यांची बदली केली गेली पाहिजे. आज एका भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये माननीय सभापती महोदयांनी त्यांच्या दालनामध्ये बैठक बोलाविली होती. आमचे माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेब, श्री. अवचट साहेब आम्ही सर्व जण त्या ठिकाणी गेलो होतो. आपले अधिकारी इतके उद्याम आहेत, मागील वेळी मा. श्री. म्हस्के साहेबांनी मुंबईच्या गृह निर्माण खात्यासंबंधी चर्चा करायला एक खास बैठक बोलाविली होती त्यावेळी श्री. उत्तम खोब्रागडे आले नाहीत. दुसऱ्या बैठकीला आले नाहीत. आणि आज या ठिकाणी महत्वाच्या प्रश्नासंबंधी बोलाविल्यानंतर माननीय सभापतींना त्याची दखल घ्यावी लागली. श्री. जे.एन.रामाराव हे प्रधान सचिव आहेत ते सांगतात की, म्हाडाचे उपाध्यक्ष माझे ऐकत नाहीत. त्या प्रधान सचिवांच्या हाताखाली उपसचिव, चिफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर ऑफ म्हाडा काम करतात. माननीय सभापतींनी बोलाविल्यानंतर, सभागृहामध्ये निर्णय दिल्यानंतर तुमचा आय.ए.एस अधिकारी ऐकत नाही? आज श्री.उत्तम खोब्रागडे आल्यानंतर जेवढी दलालांच्या हातामध्ये म्हाडा गेली आहे. आज म्हाडा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

अधिकारी चालवीत नाही, म्हाडा मंत्रालय चालवीत नाही, तिथे प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये हाताच्या बोटावर मोजण्या इतके तुरळक प्रामाणिक लोक असतील, प्रत्येकाबद्दल मी इथे शंका घेत नाही. मा. श्री. सरपोतदार साहेब तिथे अध्यक्ष होते. आम्ही आमच्या काळामध्ये जवळ जवळ 150 लोकांना दलालांना जेलमध्ये घातले होते. एका माणसालाही तुम्ही जेलमध्ये घेतले नाही? आणि म्हणून आज तिथे सुमारे 112 कोटी रुपये राहीलेच आहेत. पुर्नबांधणी तर राहिली परंतु दुरुस्ती सुध्दा केली जात नाही. त्याही पलिकडे एक धक्कादायक गोष्ट सांगू इच्छितो की, गेल्या तीन वर्षात तुमच्या रेंट कलेक्टरने संक्रमण शिबिराचे 10 कोटी 65 लाख रुपयांचे भाडे गोळा केले नाही. तुमच्या विभाग अधिकाऱ्यांना विचारा. आमच्या काळात आमच्या नेत्यांचे आदेश होते की, दर महिन्याला तुमच्या अधिकाऱ्यांची रिव्हयू मिटींग घ्या. मी या खात्याचा प्रमुख आहे, या खात्यामध्ये किती फाईली मोकळया झाल्या. किती प्रकारची लोकांची कामे झाली? 10 कोटी 65 लाख 39 हजार रुपये रिपेअर बोर्डाचे भाडे राहिले आहे. त्यातील अडीच ते पावणे तीन कोटी रुपये हे केवळ दलालांच्या माध्यमातून जे घुसखोर गेले आहेत त्यांचे भाडे राहिले आहे. कारण त्यांचे भाडे दलाल घेतात. "आंधळे दळतंय आणि कुत्रे पीठ खातेय." बाहेरचे लोक घुसले आहेत. एकही माणूस त्याठिकाणी नाही. याठिकाणी बारबालांचा उल्लेख केला. जोगेश्वरीला मालवणीला रिपेअर बोर्डाचे कँप आहेत, घाटकोपरला कँप आहेत त्या ठिकाणी या सगळया बारबाला रहातात. किती वेळा यांचे चेअरमन गेले किती वेळा यांचे अध्यक्ष गेले.? उत्तम खोब्रागडेना सांगितले, असे होते? बघतो. अधिकाऱ्यांना समोर घेणार आणि नाटक करणार. तू असे केलेस काय रे? उद्यापासून असे करु नको. म्हणजे एका क्लार्कला शोभणार नाही असे वर्तन तेथील अधिकारी करतात. पुनर्रचित इमारतीतील गेल्या तीन महिन्यातील भाडे 1 कोटी 7 लाख 21 हजार रुपये राहिले आहे. म्हणजे 12 कोटी रुपये भाडे हे लोक वसूल करीत नाहीत. त्याठिकाणी 40 रेंट कलेक्टर होते त्यातील 21 रिटायर्ड झाले 19 रेंट कलेक्टर राहिले आहेत. मी आपल्या शासनाच्या लक्षात आणून देतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/MAP पूर्वी श्री.किल्लेदार . . . . 17:50

श्री.मधुकर चव्हाण . . . .

म्हणून मला असे वाटते की, याठिकाणी या रिपेअर बोर्डाच्या माध्यमातून मुंबई शहरामध्ये अतिशय भयानक अशा प्रकारचा भ्रष्टाचार चाललेला आहे हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा म्हणजे झोपडपट्टीचा प्रश्न. सन्माननीय सदस्यांनी अतिशय एका चांगल्या मुद्याला स्पर्श केला आहे. त्यामुळे त्यांनी याबाबतीत जे मुद्दे मांडलेले आहेत, त्याची मी येथे पुनरावृत्ती करणार नाही. परवा आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे उत्तर दिले. त्यांच्यापरीने त्यांनी चांगले उत्तर दिले. ते अतिशय प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु आम्ही त्यांना असे विचारले की, मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी 116 लोकांची यादी दिली. मग आमच्या नेत्यांनी सुध्दा आम्हाला सांगितले की, तुम्ही त्याठिकाणी काही बोलू नका. म्हणून आम्ही बोललो नाही. या झोपडपट्टीदादांची यादी दिली. एकतर तुम्ही सगळे झोपडपट्टीचे आता. . ..आमचे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांचा नेहमी आवडीचा मुद्दा असतो की, झोपडपट्टीच्या बाबतीत माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी फुकट घरांची योजना केल्यामुळे या मुंबई शहरात फुकट घरे मिळतात, म्हणून लोक आले. No, not at all. 1960 साली या मुंबई शहराची लोकसंख्या 41 लाख होती. ज्यावेळी आम्ही सत्ता हातात घेतली, तेव्हा मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 5 लाख होती. आमच्या काळामध्ये 1 कोटी 5 लाख लोकसंख्या होती आणि जेव्हा आम्ही तुमच्या हातामध्ये सत्ता दिली, तेव्हा 1 कोटी 10 लाख होती. हा सेन्सेसचा आकडा आहे. साडेचार,पाच-सहा लाख लोक आमच्या काळामध्ये वाढले. हा तर नॅचरल ग्रोथ आहे. तुम्ही 1980 पासून, 1985 पासून, 1990 पासून प्रत्येक निवडणूक आली रे आली की, तुम्ही घोषणा करावयाची की, झोपडपट्टीतील लोकांना आम्ही फुकट घरे देणार आणि ते फुकट घर दिल्यानंतर तुम्ही आम्हाला मते द्या. परंतु त्यांच्या पाण्याची व्यवस्था केली नाहीत. त्याठिकाणी त्यांच्या दिवाबत्तीची व्यवस्था केली नाहीत. त्यांचे नागरी जीवन सुखकर होऊ शकत नाही. राजा उदार झालेला आहे आणि या बजेटमध्ये त्यांनी किती पैसे ठेवलेले आहेत ? त्यांनी केवळ या बजेटमध्ये 1 कोटी 8 लाख रुपये सरकारी जमिनीवर जे अधिकृत म्हणजे 1995 पूर्वीच्या ज्या झ ोपडया आहेत, त्यांना नागरी सुखसोयी देण्यासाठी शासनाने केवळ 1 कोटी 8 लाख 90 हजार रुपये दिलेले आहेत. वा रे वा. म्हणजे तुम्ही झोपडपट्टया वाढवावयाच्या. आमच्या काळात वाढल्या नाहीत. आम्ही कधीही आश्वासन दिले नाही की, आम्ही 2000 पर्यंतच्या झोपडयांना मान्यता देऊ. अतिशय स्पष्टपणे, मग मते मिळाली

. . . .4 ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

नाहीत तरी चालतील. परंतु माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी त्यावेळेला घोषणा केली होती की, 1995 नंतरच्या झोपडयांना आम्ही मान्यता देणार नाही. आम्ही अजिबात मान्यता देणार नाही असे सांगितले होते. या मुंबई शहरात महानगरपालिका 200 कोटी रुपये या अनधिकृत झोपडयांसाठी खर्च करते हे आयुक्तांनी सांगितले आहे. आम्ही नाही आणि 50 हजार रुपये दरवर्षी एका झोपडीमागे खर्च होतात. तुम्हाला जर या सर्व झोपडपट्टीला मतांसाठी सुरक्षा द्यावयाची असेल तर आमच्या नावाने, आमच्या नेत्यांच्या नावाने या मुंबई शहरात एकही झोपडपट्टी नाही. संजय गांधी झोपडपट्टी, राजीव गांधी झोपडपट्टी, इंदिरा गांधी झोपडपट्टी, तुमच्या सगळया नेत्यांच्या नावाने झोपडपट्टया आहेत. आम्ही कधीही एन्करेज केले नाही. आम्ही जरुर म्हणालो की, 1995 पर्यंत जात,पात आणि धर्मनिरपेक्ष राहून ज्या पूर्वीच्या झोपडया आहेत, कुठल्याही प्रांतातील असेल, त्याला आम्ही मान्यता देऊ. परंतु तुम्ही दिली नाहीत. 1995 पूर्वी 135 लि.पाणी प्रति माणशी, प्रति दिनी मुंबई शहरात मिळत होते. 2000 सालापासून ते 90 लि.मिळावयास लागले. हायड्रोलिक इंजिनिअर यांनी महिन्यापूर्वी सांगितले आहे की, मुंबई शहरात एक-दीड वर्षांनी केवळ 60 ते 70 लि.पाणी प्रतिमाणशी मिळेल.तुम्ही कसे भागविणार आहात ? या मुंबई शहरामध्ये प्रति माणशी, प्रति दिनी 50 लि.पाणी देणार ? कोणासाठी ? या मुंबई शहरात, घटना काहीही असेल, पण जर लोंढे थांबविले नाहीत तर या मुंबई शहरात लोक कायदा हातात घेतील. माणसांना चालावयास मिळणार नाही. माणसांना दैनंदिन व्यवहार करावयास मिळणार नाहीत. माणसांना नागरी जीवन जगावयास मिळणार नाहीत. तुम्ही कधी या मुंबई शहराचा विचार केला आहे का ? भावना, आवेशाने राज्य चालत नाही. राज्यकर्त्यांनी राज्य करताना कठोर निर्णय घ्यावे लागतात. नाही मते मिळणार. नाही पर्वा मते मिळण्याची. पण आजपासून 25-30 वर्षांनी या मुंबई शहराची लोकसंख्या नॅचरल ग्रोथने किती वाढेल याचा विचार करुन या मुंबई शहराचे नियोजन केले नाही आणि अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत अतिशय कठोरपणे कारवाई केली नाही, बरे झोपडया तुम्ही थांबविल्यात ? मुंबई शहरामध्ये धारावी असेल, खार असेल, कुर्ला स्टेशन असेल, सायन असेल, घाटकोपर असेल, बैंगनवाडी असेल. हे तर यांच्या जावेद खान यांनी वसविलेले आहे. सगळया बांगला देशी लोकांना अतिशय भ्रष्ट मार्गाने रेशन कार्ड देऊन जावेद खान नावाचे मंत्री होते, त्यांनी बैंगनवाडी आणि मानखूर्द येथील झोपडपट्टी वसविलेली आहे. आज तेथील लोक जनावरासारखे सगळे जीवन

. . . .4 ए-3

श्री.मधुकर चव्हाण . . . .

जगत आहेत. धर्माच्या नावाने त्यांना त्याठिकाणी वसवावयाचे, पण त्यांना नागरी सुखसुविधा देण्यासाठी या जावेद खान यांनी काहीही केले नाही. परिणाम असा झाला आहे की, आज मुंबई शहरामध्ये पाणी, सगळया नागरी सुखसोयी उपलब्ध होत नाहीत. मुंबईत जी गॅरेजेस् आहेत, महानगरपालिकेचे आयुक्त सांगतात की, दीड लाख अनधिकृत गॅरेजेस् आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ SBT/ KGS/ पूर्वी सौ.रणदिवे..... 17:55

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू....

1995 नंतर दीड लाख अनधिकृत गॅरेजेस उभी राहिली. हा आकडा वाचून, आयुक्तांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी सभागृहामध्ये नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नाला खोटे उत्तर दिले की काय, असे वाटेल. पण ही छोटीछोटी गॅरेजेस निर्माण झाली, त्यांचे हात कोणी अडविले ? म्हणून या ठिकाणी झोपडपट्टीचा प्रश्न अतिशय कठोरपणाने हाताळला नाही तर भयानक परिस्थिती निर्माण होईल. परवा आपण जाहीर केले की,मुंबई शहरात 70 हजार सार्वजनिक शौचालये आहेत. माझे तर स्वत:चे व्यक्तीगत मत आहे की, 1995 पूर्वीची झोपडपट्टी असेल, त्या सगळयांना सवलती द्या. परंतु आमच्या आमदारांवर देखील असे बंधन घातले पाहिजे की, अनधिकृत झोपडपट्टी असेल त्या ठिकाणी आमदार फंडातून पाणी, शौचालय यापैकी कोणतीच व्यवस्था देता कामा नये. आपण झ ोपडपट्टीच्या बाहेर सुलभ शौचालय बांधतो, आम्ही काही काही लोक देशभक्त होतो. आम्ही आमच्या दोन्ही पक्षाचे लोक असे कधी करत नाही. आम्ही चाळीत पैसे देतो,गरजुंना देतो. परंतु आपल्यावरही मी आरोप करत नाही, पण आमदार फंडाच्याबाबतीत नियम केला पाहिजे की, 1995 नंतरची जी अनधिकृत झोपडपट्टी असेल, बांगलादेशीय नागरीक असलेली झोपडपट्टी असेल, त्या ठिकाणी या भूमितील, एक पैसा सुध्दा देता कामा नये, मानवतेचा आम्ही ठेका घेतलेला नाही. ज्यांना आंदोलने करायची आहेत, त्यांना सांगा की, तुम्ही नागरी सुखसोयी द्या. मेधा पाटकरांना सांगा, जे पर्यावरणवादी आहेत त्यांना सांगा, थोडे काही झाले तरी रिट पिटिशन करणारे आहेत, त्यांना नागरी सुविधा द्यायला सांगा. एकेकांना त्यांच्या बंगल्यामध्ये रहायला सांगा. ज्यांचे बाथरूम 15x10 चे आहेत, त्यांना ते वापरू द्यायला सांगा. श्रीमती शबाना आझमींना सांगा की, झ ोपडपट्टीतील माणूस आऊट हाऊसमध्ये ठेवावा. चार-चार बेडरूम असतील त्यातील एक बेडरूम झ ोपडपट्टीवाल्यांना द्यायला सांगा. आंदोलने करून फुकटची सवंग लोकप्रियता मिळवायला फार मोठे डोके लागत नाही. म्हणून या मुंबई शहरामध्ये अतिशय कठोरपणाने झोपडपट्टीचा प्रश्न सोडविला पाहिजे. काही लोक म्हणतात 3 लाख, काही लोक म्हणतात 11 लाख, काही लोक म्हणतात 12 लाख लोक रस्त्यावरील शौचालयामध्ये जातात. परंतु कमीत कमी 3 लाख आणि जास्तीत जास्त 5 लाख लोक आज रस्त्यावरील शौचालयाला जातात, अशी परिस्थिती आहे.

(वेळ संपत आल्याची घंटा वाजविण्यात येते.)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, मला बोलून 10 ते 12 मिनिटे झालेली आहेत.

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : आपल्याला 22 मिनिटे झालेली आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : ठीक आहे, मी दोन-चार मिनिटामध्ये माझे भाषण संपवितो. सभापती महोदया, थोडा अनुग्रह करा. आपणही मुंबई शहरामध्ये रहाता, पार्ला येथे झोपडपट्टी वाढेल.

**तालिका सभापती** : झोपडपट्टी वाढवायची नाही.

श्री.मधुकर चव्हाण : मुंबई शहरामध्ये 70 हजारी शौचालये आहेत...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (बसून) : महानगरपालिकेमध्ये आपली सत्ता आहे. त्यांना आपण सांगा.

श्री.मधुकर चव्हाण : आमच्या हातामध्ये काही नाही. महानगरपालिकेच्या आयुक्तांना 37 (1) खाली आपण हे करा, म्हणून आदेश देता. आपल्या हातात काही नाही. आपण एक प्रामाणिक आमदार आहात. आपण सम्यक विचार करणारे आहात म्हणून मी आपले नाव घेतले. आपली अवहेलना करण्याचा माझा हेतू नाही. आपण मुंबईच्या प्रश्नावर पोटतिडकीने येथे बोलता, याची जाणीव आहे, म्हणून मी हे बोलतो आहे. 70 हजार शौचालयांपैकी 40 हजार शौचालये आज बंद आहेत. म्हणून झोपडपट्टीबद्दल अतिशय कठोरपणाने निर्णय घेणे आवश्यक आहे. मी मुंबईच्या मिलच्या संबंधात अधिक काही बोलत नाही. पण मी एक मजेशीर गोष्ट आपल्या लक्षात आणून देतो की, 1 एप्रिलला मुंबईतील मिलच्या जागांच्या संबंधात मुंबई हायकोर्टाने स्टे दिला. विकासाला कोणतीही परवानगी देऊ नये असे सांगितलेले असहे. त्याचवेळेला म्हणजे 20 एप्रिलला त्यांनी ॲफीडेव्हीट करायचे आहे. सरकारने याबाबत कॅवेट दाखल केलेले नाही. त्यामुळे सरकारच्या हेतूबद्दल शंका आहे. हायकोर्टाने मिल मालकांना असे सांगितले की, तुम्ही जमीन कशी घेतली, कोणाकडून जमीन घेतली, किती वर्षाच्या लिजने घेतली, आता बांधकासाठी कॅपिटल इन्व्हेंस्टमेंट आपण किती करणार आहात, याचे एक ॲफिडेव्हीट करा. शासनाला सांगितले की, 1991 नंतर किती गिरणी मालकांकडून विकासासाठी प्रपोजल्स आली, त्यातील किती मंजूर केली, कोणत्या अटीवर मंजूर केली, त्यापैकी आपल्याला एक तृतियांश जमीन किती मिळाली, म्हाडाला किती जमीन मिळाली, त्याचे ॲफीडेव्हीट करा, तसेच बी.एम.सी.लाही सांगितले. हे ॲफिडेव्हीट करण्यापूर्वीच हिंदुस्थान मिल, रुबी मिल, एन.टी.सी. हे सगळे लोक मिळून सुप्रीम कोर्टामध्ये गेलेले आहेत. मी न्यायालयाच्याबाबतीत काही बोलत नाही. तो मला बोलण्याचा अधिकार नाही. न्यायालयाने त्यांच्या हिअरींगची 18 तारीख ठेवलेली आहे.त्या ठिकाणी सरकारी वकील आपली बाजू मांडेल, त्याबद्दल मला काही म्हणायचे नाही. पण समजा,आमच्या दर्दैवाने म्हणा किंवा

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ SBT/ KGS/

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू....

मुंबईकरांच्या दुर्दैवाने म्हणा...कारण मी खटाव मिलचे एक उदाहरण मी दिले. मा.मंत्री महोदय योगायोगाने आताही उपस्थित आहेत. त्यांनी सांगितले की, अधिवेशन संपल्यानंतर महिनाभरामध्ये खटाव मिलचा प्रश्न मी धसास लावेन. मुंबई हायकोर्टाने स्टे दिलेला आहे, तो जर उठविला आणि रेग्युलर प्रोसेसमध्ये केस चालवायची म्हटली तर मुंबईच्या गिरणी कामगारांचे,त्यांच्या मुलाबाळांचे हाल पहावणार नाहीत.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार... 18:00

श्री. मधुकर चव्हाण...

माझी शासनाला विनंती आहे की, यासंबंधी आपण जागृत राहावे. शेवटी एक मुद्दा मांडतो आणि माझ ो भाषण पूर्ण करतो. या मुंबई शहरामध्ये चालायला रस्ता नाही. खेळायला मैदान नाही. राणीबाग, शिवाजी पार्क किंवा मुंबईतील आझाद मैदान, कुपरेज मैदान अशी मोकळी मैदाने सोडली तर दुसरीकडे कुठेही मैदाने नाहीत. अशा वेळेला 67 भूखंड, या 67 भूखंडा विषयी मी सांगत नाही. पण 10 भूखंडा संबंधीची उदाहरणे मी एक-दोन मिनिटात देतो. आज दिलेले उत्तर मी याठिकाणी वाचून दाखवितो. माननीय मंत्रिमहोदय, श्री. राजेश टोपे यांनी आज उत्तरामध्ये घाटकोपर आणि आकुर्ली गावतील भूंखंड सांगितलेले आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की, या ठिकाणी खेळाच्या मैदानाची गरज नाही. या ठिकाणी उद्यानाची गरज नाही. या ठिकाणी बेस्ट डेपोची गरज नाही. या ठिकाणी मॅटर्निटी होमची गरज नाही. या ठिकाणी रस्ता रुंदीकरणाची गरज नाही. या ठिकाणी हाऊस फॉर डिसहाऊसची गरज नाही. 22 हजार चौ. मीटर जमीन शासनाच्या बांधकामासाठी ठेवलेली होती. भविष्यामध्ये शासन येथे आपल्या कार्यालयासाठी बांधकाम करेल की नाही, याबद्दल शंका असल्यामुळे या जमिनीची गरज शासनाला वाटत नाही. मला असे वाटते की, या मुंबई शहरात एक रिपेअर बोर्डाचा प्रश्न आहे. एक म्हाडाचा प्रश्न आहे.एक झोपडपट्टीचा प्रश्न आहे. मुंबई शहराची लोक संख्या सव्वा कोटीच्या वर गेलेली आहे. नागरी जीवन अतिशय अस्वस्थ झालेले आहे. पार्किंग नाही, चालायला रस्ता नाही. खेळायला मैदान नाही. नागरिकांची सगळीकडे त्रस्तता निर्माण झ ालेली आहे. 50-60 लोक ज्या ट्रेनच्य डब्यातून जाऊ शकतील त्या ट्रेनच्या डब्यामधून आज 300 ते 400 लोक जात आहेत. अतिशय यांत्रिक जीवन झालेले आहे. अतिशम अमानूष जीवन झालेले आहे. मानवी जीवनाचा नैसर्गिक आनंद या मुंबई शहरातील कुठल्याही नागरिकाला हाताच्या बोटाावर मोजता येतील इतके श्रीमंत लोक सोडले आणि काही श्रीमंत वस्त्या सोडल्या तर बाकीच्या साधारण: 70 ते 80 टक्के लोकांना नागरी जीवनाचा आनंद या मुंबई शहरात लूटायला मिळत नाही. म्हणून रिपेअर बोर्डाचा अतिशय कठोरपणे शासनाने कारभार केला पाहिजे. झोपडपट्टीच्या बाबतीतही शासनाने कठोरपणे कारभार केला पाहिजे. शेवटी एक मुद्दा सांगून मी माझे भाषण संपवितो. ज्याला श्री. प्रमोद नवलकर यांनी स्पर्श केला आहे. श्रीमती वर्षा काळे नावाच्या कुणी महिला आहेत. त्यांनी या बारबालांच्या बाबतीत जाहीर केले आहे की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

बारबालांचे पुनर्वसन करा. आणि त्यांना 1500 रुपये द्या 2000 रुपये द्या. मला असे वाटते की, ठीक आहे.त्या बारबाला काही आगतिक असतील.काही परिस्थितीमुळे झाल्या असतील. त्यांचा अतिशय चांगल्या शब्दात, प्रभावीपणे उहापोह माननीय श्री. नवलकरसाहेबांनी याठिकाणी केला. पण ज्यांच्या मुली कोण बी.ए.झाल्या आहेत.बी.एस्सी.झाल्या आहेत. एम.कॉम झाल्या आहेत. अशा हजारो मुली बेकार आहेत.आपल्याला माहीत आहे. आपण बहुतांश लोक महाराष्ट्रीयन आहोत. आज कालच्या काळात मुलीला नोकरी नसेल तर तिचे लग्नही होत नाही. त्यांचे पुनर्वसन कां नाही?वा रे वा समाजसेवा. त्यांचे पुनर्वसन करावयाचे असेल, नोक-या मिळाल्या नाहीत तर एम्पलॅयमेंट एक्सचेंजमध्ये नांव नोंदवण्याऐवजी त्या ठिकाणी बार असोसिएशनच्या सेठीकडे जा आणि त्या ठिकाणी हॉटेल असोसिएशनमध्ये नांव नोंदवा आणि त्या ठिकाणी दोन-तीन दिवस नाचा आणि मग त्यांच्या पुनर्वसनाची कार्यवाही करणार, हे काय चालले आहे? आणि काही समाजसेवक त्यांना पाठिंबा देतात. त्यांना पंधराशे रुपये पुरणार नाहीत. दोन हजार रुपये द्या असे सांगतात. ज्या प्रामाणिकपणे शिकलेल्या मुली आहेत, त्यांना नोक-या नाहीत. त्या असहाय्यपणे बेकार पडलेल्या आहेत त्या सगळयां मुलींचे काय होणार आहे? आणि म्हणून या सवंग लोकप्रियेतेसाठी ज्या गोष्टीची मागणी केलेली आहे. श्री. आर.आर.पाटील मी आपल्याला विनंती करतो. आपण शासनाचे प्रतिनिधी आणि उपमुख्यमंत्री महोदय आहात. मी या दोन-तीन मुद्यांना स्पर्श केलेला आहे. आपण प्रभावीपणे आमच्या सूचनांची अंमलबजावणी करावी. मुंबई शहर ज्वालामुखीच्या तोंडावर आहे.त्याचा कधीही स्फोट होईल, तो होऊ नये. आणि महाराष्ट्राची राजधानी ही महाराष्ट्रातच रहिली पाहिजे. येथील भूमिपूत्रांना अतिशय स्वाभिमानाने जीवन जगता आले पाहिजे. त्याच्यासाठी कुठल्याही प्रकारची कठोर नियमावली करावयाची असेल मग ती नोकरी पासून टॅक्सी लायसनपर्यंत असेल तर ती केली गेली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. धन्यवाद.

**तालिका सभापती** : 6.00 वाजून गेलेले आहेत.. . .

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, सुरुवातीचे वक्ते 25/25 मिनिटे बोलतात आणि आम्ही बोलायला उभे राहिलो की, 5 मिनिटात आटोपा असे सांगण्यात येते......

..3..



SMT/ KGS/ MAP/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार... 18:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मागच्या वेळेला चर्चा सुरु करत असतांना मी स्वत: येथे म्हटलेले होते की, सुरुवातीचे वक्ते फार वेळ बोलतात. त्यामुळे नंतरच्या सदस्यांवर अन्याय होतो. हे आपणच समजून घ्यायचे आहे. सदस्यांना देण्यात आलेला वेळ संपल्यानंतर मी बेल वाजवते. सन्माननीय सदस्य श्री. अरविद सावंत यांचे म्हणणे संपूर्णपणे मान्य आहे. मी चर्चा थांबविण्याच्या बाबतीत आता सांगत नाही. माझे म्हणणे ऐकून घ्या. आता 6.00 वाजून गेलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** .......

पण मी ही चर्चा थांबविण्याकरिता हे विचारत नाही. आता 6.00 वाजून गेलेले आहेत. 5.00 वाजून 6 मिनिटांनी ही अडीच तासाची चर्चा सुरु झालेली आहे. आणखी बरेच सन्माननीय सदस्य बोलावयाचे आहेत. त्याचप्रमाणे इतरही बरेच कामकाज शिल्लक आहे. आज सभागृहाच्या कामकाजाची वेळ किती वाजेपर्यन्त वाढवावयाची हे सभागृहाने सांगावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदया, ही अडीच तासाची चर्चा असल्यामुळे नियमाप्रमाणे अडीच तासात चर्चा संपवावयास पाहिजे. नियमाप्रमाणे कामकाज चालविले पाहिजे.

**तालिका सभापती** : आपले म्हणणे अगदी बरोबर आहे.

श्री. आर . आर. पाटील : आमच्या बाजूचा राहिलेला वेळ वाटून द्यावा. आमच्या पक्षाकडे जास्त वेळ असेल तर आम्ही तो वेळ कमी करुन देऊ.

**तालिका सभापती** : आता ज्या प्रस्तावावर चर्चा चालू आहे ती चर्चा संपेपर्यन्त आपण वेळ वाढविणारच आहोत परंतु नंतरचे जे कामकाज आहे ते सुध्दा आपल्याला आज घ्यावयाचे आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : ते कामकाज उद्या ठेवावे.

**तालिका सभापती** : सर्व कामकाज संपेपर्यन्त वेळ वाढवावयाची असेल तर मी आपल्याला उर्वरित कामकाज काय राहिलेले आहे ते वाचून दाखविते.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, किती काम शिल्लक आहे याची आम्हाला कल्पना आहे. परंतु हा मक्ता फक्त विरोधी पक्षानेच घेतलेला नाही.

**तालिका सभापती** : आपण कशाच्या मक्त्याबाबत बोलत आहात ?

श्री.मधुकर सरपोतदार : मी सभागृहाचे कामकाज चालविण्यासंबंधी बोलत आहे.

**तालिका सभापती** : या प्रस्तावावर ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांची नावे मी पुकारणार आहे आणि त्यांना वेळही देणार आहे. पण पुढचे जे कामकाज आहे त्यासंदर्भात आपल्याला काही सांगावयाचे आहे काय ?

श्री. मधुकर सरपोतदार : ही चर्चा संपल्यानंतर पुढचे कामकाज येईल. आधी हा विषय तरी संपवू द्यावा.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार बोलतील.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, आता या बाजूच्या सन्माननीय सदस्याला बोलण्याची संधी दिली पाहिजे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, या सभागृहाची अशी प्रथा आहे की, विरोधी पक्षातील एक सदस्य बोलल्यानंतर या बाजूच्या एका सदस्याला बोलण्याची संधी दिली जाते. त्याला आपण आदानप्रदान म्हणतो.

**तालिका सभापती** : या ठिकाणी चर्चेचे आदानप्रदान करावयाचे आहे. आपण अगदी योग्य तेच बोलला पण माझ्याकडे सत्ताधारी पक्षाच्या बाजूने एकाही सन्माननीय सदस्याचे नाव आलेले नाही.

श्री. आर. आर. पाटील : आम्ही सदस्यांची नावे आपल्याकडे देतो.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, आम्ही हो जो प्रस्ताव दिलेला आहे त्याच्या पाठीमागे काही हेतू आहे, उद्देश आहे. मुंबई शहराची जी शोकांतिका चाललेली आहे त्यासंदर्भात या सदनामध्ये चर्चा व्हावी, काही सूचना कराव्यात, शासनाकडून काही अपेक्षा कराव्यात आणि मुंबईच्या ज्या सगळया गोष्टी आपल्यासमोर येत आहेत त्याला आपण न्याय देऊ शकलो नाही तर त्याचे दु:ख कोणाच्या मनात राहू नये या उद्देशाने हा अंतिम आठवडा प्रस्ताव या ठिकाणी दिलेला आहे. मुंबई महाराष्ट्रामध्ये सामील व्हावी म्हणून पाच वर्षे जबरदस्त आंदोलन या मुंबई शहरामध्ये उभे राहिले. 105 हुतात्म्यांनी बलिदान दिले. आज हे सर्व विसरत आहेत. 1 मे, 1960 ला महाराष्ट्राची राजधानी म्हणून मुंबई शहर महाराष्ट्रामध्ये विलीन झाले. त्यापूर्वी व्दिभाषिक राज्य होते. पूर्वी मुंबई महाराष्ट्राला दिलेली नव्हती. सन्माननीय उपमुख्यमंत्री आज या ठिकाणी बसलेले आहेत. माझी त्यांना एकच विनंती आहे. आजही आपण जे महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न काढतो ते आज किती आहे आणि त्याच्यापैकी मुंबईचा भाग किती आहे आणि उर्वरित महाराष्ट्राचा भाग किती आहे याची माहिती सदनाला दिली तर बरे होईल..

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

या पार्श्वभूमिवर आपल्याला कल्पना आहे की महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राचे सौभाग्य असे की, सुरुवातीला मुख्यमंत्री म्हणून स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्या हातामध्ये सूत्रे आली. ज्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये भाग घेतला त्यांचे भाग्य असे की, संयुक्त महाराष्ट्राच्या अमृत कलशाची जबाबदारी त्यांच्या शिरावर आली आणि महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून 1 मे, 1960 रोजी त्यांचा शपथविधी झाला. तेव्हापासून महाराष्ट्र राज्य स्वतंत्रपणे अस्तित्वात आले. त्यावेळेपर्यंत विदर्भ आपल्याकडे नव्हता. बेळगाव कारवारचा प्रश्न आजही सुटलेला नाही. त्यासाठी कोणीतरी सुप्रीम कोर्टात गेले आहे. तो प्रश्न कधी सुटेल हे सांगता येत नाही. त्यावेळी महाराष्ट्राची लोकसंख्या 60 लाख इतकी होती. मराठीचा तक्ता 57 टक्के होता. मी त्यावेळची माहिती सांगत आहे. मुंबईत कापड गिरण्यांमध्ये अडीच लाख कामगार होते, गिरण्या होत्या, उद्योगधंदे होते, विविध शासकीय, व्यापारी संकूल मोठया दिमाखाने उभे होते, लोकांना रोजगार या मुंबई शहरामध्ये उपलब्ध होत होता, कोणी कोकणातून, देशाकडून, विदर्भातून तर कोणी उत्तर महाराष्ट्रातून आला होता. त्यांना मुंबईमध्ये नोकरी मिळत होती अशी त्यावेळची परिस्थिती होती. 1965 व 1971 साली हिंदुस्थान आणि पाकिस्तानमध्ये खूप मोठी युध्दे झाली हे सर्वांना माहीत आहे. आपल्या जवानांनी अक्षरश: स्वत:चे जीवन कुरवंडी करुन ती दोन्ही युध्दे जिंकली. 1972 साली महाराष्ट्रामध्ये प्रचंड दुष्काळ पडला. लोकांचे खूप हाल झाले. त्यावेळी स्व.वसंतराव नाईक हे महाराष्ट्राला मुख्यमंत्री लाभले होते. त्यांच्या संकल्पनेतून रोजगार हमी योजना साकार झाली. महाराष्ट्रातील जनतेला किमान रोजगार उपलब्ध झाला ही त्यावेळची परिस्थिती होती. 1964 ते 1976 या कालखंडात मुंबई शहराला झोपडयांचे ग्रहण लागले आणि ख-या अर्थाने शासनाला पैसा न देता सेवा व सवलती प्राप्त करुन घेण्यासाठी म्हणून राजकीय पक्षांची चढाओढ सुरु झाली. ती 1964 ते 1976 पर्यंत चालू होती. मुंबई हे शहर महाराष्ट्राची राजधानी व्हावी, मराठी माणसावरील अन्याय दूर व्हावा म्हणून आंदोलने उभी राहिली आणि नंतर महाराष्ट्रात कालांतराने मराठी माणूस दिसेनासा झाला आणि त्यांना वाचविण्यासंबंधी जे वादळ निर्माण झाले त्याच्यातून शिवसेना या पक्षाचा 1966 साली जन्म झाला हे कधीही विसरुन चालणार

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.मधुकर सरपोतदार....

नाही. झोपडयांची त्यावेळी सुरुवात झाली होती. 1976 साली गलिच्छ वस्ती निर्मूलन हा कायदा अस्तित्वात आला. त्यावेळी त्या लोकांना गलिच्छ वस्ती म्हणत असू. आपण त्याला झोपडपट्टी सुधार असा शब्द वापरला आणि गलिच्छ वस्ती सुधार निर्मूलन योजना शासनाने हाती घेतली यामध्ये शौचालयांची निर्मिती, पाण्याची योजना, रस्ते या सगळया माध्यमातून शासकीय पैशातून झोपडयांमधून राहणा-या लोकांना आपण सोयी सवलती पुरविण्याची सुरुवात केली. साधारणपणे 1969 सालापासून गिरण्यांचा वेग वाढला होता. परंतु 1980 ते 1985 या दरम्यान मुंबई शहरात गिरणी कामगारांचा प्रचंड संप झाला. 18 जानेवारी, 1982 रोजी संपाला सुरुवात झाली. तो संप आजही संपला किंवा नाही हे माहीत नाही. परंतु या संपामुळे कामगार मात्र संपला.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

ही गोष्ट निर्विवाद आहे. अडीच लाख कामगार आणि 60 गिरण्या देशोधडीला लागल्या आणि त्याठिकाणी आज गगनचुंबी इमारती उभ्या रहायला सुरुवात झाली. याचे मूळ त्या प्रदीर्घ लढ्यामध्ये होते. आम्ही त्यावेळी आमच्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मिलओनर्स् असोसिएशन बरोबर आमच्या चर्चा झाल्या. त्यांनी काही टक्क्यांनी पगारामध्ये वाढ देतो असे सांगितले. पण ही वाढ स्वीकारली गेली नाही. संपाचा हट्ट धरला आणि संपाच्या हट्टापायी सगळा गिरणी कामगार उद्ध्वस्त झाला. त्या पाठोपाठ सेवाशर्ती चांगल्या मिळाव्यात यासाठी आंदोलने, टाळेबंदी अशा प्रकारांना ऊत आला. अनेक कारखाने जे तेव्हा पासून बंद झाले ते कधी परत उघडलेच नाहीत. सुरु झालेच नाहीत. जे.के.केमिकल्स हे त्यातील पहिले उदाहरण आहे. कारखाना बंद झाल्यानंतर तो पुन्हा उघडलाच नाही. हा संपाचा परिणाम. सभापती महोदय, 18 जानेवारीला तो संप सुरु झाला आणि तेव्हा पासून मुंबईतील कामगारवर्गावर बेकारीची जबरदस्त कु-हाड कोसळायला सुरुवात झाली. 1991साली देशामध्ये आर्थिक उदारीकरणास प्रारंभ झाला. तत्कालीन पंतप्रधान स्व. पी.व्ही.नरसिंह राव व अर्थमंत्री आणि विद्यमान पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी खुले आर्थिक धोरण राबविण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. मुंबईतील कारखाने, कापड गिरण्या, छोटेमोठे उद्योग हळूहळू बंद होऊ लागले. बेकारीच्या भस्मासुराने या मुंबईमध्ये नंगानाच करायला सुरुवात केली. 1995साली सत्तेत परिवर्तन झाले. शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या युतीने सत्ताग्रहण केली. महाराष्ट्रातील अनेक ज्वलंत समस्या सोडविण्यास त्या शासनाने सुरुवात केली. माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतून 40 लाख झोपडपट्टीवासीयांसाठी 10 लाख घरे बांधण्याची योजना साकारली. टीका करताना असे म्हटले जाते की, तुम्ही 40 लाख घरे बांधणार होता. आम्ही 40 लाख घरे बांधणार नव्हतो. आम्ही 40 लाख झोपडपट्टीमध्ये राहाणा-या लोकांसाठी

10 लाख घरे बांधणार होतो. आपल्या भाषणामध्ये मध्यंतरी, 40 लाख झोपडपट्टीवासीयांना तुम्ही घरे देणार होता, असा उल्लेख आला होता. म्हणून या शब्दाचा मी खुलासा केला. वस्तुस्थिती माहीत नसते त्यामुळे काही वेळा असा उल्लेख होतो आणि नको त्या गोष्टीवर प्रहार केला जातो. त्यासाठी ती योजना राबवली आणि नंतर जो कायदा केला तो असा केला की, 1 जानेवारी 1995

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

नंतर ज्या झोपड्या मुंबई शहरात येतील त्यांना येथे कोणताही थारा द्यायचा नाही. फक्त 1 जानेवारी 1995 पर्यन्त जे झोपडपट्टीमध्ये रहात आहेत मग ते कोणत्याही जातीचे, धर्माचे, पंथाचे असोत पण अराष्ट्रीय असतील आमच्या देशाचे नागरिक नसतील तर त्यांना येथे जागा देऊ नये ही भूमिका आपण स्वीकारली. अफझलपूरकर समिती नेमण्यात आली. त्या समितीने ज्या शिफारशी केल्या त्या शिफारशींना अनुसरुनच हे संपूर्ण कार्यक्रम राबवायला घेतले. त्यासाठी कोणत्या प्रकारची घरे असावीत, कोणत्या योजना आखाव्यात, शासनाने कोणकोणत्या जबाबदा-या घ्याव्यात या सर्व प्रश्नांच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी म्हणून ती समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल विधानमंडळास सादर झाला. आपण आता गृहमंत्री आहात. परंतु त्यावेळी आपण त्या सदनामध्ये होता. आपणाला त्या संपूर्ण अहवालाची कल्पना आहे. हा अहवाल जेव्हा खालच्या सदनामध्ये मांडला गेला त्यावेळी मी देखील त्या सदनामध्ये होतो. त्यामुळे त्या अहवालावरील पूर्ण चर्चा मला आठवते. महाराष्ट्र शासनाने 2002 साली कायदा करुन 1 जानेवारी 1995 पर्यन्तच्या झोपड्यांना संरक्षण देऊन त्या झोपड्यातील रहिवाशांना निवारा उपलब्ध करुन देण्यासंबंधीचा कायदा केला. मुंबई शहरामध्ये 55 उड्डाण पूल उभे राहिले. रस्त्यांचे कॉन्क्रीटीकरण करण्यास सुरुवात झाली. मुंबईमध्ये अस्तित्वात असलेल्या बहुतांश पदपथावर झोपडपट्टीवासीयांनी अतिक्रमणे केली. त्या ठिकाणी विविध व्यवसाय सुरु झाले. वेश्या व्यवसायही होता. त्याला अपवाद नाही. माननीय गृहमंत्र्यांनी दोन दिवसापूर्वी सरस्वती विद्यामंदिरा समोरील जो वेश्या व्यवसाय चालतो त्यासंदर्भात सांगितले. तो व्यवसाय काही आज चालत नाही. जवळ जवळ गेली 15 वर्षे त्या फूटपाथवर हा वेश्या व्यवसाय राजरोस चालू आहे. त्या ठिकाणाहून लहान मुले जातात. त्याठिकाणी शाळा आहे. जनता समोरुन चालली आहे आणि अशा प्रकारे झोपडीमध्ये हा व्यवसाय चालतो अशी तेथील परिस्थिती आहे. एखादी गोष्ट समजल्यानंतर आपण कारवाई करतो असे म्हटलात त्याबद्दल मी आपले कौतुक करतो. मात्र ती कारवाई व्हायला पाहिजे. बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 18:20

श्री. मधुकर सरपोतदार...

अशी आपल्या महाराष्ट्राची परंपरा आहे. आपण त्या परंपरेला जागाल असा मी विश्वास बाळगतो. ही झोपडपट्टी तेथून काढलीच पाहिजे. समोर शाळा आहे आणि समोरच्या झोपडयांमध्ये वेश्या व्यवसाय चालतो असे भयानक दृष्य शाळेतील मुलांना पहावयास मिळते आहे. याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. मुंबईच्या विषयावर लोकप्रतिनिधी मोठया गप्पा मारतात. परंतु मुंबईच्या विषयावर सभागृहात चर्चा चालू असताना दोन्ही बाजूच्या सदस्यांची संख्या अगदी नगण्य आहे. परवा महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीवर चर्चा चालली होती, त्यावेळी देखील सदस्यांची संख्या नगण्य होती ही बाब योग्य नाही. या ठिकाणी मोठया भीमगर्जना करतात. पण या ठिकाणी ज्यावेळी चर्चा होते त्यावेळी मात्र सदनात कोणी थांबावयास मागत नाही. ही वस्तुस्थिती सांगतो आहे. मुंबईचे सदस्य सभागृहात कायम उपस्थित असतात. महाराष्ट्रातील शेतक-यांच्या बाबतीत चर्चा होते त्यावेळी मुंबईतील सदस्य सभागृहात उपस्थित असतात. मुंबईत पाणी पुरवठा करणा-या महाकाळ पाईप लाईनच्या उभय बाजूच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे. मुंबईतील पाणी पुरवठयाच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाशी त्याच प्रमाणे मुंबई महानगरपालिके बरोबर पत्र व्यवहार केलेला आहे. तुळशी महाकाळ पाईप लाईन केलेली आहे. त्या पाईप लाईनच्या उभय बाजूला जाऊन पाहिले तर तेथे सगळया झोपडपट्टया वसलेल्या आहेत. आणि त्या मार्गास सेनापती बापट मार्ग असे नाव देण्यात आलेले आहे. आपण मुंबई शहराच्या गप्पा करतो. झोपडपट्टीबाबत बरीच चर्चा करतो. परंतु आज मुंबई शहरात फुटपाथवर चालण्यासाठी जागा नसते, त्या फुटपाथवर वेश्या व्यवसाय चालणार असेल, कारखाने चालणार असतील, अनेक वेगवेगळे उद्योग चालत असतील, तर मुंबईत जे पादचारी आहेत त्यांनी चालत कसे जावयाचे हा मोठा प्रश्न या शहरात निर्माण झालेला आहे. रस्त्यातून गेलात तर अपघात होतात.अपघात झाल्यानंतर मनुष्य मृत्यूमुखी पडतो अथवा अपंग होतो ही वस्तुस्थिती आहे. काल, परवा मुंबई शहरात वापरल्या जाणा-या तेलाचा प्रश्न निघाला होता. त्या तेलाच्या प्रश्नावरुन मला मागील दिवस आठवतात. कोहीनूर मिलमध्ये अशाच प्रकारचे तेल वाटले गेले होते. त्या तेलामुळे तेथील काही कामगार अपंग झाले. हे दिवस काही जुने नाहीत. मुंबई शहरात अशा प्रकारच्या घटना घडतात परंतु शासन या घटनांकडे गांभीर्याने पहात नाही याचे मला मनस्वी खूप दु:ख होते. या पाईप लाईनच्या उभय बाजूला ज्या झोपडया आहेत. तेथील लोकांना रेशनकार्ड दिले जाते. त्या झोपडीधारकांना फोटोपास दिले जातात. तेथे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

रहाणा-या लोकांना पोलिसांचे संरक्षण मिळते. तेथे रहाणा-या लोकांना महानगरपालिकेचे संरक्षण मिळते. जिल्हाधिकारी कार्यालय, रेशनिंग ऑफीस, पोलीस दल आणि महानगरपालिका अशा चार यंत्रणा मुंबई शहरातील परिस्थिती बिघडविण्यासाठी कारणीभूत आहेत. हे चारही विभाग या गोष्टीस जबाबदार आहेत. यांच्या सगळयांच्या समन्वयातून या मुंबई् शहरातील झोपडपट्टया वाढीस लागल्या आहेत. रेशनिंग कार्यालयात जातात तेथील कर्मचा-यांना 500 रुपये देतात आणि रेशन कॉर्ड घेऊन जातात अशी परिस्थिती आहे. जो पैसे देत नाही, जो खरा रहिवाशी असेल त्याला रेशन कॉर्ड मिळत नाही. आम्ही त्यांच्या दक्षता समित्यांवर नाही. मी नागपूरच्या अधिवेशनात मागणी केली होती की, विधान परिषदेतील आमदारांना तुम्ही दक्षता समित्यांवर नेमा. ज्यांना काम करण्याची इच्छा असेल तो तेथे जाऊन काम करेल. ज्या चुकीच्या गोष्टी चालल्या आहेत त्या थांबविण्याची क्षमता स्थानिक लोकप्रतिनिधी दाखवू शकत नसतील तर येथे बसलेले आमदार आहेत ते चुकीच्या गोष्टी थांबविण्याचा प्रयत्न करतील. दक्षता समित्या या फक्त नावापूरत्या आहेत. दक्षता समित्यांकडून कोणत्याही प्रकारची कामे होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मुंबई शहरात परप्रांतीय, बांगला देशी नागरीक,पाकिस्तानी घुसखोर यांनी अलगत प्रवेश मिळविलेला आहे. त्यांना मी मघाशी उल्लेख केला त्या शासकीय यंत्रणांनी सहकार्याचा हात दिला. माननीय गृह मंत्री तुम्ही माझ्या बरोबर या. मी तुम्हाला झोपडपट्टया दाखवितो. पहिल्या माळयावर सगळे बांगला देशी रहातात. तळाला मराठी कुटुब रहाते. त्या बांगला देशी लोकांकडून पाच, दहा हजार रुपये भाडे मिळते. एकेका खोलीमध्ये सहा ते सात व्यक्ती रहातात. आपण झोपडपट्टीवासीय लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देतो त्या सर्व सुविधांचा लाभ या लोकांना मिळतो आहे.मराठी माणसाला उत्पन्नाचे कोणते साधन नाही, नोकरी नाही, धंदा फुटपाथवर लावला तर पोलीस त्याचा माल उचलून घेऊन जातात. ज्या ठिकाणी पोलिसांचे हप्ते बांधले गेलेले आहेत तेथे पोलीस फिरकत देखील नाहीत. मी तुम्हाला आजपासून नव्हे तर अनेक दिवसांपासून पाहतो आहे. तुम्ही अतिशय प्रामाणिकपणे काम करीत आहात. प्रश्न एकच आहे की, या सगळया झोपडयांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. यासंदर्भात प्राध्यापक कवाडे साहेब उसळले होते. ते सांगत होते की, तुम्ही सगळया गरीब माणसांना उध्वस्त करीत आहात. आज काही प्रमाणात मराठी माणसे---

3...



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 18:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..

झोपडपट्टीमध्ये रहात आहे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा अजून उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यांना रेशनिंगचे धान्य उपलब्ध करुन दिले जात नाहीत. या माणसांकडे शासनाने सातत्याने दुर्लक्ष केलेले आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. मुंबई शहरातील झोपडपट्टीधारक हे अतिशय भयानक जीवन जगत आहेत...

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

मुंबईचे शांघाय करण्याची मा.पंतप्रधानांनी घोषणा केली. आम्ही प्रत्येक घोषणेचे स्वागत करतो. या मुंबईचे भले करण्यासाठी जर कोणी पुढे येत असेल आम्ही त्यांना प्रथम सामोरे जाऊ आणि सांगू की तुम्ही या मुंबई शहराचे भले करा. पुण्याचे करा. मुंबईचे जे चित्र आहे त्याचे पडसाद पुण्यामध्ये पहायला मिळतात. त्याचे पडसाद ठाण्यामध्ये पहायला मिळतात. हळूहळू सगळया शहरांमध्ये हा रोग जाणार आहे. एक वेळ अशी येणार आहे की मराठी माणसाला महाराष्ट्रातील सगळया जमिनी इतर प्रांतातील लोकांनी विकत घेतल्या की जे पैसे मिळतात घेऊन जगावे लागेल. कारण या महाराष्ट्रामध्ये आर्थिक परिस्थिती इतकी भयानक होत चालली आहे की, चोर,दरोडेखोर,अतिरेकी,लुटारु यांचा सुळसुळाट या शहरामध्ये झालेला आहे. आज एखादे वृध्द जोडपे एखाद्या ठिकाणी सुरक्षित राहू शकत नाही अशी परिस्थिती मुंबई शहराची ही कायदा आणि सुव्यवस्थेची झालेली आहे आपण याबाबतीत लक्ष द्यावे अशी आमची अपेक्षा आहे. तेलगी प्रकरणामुळे मुंबई शहरातील आणि महाराष्ट्रातील बडे पोलीस अधिकारी तुरुंगात गेले. पोलीस दलाच्या मनोबलावर त्याचा विपरित परिणाम झालेला आहे हे नाकारुन चालणार नाही. सर्वसाधारण जनतेमध्ये ज्या चर्चा चालतात या पोलिसांच्या कर्तृत्वाबद्दल चालतात. चांगले पोलीस अधिकारी आहेत,कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी आहेत. पण जो असा रोग लागला आहे किंवा कीड लागली आहे ती पोलीस दलातून कशी जाईल याचा विचार शासनाने करावा. मुंबई शहरामध्ये रेल्वे आहे,बसमधून प्रवास करणारे खूप प्रवासी आहेत. असहाय्य ज्येष्ठ नागरीक यांचे जीवन असुरक्षित बनले आहे. महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे,शासन आमचे संरक्षण करील यावरील सामान्यांचा विश्वास हळूहळू राहिलेला नाही. शाळेतील मुले,कॉलेजातील विद्यार्थी आणि नोकरदार मंडळी आदी असुरक्षित वातावरणामुळे भयभीत झालेले आहेत. बाहेर तुम्हांला बोलणार नाहीत परंतु मुंबई शहरातील सर्वसाधारपणे ही वस्तुस्थिती आहे हे नाकारुन चालणार नाही. मुंबईतील जीवन अतिशय धोकादायक बनत चालले आहे. शासनाने 2002 साली कायदा करुन 1 जानेवारी 1995 सालापर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देऊन या झोपडयांतील रहिवाश्यांना निवारा उपलब्ध करुन देण्याचा जो निर्णय घेतला त्याला चिकटून राहणे आवश्यक होते. आपण खूप मोठया धाडसाने या कारवाया सुरु केल्या पण त्यानंतर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री,देशाचे माजी संरक्षण मंत्री आणि विद्यमान कृषीमंत्री श्री. शरदचंद्र पवार यांनी मध्यंतरी भूमिका बदलली त्याचे एका वृत्तपत्रात आलेले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ..

वर्णन मी वाचून दाखवितो. अनधिकृत झोपडपट्टयांविरोधातील कारवाईने चांगलाच वेग घेतला असताना राष्ट्रवादीचे अध्यक्ष श्री.शरद पवार यांनी झोपडपट्टीवासियांचा पुळका घेऊन आधी पुनर्वसन मग कारवाई करा अशी भूमिका घेत सरकारवर टीका सुरु केल्याने झोपडीविरोधी कारवाई बारगळण्याचीच चिन्हे दिसत आहेत. एकीकडे मुंबई स्वच्छ,सुंदर करण्याची घोषणा करावयाची आणि कारवाई करताना मात्र झोपडपट्टीवासियांचे तारणहार असल्याच्या भूमिकेत पुनर्वसनाची मागणी करावयाची ही श्री.शरद पवारांची दुटप्पी भूमिका वेळोवळी स्पष्ट झालेली आहे. जनमत मधील ही बातमी आहे. सामना जे लिहिल ते रोखठोक लिहिणार. मी तुम्हांला अनेक वृत्तपत्रे दाखवितो. लोकसत्ता,म.टाईम्स,सकाळ सगळयांचे उतारे माझ्याजवळ आहेत. श्री. शरद पवार यांच्या भूमिकेबद्दलचा मी उल्लेख केला आहे आणि ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदया, 2/3 विषय आहे त्यांचा उल्लेख करतो. मुंबईमधील मोडकळीस आलेल्या चाळी ज्यांचा श्री. मधुकर चव्हाण यांनी उल्लेख केला. 16 हजार चाळी मोडकळीस आलेल्या आहेत आणि बहुतांश चाळीमध्ये मराठी माणसे राहतात अशा चाळींची दुरुस्ती होण्याची नितांत आवश्यकता आहे. मुंबई शहरामध्ये असे अनेक प्रश्न आहेत ज्यांचा उल्लेख आजच्या या चर्चेमध्ये व्हावयाला पाहिजे होता. पण आमचे नेते श्री. प्रमोद नवलकर यांनी एक वेगळा विषय की ज्याचा नीतीमूल्यांशी संबंध आहे तो मांडला. ज्या नीतीमूल्यांमुळे मनुष्य आयुष्यात उभा राहू शकतो त्या नीतीमूल्यांशी कशी घसरण होत चालली आहे आणि मुंबईचे सांस्कृतिक जीवन काय बनत चालले आहे याच्यावर त्यांनी संपूर्ण वेळ खर्च केला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ...

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांना अजूनही काही मुद्यांच्या संदर्भात उल्लेख करावयाचा होता.कदाचित हा उल्लेख ते त्यांच्या उत्तराच्या भाषणात करतील असे मला वाटते. मुंबई शहराशी निगडीत असलेले अनेक प्रश्न आहेत.1957 साली मुंबई शहरात राहणारा मराठी माणूस 57 टक्के होता असे मी सांगितले होते परंतु आज माझ्या माहितीप्रमाणे मुंबईमध्ये 26 ते 27 टक्के मराठी माणसे राहत आहेत.तेव्हा यासंबंधीची माहिती माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात द्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे.मुंबई शहराची पाठराखण कशी करावयाची,मुंबई शहर जास्तीत जास्त सुरक्षित कसे करावयाचे,मुंबई शहर जास्तीत जास्त शिस्तबध्द कसे करावयाचे, मुंबई शहरातील जीवन जास्तीत जास्त सुरक्षित कोणत्या पध्दतीने होऊ शकते याचा विचार केला गेला पाहिजे.हा विचार करीत असतांनाच पोलिसांचे मनोबल कसे वाढवावयाचे,पोलिसांच्या सहकार्याने मुंबई शहरातील चोर,बदमाश,लुटारु आणि जे अतिरेकी,बांगलादेशीय आहेत त्यांचा बंदोबस्त कसा करावयाचा याचासुध्दा विचार शासनाने केला पाहिजे. मुंबईमध्ये भविष्य काळात पाण्याची समस्या निर्माण होणार आहे.आज सुध्दा मुंबई शहरामधील अनेक भागात पाणी मिळत नाही.पुढच्या काळात हे पाणी कमी कमी होत जाईल.मे महिन्यात सुध्दा नागरिकांना पुरेसे पाणी मिळणार नाही. भविष्य काळात मुंबई शहरामध्ये जर आणखी लोंढे येत राहिले तर ही समस्या आणखी तीव्र स्वरुपाची होत जाणार आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की,मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 25 लाख आहे. परंतु माझ्या माहिती प्रमाणे आताच मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 50 लाखाच्या वर गेलेली आहे. मुंबई शहरातील हौसिंग बोर्डाचे अनेक प्रश्न आहेत. प्रत्येक खात्याचे मुंबई शहराच्या संदर्भात काही ना काही तरी प्रश्न आहेत.या सर्व प्रश्नांच्या बाबतीत मला बोलावयाचे होते परंतु वेळ कमी असल्यामुळे मला जास्त विस्ताराने बोलता आले नाही. माननीय उपमुख्यमंत्र्यांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, हे मुंबई शहर महाराष्ट्राची राजधानी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी रक्त सांडले आहे त्यांचे " व्यर्थ न हो बलिदान " याकडे लक्ष देण्याची जबाबदारी शासनाची आहे.आपण सर्व जण शासनामध्ये जाऊन बसलेला आहात. हौसिंग बोर्डाच्या संदर्भात जेव्हा प्रश्न उपस्थित केला जातो तेव्हा माननीय मंत्रीमहोदय त्याचे उत्तर देऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. त्या बाबतीत मंत्रिमहोदयांचा अभ्यास नाही. मुंबईतील जनतेची चारही बाजूने





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

जी ससेहोलपट होत आहे ती थांबविणे अत्यंत आवश्यक आहे.मुंबई शहर जास्तीत जास्त सुरक्षित कसे राहील या दृष्टीने गृहमंत्री म्हणून आपल्या वर जबाबदारी आहे. माझी अशी अपेक्षा होती की या चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील. मागे एकदा या प्रश्नासंबधी या सभागृहात चर्चा चालू होती त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना एक गोष्ट सांगितली होती. तीच गोष्ट मी आपल्याला पुन्हा सांगत आहे. आपण उपमुख्यमंत्री म्हणून ती गोष्ट लक्षात ठेवाल असे मला वाटते. जो कोणी या राज्यामध्ये मुख्यमंत्री म्हणून किंवा उपमुख्यमंत्री म्हणून येईल व जो मुंबई शहरातील रस्ते, मुंबई शहरातील सगळी व्यवस्था चांगली करुन दाखविल आणि मुंबई शहर अग्रगण्य करील आणि मुंबई शहर हे ख-या अर्थाने मुंबई करील तर त्याचे श्रेय त्याच्याकडे जाईल. मुंबई शहराचे शांघाय किंवा सिंगापूर होता कामा नये असे मला वाटते. मुंबई शहर हे मुंबईच राहिले पाहिजे. परदेशातून जेव्हा एखादा माणूस मुंबईत येतो आणि आकाशातून येणारे विमान जेव्हा सांताक्रुझ एअर पोर्टवर किंवा सहार इंटरनॅशनल एअर पोर्टवर लॅन्ड होते तेव्हा त्याला जे दृश्य पहावयास मिळेल ते दृश्य पाहिल्यानंतर त्याला असे वाटावयास पाहिजे की, मागे मी जे शहर पाहिले होते ते शहर हेच आहे काय ? मागच्या वेळी या शहराला झोपडयांनी वेढले होते असे मी पाहिले होते. त्या झोपडया आता नाहीशा झालेल्या आहेत की काय ? असे त्याला वाटावयास पाहिजे. मुंबई शहरातील झ ोपडयांना माझा विरोध नाही.शहराची बांधणी चांगल्या प्रकारची असली पाहिजे आणि शहरामध्ये राहणा-या नागरिकांना सगळया प्रकारच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत व या संदर्भात शासनाने निर्णय घेतले पाहिजेत असे मला वाटते .हे परिवर्तन जर तुमच्या राज्यात झाले असेल तर त्याचे श्रेय तुम्हालाच मिळेल. अन्य कोणाला ते श्रेय मिळणार नाही. परिवर्तन करण्याची फक्त इच्छा असून चालणार नाही तर परिवर्तन करण्यासाठी त्या माणसाने तेवढयाच निकाराने प्रयत्न करुन घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची क्षमता जर दाखवली तर निश्चितपणे आपले नावसुध्दा जनता तितक्याच आपुलकीने घेईल. असे मला सांगावयाचे आहे.एखादी चांगली गोष्ट केली तर लोक नाव घेतात व वाईट गोष्ट केली तर नाव बदनाम होते. हे आपल्याला माहीत आहे. तेव्हा या दोन्ही पैकी काय करावयाचे याचा निर्णय आपल्या मंत्रिमंडळाने घ्यावयाचा आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधान सभेने निवडलेले) सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी जी अल्पकालीन चर्चा या ठिकाणी उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदया, मुंबई आणि मुंबईचे प्रश्न यासबंधी या ठिकाणी मी काही नव्याने सांगावे अशी स्थिती नाही.अनधिकृत झोपडया,परप्रांतीयांचे येणारे लोंढे किंवा.

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गायकवाड नंतर --- 18:35

श्री. मेटे .....

बांगला देशी वगैरे अनेक विषयांवर या मुंबईच्या अनुषंगाने चर्चा येथे झाली आणि त्यावर उत्तरे देखील शासनाकडून आली. परंतु उपाय योजना मात्र म्हणाव्या तशा आतापर्यंत झालेल्या नाहीत. सभापती महोदया, मी आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, ज्यांना मराठीचा आणि मराठी माणसाचा कळवळा होता, ज्यांनी आतापर्यंत मराठी माणसाच्या मतावर या राज्यात सत्तेवर येण्याचे काम केले त्यांनी या मुंबईतील झोपडपट्टीच्या विरोधात मोहीम हाती घेतल्याचे आम्हाला कधीही पहावयास मिळालेले नाही. ती मोहीम कोणी केली तर ज्यांनी याचा उच्चार कधी केला नव्हता त्या सरकारने किंवा त्यांच्या कोणत्याही नेत्याने तसे कधी म्हटले नाही त्या लोकशाही आघाडी सरकारने या झ ोपडपट्टीच्या विरोधात, अनधिकृत झोपड्यांच्या आणि अन्य बांधकामाच्या विरोधात भूमिका घेतली आणि विशेष करून सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी ही भूमिका घेतली आणि त्यानुसार मोहीम चालविली. आतही ही मोहीम थांबविलेली नाही. मात्र याची सुरूवात ही या सरकारने केली आहे, उपमुख्यमंत्र्यांनी केली आहे आणि त्यामुळेच आज अनेक अनधिकृत झोपड्या आणि बांधकामे हटविल्याचे आपल्याला पहावयास मिळत आहेत. सभापती महोदया, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्य बोलले. आमचे दादा सरपोतदार बोलले, पण आता ते येथे उपस्थित नाहीत. मुंबईतील मराठी माणसाच्या टक्केवारी बाबत ते बोलले. त्याबद्दल त्यांना खूप काळजी वाटली. तशी ती आपणा सर्वांनाच आहे. पण जेव्हा त्यांच्यावर ही जबाबदारी आली होती तेव्हा या मुंबईतील मराठी माणसाचा 40 टक्का घसरत आला तो कोठवर घसरला तेही त्यांनी सांगितले. पण हे सारे कोणाच्या काळामध्ये झाले, हा मराठी टक्का कोणाच्या काळामध्ये घसरला, त्यावेळी मुंबई महापालिकेमध्ये कोण राज्य करीत होते, मुंबई महापालिका कोणाच्या ताब्यात होती ? आता आपणच सांगता की, ही मुंबई महापालिकेची जबाबदारी होती वगैरे. या मुंबईमध्ये जवळपास दोनशे अडीचशे शाखा नाक्यानाक्यावर कोणाच्या आहेत आणि त्यातील किती अधिकृत आहेत आणि किती अनधिकृत आहेत ? माझ्या माहितीप्रमाणे त्यातील कित्येक अनधिकृत आहेत. त्या ठिकाणी बसून नगरसेवकांच्या माध्यमातून अनधिकृत बांधकामांना, झोपड्यांना आणि व्यवसायांना संरक्षण दिले जाते आणि परत या ठिकाणी मात्र कणव व्यक्त केली जाते ती घसरलेल्या मराठी टक्क्याची आणि अनधिकृत पसरलेल्या झोपड्यांबाबत. हे दुटप्पी धोरण आता मराठी माणूस ओळखू लागला आहे आणि त्यामुळेच या मुंबईमध्ये देखील लोकांनी आपल्या विरोधात निकाल दिला. आपले दुटप्पी

..... 4जे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मेटे .....

धोरण मुंबईतील लोकांच्या लक्षात आले म्हणूनच त्यांनी तुम्हाला घरी बसविले आणि त्या विचाराच्या लोकांना येथे पाठविले आहे. आता मुंबई महापालिकेच्या निवडणुका देखील जवळ आलेल्या आहेत आणि त्या ठिकाणीसुद्धा याचेच प्रतिबिंब उमटेल याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. ... सभापती महोदया, मी हे राजकीय भाषण करीत नाही तर मी केवळ माहिती देत आहे ....

श्री. आर.आर.पाटील : हे राजकीय भाषण नसेल तर मग राजकीय काय असणार आहे ?

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदया, आपण 2000 किंवा आता 2005 च्या गोष्टी करीत आहात. परंतु 1995 मध्ये जेव्हा युती शासन या राज्यात सत्तेवर होते तेव्हा 1990 पर्यंतच्या झ ोपड्यांना संरक्षण अगोदरच दिलेले होते ते वाढवून 1995 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण दिले गेले. त्यानंतर पुन्हा ही मुदत वाढवून ती 2000 पर्यंत केली गेली. पण ही सुरूवात कोणाच्या काळात झ ाली ? तुमच्याच काळामध्ये त्याची सुरूवात झाली आहे. ...

( यानंतर श्री.जागडे ....4के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MAP/ KGS/ 18:40

श्री. विनायकराव मेटे....

परप्रांतीय आले, पाकिस्तानी आले, बांगला देशीय आले, असे समोरच्या मंडळींना बोलण्याचा कोणताही अधिकार नाही. बोलणे एक आणि करणे दुसरेच. असे समोरच्या मंडळींचे आहे. आता त्यांचे जनता काहीच ऐकून घेणार नाही.

सभापती महोदया, अनधिकृत झोपडपट्ट्यांच्या बाबतीत या शासनाने योग्य प्रकारची भूमिका घेतली आहे, त्याबद्दल मी या सरकारचे अभिनंदन करेन. परंतु याची गती आता कमी झाली आहे. ही गती कमी करु नका, असे मला शासनाला सांगावयाचे आहे. अंतुलेसाहेब ज्यावेळी या राज्याचे मुख्यमंत्री होते, त्यावेळी मुंबईत मोठ्या प्रमाणात परप्रातियांचे लोंढे आले होते. त्यावेळी त्या सर्व परप्रांतियांना त्यांच्या त्यांच्या राज्यात हाकलले होते. बस आणि ट्रेनच्या माध्यमातून त्या सर्व लोकांना त्यांच्या राज्यात पोहोचविण्यात आले होते. त्याचेच अनुकरण या सरकारने करावे, अशी मी शासनाला विनंती करीत आहे. सभापती महोदया, आज मोठ्या प्रमाणात अनधिकृत झोपड्या वाढत चालल्या आहेत. आज रस्त्यावरुन चालणे अतिशय अवघड झाले आहे. डी,एन, रोड,, रे रोड, सेनापती बापट मार्ग या सर्व रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात झोपड्या बांधण्यात आल्या आहेत. या झ ोपडपट्टयांतून अनेक प्रकारचे अनधिकृत व्यवसाय चालत आहेत. म्हणून या व्यवसायांना बंधन घालणे, त्यावर अंकुश ठेवण्याचे काम शासनाने करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आज अनेक समस्या या मुंबई शहरात निर्माण झालेल्या आहेत. मोठ्या प्रमाणात या मुंबईत परप्रांतियांचे लोंढे येत असल्यामुळे मुळ मराठी माणसाना, स्थानिक मुंबईकरांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. हे जर आपणाला टाळावयाचे असऽल तर शासनाने कडक असे धोरण घेणे आवश्यक आहे. त्या धोरणाची अंमलबजावणी काटेखोरपणाने करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या पूर्वी मी एक उदाहरण दिले होते, तेच मी आज देत आहे. मुंबईतील अनेक सोसायटीमध्ये 80 ते 90 टक्के सुरक्षा रक्षक अनधिकृतपणे काम करीत आहेत. सुरक्षा रक्षक मंडळ अनेक प्रकारचे एक्झमशन्स या सोसायट्यांना देत असते. मला मध्यंतरीच्या काळात सुरक्षा रक्षक मंडळावर राहण्याची संधी मिळाली होती. त्यामुळे मला या गोष्टीची माहिती आहे. सुरक्षा रक्षक मंडळाकडे 150 अर्ज आले होते. त्यातील 125 अर्ज हे परप्रांतियांचेच होते. 15 ते 20 अर्ज हे मराठी माणसांचे होते. या सुरक्षा रक्षकांमध्ये पाच ते सात लाख लोक परप्रांतिय आहेत. सभापती महोदय, मोठ्या प्रमाणात मुंबईत परप्रांतिय लोक येत असतात. त्यांना येथील लोक

..2..

श्री. विनायकराव मेटे....

सामावून घेत असतात. सरकारमधील काही माणसे सुध्दा या लोकांना संरक्षण देत असतात. हे होता कामा नये. हे सर्व बंद झाले पाहिजे. मुंबईत राहणा-या लोकांना न्याय मिळाला पाहिजे. हे जर आपणाला टाळावयाचे असेल तर, पोलीस अधिकारी असतील, वॉर्ड ऑफिसर असतील....

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायकराव मेटे....

किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील लोक असतील तर त्यांना सुध्दा सामील करुन घेतले पाहिजे. नगरसेवकांना सुध्दा सामील करुन घेतले पाहिजे. पोलीस अधिकारी आणि वॉर्ड ऑफिसर हे जेवढे लक्ष देत नाहीत तेवढे नगरसेवक लक्ष देत असतात. म्हणून आपण नगरसेवकांना सामील करुन घेतले पाहिजे. या अनधिकृत झोपडया वाढल्यामुळे या सर्व लोकांवर कारवाई केली पाहिजे. अनधिकृत झोपडपट्टयांमध्ये सर्व प्रकारच्या सुविधा पुरविणारे जे अधिकारी आहेत त्यांच्यावर सुध्दा कारवाई केली पाहिजे. आजतागायत मोठया प्रमाणात झोपडपट्टया झाल्या त्यामध्ये वीज, पाणी या सुविधा पुरविल्या जातात. त्या पुरविणाऱ्या एकाही अधिकाऱ्यावर आतापर्यंत कारवाई झाली नाही. तेव्हा आपण जर त्यांच्यावर कारवाई केली तर यापुढे एकही अनधिकृत झोपडपट्टी उभी रहाणार नाही. ही कारवाई करणे जसे महत्वाचे आहे त्याप्रमाणे महाराष्ट्रातील मराठी माणसाबद्दल आणि परप्रांतियांबद्दल काळजी करीत असतांना या लोकांवर सुध्दा जबाबदारी फिक्स करावी. आणि जर त्यांनी जबाबदारी व्यवस्थित पार पाडली नाही तर त्यांना शासनाने दंड करावा . तरच ही समस्या थांबू शकेल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्यांचे भाषण चालू असतांना त्यांच्या भाषणामध्ये अडथळा न आणण्याच्या उद्देशाने मी शांत राहिलो. मुंबईमध्ये परप्रांतीय येऊ नयेत याकरिता आमच्याकडील माननीय सदस्यांनी भूमिका मांडली त्याबद्दल आपण टीका केली. घटनेप्रमाणे टीका करण्याचा आपल्याला हक्क आहे. म्हणजे मुंबईमध्ये जे परप्रांतीय बांगला देशी, पाकिस्तानी येत आहेत हे आपल्याला मान्य आहे काय? आमच्यावर टीका करीत असतांना मुंबईमध्ये जे बांगला देशी व पाकिस्तानी घुसले आहेत ते आपल्याला गैर वाटत नाही काय?

(गोंधळ)

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी कृपया शांत रहावे. या संदर्भात माननीय सदस्यांचे बोलून झाले आहे..

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदया, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्दयावर मला बोलावयाचे आहे...

**तालिका सभापती** : आपण कृपया खाली बसा. आपले भरपूर बोलून झाले आहे...

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी आता भूमिका मांडली आहे. उलट या मुंबई शहरामध्ये ज्या अनधिकृतपणे अभिनेत्री रहात होत्या त्यांना एअरपोर्टवर नेऊन त्यांच्या देशामध्ये पाठविण्याचे काम या आघाडी सरकारने केले आहे. कोणत्याही देशातील व्यक्ती असेल तिला पोहोचविण्याचे काम या सरकारने केले आहे. या उलट आपल्या काळात असे अनेक प्रकार झाले आहेत. त्यावेळी फक्त बोलले गेले आहे परंतु केले गेले नाही ते या सरकारने केले.

**तालिका सभापती** : मला सभागृहाला विचारावयाचे आहे की, या प्रस्तावावर बोलण्याकरिता ज्या सदस्यांनी नावे दिलेली आहेत ती मी वाचून दाखविते. सर्वश्री दिवाकर रावते, विलास अवचट, दीपक सावंत, अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. विनोद तावडे, सर्वश्रीमती कांता नलावडे, संजीवनी रायकर, सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जोगेंद्र कवाडे यापैकी किती माननीय सदस्य बोलणार आहेत हे त्या त्या पक्षाच्या गट प्रमुखांनी कृपया सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, आमच्या पक्षातर्फे मी व मा. सदस्य श्री. दिवाकर रावते बोलणार नाहीत. फक्त मा. सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, विलास अवचट व ॲड. अनिल परब हे बोलणार आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, आमच्या बाजूने मी बोलणार नाही तर मा.सदस्य श्री. उल्हास पवार हे बोलतील.

**तालिका सभापती** : ठीक आहे, मा. सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी भाषण सुरु करावे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, नियम 269 अन्वये या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.प्रमोदजी नवलकर यांनी मुंबई महानगरीच्या संबंधातील चर्चेला सुरुवात केली आहे आणि या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, याठिकाणी झालेल्या चर्चेमध्ये अनेक विषय येऊन गेले आहेत. त्यामुळे मी पाच-सात मिनिटांमध्ये माझे विचार मांडणार आहे. मुळात 468 चौ.कि.मी.चा भूभाग म्हणजे मुंबई महानगरी. या महानगरीमध्ये जवळपास 2 कोटीच्यावर लोक राहतात. मुंबई नगरीच्या आकर्षणाने आणि पोट भरण्यासाठी रोज जवळजवळ 1000 लोक येथे आपले नशीब अजमाविण्या साठी या स्वप्ननगरीत येत असतात. या स्वप्ननगरीत फक्त महाराष्ट्र राज्यातील लोकच येतात का? नाही. तर परप्रांतातून लोक मोठया प्रमाणात या महानगरीमध्ये, स्वप्ननगरीमध्ये आपले नशीब अजमाविण्यासाठी लोक येत असतात, एक प्रकारे याला लोंढा असे म्हणावयास हरकत नाही. मग ते उत्तर प्रदेशमधून असतील, बिहारमधून असतील, आंध्र प्रदेशमधून असतील, तामिळनाडू मधून असतील आणि मोठया प्रमाणात बांगला देशातूनही या महानगरीमध्ये लोकांचा भरणा झालेला आहे असे दिसून येते. जेथे जागा मिळेल तेथे झोपडया आणि झोपडीदादा या मुंबई महानगरीमध्ये पहावयास मिळत आहेत. आपण जर मंत्रालय, विधान भवनच्या आसपास पाहिले तर क्रॉस मैदानावर अनेक परप्रांतियांनी झोपडया बांधून अतिक्रमण केल्याचे दिसून येते. मैदानाच्या मध्यभागी अधिकृत नाही, तर अतिक्रमण करुन फेरीवाल्यांनी ठाण मांडल्याचेही लक्षात येते. जर आपण रे-रोडवरुन निघून व्ही.टी.स्टेशनपर्यंत आलो तर आपल्याला त्या रस्त्यांवरील दोन्ही बाजूला अनधिकृत झोपडया असल्याचे दिसून येईल आणि तेथे असंख्य झोपडया व असंख्य जनता वावरताना आपल्याला दिसून येईल. खरे म्हणजे मुंबईचे सुशोभिकरण दूर राहीलेले आहे, उलट बकालपणा वाढविण्याचे प्रकार मुंबईत सर्रास सुरु आहेत. परप्रांतीयांच्या लोंढयाने गुदमरलेल्या आणि बेजार झालेल्या मुंबई नगरीत पोलिसांचे संख्याबळ किती आहे ? याचा जर आपण विचार केला तर असे लक्षात येईल की, ते फारच कमी आहे. त्यात अतिमहत्वाच्या लोकांना सुरक्षा देण्याच्या कामामुळे पोलिसांवर ताण पडतो. आज त्यांची अवस्था काय आहे ? तर त्यांच्या राहण्याची नीट सोय नाही, त्यांना वेळेवर वेतन मिळत नाही, त्यामुळे पोलिसांमध्ये लाच घेण्याची प्रवृत्ती बळावलेली दिसते. पोलीस दलातील त्रुटींमुळे आय.एस.आय.च्या कारवायाही वाढत आहेत. मुंबई महानगरीत आज जीवन अत्यंत असुरक्षित झालेले आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.

. . . .4 एम-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे . . . .

मधुकर चव्हाण यांनी जे सांगितले, ते खरोखर बरोबर आहे. मुंबई महानगरी ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेली आहे. आता मुंबईतील बीअरबार बंद होणार आहेत अशी घोषणा माननीय गृहमंत्र्यांनी केलेली आहे. अजून ते बंद झालेले नाहीत. परंतु ही चांगली बाब आहे. पण पीकअप पॉईंटबद्दल काय ? हे सुध्दा एक प्रकारे अधुनिक वेश्यालय आहे. हे पीकअप पॉईंटस् सुरु करण्यासाठी प्रत्येक महिन्याला तीन-तीन लाख रुपये दिले जातात. याबाबतीत शासन काय कारवाई करणार आहे ? सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी आपल्या भाषणात मसाज सेंटरचा उल्लेख केला आणि वृत्तपत्रात ज्या जाहिराती येतात त्याबद्दलही त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे मी पुन्हा त्याविषयी बोलत नाही. पण मुंबईत नाकाबंदी असेल, पेट्रोलिंग असेल किंवा कोंम्बींग असेल, या काळात पोलिसांना अनेक भुरटे चोर मिळतात. त्यांच्यावर काय कारवाई होते ? त्यांना कुठे ठेवले जाते ? की त्यांच्याकडून हप्ते घेऊन त्यांना सोडून दिले जाते ? याकडेही गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. आज मुंबई शहरामध्ये गुन्हयांची संख्या वाढली आहे. महिलांवरही अत्याचार होत आहेत. एकतर्फी प्रेमातून ॲसिड फेकणे, भररस्त्यात महिलांना जाळणे असे प्रकार होत आहेत. खंडण्या वसूल होत आहेत आणि यासाठी लहान-लहान मुलांना पळवून त्यांची हत्या केली जात आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी सौ.रणदिवे.... 18:55

मुंबईत पोलीस आयुक्तालय झाले,तेव्हापासून महिला सुरक्षा समिती, शांतता समित्या, त्याचबरोबर दक्षता समित्या, मोहल्ला समित्या अशा अनेक समित्या तयार झाल्या. पण आज या समित्यांचे काय कामकाज चालते आहे, हे पाहिले तर फक्त चहापान आणि हाय, हॅलो याच्यापलिकडे कोणतेही कामकाज होत नाही. त्यामुळे आज आपण रोज जळीत महिलांची प्रकरणे बाहेर होतात, बलात्काराचे सर्रास प्रकार चालतात,हे आपण वाचतो, दूरदर्शनवरून पहातो. भर रस्त्यामध्ये नागरिकांची संवेदनशीलता बोथट झालेली आहे. त्याबाबत कोणालाही काही वाटत नाही. कोणी एखादा मुलगा मुलीची छेड काढत असेल, बाजूने कोणी नागरिक जात असेल तर त्याची कोणी दखल घ्यायला मागत नाही. त्यामुळे मुंबईमध्ये महिलांना आज सरक्षित वाटत नाही. मुंबईतील अनेक पंचतारांकित हॉटेल्स, विमान कंपन्या, लॉज आहेत. या ठिकाणी आपण पाहिले तर अल्पवयीन मुली पुरविल्या जातात. या अल्पवयीन मुलींचा व्यापार मोठ्याप्रमाणावर मुंबईमध्ये होतो. आपण जर सांताक्रुज विमानतळापासून नीट तपासणी केली तर बाहेरून कशाप्रकारे या लहान लहान मुलींना आणले जाते आणि त्या लहान मुलींचा व्यापार केला जातो, हे आपल्या लक्षात येईल. त्यांचा लैगिक छळ होतो, लहान मुलांची देखील अशाप्रकारे पिळवणूक होत असते.

मुंबईची लोकसंख्या दरवर्षी किती पटीने वाढत जाणार आहे, माहीत नाही. खरे म्हणजे हा गंभीर अशाप्रकारचा प्रश्न आहे. मुंबई महानगरीमध्ये 50 टक्के नागरीक हे झोपडपट्टीमध्ये रहातात. मुंबईच्याबाबतील आज विचार केला तर पिण्याच्या पाण्याचा विचार करणे महत्वाचे आहे. आज मुंबई शहराची दर दिवशी 3400 द.ल.लिटर पाण्याची मागणी आहे. परंतु प्रत्यक्षात 2900 द.ल. लिटर पाणी मिळते. याचाच अर्थ पाणीपुरवठा पुरेसा नाही. विचार करा,की सन 2010-2012 पर्यन्त मुंबई महानगरीची काय अवस्था होणार आहे ? मलनिस्सारणाच्याबाबतीत अनेक सन्माननीय सदस्य बोलले. अजूनही काही ठिकाणी शौचालयाची व्यवस्था नाही. अजूनही मुंबईमध्ये सेफ्टी टँक दिसतात. कुलाबा, वरळी, बांद्रा या ठिकाणी आऊट फॉलद्वारे समुद्रात दूरवर मलनिस्सारण सोडण्याची व्यवस्था अजूनही दिसते. ही सगळी व्यवस्था मुंबई महानगरपालिका करते. आता पंपिंग स्टेशनची क्षमता खरी म्हणजे संपलेली आहे. याकडेही दुर्लक्ष होत आहे, यासाठी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. वहातूक व्यवस्थेच्या बाबतीत बोलायचे झाले तर मुंबई महानगरीमध्ये काही रेल्वे स्टेशनच्या जवळ नीट नागरीकांना चालता येत नाही, इतकी गर्दी असते. उदाहरण द्यायचे झाले तर सांबाक्रुज, बोरिवली किंवा दादर रेल्वे स्टेशन्सचे देता येईल. स्टेशनच्या बाहेर आपल्याला नीट चालताही येत नाही. गाड्या पार्किंच्या व्यवस्थेबाबत बोलायचे तर तीही वाईट अवस्था आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/

श्रीमती कांता नलावडे (पुढे चालू.....

मागच्याच आठवड्यामध्ये दादर टी.टी.च्या स्टेशनच्या बाहेरील गाड्या पार्किंगच्याबाबतीत सदनामध्ये चर्चा झाली. ज्याप्रमाणे रस्त्यावर असंख्य गाड्या दिसतात, त्याचप्रकारे 'नो पार्किंग झोन'मध्ये गाड्या उभ्या केलेल्या असतात. आपण मुंबई उपगरामध्ये पाहिले तर त्याही ठिकाणची अवस्था वाईट आहे. मग घाटकोपर असेल, मानखूर्द स्टेशन असेल, गोवंडी असेल. त्या ठिकाणी जेथे पार्किंगची व्यवस्था नाही त्या ठिकाणीही रसायन भरलेले ट्रक उभे असलेले दिसतात. मी चेंबूर ते मानखूर्द येथील शिवजी-देवजी मार्ग या रस्त्याचा उल्लेख या निमित्ताने करेन. त्या ठिकाणी दोन्ही रस्त्यांच्या बाजूला रसायनाने भरलेले ट्रक्स् उभे राहिलेले दिसतात. त्या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेच्या शाळा आहेत, माध्यमिक विद्यालये आहेत. मुले शाळेत ये-जा करत असतात, अनेक अपघात घडत असतात, मुले त्यामध्ये मृत्यू पावतात. एवढेच नव्हे तर रात्री-अपरात्री ट्रक्स उभे असतात. हे ट्रक ड्रायव्हर वेश्या व्यवसायही करतात. झोपडपट्ट्यातील मुलींना त्या ठिकाणी आणले जाते. त्याकडेही सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

(वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात येते.)

श्रीमती कांता नलावडे : मी नुकतीच भाषणाला सुरुवात केलेली आहे. अरबी समुद्रानजिक असलेली मुंबई...खरे म्हणजे भूकंप प्रवण क्षेत्रात वसलेली असली तरी या शहराच्या पूर्वेकडील....

तालिका सभापती : आपल्याला बोलून 9 मिनिटे झालेली आहेत.

श्रीमती कांता नलावडे : सन्माननीय सदस्य श्री.सावंत जे बोलले खरे आहे. शेवटी बोलणाऱ्या सदस्यांना पाच मिनिटे तरी बोलायला द्यावी. मला बोलून तीनच मिनिटे झालेली आहेत. मी जास्त बोलणार नाही.

तालिका सभापती : आपण बोलायला सुरुवात करून 9 मिनिटे होऊन गेलेली आहे.

श्रीमती कांता नलावडे : ठीक आहे. मी दोनत्तीन मिनिटेच आता बोलणार आहे. या मुंबई शहराचा पूर्वेकडील भाग त्सुनामीचा आहे हे आपण पाहिलेले आहे. पश्चिम किनाऱ्यापेक्षा जास्त धोकादायक तो भाग ठरू शकतो. भविष्यात त्सुनामीचे संकट मुंबईवर येऊ शकते.

यानंतर कु.थोरात....

अस्शोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदार... 19:00

श्रीमती कांता नलावडे..

भविष्यात मुंबईवर त्सुनामीचे संकट येऊ शकते. पश्चिम भागात अधिक प्रमाणात ते येण्याची भिती तज्ञ मंडळींनी व्यक्त केली आहे. मुंबई आणि असपासचा परिसर 4 रिश्टर स्केलच्या च्या म्हणजे तीव्र श्रेणीत मोडतो. रिस्टर स्केलनुसार मुंबईत 6.5 इतक्या क्षमतेचा भूकंप होऊ शकतो. खरे म्हणजे त्सुनामीचे संकट आले त्याच वेळेला खरे म्हणजे आपण सावध व्हायला पाहिजे. इतक्या तीव्रतेचा भूकंप झाल्यास मुंबईसाख्या दाटीवाटीच्या शहराची काय वाताहत होईल याची कल्पना करवत नाही. कुलाबा ते वसई पट्टा खरे म्हणजे भूकंपप्रवण पट्टा आहे. मनोरी मालाड विहार, तुळशी तसेच दक्षिण मुंबईमध्ये मलबारहिल हे विशेष घोक्याचे क्षेत्र आहेत. मुंबईत 6.5 रिश्टर क्षमतेचा भूकंप होऊ शकतो. किनारी भागाला समुद्र गिळंकृत करु शकेल. या येणा-या संकटाला समोरे जाण्यासाठी सरकारने काही यंत्रणा उभारली आहे काय? याबाबतीत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. मुंबईच्या विकासाच्या अंतर्गत नेमके कोणते प्रकल्प हाती घ्यावयाचे आहेत याचा मास्टर प्लॅन अजूनही तयार नाही. आधुनिक मुंबापुरीच्या नेमक्या गरजा काय आहेत? याचा अंदाज अजून कुणीही घेतलेला दिसत नाही. मुंबईत राज्याच्या ग्रामीण भागातून व परराज्यातून म्हणजे भावी काळात लोकांचे किती लोंढे येणार याबाबतीतही अजून कोणतेही आडाखे बांधले गेलेले नाहीत, ते बांधायला पाहिजेत. मुंबईला ओंगळवाणे स्वरुप प्राप्त झाले आहे. त्याचे स्वरुप अमुलाग्र बदलण्यासाठी बेकायदा झोपडया आणि बांधकामे पाडण्याच्या मोहिमेला ठोस विकास आराखडयाची जोड मिळणे अत्यंत आवश्यक आहे. जोपर्यंत या सर्व उपाययोजना होत नाहीत तोपर्यंत मुंबई महानगरीचे काही खरे नाही. या ठिकाणी अनेक विषयांचा उल्लेख झालेला असल्यामुळे मी परत त्याचा उल्लेख करणार नाही. या मुंबई महानगरीबद्दल चार ओळी काव्यातून व्यक्त करुन मी माझे भाषण संपविणार आहे.

काय होतीस तू, कशी झालीस तू,
अग, मुंबानगरी, ओंगळ झालीस तू !
गर्दी दुर्गंधींने, झालीस हैराण तू !
एके काळी होती, काय तुझी शान,
प्रजासत्ताक दिनी, असे रोषनाईचा मान !
रस्त्यांनाही मिळतसे, अभ्यंग स्नान,

..2..

श्रीमती कांता नलावडे...

आज तू मळवेली, भुकेने व्याकुळली,
गलिच्छ नगरीमध्ये, गणना तुझी झाली.
आकर्षित महानगरी, अदा तुझी भारी,
पोलीसदलाच्या शौर्यानेही ऐश्वर्यात न्हाली.
झोपडपट्टीचा ग तुला, कर्करोग झाला
सर्जरी उपाय, कोणाला न सूचला
कळवळा येऊ दे ग, राज्य शासनाला !
पैसे सोडा कि हो, मुंबई विकासाला,
डौलाने उभी करा, मुंबानगरीला !!!

धन्यवाद.

------



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदार... 19:00

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) सभापती महोदया, नियम 259 अन्वये हा जो अंतिम आठवडा पस्ताव विरोधी पक्ष नेते सन्माननीय श्री. पांडुरंगजी फुंडकर, श्री. मधुकर चव्हाण, श्री. प्रमोद नवलकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आणला. या प्रस्तावर श्री. प्रमोद नवलकरजींनी या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात ओपनिंग बॅट्समनची जी भूमिका घेतली ती अत्यंत महत्वाची आहे, असे मला वाटते. यामध्ये त्यांनी मुंबईचे अत्यंत विदारक चित्र या ठिकाणी उभे केले. डान्सबार, मुजरा, पार्लर, ब्युटी पार्लर, जेन्ट्स पार्लर, डान्सिग स्कुल......................

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

या सगळया माध्यमातून मुंबईची नैतिकता विद्रुप करण्याचा जो प्रयत्न केला जात आहे ती खऱ्या अर्थाने आमच्याकरिता चिंतेची बाब आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोदजी नवलकर यांनी मुंबईचे जे वास्तव वर्णन केले त्याबाबतीत मला असे म्हणावेसे वाटते की, मुंबईची रात्र कधी संपत नाही आणि दिवस कधी उगवत नाही अशी मुंबईची अवस्था झालेली आहे. मुंबईच्या अनेक समस्या आहेत. त्यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रवचने केली. त्या प्रवचनाच्या माध्यमातून मुंबईच्या कोणत्या व्यथा आहेत, काय वेदना आहेत ते मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सभापती महोदया, जी व्यथा सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांची आहे, जी व्यथा सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांची आहे तीच माझी व्यथा आहे. या सदनातील जे सन्माननीय सदस्य सुरुवातीला बोलतात तेव्हा ते प्रदीर्घ बोलतात आणि आम्हाला मात्र वेळेची मर्यादा पाळावी लागते. अर्थात वेळेच्या मर्यादेप्रमाणे बोलण्याचा माझा प्रयत्न आहे. आपण ते समजून घ्याल असा मला विश्वास वाटतो. अनेक प्रकारच्या समस्या उराशी घेऊन, अनेक प्रकारच्या व्यथा पचवून, सर्व प्रकारचे दु:ख पचवून मुंबई जगत आहे आणि मुंबईत येणाऱ्या प्रत्येक माणसाला ही मुंबई जगवित आहे, हे मुंबईचे वैशिष्ट्य आहे. मग मुंबईमध्ये येणारा कोणत्याही प्रांतातील असो, आमचा मराठी माणूस असो किंवा आणखी कोणी असो, कोणत्याही जातीचा असो, कोणत्याही धर्माचा असो, कोणत्याही पंथाचा असो, तो मुंबईमध्ये येतो आणि त्या सर्वांना आपल्या अंगाखांद्यावर खेळविण्याचे आणि त्यांना आनंद देण्याचे काम ही मुंबई नगरी करते. आम्ही सर्व माणसे कद्रू आहोत. आम्हाला ते आवडत नाही. यामध्ये आमचा स्वार्थ आहे. आमच्या स्वार्थापोटी कधी परप्रांतीयांच्या नावाखाली, कधी झोपडपट्टीच्या नावाखाली अशा वेगवेगळया नावाखाली आपण मुंबईला बदनाम करण्याचा प्रयत्न करतो. मुंबई गुदमरते हे खरे आहे. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते या ठिकाणी उपस्थित आहेत. जेव्हा मुंबईचा वाढत जाणारा भार कोठे तरी शिफ्ट झाला पाहिजे, कोठे तरी स्थलांतरीत झाला पाहिजे म्हणून तिसऱ्या मुंबईची कल्पना माननीय श्री. नितीन गडकरी यांनी ते विरोधी पक्ष नेते असताना मांडली होती. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी फार भयानक कॉमेंन्ट्स केले होते. ते

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

सन्माननीय श्री. गडकरी साहेबांना म्हणाले होते की, तिसऱ्या मुंबईची चर्चा करुन आमच्या मुंबईचे महत्व कमी करण्याचा प्रयत्न करु नका. तुम्ही तिकडे नागपूरमध्ये बसा आणि तेथे तुमचे राजकारण करा इथपर्यन्त ते म्हणाले होते. मग मुंबईचा हा लोंढा, मुंबईचा हा भार जर आपल्याला कमी करावयाचा असेल तर आपल्याला काही पर्याय निर्माण करावे लागतील. त्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग दिसत नाही. मी त्या मुद्दयावर बोलणार नाही. प्रश्न अनेक आहेत. त्यामध्ये मराठी माणसांची होत असेलेली कुचंबणा हा प्रश्न आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/ श्री.बरवडनंतर 19:10

प्रा.जोगेंद्र कवाडे....

परप्रांतियांचे आपल्या राज्यात दिवसेंदिवस वाढणारे लोंढे, मोडकळीस आलेल्या इमारती, गृहनिर्माणाच्या समस्या आहेत. रामरावजी प्रिंसिपल सेक्रेटरी, खोब्रागडे हे म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यांच्यासंबंधी कलागती लावण्याचे प्रकार या ठरावाच्या माध्यमातून समोर आले. यामध्ये एक गोष्ट निश्चित आहे. मा.सदस्य श्री.मधुकरराव सरपोतदार म्हणाले की, आपल्या मुंबई नगरीमध्ये कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा माणूस आला तरी चालेल परंतु अराष्ट्रीय प्रवृत्तीचा माणूस येता कामा नये असे म्हणता म्हणता शेवटी परप्रांतियांचा त्यांनी मुद्दा उपस्थित केला. अराष्ट्रीय प्रवृत्तीचा माणूस मुंबईमध्ये राहू नये परंतु तो इतर ठिकाणी चालतो असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? अराष्ट्रीय प्रवृत्तीचा माणूस कोणत्याही जातीचा, धर्माचा असेल तो येथे राहिला काय, नागपूरला राहिला काय, गोंदियाला राहिला काय किंवा महाराष्ट्राच्या कोणत्याही भागामध्ये राहिला काय त्याचा सर्वनाश झाला पाहिजे. ही आपली भूमिका असावयास पाहिजे. अपप्रवृत्तींचा सत्यानाश करण्याची ताकद आमच्या सभागृहाच्या नेत्यांमध्ये आहे, राज्याच्या मुख्यमंत्र्यांमध्ये आहे. या शासनाने मुंबईच्या बाहेरचे सर्व डान्स बार बंद करण्याचा निर्धार केला आणि ते बंद करुन दाखविले, परंतु मुंबई बाहेर ही संस्कृती गेली तिचे उगमस्थान मुंबईमध्ये आहे, तिला बूच मारण्याचे राहिले होते. जसे घाण कितीही काढली तरी ती जोपर्यंत मुळापासून काढली जात नाही तोपर्यंत ती बाहेर येत राहणार त्याप्रमाणे या बार संस्कृतीचे आहे. त्यामुळे सरकारच्या जेव्हा लक्षात आले की, मुंबईमध्ये देखील डान्स बार बंद करण्याची आवश्यकता आहे त्यामुळे डान्स बार बंद करण्याचा फतवा शासनाच्यावतीने काढण्यात आला. म्हणून मा.श्री.आर.आर.आबांचे सर्वांनी अभिनंदन केले गेले. या चर्चेच्या माध्यमातून आता ज्या नैतिकतेच्या गोष्टी आपण बोलतो, परंतु मला एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते की, संपूर्ण देशामध्ये मुंबई नगरी फक्त सुंदर नगरी आहे. मुंबईमध्ये पैदा झालो म्हणून नव्हे, मुंबईबद्दल गौरव आहे म्हणून नव्हे तर देशाच्या जनतेचे मुंबईवर प्रेम आहे म्हणून. त्या प्रेमाचा आपण सर्वांनी सन्मान करणे हे मराठी माणसाचे कर्तव्य आहे. आमच्या घरी पाहुणा आला तर घरातील माणूस एक पोळी कमी खातो परंतु पाहुण्यांना पोटभर जेवू घालतो अशी आपली महाराष्ट्राची संस्कृती आहे. अतिथी देवो भव असे म्हणतो, एकिकडे हे विश्वचि माझे घर असे म्हणतो. आमच्या देशातील माणसे येथे येतात तेव्हा

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

प्रा.जोगेंद्र कवाडे....

त्यांच्याबद्दल द्वेषाची, तिरस्काराची भावना मनामध्ये ठेवणे योग्य नाही. या मुंबईचे प्रश्न एकत्र येऊन सोडवू या. या मुंबईची अवस्था कौरवांमध्ये सापडलेल्या द्रौपदीसारखी झाली आहे. ती द्रौपदी पांडवांकडे साहाय्यासाठी पहात आहे परंतु ते पांडव सुध्दा कौरवासारखे वागत आहेत. म्हणून मी त्यांना सांगेन की,

कल की बात क्या पूछते हो, कल के हालात भूल जाते हो
हमारी औक़ात पूछने वालों, अपनी औक़ात भूल जाते हो.

सभापती महोदय, असा प्रश्न कधी कधी विचारावासा वाटतो. प्रश्न औक़ातचा नाही तर झ ोपडयांसंबंधी ज्या गोष्टी गोष्टी बोलल्या गेल्या, झोपडपट्टयासंबंधी बोलले गेले ते ऐकून मन विषण्ण झाले. श्री.शरद पवार यांच्यासंबंधी याठिकाणी सांगितले गेले.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 19:15

(प्रा. जोगेंद्र कवाडे ...)

श्री. शरद पावार हे योग्य बोलले. कारण 2000 पर्यन्तच्या झोपड्यांना मान्यता देऊ अशी आघाडी सरकारची घोषणा होती. माननीय श्री. शरद पवार यांनी देखील युपीए सरकारच्या धोरणाचा उल्लेख केला. श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली युपीए सरकार स्थापन झाले आणि श्री.मनमोहन सिंग हे भारताचे पंतप्रधान झाले. युपीए सरकारच्या कॉमन मिनिमम प्रोग्रॅममध्ये ही बाब लिखित स्वरुपात नमूद केलेली आहे की झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन केल्या शिवाय झोपडपट्टी तोडता येणार नाही. हीच भूमिका आपल्या देशाचे कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी घेतली. मी त्यांना या देशाचा जाणता राजा असे म्हणेन. त्यांनी देखील झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन झाल्या शिवाय त्या हटवू नयेत. निवडणुका आल्या की, हे झोपडपट्टीवाले चालतात आणि निवडणुका संपल्यानंतर ते चालत नाहीत अशा प्रकारची भूमिका कोणत्याही सरकारला शोभणारी नाही. म्हणून झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन झाल्याशिवाय झोपड्या हटविण्याचे पाप महाराष्ट्राच्या आघाडी सरकारने करु नये अशी या चर्चेच्या निमित्ताने माझी आग्रहाची विनंती आहे. आपल्याला हे माहीत आहे की, रोज गर्दी वाढत आहे, अपघात वाढत आहेत, अपघातात माणसे मरत आहेत. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर देखील प्रचंड प्रमाणावर अपघात होतात आणि कित्येत माणसे मृत्यूमुखी पडतात. काहींचा ठावठिकाणा लागतो तर काहींचा लागतही नाही. मुंबईमध्ये देखील रोज अपघात होतात. सलमानखान रात्रीच्या वेळी दारु पिऊन फुटपाथवरुन गाडी चालवतो. त्याच्या गाडीखाली एका माणसाचा मृत्यू होतो. त्याच्यावर 302 कलमाखाली गुन्हा दाखल व्हावा म्हणून आंदोलने होतात. वर्तमानपत्रामध्ये गाजावाजा होतो आणि कारवाईची मागणी होते. अशा प्रकरणी आवश्यकती कारवाई केलीच पाहिजे. म्हात्रे सारखा माणूस दारुच्या नशेमध्ये अशा प्रकारे गाडी चालवून...(अडथळा)..श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे पी.ए...

श्री. अनिल परब : माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे पी.ए. दारुच्या नशेत... ही बातमी वृत्तपत्रामध्ये छापून आलेली आहे....गाडी चालवीत असताना त्यांच्या गाडीखाली दोघा मायलेकींचा मृत्यू झाला. ही मुंबईची संस्कृती नसावी. (अडथळा)....

..2..

(विरोधी पक्षाचे काही मा.सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : मा.सदस्यांनी कृपा करुन आपल्या जागेवर शांत बसावे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : सभापती उभे असताना कोणी सदस्य उभे रहात नाहीत अशी प्रथा आहे. कृपया सगळया सदस्यांनी आपापल्या जागी शांततेने बसावे. कृपया सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपणे भाषण लवकर संपवावे.

( दोन्ही बाजूचे सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

माझी पुन्हा सगळया सदस्यांना विनंती आहे की, सगळयांनी खाली बसावे. कोणीही आपापसात बोलू नये.

( गोंधळ )

श्री. दिवाकर रावते: दारु पिऊन आमदार निवासात मारामारी करणा-या व्यक्तीस दुस-या व्यक्तीच्या बाबतीत काही बोलण्याचा अधिकार नाही.

**तालिका सभापती** :आपल्याला असे असंसदीय बोलता येणार नाही. आपले बोलणे मी रेकॉर्डमधून काढून टाकीत आहे. कृपया माझी सदस्यांना पुन्हा विनंती आहे की, आपण खाली बसा. सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांनी आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

श्री. दिवाकर रावते : प्रा.कवाडे यांचे देखील म्हणणे रेकॉर्डमधून काढून टाकले पाहिजे.

**तालिका सभापती** : या ठिकाणी एकमेकाच्या विरुध्द जर काही हेत्वारोप केले गेले असतील तर ते रेकॉर्डमधून काढून टाकण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया...

श्री. मधुकर सरपोतदार : मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

**तालिका सभापती** : आपल्याला हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : माझा एकच हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य हे मुंबईच्या प्रश्नावर आपले विचार व्यक्त करीत आहेत. ते मुंबईच्या प्रश्नाच्या बाबतीत विचार मांडता आहेत त्यास आमचा विरोध नाही. परंतु ज्या गोष्टीची पूर्णपणे त्यांना माहिती नाही त्या अज्ञानाच्या संदर्भात एखादे स्टेटमेंट करुन ते रेकॉर्डवर रहाणे हे कधीही योग्य नाही. म्हणून मला एक गोष्ट सांगावयाची आहे की,..

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, मला देखील हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे..

श्री. मधुकर सरपातेदार : माझा हरकतीचा मुद्दा पूर्ण होऊ द्या. त्यानंतर आपण आपला मुद्दा उपस्थित करावा.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे यांना सांगू इच्छिते की, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचा हरकतीचा मुद्दा प्रथम पूर्ण होऊ द्यावा.

श्री. मधुकर सरपोतदार : माझा हरकतीचा मुद्दा एकच आहे की, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी जे स्टेटमेंट या ठिकाणी केले आहे. श्री. म्हात्रे यांनी अपघात केला, त्यांनी दोन माणसे मारली. त्यासंबंधीची पोलीस तक्रार झाली नाही आणि तो तसाच सुटला अशा प्रकारचे स्टेटमेंट त्यांनी या ठिकाणी केले आहे. ज्यावेळी हा अपघात झाला त्यावेळी श्री.म्हात्रे स्वत:हून पोलीस स्टेशनला गेले. पोलिसांनी त्यांच्याविरुध्द केस दाखल करुन घेतली. त्यांना या अपघात प्रकरणी अटक झाली होती. कोर्टातून त्यांना जामीन मिळालेला आहे. हे त्यांना माहिती नाही. ते याबाबतीत अज्ञानी आहेत म्हणून ते या ठिकाणी असे बोलता आहेत एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री. गरुनाथ कुलकर्णी : अपघात झाल्यानंतर श्री.म्हात्रे यांना बॉम्बे हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. तो पर्यन्त पोलिसांनी त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई केली नव्हती.

( गोंधळ )

**तालिका सभापती** : या संदर्भात माहिती घेतली जाईल. आपण कृपया सगळयांनी खाली बसावे. जी काही माहिती खरी असेल तीच माहिती रेकॉर्डवर ठेवली जाईल. चुकीची माहिती असेल तर ती रेकॉर्डवर ठेवली जाणार नाही. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यानी आपले भाषण पूर्ण करावे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (बसून) : कॉपी करुन पास झालेले आहेत...

प्रा.जोगेंद्र कवाडे : कॉपी करुन कोण पास होते याची सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना चांगली माहिती आहे. मी जे काही या ठिकाणी बोललो...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे यांना सांगू इच्छिते की, आपल्याला भाषण करण्यासाठी एका मिनिटापेक्षा जास्त वेळ देता येणार नाही. तो वेळ सुध्दा भाषण पूर्ण करण्यासाठी देणार आहे. म्हणून आपण आपले भाषण लवकर पूर्ण करावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्या अनुषंगानेच मला देखील हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना सांगावयाचे आहे की, श्री. म्हात्रे यांच्या संदर्भात जर चुकीची माहिती दिली आहे असे मला वाटत नाही. आपण रेकॉर्ड काढून बघा. श्री. म्हात्रे यांचा फक्त या ठिकाणी रेफरन्स दिलेला आहे. सन्माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे स्वीय सहाय्यक असे मी म्हटलेले आहे. असे म्हणणे चुकीचे आहे काय ?

**तालिका सभापती** : आपण आपले भाषण पूर्ण करावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, मोठ मोठया प्रश्नांमध्ये आमची मुंबई नगरी सापडलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी महत्वाची गोष्ट सांगितली. महाराष्ट्राची निर्मिती झाली. मुंबई आपली राजधानी झाली...

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ...

105 हुतात्म्यांनी बलिदान केले तेव्हा कुठे मुंबई महाराष्ट्राला मिळाली. परंतु एक गोष्ट कदाचित मा.सदस्यांना माहीत नसेल की, केवळ 105 आमच्या हुतात्म्यांनी बलिदान दिले मुंबई महाराष्ट्रात यावी म्हणून दिले पण विदर्भाने केवळ मुंबई महाराष्ट्रात यावी यासाठी संपूर्ण विदर्भाने आपले आत्मसमर्पण संपूर्ण महाराष्ट्रासाठी करुन टाकले ही गोष्ट मुद्दाम सांगतो. ही मुंबई देशाचे वैभव आणि देशाचा गौरव झाला पाहिजे कारण स्वप्ननगरी आहे. सर्वांच्या प्रतिष्ठेची बाब आहे. मुंबई शहर सर्वांना सोबत घेऊन चांगले,स्वच्छ,सुंदर,आकर्षक झाले पाहिजे. मुंबई आकर्षक बनण्यासाठी मुंबईतील माणसे देखील आदर्श असली पाहिजेत आणि हा माणसांचा आदर्श,माणसांची मुंबई आणि समता,स्वातंत्र्य,बंधुत्व ,न्यायाचे राज्य ज्या मुंबईमध्ये चालते आणि सर्व जातीच्या,धर्माच्या लोकांना सन्मानाने जगण्याची आणि इज्जतीची भाकर कमावण्याची संधी या मुंबई नगरीमध्ये मिळते अशी जी प्रतिमा मुंबईची निर्माण झालेली आहे ती सतत कायम रहावी आणि मुंबईला वैभवशाली बनविले जावे हे नमूद करुन आपण मला संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

जयभीम.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 19:25

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदया,मुंबई देशाची आर्थिक राजधानी आणि राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या समस्या आणि दिवसेंदिवस होत असलेली दुरावस्था याविषयावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. अनेक ज्येष्ठ सदस्यांनी यावर आपले विचार मांडले. मुंबई नगरी सबसे बाका जशी रावणाची लंका. ही लंका आता उध्वस्त व्हायला लागली आहे. खरे पाहता मुंबईचे मूलभूत प्रश्न कोणते असा विचार केला तर माझ्या दृष्टीने मुंबईचा पहिल्यांदा भौगोलिकदृष्टया विचार केला पाहिजे. या मुंबईचे क्षेत्रफळ 484 चौ.कि.मी. असेल तर त्यावरील लोकवस्ती किती असू शकते आणि त्यासाठी लागणा-या ज्या सर्व प्रकारच्या नागरी सुविधा आहेत त्यांचा विचार केला पाहिजे. त्यादृष्टीने लोकसंख्या,वाहतूक व्यवस्था,आरोग्य व्यवस्था,पाण्याची व्यवस्था,प्रदुषण नियंत्रण,शिक्षणाची व्यवस्था,कायदा आणि सुव्यवस्था,मलनिस्सारण या सगळया भौतिक गरजांचा विचार केल्यानंतर ख-या मुंबईचा विचार केला तर या सगळया मुंबईचा सांस्कृतिक वारसा,मुंबईची संस्कृती याचा विचार केला पाहिजे. म्हणून मुंबईचे शांघाय करायला आपण निघालो आहोत तर खरी मुंबई आम्ही कोणती पाहिली याचा विचार केला पाहिजे. गेल्या 50 वर्षात पाहिलेल्या मुंबईचा विचार केला तर धगधगणारी मुंबई,गिरण्यांचे भोंगे वाजणारी मुंबई,गिरणीचा कामगार धावणारी मुंबई,रस्ते पाण्याने धुतले जाणारे मुंबई आम्ही पाहिली आणि कच-याचे ढिगारे आम्ही पाहिले नाहीत. या मुंबईत जे लोंढे यायला सुरुवात झाली आणि मुंबईचे जे प्रश्न निर्माण झाले. आम्हांला सातत्याने भीती वाटते की मुंबई ज्वालामुखीच्या तोंडावर आहे. कशामुळे याचा विचार केला पाहिजे. त्यासाठी मागे जावे लागते. या सा-या प्रश्नांचा मूळ प्रश्न येतो लोकसंख्या आणि शहरात येणारे लोंढे. या शहराची क्षमता किती आणि त्याप्रमाणे आपल्याला नागरी सुविधांची व्यवस्था करता येईल काय हे पाहिले पाहिजे. या सरकारने 1995 च्या झोपडयांच्या संदर्भातील कायदा केला. दोन्ही सभागृहाने तो कायदा मान्य केला. प्रा. कवाडे यांनी सांगितले की आम्हीही लोकांना आश्वासन दिले होते. पण तुम्ही विचार केला नाही की त्यातून मुंबईची दुरावस्था होईल काय ? फक्त राजकीय दृष्टया आम्हांला काय फायदे मिळतील आणि सत्ता मिळेल काय आणि आमचे उपमुख्यमंत्री मरता क्या नही करता असे म्हणतात. क्या नही करता कुछ भी करो वो भी मार डालो. मुंबई मारायची काय ? या मुंबईची अवस्था कुठपर्यंत चालली आहे याचा विचार केला पाहिजे. मुंबईतील वाहनांची संख्या आणि त्यामुळे होणारे प्रदुषण याचा विचार केला तर 31 मार्च 2004 पर्यंत आलेली आकडेवारी नुसार

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

दुचाकी वाहनांची संख्या 5 लाख 84 हजार 180 त्यात 3 लाख 18 हजार 199 मोटार सायकल 2 लाख 33 हजार 156 स्कूटर्स आणि उरलेल्या मोपेड यांचा समावेश आहे. मुंबईत 1 लाख ऑटो रिक्षा आणि 50 हजार टॅक्सी आहेत. मुंबई दक्षिणोत्तर पसरली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावत ..

आज मुबई दक्षिणोत्तर पसरलेली आहे.मुंबईत चार हमरस्ते आहेत आणि या चार हमरस्त्यावर सतत ट्राफिक असते .जेव्हा 1995 च्या झोपडयासंबंधीचा विचार आपल्यासमोर आला होता. तेव्हा आपण तो विचार का करावयास लागलो? कोणालाही कोणत्याही प्रांतात जाऊन राहण्याचा व कोणताही व्यवसाय करण्याचा अधिकार राज्य घटनेने दिलेला आहे. त्या ठिकाणी जाऊन अनधिकृत बांधकामे करावीत असा राज्य घटनेने अधिकार दिलेला नाही.तुम्ही कोणत्याही प्रांतात जावे आणि त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे करावीत किंवा अनधिकृत व्यवसाय करावा असे राज्य घटनेमध्ये सांगण्यात आलेले नाही. नाना चुडासामा यांचे वाक्य मला फार आवडले होते आणि त्यांनी असे म्हटले होते की, "occupy a land, construct a hut and own a flat." मुंबईची परिस्थिती धर्मशाळेसारखी झाली आहे. गेट वे ऑफ इंडियाला दरवाजा नाही. येथे कोणीही यावे आणि अनधिकृतपणे झोपडया बांधाव्यात. अशी स्थिती आहे. त्या झोपडया नंतर अधिकृत करण्यास शासन तयार आहे.डिसेंबर - जानेवारी महिन्यात झोपडया तोडण्याची मोहीम सुरु करण्यात आली होती परंतु या झोपडया कोणत्या तोडण्यात आल्या होत्या ? प्रतीक्षा नगर भागातील पंचशील नगरमधील झोपडया तोडण्यासंबंधीच्या नोटीसेस त्यांना देण्यात आल्या होत्या.त्या ठिकाणी काही मराठी माणसे राहत होती.जी मराठी माणसे आहेत त्यांना मुंबईमध्ये राहण्याचा जरुर हक्क असेल.परप्रांतीयांनी मुंबईत येऊ नये असे मी नेहमी सांगतो. महाराष्ट्रातील जो मराठी माणूस आहे तो मुंबईत येण्यास गांगरुन जातो. मला मुंबईमध्ये जाता येईल काय ? असा प्रश्न त्याच्या समोर उभा राहतो.आंबुजा वाडी येथील मराठी आणि महाराष्ट्रातील मुसलमान राहत होते त्यातील काही उत्तर प्रदेशातील मुसलमानसुध्दा होते. त्या ठिकाणच्या झोपडया तोडल्या होत्या परंतु एअरपोर्टजवळील टेकडीवर रफीनगर आहे त्या ठिकाणी असलेल्या झोपडया मात्र तोडण्यात आल्या नाहीत. जाणीवपूर्वक भेदाभाव करुन काही ठिकाणच्या झोपडयस तोडल्या तर काही ठिकाणच्या तोडल्या नाहीत.श्री.कृपाशंकर सिंह यांनी हट्ट केल्यामुळे त्या ठिकाणच्या झोपडया तोडल्या नाहीत.विमानतळा जवळील झोपडया तोडण्यासंबंधीचा विषय मध्यंतरी पुढे आला होता तेव्हा तातडीने 86 झोपडया तोडण्यात आल्या होत्या.अशा प्रकारे एका रात्रीतून झोपडया तोडण्याचे काम तुम्ही करु शकता परंतु ते करण्यासाठी जरब लागते, तसेच वकूबही लागतो.परंतु अनेकदा झोपडयांना संरक्षण देण्यासाठी राजकीय स्टेटमेन्टस केली जातात. सुरुवातीला 1995 पर्यन्तच्या झोपडयांना संरक्षण

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

दिले गेले .त्यानंतर 2000 पर्यन्तच्या झोपडयांना संरक्षण देण्याच्या बाबतीत सहानुभूतिपूर्वक विचार केला जाईल असे सांगण्यत येते.या दृष्टिकोनातून जेव्हा मराठी माणसांचा विषय समोर येतो तेव्हा नसीमखान, जावेदखान या सारख्या खान मंडळींनी मुंबईमध्ये झोपडयांच्या खाणावळी उघडल्या आहेत. या खाणावळी एवढया आहेत की त्या ठिकाणी त्यांनी वाटेल तशा झोपडया वसवल्या आहेत.सभापती महोदया, दोन तीन दिवसा पूर्वी वान्द्रा येथील नर्गिस नगर झोपडपट्टीस आग लागली होती. त्या संबंधी सभागृहात चर्चा झाली होती. मी सुध्दा त्या ठिकाणी जाऊन आलो होतो.माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्यावर माझा विश्वास आहे. मला त्यांना असे सांगावयाचे आहे की, नर्गिस नगर झोपडयांच्या आगीसंबंधीची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात यावी..नर्गिस नगर पासून फायर ब्रिगेड जवळ होते. नर्गिस नगरमधून हे फायर ब्रिगेड दिसत होते परंतु त्यांना अशा सूचना देण्यात आल्या होत्या की आग विझविण्यासाठी जाऊ नका.नर्गिस नगर जळू द्या. त्या ठिकाणचे नर्गिस नगर जाणीवपूर्वक जाळण्यात आले होते आणि त्या ठिकाणी चाळी वसविण्यात आल्या आहेत.ते लोक 1995 पूर्वीचे होते काय ? ही झोपडपट्टी कधीची होती? त्या ठिकाणी 75 झोपडया होत्या आणि तेथे पुन्हा फुटपाथवर 75 लोक राहतात परंतु त्यांना अजूनही हटविण्यात येत नाही. त्यांना का हटविले जात नाही.? त्यांच्याकडे जाणीवपूर्वक का दुर्लक्ष केले जात आहे? केवळ मत मिळतात म्हणून त्यांना संरक्षण दिले जात आहे.आज त्या ठिकाणी 75 झोपडया आहेत परंतु काही दिवसानंतर 750 झोपडया उभ्या राहतील.या बाबतीत मी आपल्याला आणखी एक उदाहरण देतो .आपण मनोरा येथील आमदार निवासामध्ये राहतो. मी 1996 मध्ये प्रथम आमदार म्हणून आलो होतो तेव्हा मनो-याच्या समोर असलेल्या जागेवर 5-25 झोपडया होत्या. परंतु आज सगळी जागा झोपडयांनी भरुन गेलेली आहे. या झोपडयांचे संरक्षण करण्यासाठी मानवी हक्क आयोगाचे प्रतिनिधी येथे येतात. श्री.संजय दत्त, श्री.सुनील दत्त, श्रीमती शबाना आझमी हेसुध्दा या झोपडयांच्या संरक्षणासाठी धावपळ करीत असतात.पूर्वी त्या भागात थोडयाशाच झोपडया होत्या परंतु आज खाडीपर्यन्त झोपडया उभ्या राहिल्या आहेत.या झोपडया हाकेच्या अंतरावर उभ्या आहेत. त्या ठिकाणी पत्र्याचे शेड टाकण्यात आलेले आहे आणि बाकीच्या सुविधा देण्यात आल्या आहेत.अतिशय व्यथित मनाने मी मुंबई

3...



VTG/ MHM/ SBT/ 19:30

श्री.अरविंद सावंत ...

शहरासंबंधीचा खेद व्यक्त करीत आहे.आपल्या हातून हे सर्व काही सुटून चालले आहे आणि मुंबई शहर वाचवा अशा प्रकारची आपण केवळ हाकाटी मारत आहोत. आणि सभागृहात भाषणे करीत आहोत. माझ्याकडे मुंबई महानगर प्राधिकरणाचा अहवाल आहे.

नंतर श्री.सुंबरे

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री.गायकवाड नंतर --- 19:35

श्री.अरविंद सावंत .....

या प्राधिकरणाने ओशिवरा येथे एक बिझनेस सेंटर करण्याचे ठरविले. यांचा आणखी एक मजेशीर प्रकार आहे. एमयूटीपी आणि एमयूआयपी असे ते दोन प्रकार आहेत. त्या एमयूटीपी मध्ये ट्रान्स्पोर्ट प्रोजेक्ट आणि एमयूआयपी मध्ये इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट घेतले जातात आणि या दोघांचेही प्रोजेक्ट कोठे घेतले जाणार आहेत हे अगोदरच सगळ्या लोकांना कळत असते आणि ती स्पार्क एजन्सी आहे तिला असे काम दिलेले आहे की, ज्यावेळेस तुम्ही सर्वेक्षण करण्यासाठी जाल तेव्हा म्हणजे सर्वेक्षणाच्या वेळी तेथे ज्या काही झोपड्या वा बांधकाम अस्तित्वात असेल त्यांचे पुनर्वसन करा.. इररिस्पेक्टिव ऑफ द लॉ, इररिस्पेक्टिव ऑफ द ॲक्ट .. तुमचा 1995 चा कायदा बाजूला सारा. जागतिक बँकेने सांगितले आहे की जे अस्तित्वात असेल त्याचे पुनर्वसन करा. बरोबर मग तेथे हे झ ोपडीदादा लोक बांधकामे करतात. सभापती महोदया, आपण येथून ठाण्याला जा. जाताना कुर्ल्याचा उड्डाणपूल ओलांडला की चेंबूरचा जुना उड्डाणपूल येतो. त्याच्या मधल्या रस्त्यावरील रस्ता रूंदीकरणाचे काम सुरू झालेले आहे. एका बाजूला आजही सुरू आहे. तेथे ताबडतोब 4-5 काठ्या टाकून धडाधड झोपड्या आल्या. आता तेथील पुलाचे काम देखील थांबले आहे. का तुम्ही त्या झ ोपड्या तोडत नाही ? का तुमची मोहीम थांबली ? तुम्हाला मुंबई सुंदर करायची आहे ना ? मग प्रश्न येतो की, हे सगळे करीत असताना या झोपड्यांखालील जमिनींचा ... एमएमआरडीएने तेथे बिझनेस सेंटर होते ... त्याबाबत वृत्तपत्रात आलेली बातमी मी येथे मुद्दामच आपणास वाचून दाखवितो. यामध्ये म्हटले आहे की, मुंबईच्या पश्चिम उपनगराच्या गरजा भागविणारे एक जिल्हा केंद्र. पश्चिम रेल्वेवर जोगेश्वरी व गोरेगाव रेल्वे स्टेशनच्या दरम्यान ओशिवरा येथे बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. हे जिल्हा केंद्र 102 हेक्टर जागेवर बांधण्याचे योजले आहे. त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, नियोजन या शब्दालाच खुंटा घातला जातो आहे. म्हणजे नियोजन प्राधिकरण .. त्या ठिकाणी एक चौकी आहे त्यामध्ये एक चौकीदार बसलेला असतो. त्याला विचारले की, तू येथे काय करतोस ? तर त्याने सांगितले की, काही नाही, ती समोरची दोन हॉटेल्स आहेत ती मला येथे चहा आणि दोन वेळची जेवणं देतात. तेथे अनधिकृत सारे काही आहे. पत्रे, शेडस्, गॅरेजेस वगैरे सारे काही, दणादण बांधून मोकळे झाले. म्हणून मी आपल्याला सांगतो की, आपल्या एमएमआरडीए ला याबद्दल विचारा. तुम्ही त्यांना एक ॲथॉरिटी दिलेली आहे. तुमची

...... 4व्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सावंत ....

ही ॲथॉरिटी तेथे काम करीत असतानाही हे असे होत आहे. सभापती महोदय, माझ्याकडे आजचे एक वृत्तपत्र आहे. मघा त्या रेशनकार्डस्चा उल्लेख आला. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.सरपोतदार यांनी तो मांडला. तुम्ही रेशनकार्ड मागता. तर तेथे रिलायन्सची लाईट किंवा बीईएसटीचे कनेक्शन मिळाले पाहिजे. कोठलीही झोपडपट्टी बांधली की ताबडतोब तेथे कनेक्शन मिळते. ते मिळाले की, ताबडतोब रेशनकार्ड पाच-पंचवीस, दोन-पाचशे रुपये खर्च केले की मिळते. रेशन कार्ड आणि लाईट बिल ही दोन बेसिक कागदपत्रे-पुरावा मिळाला की तुमचे नाव मग मतदार यादीमध्ये येऊ शकते. या मुंबई शहरामध्ये आम्ही मग कोठल्या थराला गेलो आहोत. आयएसआय एजंटाचे नाव मतदार यादीमध्ये. पाकिस्तानी नागरिक असूनही मुंबईच्या कुलाबा मतदारसंघातील मतदार यादीमध्ये नोंदणी. एकीकडे असंख्य मुंबईकरांना भारतीय नागरिक असूनही निवडणुकीत मतदानाचा अधिकार बजावण्याची संधी केवळ त्यांची नावे मतदार यादीमध्ये नसल्याने मिळत नसताना दुसरीकडे पाकिस्तानचे नागरिक असणा-या आयएसआय एजंटची नावे मात्र मतदार म्हणून नोंदविण्यात आली अशी धक्कादायक माहिती वृत्तमानस ला मिळाली. महम्मद अझर रफिक उर्फ सारंगअली खान उर्फ आझाद नावाचा हा आयएसआय एजंट गेली चार वर्षे मुंबईत सक्रीय होता. पोलिसांनी त्याच्या तीन साथीदारासह त्याला जेरबंद करण्यात यश मिळविले आहे. त्याचे नाव येथील मतदारयादीमध्ये आहे. ही माणसे आमच्यावर राज्य करणार ? म्हणून मुंबई ही ज्वालामुखीच्या उंबरठ्यावर आहे असे आपण म्हणतो. कोठे चाललो आहोत आम्ही ? यासाठीच झोपड्यांचे राजकारण केले गेले. ...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांची वेळ आता संपली आहे. त्यांनी आपले भाषण आवरते घ्यावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, मी भाषण आटोपतेच घेतो आहे. मी केवळ एका विषयावरच बोललो आहे. आपण झोपड्यांचे राजकारण केले. पण हे राजकारण करताना मध्यंतरी एक नवीनच टूम काढली कोणी तरी. मुंबईला स्वतंत्र राज्य द्या किंवा मुंबईला स्वतंत्र मंत्री द्या म्हणून सांगितले गेले, मागणी केली गेली. पण यामध्ये देखील एक कारस्थान आहे. ते कारस्थान आम्ही सहन करणार नाही. वेगळा मंत्री द्या अशी जेव्हा मागणी केली जाते तेव्हाच मनामध्ये कोठे तरी पाल चुकचुकते. कशासाठी ही मागणी केली जाते ? कोणाच्या डोक्यात हे कीडे वळवळतात ?

..... 4व्ही 3 ...



KBS/ SBT/ MHM/ श्री.गायकवाड नंतर --- 19:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

का तुम्ही हे वेगळे मुंबईसाठी मागता आहात ? त्याची पुढची पायरी म्हणजे पाणी वाटपाचे देखील खाजगीकरण करू मागताहेत. असाही विचार बोलून दाखविला जातो आहे. के वॉर्डामध्ये पाणी पुरवठा देखील खाजगीकरणातून प्रायोगिक तत्त्वावर देण्याचे घाटत आहे. सभापती महोदया, ही सगळी पावले मुंबई महापालिकेचे पंख कापणारी आहेत. आश्चर्य म्हणजे सगळे व्यवस्थित सुरू आहे. सगळे काही प्लॅन्स आपले चालू आहेत. एमएमआरडीचे प्लॅन्स चालू आहेत. म्हणून मी माघाशी म्हणालो की, या सगळ्या भौतिक गरजांमागे काय आहे ? तर मुंबई ही महाराष्ट्राची आहे आणि त्या महाराष्ट्राच्या संस्कृतीची जपणूक व्हायला पाहिजे. ती जपणूक करावयाची असेल तर येथील मराठी माणूस टिकला पाहिजे.

( यानंतर श्री.जागडे .... 4डब्ल्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

मराठी माणूस टिकला नाही तर मुंबई आपल्या हातात राहणार नाही. मुंबई मराठी माणसांच्या हातून केव्हाच निसटली आहे. परंतु ही मुंबई आता मंत्रालयातील राज्यकर्त्यांच्या हातातून निसटते आहे. माननीय गृहमंत्री योग्य प्रकारची भूमिका घेतात आणि तसे वागतातही. परंतु त्यांनाही कोणीतरी अडचणीत आणू शकेल. मध्यंतरीच्या काळात माननीय मुख्यमंत्र्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला होता. मा. मुख्यमंत्र्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला होता. त्यांचे अंतर्मन असे म्हणत असेल की, हे होता कामा नये. सभापती महोदया, या झोपडपट्टया मुंबईची वाट लावण्यासाठीच वाढत आहेत.

सभापती महोदया, म्हणून मी या ठिकाणी काही सूचना करणार आहे. मुंबईचे जोहान्सबर्ग होणार आहे. शांघाय होणार नाही. शांघाय शहरातील एका भागातून दुस-या भागात जावयाचे असेल तर परमीट लागते. शांघायमध्ये प्रवेश करण्याचा प्रश्नच निराळा आहे. म्हणूनच तेथील लोकसंख्या ठराविक राहीली, शहरात स्वच्छता राहिली. म्हणून या बाबतचा विचार करीत असताना कडक कायद्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. म्हणून या बाबत मी काही सूचना करणार आहे. आता शासन सागरी मार्ग करणार आहे. हा सागरी मार्ग होण्याची आवश्यकता आहे. नरिमन पॉईन्ट ते वर्सोवा असा हा सागरी मार्ग होणार आहे. आता हा मार्ग बोरिवलीपर्यन्त होण्याची आवश्यकता आहे. आता मुंबई-नाव्हाशेवा मार्ग होणार आहे. आता हा मार्ग होणार म्हटल्यावर त्या ठिकाणी झ ोपड्या होतील. मी आज जे सांगत आहे, ते आपल्या रेकॉर्डवर ठेवा. मुंबई - नाव्हाशेवा या रस्त्याच्या मार्गावर झोपड्या दिसतील. नंतर या लोकांना सुध्दा आपणाला फुकटची घरे द्यावी लागतील. सभापती महोदय, प्रदुषणाच्या बाबतीत मला सूचना करावयाची आहे. मुंबई बंदरात जी जहाजे येतात, आणि कंटेनरशिवाय अनलोडींग करतात, त्यांना बंद केले पाहिजे. कोळसा उघड्यावर टाकला तर त्यातून प्रदुषण होणार आहे. सल्फर उघड्यावर टाकले तर त्यातून प्रदुषण होणार आहे. जेएनपीटी कंटेनरशिवाय माल उतरवित नाही. त्याप्रमाणे मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये केले पाहिजे.

सभापती महोदया, मुंबईला दोन्ही बाजुने जल वाहतूक सुरु करावी. आपणाला परप्रांतियांचे लोंढे थाबविले पाहिजेत. मुंबईची लोकसंख्या आपणाला गोठविली पाहिजे. पार्लमेंटमध्ये असे ठरविण्यात आले आहे की, खासदारांची संख्या 588 राहील. यापुढे ही संख्या वाढणार नाही.

..2..

श्री. अरविंद सावंत......

तशाच पध्दतीने मुंबईच्या लोकसंख्येचा विचार केला पाहिजे. मुंबईचे क्षेत्रफळ विचारात घेता मुंबईची लोकसंख्या दीड कोटी पेक्षा जास्त होणार नाही. यासाठी आपणाला कोठेतरी नियमन करावे लागेल. प्रवेश पासेस बनवावे लागतील. जल वाहतूक सुरु करावी लागेल. रेशन कार्डाचा शेवटचा नंबर आपण जाहीर करा. रेशन कार्ड कोणाला दिले गेले, हे कळले पाहिजे. या मुंबईत कोण नवीन माणूस कोठून आला आणि कसा आला हे कळले पाहिजे. परवा मी बोलत असताना बोगस रेशन कार्ड कशा प्रकारे छापण्यात आली होती, याची माहिती दिली आहे. बांगला देशीय लोकांकडे रेशन कार्ड मिळालेली आहेत. आता हीच बांगली देशीय मंडळी आपल्या निवडणूकीला सुध्दा उभी राहतील. म्हणून या बाबत कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदया, बीईएसटी आणि रिलायन्स एनर्जीचे कनेक्शन देत असताना तसेच रेशन कार्ड देताना कठोर आणि कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. पूर्व आणि पश्चिम द्रुतगती मार्गाशेजारी सुध्दा झोपड्या बांधल्या जाण्याची शक्यता आहे. त्याची दक्षता आता शासनाने घेतली पाहिजे. तिवरांची झाडे तोडून झोपड्या बांधल्या जात आहेत. त्याचाही विचार करण्याची गरज आहे. उड्डाण पुलाच्या खाली ज्या जागा आहेत, त्या ठिकाणी सुध्दा आज कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मुंबईत येणा-या जड वाहनांना दिवसा प्रवेशबंदी केली पाहिजे. त्यामुळे वाहतूक सुरळीत राहण्यास मदत होईल. सर्व मोठ्या गाड्या रात्री येऊ द्या. आज सिमल्या शहरात देखील मा. राज्यपाल गाडीतून उतरुन चालत जात आहेत. मेट्रो रेल्वेचा विचार शासनाने करावा. तसेच रिजनल फायनानशियल हब करण्याचा जो विचार आहे, त्याबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

मुंबईमध्ये हे करीत असतांना कमाल जमीन धारणा कायदा आहे त्याची अंमलबजावणी करा. आज या शहरामध्ये धनिकांची प्रचंड जमीन आहे, त्यामध्ये गोदरेजची 15 हजार एकर जमीन आहे ती जमीन शासन अधिग्रहीत करु शकते. ती जमीन अधिग्रहीत करुन त्यावर लोकांचे पुर्नवसन करता येण्यासारखी गोष्ट आहे. नागरी कमाल जमीन धारणा कायद्याची अंमलबजाणी करण्याचा प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो. आणि या ठरावाच्या निमित्ताने मुंबईला एक वेगळा मंत्री द्यावा अशी कल्पना जर कुणाच्या डोक्यात येत असेल तर तो कल्पना विलास आहे. मुंबईला वेगळा मंत्री देऊन आपण मुंबईची काळजी असे सांगून या मुंबईला दाबण्याचा आपला कट आहे. तो कट आम्ही उध्वस्त केल्याशिवाय रहाणार नाही. मुंबई ही मराठी माणसाची संस्कृती आहे ती संस्कृती जपण्याचे काम आपण करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेते व अनेक माननीय सदस्यांनी नियम 259 अन्वये प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावावर या सदनाचे ज्येष्ठ माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी सुरुवात करुन भाषण केले. मला त्यांचे चांगले भाषण ऐकायला मिळाले असते. परंतु मी उशिरा आल्यामुळे मला ते ऐकायला मिळाले नाही. मुंबईच्या प्रश्नासंबंधी चर्चा होत असतांना मुंबई केवळ महाराष्ट्राची राजधानी किंवा देशाची औद्योगिक, आर्थिक राजधानी आहे या भावनेतून नव्हे तर मुंबईची वाढणारी प्रचंड लोकसंख्या आणि त्यातून निर्माण झालेले असंख्य प्रश्न आहेत. त्यामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्न आहेत. त्याचबरोबर प्रदूषणाचे, वहातुकीचे, बेरोजगारीचे, आरोग्याचे, पाण्याचे असे अनेक प्रश्न या अनुषंगाने मांडण्याचा प्रयत्न अनेक माननीय सदस्यांनी केला. हे मोठे जटील प्रश्न आहेत. मुंबईकडे पहातांना महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला "मुंबई माझी, माझी मुंबई" व "मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा" म्हणून 105 हुतात्म्यांनी बलिदान केले व "मुंबईसह मराठी भाषिकांचे राज्य व्हावे" यासाठी अनेकांनी त्याग केला.. या ठिकाणी एकच आठवण देतो की, स्वर्गीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणला असे आपण वर्णन करतो ही गोष्ट खरी आहे. मला त्यावेळची आठवण झाली. अनेक तऱ्हेने आज प्रयत्न होतात ते होऊ नयेत. परंतु स्वर्गीय श्रीमती इंदिराजी गांधी या 1959 साली अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अध्यक्षा होत्या त्यांनी पुढाकार घेऊन पंडितजींकडे रदबदली करुन वर्किंग कमिटीमध्ये प्रस्ताव पारित केला त्याची आठवण मला या निमित्ताने होते.परंतु 1960 सालची मुंबई आणि आजची 2005 ची मुंबई हे स्थित्यंतर 45 वर्षातील आहे. या 45 वर्षामध्ये मुंबईचे परिवर्तन झाले की नाही माहीत नाही परंतु अनेक प्रश्न निर्माण झाले. आता आमचे मित्र माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी पठ्ठे बापूरावांच्या लावणीची आठवण करुन दिली. "मुंबई नगरी बडी बाका, जशी रावणाची दुसरी लंका, रहाण्याला गुलाबाची फुलकी पाहिली मुंबई" मुंबईचे असे सुंदर वर्णन केले आहे. शाहीर दादा कोंडके, शाहीर अण्णाभाऊ साठे आणि शाहीर आत्माराम बापू पाटील यांनीही वर्णन केले आहे. या शाहीरांचे नाव घेत असतांना त्यांच्या पिढीतील वारसा सांगणारे शाहीर विठ्ठल उमप असो किंवा शाहीर साबळे असो हे सोडले तर शाहिरांचे पथक आज कुठे दिसत नाही. सुदैवाने 1971 पासून मी मुंबईमध्ये येत आहे. सेवा दलाच्या, युवक कॉंग्रेसच्या चळवळीत काम करीत असतांना टिळक भवनात

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

दादरला खेड गल्लीत, काकासाहेब गाडगीळ मार्ग या ठिकाणी येत असतांना 24 तास जागी असलेली मुंबई पाहिली आहे. त्यावेळच्या गिरण्या पाहिल्या आहेत. त्या ठिकाणी तीन चालणाऱ्या पाळया पाहिल्या आहेत. सातत्याने 24 तास मुंबई जागी असायची. त्यावेळी लहान लहान दुकाने, चहाच्या टपऱ्या असायच्या. त्यावेळचा गजबजाट, गलबला मुंबईमध्ये पाहिला आहे. विशेषत: टिळक भवनसमोर पाहिला आहे. आमच्या पुणे जिल्हयातील पुरंदर आणि भोर तालुक्यातील सर्वसामान्य कुल्फी विकणारी माणसे पाहिली आहेत. असे अनेक व्यवसाय व अशी अनेक माणसे पहायला मिळाली आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

परंतु आता या सर्व गोष्टींमध्ये परिवर्तन झालेले आहे. ना.सी.फडके यांच्या कुलाब्याच्या दांडीमधली गोमू आपल्याला आता कुठे मासे विकताना दिसतच नाही. या गोमूला सुध्दा मासे विकण्याच्या बाबतीत प्रश्न निर्माण झालेले आहेत अशी अवस्था आहे. सगळया गोमूंना, आमच्या माता, भगिनींना यासाठी आता आंदोलन करावे लागत आहे अशी या मुंबईची दुर्दैवी, विदारक, क्लेशकारक अवस्था झालेली आहे आणि ही अवस्था होण्याकरता अनेक कारणे आहेत. मला प्रामाणिकपणे आणि विनम्रपणे वाटते की, राजकीय अभिनिवेश बाजूला सारुन मुंबईचे हे सर्व जटील प्रश्न आपल्याला सगळयांना प्रामाणिकपणे, मनापासून कसे सोडविता येतील यादृष्टीने विचार केला पाहिजे आणि त्यादृष्टीने मी या प्रस्तावाकडे पहात आहे. मग तो वाढत्या झोपडपट्टयांचा प्रश्न असेल, वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न असेल, येणारे लोंढे असतील. आता सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की, सन्माननीय पंतप्रधान यांना मुंबईचे शांघाय करावयाचे आहे. घटनेच्या माध्यमातून, घटनेच्या नावाखाली, समाजवादाच्या नावाखाली अनेक लोक अनेक प्रश्न उपस्थित करीत आहेत. पण मला याठिकाणी एक आठवण सांगावीशी वाटते की, 1973 मध्ये मी जागतिक युवक संमेलना साठी जर्मनीला गेलो होतो आणि नंतर रशियाला आलो. त्यावेळी रशिया हा संपूर्ण माक्सवादी, कम्युनिस्ट पक्षाचा म्हणजे युनायटेड रशिया होता.मास्को मध्ये कायम वास्तव्याला येण्यासाठी रशियामधील कोणत्याही माणसाला परमिट लागत असे. त्यामध्ये काही अमानुषता नव्हती. मला आणखी एक गोष्ट आठवते आणि ती म्हणजे 1974-74 मध्ये मी महाराष्ट्राच्या युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो आणि त्यावेळी तरुणांमध्ये साप्ताहिक "मनोहर" अतिशय लोकप्रिय झालेले होते. मी वेगवेगळया बातम्या वाचत असे.तेव्हा मला एक बातमी वाचावयास मिळाली. त्यावेळी मला "मनोहर" मध्ये लिहीण्यासाठी "पाऊस" हा विषय देण्यात आला होता. तेव्हा पाऊस या शब्दाकडे माणसे कशा पध्दतीने पाहतात. शेतकरी पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहतो. त्याला असे वाटते की, पाऊस यावा, जमीन भिजावी आणि राने हिरवीगार व्हावीत. कवीला असे वाटते की, श्रावणामध्ये पाऊस पडावा आणि त्याला कविता सुचावी. प्रत्येकाचा वेगवेगळा दृष्टीकोन आहे. त्यावेळी मी एक बातमी वाचली आणि त्यामुळे माझ्या अंतर्मनाला फार वेदना झाल्या. बातमी अशी होती की, कन्नमवार नगरच्या शेजारी झोपडपट्टी आहे आणि पावसामध्ये तेथे पाणी जमा होते. आपण नेहमी पाहतो की, पावसामुळे काही वेळा घरामध्ये पाणी शिरते, कंबरेएवढे पाणी जमा होते. लोकांना पाण्यातून वाट

. . . .4 वाय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

काढावी लागते. अशा वेळी झोपडपट्टीतील अवस्था तर फारच वाईट असते. तेव्हा या झोपडपट्टीतील एक बाई नुकतीच बाळंत झाली होती. घरामध्ये बाळाला शेक मिळावा म्हणून आपण प्रयत्न करीत असतो. पण या झोपडपट्टीमध्ये पाणी शिरले होते आणि त्या बाईने बाळाला काथ्याच्या खाटेवर ठेवले होते. पण पाणी वाढत राहीले, मग तिने त्या खाटेवर दुसरी खाट ठेवली आणि त्यावर बाळाला ठेवले. पण तरीही पाणी वाढत होते आणि शेवटी त्या बाळापर्यंत पाणी आले. मग ती बाई वैतागुन म्हणाली की, नको, तो पाऊस. कशासाठी हा पाऊस येत आहे ? ही बातमी वाचल्यानंतर "मनोहर" मध्ये मी लिहीले होते की, "पाऊस" या शब्दाकडे माणसे कशी वेगवेगळया दृष्टीकोनातून पाहतात. हे सांगण्यामागचा मुद्दा हा की, 1973-74 सालातील ते चित्र, आज 30 वर्षांनी आणखी भयानक झालेले आहे. परप्रांतीय माणसे मग ती मराठी आहेत की आणखी कुणी आहेत हा मी चर्चेचा विषय येथे उपस्थित करु इच्छित नाही. परंतु मुळात 50-60-70 लाख लोक झोपडपट्टीमध्ये रहात आहेत. आपण त्यांचे सर्व प्रश्न सोडवू शकलो नाही ही दुर्दैवाने सत्य गोष्ट आहे. मग राज्य कोणाचे का असेना, पण आपण प्रश्न सोडवू शकलो नाही. मुळातच गरीबांचे अनेक प्रश्न आहेत आणि गरीबीमध्ये जीवन जगणारे आपले जे असंख्य बांधव आहेत त्यांचे प्रश्न सोडविण्याऐवजी त्यात आणखी भर घालावयाची आहे का ? यादृष्टीने या प्रश्नाकडे आपण पाहिले पाहिजे. याठिकाणी बांगला देशी आले की पाकिस्तानी आले ? याठिकाणी सदनामध्ये माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की, याठिकाणी किती पाकिस्तानी फरारी आहेत ? किती जणांचा व्हिसा संपलेला आहे ? पण असे किती लोक सापडत नाहीत ? किती बांगला देशी आहेत ? ही माहिती जाहीर करावी. कारण आसाममध्ये प्रश्न निर्माण झाले. आसाम,ओरिसा येथे आंदोलने झाली आणि त्यामुळे देशाच्या ऐक्याला तडा जाईल की काय ? अशी भीती निर्माण झाली होती. आपण तर सीमेपासून खूप लांब आहोत. परंतु सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितल्या प्रमाणे बांगला देशी, पाकिस्तानी मुंबईत असला काय किंवा कुठेही असला काय ? जो राष्ट्रद्रोही आहे, तो नष्टच झाला पाहिजे ही जी भावना त्यांनी व्यक्त केली, त्याच्याशी आपण सर्वजण सहमत होऊ असे मला वाटते. याठिकाणी गर्दी प्रचंड असल्याने लपायला, छपायला वाव असल्याने या गोष्टीचा फायदा घेऊन जेव्हा गुन्हेगारी वाढते आणि मग गुन्हेगारीच्या नावाखाली झटपट पैसा. तरी नशीब चांगले आहे की, आता ब-याच अंशी गँगवॉरला रोखण्याचे काम या शासनाच्या माध्यमातून आमच्या सर्व नेतेमंडळींनी आणि प्रशासनाने केले आहे.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (पुढे चालू.....

हे सर्व केले पाहिजे. परंतु याच्या आड लपून राष्ट्रद्रोही कारवायांना स्थान मिळणार नाही, याची गांभीर्याने दखल तुम्ही-आम्ही सर्वांनी मिळून घेतली पाहिजे. त्याकरिता कोठे राजकीय वापर करण्याची आवश्यकता असे मला तरी वाटत नाही. म्हणून झोपडपट्टीच्या प्रश्नाकडे माणुसकीच्या दृष्टीने पहात असतांना, त्यांचे पुनर्वसन करत असतांना या सगळ्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. जसे आता सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी उल्लेख केला की, बॅ.अंतुले साहेबांनी त्यावेळस एक प्रयत्न केला होता. खरोखरच फुटपाथवरुन चालता येत नाही. प्रत्येक फुटपाथवर झोपडी झालेली आहे. त्या झोपडीमध्ये रहाणारा माणूस सुखी नाही, आनंदी नाही. त्यालाही अनेक प्रश्न आहेत. परंतु त्यामुळे मुंबईमध्ये अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. उड्डान पुलाच्या खाली काय अवस्था आहे, हेही येथे सांगितले. अनेकांच्या गाड्या त्या ठिकाणी ठेवलेल्या असतात. मालकी जरी महानगरपालिकेची असली तरी यापुढे त्याचा दुरुपयोग होऊन आणखी काही होणार नाही याची काळजी तुम्ही-आम्ही सर्वांनी घेतली पाहिजे. ठीक आहे, माणुसकीने त्या लोकांचे पुनर्वसन झ ालेच पाहिजे, पण हे होत असतांना मी हेही सांगतो की, विमानतळाच्या भोवतालच्या झोपड्या केंद्रीय मंत्री सन्माननीय श्री.प्रफुल्ल पटेल, आणि मा. शरदराव पवार यांनी त्या ठिकाणी येऊन स्पष्टपणाने सांगितलेले होते. कारण ज्यावेळेस विमानतळाच्या परिसराला धोका निर्माण झाला, तेव्हा त्यांनी देखील सांगितलेआहे. त्यांचे म्हणणे असे नाही की, झोपड्या वाढाव्यात. हे कोणाचेच म्हणणे असू शकत नाही. या ठिकाणी असलेल्या दोन्ही बाजूच्या कोणाकडेही हे म्हणण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. म्हणून या सगळया गोष्टींचा साकल्याने विचार करणे आवश्यक आहे. मला आठवण झाली ती या मुंबईच्या जटिल प्रश्नांची. प्रथमच सरकारने जवळजवळ 35 हजार कोटी रुपयाचा आराखडा केंद्र सरकारला सादर केलेला आहे. मुंबईच्या सगळया प्रश्नावर मात करण्याकरिता, प्रश्नांची सोडवणूक करण्याकरित, खऱ्या अर्थाने भारताच्या आर्थिक राजधानीचे शहर म्हणून चांगले उत्तम शहर जगातील लोकांनी पहावे, अशी भूमिका ठेवून 35 हजार कोटी रुपयांचा आराखडा केंद्र सरकारला या सरकारने सादर केलेला आहे. त्यालाही उत्तम प्रकारे सन्माननीय पंतप्रधान श्री.मनमोहनसिंगजी आणि केंद्र सरकारने पाठिंबा देऊन दरवर्षी 1500 ते 2000 कोटी रुपये या मुंबईच्या विकासाच्या कामाकरिता मिळावेत, अशाप्रकारची सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारला विनंती केलेली आहे. त्याच्याही पूर्वी 1985 साली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/

श्री.उल्हास पवार (पुढे चालू...

काँग्रेसची शताब्दी होत असतांना, स्व.राजीव गांधींचे आधुनिक भारताचे स्वप्न होते. त्यांनी मुंबईच्या झोपडपट्टीकरीता त्वरित 100 कोटी रुपये मंजूर केलेले होते. आता तर इतके प्रश्न जटिल झालेले आहेत की, 1985 च्या खूप पुढे म्हणजे 2005 मध्ये आपण गेलेलो आहोत. म्हणून 35 हजार कोटी रुपयाचा आराखडा या मुंबईच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता,समस्या सोडविण्यासाठी, प्रश्नांवर मात करण्याकरिता आराखडा राज्य सरकारने केंद्र सरकारकडे सादर केलेला आहे, हे विसरता कामा नये. वाहतुकीच्या प्रश्नासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न मांडले. कायद्याच्य कक्षेत कसे बसू शकेल, हे मला माहीत नाही. ते सगळे मांडता येईल. परंतु दिवसाची विशेषत: गर्दीच्या रस्त्यामधील ट्रक्सची वाहतूक थांबविता आली तर ..जेव्हा रस्त्यावरील वाहतूक कमी होईल, तेव्हा अशा वेळी अशा वस्तू आणण्याकरिता या जड वाहनांना आपण परवानगी दिली तर आता जे वाहतुकीचे प्रश्न निर्माण झालेले आहेत, वाहतूक खोळंबते, अपघात होतात, अडथळे निर्माण होतात, लोकांना थांबावे लागते ते कमी होईल. त्याबाबतीत आपल्या काही सूचक सूचना असतील तर त्या द्याव्यात. सूचना तज्ज्ञांकडून मागवाव्यात, या अडचणी सोडविण्याच्यादृष्टीने तुम्ही प्रयत्न केले पाहिजेत. या पार्श्वभूमीवर केवळ झोपड्या हटविल्या नाहीत तर मी मा ागच्याही वेळेस सांगितलेले होते की, या सरकारने 53 हजार घरे बांधून तयार ठेवलेली आहेत. त्यांच्या पुनर्वसनाच्या केवळ घोषणा नव्हे तर प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. मुंबईमध्ये तुम्हाला-आम्हाला दिसणारी मुंबईच्या घरांच्या प्रश्नासाठी सुरुवात केलेली आहे,हे नम्रपणाने या ठिकाणी सांगितले पाहिजे. आरोग्याच्या दृष्टीने आपण पहातो की,पावसाळा आला की प्रचंड पाणी साचते, हे तुम्ही-आम्ही सर्वांनीच पाहिलेले आहे. याची काळजी अगोदरच या ठिकाणच्या महापालिकेने आणि नंतर सरकारच्या माध्यमातून सर्वांनी घेतली पाहिजे. साथीचे वाढणारे रोग आहेत, मग ते काविळीचे असतील किंवा आणखी कोणते आजाराचे असतील, याची देखील काळजी घेण्याकरिता सरकारने पूर्व तयारी केली पाहिजे.

(वेळ संपत आल्याची बेल वाजविण्यात येते.)

श्री.उल्हास पवार : कायदा आणि सुव्यवस्थेच्याबाबतीमध्ये...आपण बेल वाचविली. परंतु एका मिनिटामध्ये माझे भाषण थांबवितो. वेळ झालेली आहे याची मला कल्पना आहे. सन्मानीय सरकारचे आणि उप मुख्यमंत्र्यांचे डान्स बारच्या संबंधाने घेतलेल्या निर्णयाबाबत मी अभिनंदन करतो. मी स्वत: व्यसनमुक्तीच्या बाजूचा आहे. दारूबंदीच्या बाजूचा आहे. शेवटी दारुबंदी काही होऊ शकली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (पुढे चालू...

नाही, ती अवघड गोष्ट आहे. पण श्री.बाळासाहेब भारदे असे म्हणाले होते की, 'द्रव बंदी करता आली नाही तरी उपद्रव बंदी तरी करा.' पण जो डान्सबारच्या माध्यमातून उपद्रव निर्माण झाला होता, त्याला पायबंद बसला. हायवेवर डान्सबार होते, तेथील दृश्य पाहून अंत:करणाला घरे पडायची की,

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार.....

बहुजन समाजातील, खेडयापाडयातील, शेतक-यांची मुले बरबाद होत आहेत. उध्वस्त होत आहेत. यातून रेव्हेन्यू किती मिळतो हे तुम्हाला आकडयामध्ये हजार कोटी मध्ये मोजता येईल. पण पिढया कशा बरबाद होतात, हे कुठल्याही अर्थकारणामध्ये मोजता येणार नाही. म्हणून या पार्श्वभूमिवर शासनाने जो निर्णय घेतला आहे, कुणी कितीही घोषणा करु द्या. कुणी कितीही दमबाजी करु द्या. महाराष्ट्राचा सामान्य माणूस तुम्हाला दुवा दिल्याशिवाय राहणार नाही. जे बंडखेरीची भाषा करीत आहेत, जे दमबाजीची भाषा करीत आहेत ते अध्यक्ष असतील, आणखीन कोणी पदाधिकारी असतील, कोटयाधीश असतील,अब्जाधीश असतील परंतु या देशातील, या महाराष्ट्रातील गोरगरीब माणसे, विशेषत: महिला, माता, भगिनी या संपूर्ण निर्णयाच्या पाठिशी राहतील म्हणून मुंबईमधील डान्सबार बंद करण्याचा निर्णय हा अतिशय धाडशी आणि ऐतिहासिक आहे. म्हणून मी शासनाचे अभिनंदन करतो. सन्माननीय लोकसभेचे अध्यक्ष श्री. सोमनाथ चटर्जी सारखे घटना तज्ञ ज्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांना देखील शेवटी कुठे तरी सांगावे लागले की, घटनेच्या मर्यादा न्यायालयाने मोडू नयेत. गुटखा बंदी झाल्यानंतर तांत्रिक मुद्यावर गुटखा पुन्हा सुरु केला. तेव्हा डान्सबारच्या बाबतीत जेव्हा ही माणसे कोर्टात जातील तेव्हा अत्यंत तज्ञ लोकांचा सल्ला घेऊन त्यांना न्यायालयात सुध्दा यश मिळणार नाही याची काळजी देखील आम्ही सगळयांनी घेतली पाहिजे, मग हे सर्व प्रश्न मुंबईचे असतील किंवा आणखीन कूठलेही असतील? कायदा व सुव्यवस्थेचे असतील? ते निश्चितपणे सुडवले जातील, अशी अपेक्षा व्यक्त करतो. आणि मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली तेवढया थोडया अवधीमध्ये मी या निमित्ताने मुंबईच्या प्रश्नासंबंधीची माझी भावना मांडली. मी आपल्या धन्यवाद देतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 20:00

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक ):सभापती महोदया, आज जरी मुंबईच्या समस्यांविषयी नियम 259 अनव्ये येथे चर्चा सुरु असली तरी दरवर्षी या विषयावर या ठिकाणी चर्चा करण्यात येते. त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्य आपले विचार मांडतात परंतु प्रत्यक्षात काय निष्पन्न होते हा विचार करण्यासारखाच प्रश्न आहे. परप्रांतीय लोंढे महाराष्ट्रात येऊन आदळत आहेत. या लोंढयामुळे येथील सुविधांवर ताण पडतो त्यामुळेच महाराष्टीयन जनतेचे हाल होत आहेत अशी कबुली केंद्रीय, कृषि मंत्री माननीय शरदरावजी पवार यांनी दिलेली आहे. मला आठवते की, महानुभव पंथाचे श्री. चक्रधर स्वामी यांनी आपल्या अनुयायांना सांगितले होते की, "महाराष्ट्र वचावे. कन्नड देशा, तलेंग देशा न वचावे." त्यांच्या अनुयायांनी त्यांचे किती ऐकले माहीत नाही. कारण महानुभवपंथी लोक आता फारसे दिसत नाही. मग त्यांचे ऐकले कोणी ? तर उत्तर प्रदेश, बिहारमधील लोकांनी त्यांचे ऐकले. तेच त्यांचे अनुयायी झालेत की काय समजत नाही. अशा लोंढयामुळेच पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. झोपडपट्टयात वाढ झालेली आहे. आणि त्या झोपडपट्टया हटविल्या तरच शहराचा विकास होऊ शकेल, हे मात्र निश्चितच आहे. नवी मुंबई शहराची सूज आता वाढत आहे. पाटील साहेबांचेच हे उद्‌गार आहेत. मला आठवते की, माझ्या लहानपणी दादरपर्यंतच मुंबई होती. त्याच्यापुढे मुंबईच्या बाहेर असे वाटत होते. आता दादर-वांद्रेपर्यंत मुंबई शहर आहे आणि पुढे उपनगरे आहेत. नवी मुंबई आणि आता पुण्याला तर अडीच तासात जाऊन पोहचतो. तेव्हा आपली मुंबई पुण्यापर्यंतसुध्दा असे लोंढे वाढले तर जाऊन पोहचेल असे मला वाटायला लागले आहे. मुंबईचे शिवधनुष्य पेलने ही मोठी करामतीचीच गोष्ट आहे. ती केली पाहिजे. अशी करामत केली तर परदेशातही त्यांचे नाव आदरानेच घेतले जाईल.1981-1991 मध्ये परप्रांतींयाचे प्रमाण 17 टक्के होते. 1991-2001 मध्ये ते 36 टक्क्याच्या वर गेले आहे. देशातील एक-तृतीयांशपेक्षा जास्त महसूल हा माराष्ट्राची राजधानी मुंबई केंद्र सरकारला देत असते. पण प्रत्यक्षात मुंबईला त्यातील एक टक्कासुध्दा पैसे मिळत नसतील. महाराष्ट्राची, मुंबईची, ही बिकट अवस्था हे लोंढे वाढू लागल्यामुळेच झालेली आहे. त्यातूनच झोपडया वाढलेल्या आहेत. त्यामुळे झ ोपडपट्टीदादा निर्माण झाले.. परप्रांतीय पुढारी त्यातून निर्माण झाले.क्रय शक्तीची किंमत याच लोकांनी घटवली आहे. परप्रांतीय बेकारांनी

..3..

श्रीमती संजीवनी रायकर..

स्थानिक लोकांची क्रयशक्तीची किंमत घटवलेली आहे. गिरण्या, कारखाने, मार्केट या ठिकाणी मराठी माणसे खूप प्रमाणात होती त्यांची हाकालपट्टी केली आहे. वॉचमन नेपाळी असे किंवा मराठी माणूस असे. त्यांना हटवून आता अन्य प्रांतीय लोक या पदावर काम करीत आहेत. मराठी समाजावर शैक्षणिक, सामाजिक या सगळया गोष्टींवर परिणाम झालेला आहे.

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर .....

त्यामुळे प्रचंड नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. वाढते प्रदुषण, रोगराई याबद्दल बरेच सन्माननीय सदस्य बोललेले आहेत. या ठिकाणी मानवी युध्द सुध्दा सुरु होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. मुंबई शहराला येथील गरीब आणि मध्यवर्गीयच वाचवतील. मुंबई हे सर्व देशाचे आकर्षण आहे. रोजगार, महात्वाकांक्षेची क्षितिजे, आघाडीची चित्रपटसृष्टी या ठिकाणी आहे. विविध क्षेत्रातील संधी या ठिकाणी उपलब्ध होतात. त्यामुळे मुंबईमध्ये येणाऱ्यांची संख्या वाढते. अनेक विविध वैशिष्ट्ये मुंबईत येण्यासाठी खुणावतात. स्थानिकांच्या सोयीसवलतींवर, त्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण होते. त्यामुळे त्यांच्या सुविधांवर ताण निर्माण झालेला आहे. लोंढयांच्या विरुध्द ओरड व त्यामुळे ताणतणावात आणखी भरच पडलेली आहे. नेते येतात आणि उपदेशांचे डोस पाजतात. घटनेची गीता सांगतात. कोणालाही कोठेही उद्योग करण्याची संधी मिळाली पाहिजे असे सांगतात. कोणीही यावे आणि पथारी पसरावी. झोपडया, बेकायदा धंदे, उपनगर टेकडयांवरही झालेल्या झोपडया, पाईप फोडून पाणी घेणे, रोगराई, यापेक्षा त्या त्या प्रांताच्या लोकांनी आपापल्या प्रांतांमध्ये रोजगार, शिक्षण याच्या चांगल्या सुविधा निर्माण केल्या तर लोक कशासाठी आपला प्रांत सोडून या ठिकाणी येतील ? हा संदेश त्या लोकांपर्यन्त गेला पाहिजे. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग हेच ते करु शकतील. मुंबईला जगातील उत्तम शहर बनविण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केलेला आहे. राज्य सरकारला सहकार्य देण्याचे त्यांनी आश्वासन दिलेले आहे. कारण ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ञ आहेत त्याचप्रमाणे ते माजी अर्थमंत्री सुध्दा आहेत. आर्थिक आणि राजकीयदृष्टया मुंबईचे महत्व पाहता मुंबईच्या विकासासाठी अधिकाधिक खर्च देण्याची गरज आहे. तेही त्यांनी मान्य केले आहे. परंतु आज डोळयावर हात, कानावर हात आणि तोंडावर बोट अशा तीन माकडांसारखी मुंबईची अवस्था झालेली आहे. मुंबईचे शांघाय करण्याची योजना आहे. शांघाय सुदर शहर आहे. त्या ठिकाणी गगनचुंबी इमारती आहेत. परंतु त्यामुळे एकच गर्दी होऊन त्या ठिकाणी वाहतुकीची समस्या निर्माण झालेली आहे. इतरांच्या चुका टाकून, दोष गाळून हा विकास साधावयाचा आहे. आलिशान इमारती उभारणे व झोपडयांचे उच्चाटन म्हणजेच मुंबईचा विकास नव्हे. मुंबई ही श्रीमंतांची, उद्योगपतींची आहे तशीच ती गरिबांची, श्रमिकांची, कष्टकऱ्यांची, बुध्दिमंतांची, विचारवंतांचीही आहे. विकासाचा मानवी चेहरा

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्रीमती संजीवनी रायकर ....

कायम राखणे आवश्यक आहे. विकास सर्वांना सामावून घेणारा, सांभाळून घेणारा असला पाहिजे. विकास हा नियोजनबध्द, कालबध्द असला पाहिजे. मुंबईचे प्रश्न जटील आहेत. पण मुंबईत प्रश्नांची उत्तरे सुध्दा शोधण्याची क्षमता आहे. परप्रांतीयांना या ठिकाणी लगेच नोकरी उद्योग मिळतो. एक वर्ष झाले की लगेच या परप्रांतीयांना रिक्शा वगैरे चालविण्याचे लायसन्स कसे मिळतात याबाबतीत बऱ्याचदा चर्चा झाली. कमीतकमी दहा वर्षे मुंबईचा रहिवाशी असेल तर त्याला नोकरी आणि उद्योगधंद्यामध्ये सामावून घ्यावे. तोपर्यन्त त्यांना नोकरी देऊ नये. परंतु अजूनही तसे काही घडत नाही. ज्या राज्यातून लोंढा येतो त्या ठिकाणच्या राज्यकर्त्यांची अकार्यक्षमता आहे. ते लोकांना रोजगार पुरवू शकत नाहीत म्हणून अशी माणसे या ठिकाणी येत असतात. परप्रांतीय घुसखोरीमुळे जनजीवन पूर्ण विस्कळित झालेले आहे. लोकलने प्रवास करताना दहिसर-बोरीवली या ठिकाणाहून परप्रांतीय दादागिरीने जागा मिळवितात आणि मराठी माणूस दारात उभा असतो. परप्रांतीयांचे पत्त्यांचे डाव रंगलेले असतात. मराठी माणसाने नोकरीधंदा करण्यासाठी राहती जागा सोडून उपनगरांमध्ये स्थलांतर केलेले आहे. त्यामुळे मुंबईमध्ये मराठी माणूस 25 टक्केच म्हणजे अल्पसंख्यांक झाला आहे. या अल्पसंख्यांकांना मिळणारे जे फायदे आहेत ते मुंबईतील मराठी माणसांना दिले पाहिजेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ श्री.बरवडनंतर 20:10

श्रीमती संजीवनी रायकर....

परप्रांतियांनी मोकळे मैदाने, देवळांचा परिसर, फूटपाथ, उड्डाणपूलच्या विस्तीर्ण जागा त्यांनी केव्हाच हडप केल्या आहेत. यासाठी शासनाने काय केले पाहिजे ? मराठी नेत्यांनी मग ते कोणत्याही पक्षाचे असोत, आपापसातील मतभेद बाजूला ठेवून मराठी माणसांच्या हितासाठी एकत्र आले पाहिजे. अन्यथा, संपूर्ण महाराष्ट्राचा यु.पी., बिहार झाल्याशिवाय राहणार नाही. तामिळनाडू, कर्नाटक, केरळ आणि आता आसाम सुध्दा आपल्या स्थानिक रहिवाश्यांच्या अस्मितेसाठी केव्हाही लढण्यास तयार असतात. महाराष्ट्रात मात्र आपसातील मतभेदांमुळे परप्रांतीय आक्रमणाला खतपाणीच मिळत गेले आहे. त्यामुळे वेळीच जागे होण्याची गरज आहे. मुंबईतील अनेक प्रकल्प प्रलंबित आहेत. विकास करताना स्थानिकांना रोजगार, निवारा व हक्कही अबाधित राहिला पाहिजे याची दक्षता घेतली पाहिजे. परंतु त्यांना डावलून परप्रांतियांना नोकरभरती, त्यांची चलती असा आजपर्यंतचा अनुभव आहे. देशी परदेशी गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यासाठी देशाच्या या व्यापारी राजधानीला नवा चेहरा, नवे अंतरंग प्राप्त होईल, या नगरीचा ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक वारसा जतन करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागाचाही विकास अपेक्षित आहे, तिथेच रोजगार मिळेल. सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी मी सांगते की, मी ऑस्ट्रेलियाला लीडरशिप कोर्ससाठी मला आमच्या संघटनेतर्फे पाठविले होते. त्याठिकाणी शहरे तर आहेतच, परंतु तेथे खेडी अशी वसविली की खेडी सुध्दा शहरे वाटत होती. त्याठिकाणी शहरासारख्या चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत. त्याप्रमाणे आपल्या येथे संपूर्ण देशामध्ये जी जी खेडी आहेत त्यांचा अशात-हेने विकास केला तर हे लोक आपले गाव सोडून शहराकडे वळणार नाहीत. शासनाने ग्रामीण भागामध्ये शहरीकरण कसे होईल यादृष्टीने विचार करावा. शहरीकरणामुळे बकालपणा, अस्वच्छता, अनारोग्य, प्रदूषण वाढत आहे. गांधीजी म्हणत की, खेडी हा भारताचा आत्मा आहे, खरा भारत खेडयातच आहे. हा मंत्र विसरता कामा नये. निदान गांधीजींचे नाव घेणा-यांनी तरी विसरता कामा नये. यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

------

2...

15-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 5C-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.विलास अवचट ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, मुंबईच्या प्रस्तावावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. मुंबईला जगाची व्यापारपेठ म्हटले जाते. देशाची औद्योगिक राजधानी म्हटले जाते तर महाराष्ट्राची राजधानी म्हटले जाते. मी त्याच्याही पुढे जाऊन सांगेन की, मुंबई ही एवढयापुरती मर्यादित नसून साहित्य आणि सांस्कृतिक राजधानी आहे. या राज्यामध्ये दरवर्षी महाराष्ट्र शासनातर्फे निरनिराळया लेखकांना साहित्य पुरस्कार दिले जातात. यावर्षी मात्र या आघाडी सरकारने एका लेखिकेचा अपमान केलेला आहे. दिनांक 22 मार्च, 2005 रोजी यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये एक कार्यक्रम झाला. सन 2002-2003 चे एक पुस्तक होते. त्या पुस्तकाच्या लेखिका श्रीमती सुनिताबाई देशपांडे हया होत्या. "मण्याची माळ" या पुस्तकाला शासनातर्फे पुरस्कार दिला होता. त्यासंबंधी खात्यातर्फे पत्र पाठविण्यात आले होते, त्या पत्राचा मसूदा असा होता की, "या सोहळयाला आपण आपल्या पतीसोबत उपस्थित रहावे." सगळयांना माहीत आहे की, श्रीमती सुनिताबाईंचे पती कोण आहेत ? पु.लं.ना महाराष्ट्राचे साहित्य भूषण म्हटले जाते. पु.लं.च्या नावाने कला अकादमी उभी केली अशा परिस्थितीत त्यांच्या पत्नी श्रीमती सुनिताबाई देशपांडे यांचा अपमान करण्यात आला आहे. याबाबत शासनाने वा संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी याठिकाणी दिलगिरी व्यक्त करावी असे मला वाटते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. विलास अवचट पुढे सुरु...)

पुरस्कार किती आहे हे महत्वाचे नाही. तो पुरस्कार मौज प्रकाशनचे श्री. भागवत यांनी स्वीकारला आणि पुण्याला पाठवून दिला. परंतु खात्या मार्फत त्यांना असे सांगितले गेले की, पुरस्काराची रक्कम आपणाला नंतर पाठविण्यात येईल. जेव्हा एखादा पुरस्कार दिला जातो तो महाराष्ट्र शासनातर्फे दिला जातो, महाराष्ट्रातर्फे त्या व्यक्तीचा सन्मान केलेला असतो. त्यामुळे पुरस्काराची रक्कम किती आहे याला महत्व नाही. आज वर्तमानपत्रामधील बातमी वरुन समजले की, कालच्या प्रकाराची दखल घेऊन आज त्यांना ती रक्कम पाठविली जात आहे. शेवटी याठिकाणी रक्कम महत्वाची नाही. मी मा उप मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, ज्या श्रीमती सुनिताबाईंनी अनेक पुस्तके लिहिली त्या सुनिताबाईंचा अशा प्रकारे अपमान होणे हे वस्तुस्थितीला धरुन नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, महाराष्ट्रात मुंबई आहे, पण मुंबईत महाराष्ट्र आहे काय आणि मुंबईत मराठी आहे काय असा प्रश्न सारखा पडत असतो. मंत्रालयातील प्रशासनात मराठा टक्का कमीच, असे मा. मुख्यमंत्र्यांनी केलेले व्यक्तव्य वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेले आहे. ते पुढे असे म्हणतात की, मंत्रालयामध्ये प्रशासन चालविणा-या अधिका-यांमध्ये मराठी माणसांचे प्रमाण फारच कमी आहे. मंत्र्यांच्या पाट्या पाहिल्या तर तेथेही अराठी नावे. मंत्रिमंडळात मराठी मंत्र्यांची संख्या पुरेशी असली तरी प्रतिनिधीत्व देताना बाहेरच्यांचा देखील समावेश करावा लागतो. महाराष्ट्रातील ही स्थिती इतर परप्रांतात मात्र दिसत नाही. अशी खंत मा. मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेली आहे. मा.मुख्यमंत्र्यांनी हेही सांगितले की, आपण जेव्हा मंत्रालयात फेरफटका मारतो त्यावेळी मराठी माणसाची कमतरता जाणवते. मंत्र्यांनी कितीही घोषणा केल्या तरी त्याची अंमलबजावणी प्रशासकीय अधिकारीच करतात. लोकांशी त्यांचा थेट संपर्क असतो. मात्र नेमका इथेच मराठी माणूस दिसत नाही. ही मा.मुख्यमंत्र्यांची व्यथा आहे. त्यामुळे स्थित्यंतर दिसून येते. परंतु महाराष्ट्रात ही अवस्था दिसते. याठिकाणी मा.सदस्य श्री. प्रमोद नवलकर हे याठिकाणी सारखे मराठी, मराठी असे बोलतात. 1मे 1960 साली स्व. यशवंतराव चव्हाणांनी मंगल कलश आणला आणि गेली 45 वर्षे आपण महाराष्ट्र दिन साजरा करतोय. परंतु अजूनही या मंत्रालयाच्या प्रवेशद्वराजवळ मराठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलास अवचट पुढे सुरु...)

माऊली आपणाकडे न्याय मागत आहे. तिला आपण न्याय देणार आहात काय हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. यापुढे जाऊन महाराष्ट्राच्या प्रशासनावर परप्रांतीयांचा कब्जा असे म्हटले तर ती अतिशोयोक्ती होणार नाही. या राज्यामध्ये एकूण 350 सनदी अधिकारी आहेत. त्यातील फक्त 90 मराठी आहेत. म्हणूनच राज्यातील मंत्रालयात मराठी अधिका-यांचा टक्का घसरला असल्याचे वास्तव खुद्द मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी कार्यक्रमात जाहीरपणे मांडले. मी याठिकाणी मा.मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतोय. हे अभिनंदन करीत असताना याठिकाणी कारवाई होणार आहे की नाही ? हा सगळयात महत्वाचा प्रश्न आहे. कारण सातत्याने गेली तीन-चार वर्षे या मुंबईच्या प्रश्नावर पोटतिडिकीने आम्ही प्रश्न उपस्थित करीत आहोत. मा. मुख्यमंत्री आश्वासन देतात आणि परत जेव्हा मुंबईचा प्रश्न येतो त्यावेळी पुन्हा आश्वासनेच दिली जातात. नेहमीच येतो मग पावसाळा या उक्तीप्रमाणे या ठिकाणी जर नुसती आश्वासने मिळू लागली तर मी मा.सदस्य श्री. नवलकर आणि मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना सांगेन की, या पुढे आपण मुंबईच्या प्रश्नावरील चर्चा बंद करुया. कारण इतक्या पोटतिडिकीने याठिकाणी प्रश्न मांडत असताना देखील त्याबाबतीत शासनाकडून न्याय मिळणार नसेल तर या सभागृहामध्ये तीन-तीन तास चर्चा कशासाठी करायची? या सभागृहामध्ये परप्रांतीयांच्या लोंढ्यावरुन बरीच चर्चा झाली. या देशाचे कृषी मंत्री मा.श्री.शरदचंद्र पवार यांनी देखील आपली खंत व्यक्त केली आणि सांगितले की, परप्रांतीयांचे लोंढे महाराष्ट्रावर आदळत आहेत. या लोंढ्यामुळे येथील सुविधांवर मोठा ताण पडत असून महाराष्ट्रातील जनतेचे हाल होत आहेत. शासन याठिकाणी असे सांगते की, झोपडपट्टीच्या बाबतीत आम्ही निश्चित भूमिका घेतलेली आहे. परंतु जेव्हा काँग्रेस पक्षाचे दोन नेते वर्तमानपत्राच्या माध्यमातून यासंदर्भात विरोधी भूमिका व्यक्त करतात त्यावेळी आम्हाला काँग्रेस पक्षाचे धोरण कळत नाही. मुंबई शांघाय कसली करता ? आधी मुंबईतील सर्वसामान्य माणसांच्या मूलभूत गरजावर भर द्या अशा शब्दात काँग्रेसच्या श्रीमती मार्गारेट अल्वा यांनी राज्य शासनाला फटकारले आहे.

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 20:20

श्री.विलास अवचट...

गिरण्याच्या जमिनींच्या विकासाचे धोरण हे मालक धार्जिणे असून विकासाचा 15 वर्षाचा पूर्वीचा प्रस्ताव कोणी व का केला असेही कॉंग्रेसच्या नेत्यांनी खडसावले. दुसरीकडे बघावयास गेलो तर मुंबईतील अनधिकृत झोपडपट्टीवरील कारवाई थांबवा या मागणीसाठी श्रीमती मेघा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली झोपडपट्टीधारकांनी सोमवारी कॉंग्रेसच्या टिळक भवन कार्यालयास घेराव घातला. तेव्हा झोपडपट्टीवरील कारवाई सात दिवसात आम्ही थांबवू असे आश्वासन कॉंग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती प्रभा राव यांनी दिले. कॉंग्रेसच्या दोन नेत्यांमधील परस्पर अशी विधाने या संदर्भातील आहे. त्यामुळे झ ोपडपट्टीच्या संदर्भातील शासनाचे निश्चित धोरण काय आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. मुंबईच्या विकासाचे शिवधनुष्य राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी स्वीकारले असताना त्यांनी यासंदर्भात असे म्हटले आहे की, मुंबईला आंतरराज्यीय शहर बनवित असताना वाढते अतिक्रमणे थांबविणे गरजेचे आहे. या शहरात वाढत असलेल्या अतिक्रमणांना आळा घालणे गरजेचे आहे. मुंबई शहरात कोणीही येतो आणि पथारी पसरतो आहे. अनधिकृत झोपडपट्टया करणा-यांना जरब बसली पाहिजे अशी कारवाई करणे आवश्यक आहे. 1995 पर्यन्तच्या झोपडयांना संरक्षण दिले असून त्यानंतरच्या झ ोपडयांवर कारवाई करणे आवश्यक आहे. आघाडी सरकारने 2000 वर्षापर्यन्त संरक्षण दिलेले असले तरी विधिमंडळातील सर्व गट नेत्याबरोबर चर्चा करुन यासंदर्भात निर्णय घेऊ. मला या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांचे अभिनंदन करावयाचे आहे.मुंबई शहराच्या इतिहासामध्ये एवढया प्रचंड प्रमाणात झोपडया तोडल्या नव्हत्या. त्या दोन ते तीन महिन्यात तोडल्या. शासनाच्या माध्यमातून 15 ते 20 मोठे भूखंड मोकळे करण्यात आले. पण नंतर माशी कुठे शिंकली ? मुंबई महानगरपालिकेला सांगितले की, या ठिकाणची अतिक्रमणे काढण्याची जबाबदारी तुमची आहे. अतिक्रमणे हटविताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, ज्या ठिकाणची अतिक्रमणे हटवून भूखंड मोकळे करण्यात आले आहेत त्या भूखंडावर पुन्हा अतिक्रमणे झाली तर संबंधित अधिका-यांवर कारवाई करु. कुठल्या कुठल्या झोपडया तोडल्या आणि कोणकोणत्या भूखंडावर अतिक्रमणे नव्याने झालेली आहेत याबाबतची माहिती मी सदनाला नंतर देणार आहे. सभापती महोदय, परप्रांतीयांचे लोंढे रोखण्यासाठी नवा कायदा अंमलात आणू असे सन 2000 मध्ये त्यावेळचे गृहनिर्माण मंत्री सन्माननीय श्री.रोहिदास पाटील यांनी वक्तव्य केले

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट...

आहे. सभागृहात आम्हाला आश्वासने देता. आज तागायत हे लोंढे थांबविण्यासाठी कायदा शासनाच्या माध्यमातून करण्यात आलेला नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. त्यामुळे यापुढे परप्रांतीयांच्या लोंढयांच्या बाबतीत चर्चा करावयाची की नाही असा प्रश्न आमच्या समोर उभा रहातो. परप्रांतीयांच्या लोंढयामुळे मुंबई शहराचा आर्थिक विकास अधोगतीस चालला आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांनी दिलेली आहे. दरम्यानच्या काळात माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी सांगितले की, बेकायदेशीर झोपडयांवर कारवाई महानगपालिका करीत आहे. ते महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र आहे. राज्य सरकार तूर्त काहीही कारवाई करु शकत नाही. मग अतिक्रमणे हटविण्याची कारवाई का थांबविण्यात आली याचा खुलासा सभागृहात होणे आवश्यक आहे. सभापती महोदया, मी आपल्याला मघाशी सांगितले की, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि उप मुख्यमंत्र्यांनी धाडसी निर्णय घेऊन दीड हजार कोटी रुपये किंमतीची 300 एकर जागा झोपडीमुक्त केली. घाटकोपर, गोवंडी, महाराष्ट्र नगर, चेंबूर, कुरार, इत्यादी ठिकाणची अतिक्रमणे हटवून भूखंड मोकळे करण्यात आलेले आहेत. या भूखंडावर पुन्हा अतिक्रमणे होऊ नयेत म्हणून खबरदारीचे आदेश माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी महसूल खात्याच्या अधिका-यांना दिलेले आहेत. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, मी या सगळया भूखंडाची पाहणी करुन आलेलो आहे. त्या ठिकाणच्या भूखंडावर पुन्हा अतिक्रमणे झालेली आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन महसूल विभागाच्या अधिका-यांकडून झालेले असल्यामुळे महसूल विभागाच्या किती अधिका-यांवर कारवाई केली याबाबतची माहिती या सभागृहात देण्याची आवश्यकता आहे. आमचे सन्माननीय नेते आणि या सभागृहाचे जेष्ठ सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी गिरगाव येथील झावबावाडी येथे झालेल्या एका टॉवरचा या ठिकाणी उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, टॉवर झाले मोठे आणि रस्ते झाले छोटे. सभापती महोदया, झावबावाडीमध्ये 22 मजली इमारत उभी राहिली आहे. 10 तारखेस त्या ठिकाणी आग लागली. या आगीच्या संदर्भातील मुंबई महानगरपालिकेचे माझ्याकडे पत्र आहे. या पत्रात त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, जगन्नाथ शंकर शेठ रोड, दर्शन हाईट बिल्डींग ही तळ मजल्यापासून 21 माळयाची इमारत असून तेथील 15 व्या माळयावर लाकडी सामान पडलेले होते. सदर आग

3...



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 20:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट...

अग्निशमनदलाच्या चार बंबानी विझविली गेली असली तरी  त्या ठिकाणची गल्ली लहान असल्यामुळे अग्निशमनदलाच्या वाहनांना त्या ठिकाणी पोहोचण्यास मोठा अडथळा निर्माण झाला होता. त्यामुळे अग्निशमन दिलाची वाहने त्या ठिकाणी उशिरा पोहचू शकली. या ठिकाणी लागलेल्या आगीची छायात्रित्रे काढलेली आहेत. ती छायाचित्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत..

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK 20:25

श्री. विलास अवचट ...

कंट्रोल रुममधून ज्यावेळी टॉवरमध्ये जायचे असते त्यावेळी किमान 20 फूटाचा रस्ता असणे आवश्यक आहे. परंतु या बिल्डींगच्या बाजूला केवळ 9 फूटाचा रस्ता होता. त्यामुळे अग्निशमन दलाच्या कर्मचा-यांना शिडी घेऊन वाडीमध्ये शिरता आले नाही आणि पाण्याचा पुरवठा सुरु होण्यासाठी दोन तासांचा कालावधी गेला. सभापती महोदया, गावदेवी येथे मणिभवन आहे. महात्मा गांधीच्या वास्तव्याने पावन झालेली ही वास्तू आहे. त्यांचा परिसस्पर्श याठिकाणी झालेला आहे. आपण दांडी यात्रेचे 50 वे वर्षे साजरे करीत आहोत. याठिकाणी 22 मजली टॉवर उभा रहात आहे. या सोसायटीच्या उपाध्यक्षांनी महानगरपालिकेकडे तक्रार केली. परंतु आजतागायत या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. हेरीटेज बिल्डींगला महानगरपालिकेने परवानगी कशी दिली ? वाडीतील लोकांनी प्रश्न उपस्थित केला त्यावेळी बिल्डींग डिपार्टमेंटने सांगितले की आमची परवानगी घेतलेली नव्हती. इमारत पूर्ण झाल्यानंतर ओसी दिली जाते. तत्पूर्वी महानगरपालिकेकडून पाहणी केली जाते. असे असताना परवानगी कशी दिली ? सभापती महोदया, सगळयात महत्वाची गोष्ट मी सांगू इच्छितो. आपण विकासाच्या गोष्टी करीत असताना मुंबई महानगरपालिका हे विकासाचे मोठे क्षेत्र आहे. या शहरामध्ये राहणारा नागरिक प्रामाणिकपणाने आपले कर भरीत असल्यामुळे नागरी सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. असे असताना महानगरपालिकेला राज्य सरकारकडून 517 कोटी रुपयांचे येणे बाकी आहे. थकबाकी दिलेली नसल्यामुळे महानगरपालिकेचे जे विकास प्रकल्प आहेत त्यामध्ये 50 टक्के कपात केलेली आह. सिमेंटचे रस्ते आहेत,पाण्याचे प्रकल्प आहेत,मलनिस्सारणाचे प्रकल्प आहेत यासाठी 135 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध नसल्यामुळे निधी अभावी 2006-07 च्या अर्थसंकल्पामध्ये हे प्रकल्प टाकले आहेत. या शहराचा खरोखरच विकास करावयाचा असेल तर प्रत्येक पुरवणी मागण्यांच्या वेळी आणि वार्षिक अर्थसंकल्पाच्या वेळी 2 वर्षे सातत्याने महानगरपालिकेला जर सरकारने थकबाकी दिली तर हे प्रकल्प निश्चित पूर्ण होतील असे मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे.

जयहिंद,जयमहाराष्ट्र

----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अॅड. अनिल परब (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. ही मुंबई पोर्तुगीजांनी इंग्रजांना आंदण दिली होती. 7 बेटे मिळून मुंबई होती. आता परिस्थिती बदलत गेली आहे. 1950 साली मुंबईची लोकसंख्या 30 लाख होती आणि आज 2005 मध्ये मुंबईची लोकसंख्या जवळजवळ 1 कोटी 30 लाख एवढी झालेली आहे. मुंबईची अतिशय बिकट परिस्थिती होत चालली आहे. मुंबई हे मरणासन्न शहर होत चालले आहे. याला अनेक कारणे आहेत आणि या चर्चेमध्ये त्याचा ऊहापोह झ ााला पाहिजे. कशा पध्दतीने मुंबईत लोक आले याचा विचार केला पाहिजे. केवळ मुंबईत जन्मले म्हणून लोकसंख्या वाढली काय ? नोकरी-धंद्याच्या निमित्ताने आले आणि स्थिरावले काय ?महानगरामध्ये उद्योगधंदे उभे राहिले. मुंबईने ब-याच लोकांना नांव,प्रसिध्दी आणि पैसा दिला. एका क्षमतेच्या बाहेर या सर्व गोष्टी व्हावयाला लागल्या. त्यामुळे ख-या अर्थाने मुंबईवर लोंढे आदळायला लागले याची चर्चा सुरु झाली. आजच्या परिस्थितीमध्ये मुंबई ही सोन्याचे अंड देणारी कोंबडी आहे आणि या कोंबडीकडून रोज एक अंड घेण्यापेक्षा कोंबडीला ओरबाडायला सुरुवात झाली आणि अशा प्रकारे मुंबईवर सभागृहात चर्चा व्हावयाला सुरुवात झाली.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परब .....

सभापती महोदया,मुबईतील लोकसंख्या वाढीच्या कारणाच्या संदर्भात या पूर्वी सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. मुंबईतील लोकसंख्या कशा पध्दतीने वाढली आणि झोपडपट्टी दादांनी या शहरामध्ये कशा प्रकारे झोपडया वसवल्या यासबंधी पुष्कळ चर्चा झाली होती.या झोपडपट्टी दादांची मोडस ऑपरेन्डी काय होती ही जर आपण शोधण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला दिसून येईल की, इमारतीचे जे डेब्रीज असते ते त्या जमिनीवर टाकावयाचे तेथे बांबू लावावयाचे व गरीब लोकांना या झोपडया विकून ते दादा तेथून निघून जावयाचे.झोपडपट्टी दादांनी या झोपडया विकून अमाप पैसा मिळवला होता व या पैशाच्या जोरावर या मुंबई शहरामध्ये गुन्हेगारी फोफावली गेली आहे.झोपडपट्टी दादांनी ज्या प्रकारे या झोपडया वाढविण्याचा प्रयत्न मुंबई शहरामध्ये केला त्याला पायबंद घालण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही.मुंबई शहराची आज जी स्थिती निर्माण झालेली आहे त्या स्थितीला जबाबदार असणा-या लोकांनी आज या गोष्टीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.1995 साली असा कायदा करण्यात आला होता की, या ठिकाणी 1995 ला जे लोक राहत आहेत त्यांना अधिकृतपणे संरक्षण देण्यात येईल.परंतु त्यानंतर असंख्य लोक मुंबईमध्ये येऊन आज अनधिकृतपणे राहत आहेत. त्यांना देखील संरक्षण देण्यात यावे अशा प्रकारची मागणी ज्यावेळी करण्यात आली होती त्यावेळी विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने शासनाने असे आश्वासन दिले होते की, 2000 पर्यन्तच्या

झोपडयांना संरक्षण देण्याच्या बाबतीत सहानुभूतिपूर्वक विचार करण्यात येईल. 2000 नंतरसुध्दा आज चार लाख झोपडया या शहरात उभ्या राहिलेल्या आहेत.या 4 लाख झोपडयांच्या बाबतीत आजपर्यन्त निर्णय घेण्यात आलेला नाही . अनधिकृत झोपडया पाडण्यात येतील यासंबंधी मोठया प्रमाणावर डंका पिटण्यात आला होता.सर्व अनधिकृत झोपडया तोडण्यात येतील अशा घोषणा करण्यात आल्या होत्या परंतु त्यापैकी फक्त 60 हजार झोपडयाच तोडण्यात आल्या आहेत. या झोपडया ज्या जमिनीवर होत्या अशा 300 एकराचा भूखंड शासनाने आपल्या ताब्यात घेतला आहे परंतु हा 300 एकराचा भूखंड शासनाच्या ताब्यात शाबूत आहे काय ? हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.एकदा झोपडया तोडल्यानंतर त्या जागेवर पुन्हा झोपडया उभ्या राहिल्या आहेत किंवा नाही याची खातरजमा शासनाने केलेली आहे की नाही हा आजच्या चर्चेचा महत्वाचा भाग आहे.1995 ते 2000 पर्यन्तच्या झोपडयासबंधीचा विषय हा नंतरचा आहे.परंतु 2000 ते 2005 पर्यन्तच्या झोपडया





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परब ....

तोडण्याच्या संदर्भात शासनाने जी कारवाई सुरु केली होती ती कारवाई शासनाने कोणाच्या दबावामुळे बंद केली ? याबाबतीत खुलासा करण्यात आला पाहिजे. मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना दम देण्यात आला होता की,श्रीमंताच्या अनधिकृत्त इमारतीसंबंधीची यादी आम्हाला द्या अन्यथा झोपडया तोडण्यासाठी गृह विभागाकडून आपल्याला पोलीस संरक्षण दिले जाणार नाही. गृह विभागाचे काम कायदा व सुव्यवस्था पाहणे हे आहे.झोपडया तोडणे किंवा त्या बाबतीत निर्णय घेणे हे गृह विभागाचे काम नाही असे मला वाटते.आज मुंबई शहरामध्ये परप्रांतीयाचे लोंढे मोठया प्रमाणावर येत आहे आणि मुंबई शहरावर त्यांचे मोठे आक्रमण होत आहे त्याबाबत सरकारने कठोर निर्णय घेतला पाहिजे. राज्य घटनेत जे 19 वे कलम आहे त्या कलमामुळे कोणालाही कोठेही जाण्याचा अधिकार आहे. त्यामुळे इतर राज्यातून मुंबई शहरात परप्रांतीयांचे लोंढे येत असतात. आज केन्द्रामध्ये यु.पी.अे.चे सरकार आहे.मुंबई शहरातील लोकसंख्येवर आळा घातला पाहिजे असे जर केन्द्र सरकारला ख-या अर्थाने वाटत असेल तर ते कलम बदलण्याची गरज आहे. तेव्हा हे कलम जर बदलण्यात आले तर ब-याच गोष्टी नियंत्रणाखाली येऊ शकतील असे मला वाटते.तेव्हा या संदर्भात शासनाचे काय धोरण राहणार आहे याचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणात करावा अशी मी या निमित्ताने त्यांना विंनती करीत आहे.त्यांचे उत्तर ऐकण्यास आम्ही उत्सुक आहोत.सभापती महोदया, यामध्ये महत्वाचा मुद्दा असा आहे की, मतदार यादीत नाव नोंदविण्याच्या बाबतीत निवडणुक आयोगाची एक पध्दत आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नाव नोंदवावयाचे असते तेव्हा त्याच्या घराचा दाखला पुरावा म्हणून द्यावा लागतो..रेशन कार्ड मिळविण्यासाठीसुध्दा घराचा दाखला द्यावा लागतो. रेशन कार्ड दिल्यानंतर व घराचा दाखला पुरावा दिल्यानंतर त्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत समाविष्ट केले जाते. घराचा दाखला, रेशनकार्ड या आधारे त्याचे नाव मतदार यादीत आल्यानंतर तो मतदान करीत असतो. त्या मतदार यादीच्या आधाराने तो पासपोर्ट तयार करीत असतो.अशा प्रकारे बनावट पासपोर्टच्या आधारावर काही जण देश विघातक कृत्य करण्यामध्ये गुंतलेले आहेत त्याची यादी गृह विभागाकडे असू शकेल.निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार एका व्यक्तीला एकाच ठिकाणी मतदान करता येते. मुंबई शहरामध्ये 2000 सालानंतर ज्यांनी अनधिकृतपणे घरे बांधली होती त्यातील काही जणांची घरे शासनाने तोडली आहेत.ज्यांची घरे तोडण्यात आलेली आहेत त्यांचा घराचा मूळ दाखलाच

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परब .....

नाहीसा झालेला असल्यामुळे या लोकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली पाहिजे अशी आग्रहाची मागणी महाराष्ट्र शासनाने निवडणूक आयोगाकडे केली पाहिजे. हा आजच्या चर्चेचा महत्वाचा विषय आहे.आज अनेक लोकाना हे माहीत झालेले आहे की, मुंबईमध्ये गेल्यानंतर तातडीने रेशन कार्ड मिळते.मघाशी बोलत असतांना सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की,वाशी मध्ये बनावट रेशन कार्डस देणारे कारखाने आहेत. स्वत:च्या स्वार्थासाठी आणि निवडून येण्यासाठी बनावट रेशन कार्डस जर बांगला देशीय आणि पाकिस्तानी नागरिकांना दिली जाणार असतील तर आपण देशाच्या सुरक्षिततेशी खेळत आहात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री.गायकवाड नंतर --- 20:35

श्री. परब ...

तर आपण देशाच्या सुरक्षिततेशी खेळतो आहोत असे मला वाटते आहे. तेव्हा ही सुरक्षितता कोणत्या टोकाला जाईल याचा विचार शासनाने करणे गरजेचे आहे. म्हणून या ज्या सगळ्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत त्या गृहखात्याने पाहिल्या पाहिजेत. त्यामध्येही कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास मुंबईच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास, प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये आपण जाऊन पहावे. बऱ्याचदा आम्हाला कोर्टामध्ये जावे लागते, वेगवेगळ्या आंदोलनाच्या संबंधात आम्ही जेव्हा तारखांना कोर्टामध्ये जातो तेव्हा काय पाहतो तर जेव्हा नावे पुकारली जातात.. मग ती चोरीच्या प्रकरणातील असो वा बलात्काराच्या प्रकरणी असो, त्यामध्ये कोणीही मराठी माणसे नसतात वा मुंबईत राहणारी ती माणसे नसतात. त्यांची कुंडली आपण तपासली तर आपल्याला दिसून येईल की, यामध्ये बरेचसे बांगलादेशी नागरिक आलेले आहेत, थोडेसे पाकिस्तानी लोक आलेले आहेत. सुदैवाने आपल्या गृहखात्याने याबाबत व्यवस्थित काळजी घेऊन सगळाच तक्ता मागविला, पोलीस ठाण्यांमध्ये आपण गेलात तर पोलीस ठाण्यांच्या बाहेर कोण माणसे असतात याचीही तपासणी आपण केली, तेथील दलाल कोण असतात याची माहिती घेतली, तपासणी केली तर बऱ्याच गोष्टी आपल्याला कळून येतील. आज या मुंबईची जी वाईट परिस्थिती झालेली आहे याला या गोष्टी कारणीभूत आहेत आणि या गोष्टींना जोपर्यंत आळा बसत नाही तोपर्यंत मला वाटत नाही की, मुंबईमध्ये आपण काही नियंत्रण आणू शकू. मुंबईच्या लोकसंख्येच्याबाबतीत किंवा या ज्या मुलभूत गोष्टी आहेत त्यावर जोपर्यंत कंट्रोल येत नाही तोपर्यंत मुंबईचे हे प्रश्न असेच चालू राहतील असे मला वाटते. सभापती महोदय, मुंबईचे शांघाय आपण करणार म्हणतो आहोत. परंतु मुंबईचे ढाका होण्याचीच मला जास्त भीती वाटते आहे. मुंबईचे शांघाय होईल की नाही हे मला माहीत नाही पण ढाका निश्चित होण्याची शक्यताच जास्त आहे. सुदैवाने ही दोन्ही शहरे पाहण्याची संधी मला मिळाली आहे. सभापती महोदया, शांघाय चांगले शहर आहे असे आपण म्हणतो पण शांघाय काही असेच चांगले, सुंदर झालेले नाही. शांघाय जेव्हा झाले तेव्हा तेथे कसे कोणीही उठसूट येऊ-जाऊ शकत नव्हते. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले आहे. तेथे एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यासाठी देखील परमिट लागते आहे. तेव्हा जोपर्यंत आपल्याकडेदेखील असे कडक कायदे होत नाहीत, जोपर्यंत समाजकंटकांना कायद्याची भीती वाटत नाही तोपर्यंत हे असेच चालत राहणार आहे. मी तर बघतो आहे, बऱ्याचदा

....... 5एच 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परब ....

वर्तमानपत्रातून देखील माहिती घेत असतो त्यावरून समजून येते आहे की, हल्ली गुन्हेगारीचे स्वरूप देखील बदलते आहे. मुंबईतील गुन्हेगार फार कमी झालेले आहेत. गुन्हेगारीचे देखील कॉन्ट्रॅक्ट दिली जातात. यूपी, बिहारच्या गुन्हेगारांना ही कंत्राटे दिली जातात. तेथील गुन्हेगार मुंबईत येतात, गुन्हा करतात आणि परत निघून जातात. पोलीस रेकॉर्डला ते गुन्हेगार नसल्यामुळे त्या गुन्ह्यांचा तपास काही होत नाही आणि बरेचसे तपास अद्यापपर्यंत अपूर्ण राहतात. अशा प्रकारे हल्ली येथील गुन्हेगारीची पध्दत देखील बदलत गेलेली आहे. परंतु येथे येणाऱ्या लोकांवर जर काही नियंत्रण असेल, परराज्यातून येथे येणाऱ्या माणसाची नोंद होत गेली आणि त्यामध्येही पोलीस रेकॉर्डमध्ये त्याची नोंद होत गेली किंवा तसा कायदा केला गेला तर अशा प्रकारांना आपोआप आळा बसण्याची शक्यता जास्त आहे. म्हणून ही जी काही परिस्थिती आहे, मुंबईतील कायदा सुव्यवस्था सुद्धा आपण नियंत्रणामध्ये ठेवू शकणार आहोत. आज मुंबईची पाणी पुरवठ्याची व्यवस्था काय आहे ? आज भांडुपच्या संकुलामध्ये मिनरल वॉटर सारखे पाणी येते आहे परंतु जेव्हा आपण नळ उघडतो तेव्हा त्यातून गढूळ पाणी येते. याचे कारण म्हणजे त्या ज्या पाण्याच्या लाईन्स आहेत त्यावर आजूबाजूला झोपडपट्टी वसलेली आहे आणि त्या पाण्याच्या पाईपलाईन्स या मधूनच फोडल्या गेलेल्या आहेत. सभापती महोदया, आज मुंबईतून मोठ्या प्रमाणात देशाला कर जातो आहे पण तो कर देणाऱ्या नागरिकांसाठी आपण काय करतो आहोत ? हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. मुंबई महानगरपालिकेच्या काही ऑब्लीगेटरी ड्युटीज आहेत. मुंबई महापालिका नागरिकांना काही सोयी सुविधा देण्यासाठी प्रयत्न करीत आहे. परंतु आज मुंबई महापालिकेची सुमारे 569 कोटी रुपयांची थकबाकी राज्य सरकारकडे आहे. आमचा तर या बाबतीत आरोप आहे की, महापालिकेमध्ये शिवसेनेची सत्ता असल्यामुळेच राज्य सरकार गेल्या कित्येक वर्षामध्ये ही थकबाकी ठेवते आहे. ही थकबाकी राहिल्यामुळे महापालिकेच्या शिक्षण सेवांवर अन्याय होतो आहे, आरोग्य सेवांवर अन्याय होतो आहे. आज त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, या सेवांसाठी बजेटमध्ये तरतूद करता येत नाही. कारण विचारले तर आम्हाला सांगितले जाते की, निधी नाही. त्याचे कारण विचारले तर सांगितले जाते की, राज्य सरकारकडून पैसे आलेले नाहीत. म्हणजे राज्य सरकार जाणुन बुजून अशा पध्दतीने महापालिकेची देणी देण्याच्या बाबतीत राजकारण करून गळचेपी करीत आहे का ? अशा प्रकारे राजकारणातून ही गळचेपी होणार असेल तर महापालिकेला कोणीही वाचवू शकत

...... 5एच 3 ..



KBS/ MAP/ KGS/ श्री.गायकवाड नंतर --- 20:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही अशा मतापर्यंत आम्ही आलो आहोत. आज म्हाडाकडे स्वत:चे पैसे आहेत, एमएमआरडीएकडे स्वत:चे पैसे आहेत. परंतु हे पैसे ते कसे गुंतविणार आहेत ? मुंबईसाठी ते काय करणार आहेत ? आज एमयूआयपी प्रोजेक्ट चालू आहे, एमयूटीपी प्रोजेक्ट चालू आहे. परंतु हे कंत्राटदार जे मध्येच सोडून गेलेले आहेत. त्यामुळे रस्त्यांची परिस्थिती भयानक झालेली आहे, चारही बाजूने रस्ते खणून ठेवलेले आहेत, रस्त्यांची कामे मध्येच कंत्राटदार लोक सोडून गेलेले आहेत. या बाबतीत देखील आळा घालण्याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये तर सहज अगदी हे होत आहे. कोणीही येते आणि रस्ता खणून ठेवते, काहीही करते, पण कोणी त्याला विचारीत नाही. कारण हा सारा कारभार आता शासनाकडे गेलेला आहे. त्यावर कोणाचाही अंकुश राहिलेला नाही त्यामुळे मुंबईची बकालता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. माझी स्वत:ची याबाबतीत अशी भावना झालेली आहे की, मुंबईवर, मुंबईकरांवर खरोखरी प्रेम आपल्याला करावयाचे असेल तर येथील कायदे अतिशय कडक करणे गरजेचे आहे त्यासाठी मुंबई महापालिकेला अतिशय सक्षम बनविणे आवश्यक आहे. राजकारणातून येणाऱ्या द्वेषापोटी मुंबई महापालिका जर कमजोर झाली तर मला वाटते की, करदात्या मुंबईकरांना सेवा देण्यास, सवलती देण्यास अतिशय कुचकामी ठरू आणि म्हणून महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांकडून आमच्या अशा अपेक्षा आहेत, आज या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री महोदय या ठिकाणी राज्य सरकारच्या वतीने उत्तर देणार आहेत .. खरोखरी या मुंबईवर त्यांचे जे प्रेम आहे, लोकांना जे त्यांचे प्रेम दिसते आहे त्याबद्दल आम्हाला विश्वास वाटायचा असेल तर येणाऱ्या काही दिवसात ते मुंबईसाठी काही चांगले नियोजन करतील असा विश्वास व्यक्त करून मी माझे दोन शब्द संपवितो.

*****

( यानंतर श्री.जागडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदया, नियम 259 नुसार या सदनातील ज्येष्ठ सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी मांडलेल्या प्रस्तावावर माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर चव्हाण, मधुकर सरपोतदार, विनायकराव मेटे, श्रीमती काता नलावडे, सर्वश्री.जोगेंद्र कवाडे, अरविंद सावंत, उल्हासदादा पवार, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री. विलास अवचट व अनिल परब यांनी भाग घेतला. मुंबईबद्दल या सर्व माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली. या सर्व माननीय सदस्यांनी अनेक महत्वपूर्ण सूचनाही केल्या आहेत. या राज्याची राजधानी मुंबई आहे. या देशाची आर्थिक आणि औद्योगिक राजधानी मुंबई आहे. जागतिक स्तरावर या मुंबईला अनन्यसाधारण महत्व आहे. सांस्कृतिक, साहित्यिक अशी खूप मोठी परंपरा या शहराला आहे. या शहराचे गत काळातील वैभव टिकावे, आंतरराष्ट्रीय महत्व कायम रहावे, या शहरातील लोकांचे जीवन सुखी व्हावे. त्यांना सर्व प्रकारच्या नागरी सुविधा मिळाव्यात, या दृष्टीने माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत.

सभापती महोदया, मी एक गोष्ट प्रांजळपणाने कबूल करीन की, देशाचा प्लॅन तयार करीत असताना काही चुका घडलेल्या आहेत. जगाच्या तुलनेत या देशात मोठ्या प्रमाणात नागरिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. एकेकाळी भारत हा देश आपण खेड्यांचा देश मानीत होतो. त्यावेळी 80 टक्के लोक खेड्यांमध्ये राहत होते आणि 20 टक्के लोक शहरात राहत होते. औद्यांगिकीकरणामुळे देशाच्या पातळीवर आणि राज्याच्या पातळीवर वेगवेगळी भूमिका घेण्यात आली. खेड्यात चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळत नाही. खेड्यात रोजगार उपलब्ध होत नाही, खेड्यामध्ये आरोग्याची सोय चांगल्या प्रकारची नाही, पिण्यासाठी चांगले पाणी मिळत नाही, कायदा आणि सूव्यवस्था चांगली राहत नाही. या आणि अशा अनेक कारणामुळे खेड्यातील माणूस शहराकडे येत राहिला. खेड्यातील सर्व समस्यांचे गाठोडे घेऊन खेड्यातील माणूस शहरात आला. याचे वर्णन करावयाचे झाले तर खेडी ओस आणि शहरे सुजलेली अशी अवस्था झाली. शहरांची वाढ निकोप झाली असती तर त्याचे समर्थन करता आले असते. परंतु शहरे वाढलेली नाहीत तर ती सुजलेली आहेत. सभापती महोदय, नागरिकीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशात पहिल्या नंबरचे राज्य राहिले. खेडी ओस पडली आणि बकाल शहरे निर्माण झाली. शहरातून मोठ्या प्रमाणात झोपडपट्टींची वाढ झाली. पिण्याच्या पाण्याचे असंख्य प्रश्न निर्माण झाले. शहरातील समस्या सतत वाढत चालल्या.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

जी शहरे आपण आंतरराष्ट्रीय शहरे म्हणतो अशा शहरामध्ये कधी कॉलऱ्याच्या, कधी प्लेगच्या , तर कधी लॅप्टेस्पायरोसिसच्या साथी शहरामध्ये येतात. चांगली स्वच्छता नाही, चांगले आरोग्य नाही, शहरामध्ये एक भयानक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुंबईच्या बाबतीत बोलायचे झाले तर राज्यभरातून आलेले लोंढे मुंबईने सहज आपल्या काखेत घेतले, देशभरातून आलेले लोंढे मुंबईने आपल्या खांद्यावर घेतले, आणि बाहेरचे आलेले लोंढे सुध्दा मुंबईला आपल्या डोक्यावर घ्यावे लागले.जोपर्यंत सहन होत आहे तोपर्यंत मुंबईने हा बोजा पेलला.परंतु यापेक्षा आणखी हा बोजा वाढला तर मुंबईलाच कोलमडून पडावे लागेल अशी स्थिती निश्चितपणे निर्माण झाली आहे. लोकशाही आघाडी सरकार सत्तेवर आले. आणि रोज उठून कुणी तरी आम्हाला आमच्या जाहीरनाम्याची आठवण करुन देत आहेत. एक गोष्ट सांगू इच्छितो की, शहराची अशीच परिस्थिती केवळ मुंबईला उध्वस्त करणारी नाही. ज्या दिवशी मुंबई कोलमडून पडेल त्या दिवशी महाराष्ट्र कोलमडलेला असेल आणि देश सुध्दा सावरला जाऊ शकणार नाही. कारण मुंबई ही देशाची आर्थिक, औद्योगिक राजधानी सुध्दा आहे. अनेक वेळा राजकारण्यांना आणि सत्तेत असलेल्यांना भावनेपेक्षा वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे सत्तेतील माणसे काही वेळा भावनाशून्य वाटतात. गरीबांच्या व्यथा दिसत असतांना, झोपडपट्टीतील माणसाचे संसार उघडयावर येतात हे कळत असतांना, त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाची आबाळ होते हे माहीत होत असतांना महाराष्ट्राच्या इतिहासात कधी नव्हे एवढया 75 हजार झोपडया महानगरपालिका आणि महसूल खाते पाडीत असतांना मुंबईच्या पोलीस दलाने विशेष सहकार्य करण्याची भूमिका स्वीकारली.

सभापती महोदया, एक दिवस मुंबईचे माजी महापौर श्री. महादेव देवळे साहेब मला भेटायला आले आणि म्हणाले की, आतापर्यंत अशाप्रकारे पोलीस दलाकडून कधीही सहकार्य मिळाले नव्हते. अशाप्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली. मी स्वत: आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: त्यामध्ये विशेष काही केले नव्हते. राज्यात जे कायदे केले त्यांचे पालन झाले पाहिजे. आणि ते पार पाडण्याची जबाबदारी पार पाडीत असतांना सहकार्य करण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे एवढाच त्या पाठीमागचा हेतू होता. आज सरकारच्या या कृती वर दोन्ही बाजूकडून टीका केली जाते. मानवता वादी उठतात, विकास कामाला मानवतेचा चेहरा असला पाहिजे अशा प्रकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

भावना व्यक्त करतात त्यांच्या या मताशी, भूमिकेशी शासन 100 टक्के सहमत आहे. शेवटी गरीब माणसाला रस्त्यावर आणून त्याला उघडे पाडण्यात फार पुरुषार्थ नाही. हे काम सहज करता येईल. घर पाडणे सोपे असते, झोपडी तोडणे त्याहून सोपे असते परंतु ती बांधणे खूप अवघड असते. दिल्लीहून मार्गदर्शन झाले असेल, मानवतावादी बोलले असतील, काही जणांनी आंदोलने केली असतील त्या आंदोलन करणाऱ्यांनी,लांब राहून मागदर्शन करणाऱ्यांनी हा विचार करण्याची गरज आहे की, मुंबईत रहातात ती सुध्दा माणसेच आहेत. आलेल्या लोंढयामुळे त्यांना अमानुषपणाचे जीवन जगावे लागत असेल, अमानवीपणे रहावे लागत असेल तर सारासार विचार त्यांचाही केला जाण्याची आवश्यकता आहे. या शहराची 1951 मध्ये लोकसंख्या 29 लाख 60 हजार होती. आज हे शहर 1 कोटी 20 लाखापर्यंत पोहोचले आहे. लोकसंख्येमध्ये 400 टक्के वाढ झाली आहे. 1951साली शहरामध्ये 35 हजार वाहने होती आज ती संख्या 13 लाखावर पोहोचली आहे. तेव्हा या शहरातील वाहनांची संख्या वाढत असेल, 400 टक्क्यांनी लोकसंख्या वाढत असेल, रस्त्यांची संख्या मात्र वाढणार नसेल तर वहातुकीची कोंडी होणार नाही तर दुसरे काय होणार? मुंबई महानगरपालिकेंने आता पाणी पुरवठा योजना केली आहे.

(यानतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MAP पूर्वी श्री.सरफरे . . . . 20:50

श्री.आर.आर.पाटील . . . .

पाईप लाईनखाली आणि पाईप लाईनवर 35 हजार झोपडया आहेत. मोठा खर्च करुन रस्ते केले. फूटपाथवर 7 हजार झोपडया आहेत. आज मुंबई शहरात 13 लाख झोपडया आहेत. 1995 सालापर्यंतच्या झोपडया नियमित करण्याची भूमिका राज्य शासनाने पूर्वीच स्विकारलेली होती. 7 लाख 60 हजार झोपडयांचे पुनर्वसन करणे, त्यांना प्रोटेक्शन देणे अशा पध्दतीची भूमिका यापूर्वीच मान्य करण्यात आली आहे आणि या भूमिकेशी राज्य शासन बांधील आहे. 3 लाख 80 हजार झोपडया या पुन्हा झाल्या आणि 2000 सालानंतर आणखी त्यात वाढ होत गेली. हा आकडा 13 लाखापर्यंत पोहोचला आहे. जर ही वाढ अशीच होत राहीली तर आणखी अडचणी निर्माण होऊ शकतात. कोणताही आजार झाल्यावर औषधोपचार करणे हे योग्य असले तर मग अनेक आजार इतके वाढतात की, जगातील औषधे सुध्दा अपूरी ठरतात. म्हणून आता रोग होणार नाहीत याचीच काळजी घेण्याची आवश्यकता आहे. झालेल्या झोपडयांचे काय करावयाचे याचा राजकीय निर्णय होईल. दुदैवाने महाराष्ट्रातच नाही तर आपल्या देशामध्ये सगळेच निर्णय मग ते आर्थिक असू देत किंवा अन्य कोणत्याही बाबतीतील असू देत, ते राजकीय दृष्टयाच घेतले जातात. हे जरी दुर्दैव असले तरी एका बाबतीत मी आज ठाम विश्वास व्यक्त करतो की, यापुढच्या काळामध्ये मुंबई शहरामध्ये एकही नवी झोपडी होता उपयोगाची नाही. या गोष्टीची शासनाच्यावतीने मी सदनामार्फत राज्यातील आणि मुंबई शहरातील तमाम जनतेला ग्वाही देतो. हे शक्य आहे. यंत्रणा नियंत्रणात ठेवल्या तर कशा काम करतात आणि ढिल्या सोडल्या तर किती मोकाट सुटतात याचा प्रदीर्घ नसला तरी थोडासा अनुभव मी घेत आहे. आज सगळयांनी मिळून या प्रश्नाकडे वेगळया नजरेने बघण्याची ख-या अर्थाने गरज आहे. सगळेच प्रश्न राजकीय नाहीत. काही प्रश्न पक्षापुढचे असतील, काही प्रश्न राज्यापुढचे असतील. आज मुंबईची लोकसंख्या यापेक्षा अधिक वाढू न देणे हा केवळ कुठल्या एका पक्षापुढचा प्रश्न न मानता, हा राज्यापुढील प्रश्न मानण्याची आवश्यकता आहे आणि तसे मानावयास सरकार तयार आहे म्हणूनच माननीय मुख्यमंत्र्यांनी यापुढच्या काळामध्ये पाहुण्यांना मुंबईमध्ये जागा नाही ही स्पष्ट भूमिका विधानसभेमध्ये घेतलेली आहे. पण मी या लोकांना पाहुणे सुध्दा मानत नाही. कारण पाहुणा कधीतरी जातो, हा कायमचा घरोबा मुंबईला न पेलणारा आहे. केंद्र सरकारचे काही कायदे आहेत,घटना आहे. राज्य सरकारचे कायदे आहेत. आज आपल्या घटनेप्रमाणे बाहेरच्या माणसांना आपण रोखू शकत नाही. मुंबईत येण्याचे थांबवू शकत नाही.

. . . .5 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

कुणाला यावयाचे असेल त्याला परवानगी दिली जाईल. ती घटनेनेच दिलेली आहे. पण येथे येऊन येथील सगळया नियमांची आणि कायद्यांची पायमल्ली मात्र कोणाला करता येणार नाही. या राज्यातील कायदे पायदळी तुडविता येणार नाहीत. जर कोणाला मुंबईमध्ये येऊन रहावयाचे असेल तर अधिकृत घर घेऊन निवांत राहता येईल, त्यांना पूर्णपणे संरक्षण देण्याची भूमिका स्विकारली जाईल. पण "आओ जाओ, घर तुम्हारा" अशा पध्दतीने मुंबईला मोकळे सोडण्याची भूमिका सुध्दा घेऊ दिली जाणार नाही. याबाबतीत दक्षता घेतली जाईल. जसे देश स्तरावरील नियोजन चुकले हे मी प्रांजळपणाने कबूल केले. तसे मी हेही कबूल करीन की, यंत्रणेला सुध्दा भ्रष्टाचाराचा रोग लागला आहे. एकदा या राज्यामध्ये 1995 नंतरच्या सगळया झोपडया, सगळी अनधिकृत बांधकामे अवैध आहेत अशी भूमिका घेतल्यानंतर डोळयावर कातडे पांघरुन घेण्याची भूमिका महापालिकेमध्ये बसलेल्या झारीतील शुक्राचार्यांनी घेतली, तशीच भूमिका पोलीस दलातील लोकांनी घेतली, तशीच भूमिका महसूल खात्यातील लोकांनी घेतली. केंद्र सरकारच्या ज्या जागा होत्या, त्यांनी सुध्दा डोळेझ ाक केली आणि झोपडया पाठीमागून झोपडया वाढत गेल्या. अनेक वेळा चुकीचे संदेश देणारे निर्णय आम्ही घेतले. मी प्रांजळपणाने या गोष्टी कबूल केल्या. प्लनिंगमध्ये काही चुका झाल्या. यंत्रणेमध्ये काही चुका राहील्या.

**सभापतीस्थानी - मा.सभापती**

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ MHM/ KGS/ पूर्वी सौ.रणदिवे.... 20:55

श्री.आर.आर.पाटील (पुढे चालू...

एक चूक झाली. ती आपण देखील प्रांजळपणाने कबूल केली पाहिजे. 1995 च्या झोपड्या कायम करत असतांना झोपडपट्टीवासियांना मोफत घरे देण्याची भूमिका स्वीकारली गेली. सभापती महोदय, देशभरातील गरीब लोकांना हे निमंत्रण देणारी बाब वाटली. मंबईत आल्यानंतर बेकायदेशीरपणाने एक झोपडी बाधली तर 225 फुटाचे घर मिळते. पुन्हा येत असलेल्या झोपड्यांना आणखी वेग आला. चूक कोणाची याचे विश्लेषण आज करण्याची आवश्यकता नाही. एकट्या सेनेमुळे, एकट्या भाजपमुळे या झोपड्या वाढलेल्या नाहीत, ते असलेच तर आपल्या सगळ्यांचे मिळून पाप आहे, ही गोष्ट आपण सगळे मिळून कबूल करणे, पुढे या गोष्टी घडणार नाहीत, या दृष्टीने दक्षता घेणे हाच त्यावर मार्ग असू शकतो. अन्यथा, तुम्ही-आम्ही म्हणू शकतो की, राज्यामध्ये प्रदीर्घ काळ तुमचे सरकार होते, देशामध्ये तुमच्या विचाराचे लोक सत्तेवर होते, मुंबईसाठी काय केले ? हे तुम्ही आम्हाला विचारू शकता. पण मुंबई एवढी बकाल होत असतांना तुम्ही काय केले, असे या बाजूचे सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे शिसेना-भाजपला विचारू शकतात. सभापती महोदय, आता एकमेकाला दोष देऊन शक्ती वाया घालविण्यापेक्षा झालेल्या सगळ्या चुकांच्याबाबतीत आत्मपरीक्षण करून आता पुन्हा चुका घडणार नाहीत, झालेल्या चुका दुरुस्त होतील, याचा गांभीर्याने विचार आज केला जाण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.परब साहेब मुंबईला सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे असे म्हणाले, ही गोष्ट कोण नाकबूल करेल ? या मुंबई शहरातील कर देणाऱ्या जनतेने केंद्र सरकारच्या तिजोरीमध्ये दरवर्षी 40 हजार कोटीची भर टाकावी, राज्य सरकारच्या तिजोरीमध्ये 12 हजार कोटीची भर टाकावी, मुंबईच्याबाबतीत कोण बोलले की घटनेप्रमाणे तुम्हाला हे करता येणार नाही, हे मद्रास पासून दिल्लीपर्यन्त सगळयांनी, सगळ्य तज्ज्ञांनी हातात मोठमोठी पुस्तके घेऊन सांगावे. मुंबईवर हक्क सांगतांना मुंबई ही सर्वांची असते, पण मुंबईच्याबाबतीत कर्तव्य पार पाडीत असतांना, मुंबई नेहमी बेवारशी असते. सभापती महोदय, हक्क सांगणाऱ्यांनी आता कर्तव्याच्या भावनेने तितकेच पुढे येण्याची आवश्यकता आहे. पोकळ हक्क सांगण्याची भूमिका, पोकळ मार्गदर्शन करण्याची भूमिका आता मुंबईच्याबाबतीत परवडणारी नाही. हक्क सांगायला मुंबई ही सर्वांची आणि कर्तव्य बजावायला मुंबई कोणाचीच नाही ही दुटप्पी भूमिका सोडून देण्याची गरज आहे. आज मुंबईमध्ये अनेक क्षेत्रात अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. माझी खात्री आहे की, स्थानिक प्रश्न स्थानिक प्रशासनानेच सोडविले पाहिजेत, असे वरवर म्हटले तर तो मुंबई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ MHM/ KGS/

श्री.आर.आर.पाटील (पुढे चालू.....

महानगरपालिकेवर अन्याय होईल. त्यापेक्षा अधिकचा अन्याय मुंबईच्या जनतेवर होईल. हा अन्याय आता होता उपयोगाचा नाही. म्हणून कर देणारी सोन्याची कोंबडी न मानता केंद्र सरकारने देखील मुंबईसाठी भरीव तरतूद देण्याची आवश्यकता आहे. राज्य सरकारनेसुध्दा आता उदासिनतेची तटस्थ भूमिका न घेता, मुंबईसाठी काही करून दाखविण्याची गरज आहे. सभापती महोदय, लोकशाही आघाडीचे सरकार मागे आपल्या टर्म्समध्ये सत्तेवर असतांना मेकॅन्सी यांच्याकडून मुंबईच्या डेव्हलपमेंटच्याबाबतीत एक प्लॅन तयार करून घेण्यात आला. जगभरातील जी मोठी शहरे आहेत, त्यांच्या एका बाजूला चित्र लावून हे शहर 15 वर्षांनी कसे असेल, 25 वर्षांनी कसे असेल, याचा आराखडा जगामध्ये सगळीकडे ठेवतात पण आमची शहरे मात्र आज आहेत त्यापेक्षा पुढच दहा वर्षांनी बकाल होणार असतील जर जग ज्या दिशेने चाललेले आहे, त्याच्या उलट दिशेने आपण चाललो आहे. आज महाराष्ट्रातील शहरांकडे दुर्लक्ष करता येण्यासाठी परिस्थिती नाही. कारण आज शहरामध्ये केवळ 20 टक्के लोक रहात नाहीत तर महाराष्ट्रातील शहरांमध्ये तब्बल 42 टक्के लोक रहातात. काही दिवसांनी हा आकडा 50 टक्क्यापर्यन्त पोहोचण्याची शक्यता आहे. म्हणून ज्या शहरामध्ये मूलभूत समस्या निर्माण होतात, त्याला वेगळ्या पध्दतीने सामारे जाण्याची गरज आहे. आज मुंबई शहरातील रस्त्यांची आणि वाहनांची संख्या पाहिली तर आणि जगामधील वाहनांची आपल्याबरोबर घनता पाहिली तर दिल्ली शहरामध्ये 127 वाहने प्रत्येक कि.मी. पाठीमागे आहेत. मोठया शहरांची आंतरराष्ट्रीय सरासरी 1 कि.मी. पाठीमागे 300 वाहनांची आहे. मुंबई शहरामध्ये 694 वाहने प्रत्येक कि.मी.ला आहेत.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदार... 21:00

श्री. आर.आर.पाटील ..

रस्ते शहराचे आकारमान आणि त्या तुलनेत मुंबई इतकी वाहने जगातील कुठल्याही शहरात नाहीत. ही जर अशीच परिस्थिती राहिली तर फार मोठी बिकट समस्या, या शहरामध्ये होऊ शकते. म्हणून काही धोरणात्मकदृष्टया निर्णय घेण्याची गरज आहे. सभापती महोदय, झोपडयांच्या बाबतीत सुध्दा 1995 साला पर्यतच्या झोपडयांना पूर्ण प्रोटेक्शन देण्याची भूमिका माननीय मुख्य मंत्रिमहोदयांनी घोषित केलेली आहे. पुढच्या झोपडयांचे योग्य ठिकाणी मुंबईबाहेर पुनर्वसन करण्याचेसुध्दा मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच घोषित केले आहे. यापुढच्या काळामध्ये जर झोपडया वाढू दिल्या नाहीत तर या शहराची किंमान आहे अशीच स्थिती तरी राहू शकते. ओळखपत्र देण्याचा कार्यक्रम राज्यामध्ये घेतला गेला. 13 लाख 20 हजार इतके अर्ज आले. त्यापैकी 2 लाख 20 हजार इतके अर्ज पात्र ठरले. अजूनही काही अर्जांच्या बाबतीत छाननी सुरु आहे. या शहरामधील जवळ जवळ 50 टक्के लोकसंख्या झोपडपट्यामध्ये आणि मोडकळीस आलेल्या, पडक्या घरांमध्ये राहते. 19 हजार मोठया इमारती आहेत, चाळी आहेत की, ज्या केव्हा पडतील याचा नेम नाही. एका बाजूने विकासाला मानवी चेहरा देण्याच्यादृष्टीने प्रयत्न करीत असतांना ज्या 19 हजार उपकरप्राप्त इमारती आहेत, त्यांच्या बाबतीतही एक वेगळी भुमिका घेण्याची गरज आहे. ज्या

झोपडयांना आपण प्रोटेक्शन दिले आहे त्यांना पक्की घरे प्राप्त करुन देणे, ज्या झोपडयांना पुनर्वसनाचे लाभ द्यावयाचे आहेत, त्याबाबतीत आमचे आश्वासन आहे. आम्ही जाहिरनाम्यामध्ये दिलेले आश्वासन किती लोकांनी वाचून आम्हाला मत दिले होते माहीत नाही. पण आज निवडून आल्या नंतर मात्र आम्हाला आमचा जाहिरनामा सारखा, सारखा दाखविला जातो. ज्या अश्वासनांची पूर्तता केली जाते त्याबदल क्रेडिट कधीच मिळत नाही. त्यातील एखादे काम राहिले की, तेवढे ठोकून काढण्यासाठी सारखा जाहिरनामा पुढे केला जातो.ही गोष्ट मी प्राजंळपणाने कबूल करीन हा जाहिरनाम्यामध्ये तो उल्लेख होता. मानवतेच्या दृष्टीकोनातून माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केले आहे. त्यांचे पुनर्वसन योग्य ठिकाणी आपण करु. या गोष्टी केल्या पाहिजेत, याबद्दल दुमत नाही. ज्या झोपडया मुंबईमध्ये पूर्वीपासून आहेत. त्यांनाही पक्की घरे दिली पाहिजेत. तीही माणसे आहेत राज्यात देशात दहा-वीस वर्षापासून 1995 पर्यंत येथे राहिलेली आहेत. आज झोपडपट्टयांची अवस्था आणखी बकाल आहे. तेथे पिण्यासाठी पाणी नाही, शौचालय नाही. खूपमोठया समस्या त्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

ठिकाणी आहेत. या झोपडपट्ट्यांना चांगले जीवनमान प्राप्त करुन देत असतांना मोडकळीस आलेली जी घरे आहेत त्यांच्या बाबतीत गंभीर होण्यासारखी परिस्थिती आहे. सुरुवातीच्या काळात ती नुसतीच पडतील अशी भिती होती. पण 1940 पूर्वीची काही घरे आता प्रत्यक्षात पडायला सुरुवात झ ालेली आहे.प्रत्येक पावसाळयामध्ये गेलेल्या पावसाळयाचा एक दिवस मुंबईकरांना, शासनाला आणि गृहनिर्माण मंडळाला घर न पडता गेला तर आपली सुटका झाली असे वाटते. ही सगळी घरे दुरुस्त करावयाची झली तर पाच हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आज एवढे पैसे उपलब्ध होत नाहीत. राज्य सरकारने केंद्राकडे प्रस्ताव पाठविला आहे की, केंद्र सरकारने यासाठी काही खास अनुदान दिले पाहिजे. मुंबईची वेगळी परिस्थिती लक्षात घेऊन हे अनुदान दिले पाहिजे.मुंबईसाठी ते आवश्यक आहे. एक गोष्ट मात्र मी कबूल करीन की, मुंबईचे शोषण होते मुंबईमधून पैसा बाहेर नेला जातो असे म्हणत असतांना अलीकडच्याकाळात मुंबईबद्दल आपल्या देशाच्या पंतप्रधांनीनी जी सदभावना दाखविली आहे तिचे सर्व पक्षांनी जाहीरपणाने अभिनंदन केले पाहिजे.अध्यक्ष महोदय, पोटतिडिकेने ते बोलले हे मुंबई शहर चांगले केले पाहिजे.आदरणीय श्री पवार साहेब, पृथ्वीराजबाबा मुख्यमंत्री आणि मीही त्या मिटिंगला उपस्थित होतो.या शहरासाठी वेगळा निधी देण्याची आवश्यकता भासली तर तो दिला जाईल. केंद्र सरकारच्या बजेटमध्ये तशा पध्दतीची प्रोव्हिजन केली जाईल, याचे सुतोवाच मुंबईमध्ये झालेल्या मिटिंगमध्ये त्यांनी केले होते.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील......

जाता जाता माजी पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी साहेबांनी 500 कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. त्याही गोष्टीचा त्यावेळी उल्लेख केला की, जाता जाता दिलेले आश्वासन त्यांना पार पाडता आले नव्हते तेही आश्वासन मुंबईच्या बाबतीत पार पाडावे. माननीय पंतप्रधानांनी खुल्या मनाने सांगितले की, पूर्वीच्या पंतप्रधानांनी दिलेले आश्वासन असले तरी आणि त्या काळात पैसे मिळाले नसले तरी पंतप्रधानांचे आश्वासन हे त्या पदाकडून पार पाडण्याचा प्रयत्न केला जाईल. या आश्वासनाबरोबरच आणखी जास्तीचे पैसे उपलब्ध करुन दिले जातील ही भूमिका त्यांनी घेतलेली होती. मुंबईच्या प्रामुख्याने ज्या समस्या आहेत त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या, रस्त्यांच्या समस्या, ड्रेनेजच्या समस्या, मलनिस्सारणाची समस्या अशा समस्या आहेत. आज मुंबईच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आज मुंबईला एकंदरीत 4200 दशलक्ष लीटर पाणी उपलब्ध असले पाहिजे. प्रत्यक्षात 3 हजार 50 लशलक्ष लीटर पाणी पुरविले जाते. म्हणजे 1100 दशलक्ष लीटरची तफावत आहे. आज जो प्लॅन तयार केलेला आहे त्यामध्ये 2021 सालापर्यन्त ही तफावत दूर करील अशा पध्दतीचा प्लॅन केलेला आहे. मध्य वैतरणा प्रकल्प केला तर त्यासाठी 1800 कोटी रुपये खर्च येईल. जागतिक बँकेकडून, केंद्र सरकारकडून महानगरपालिकेला मदत करुन देण्याची भूमिका स्वीकारली जाईल. हा 1800 कोटीचा प्लॅन लवकरात लवकर पूर्ण करुन या शहराला पाणी मिळू शकेल. याबाबतीत सुध्दा राज्य सरकार प्रयत्नांची पराकाष्ठा करील. महापालिकेच्या खांद्याला खांदा लावून ज्या गोष्टी कराव्या लागतील त्या केल्या जातील. आज सांडपाण्याची परिस्थिती बघितली तर या ठिकाणी 2600 एम.एल.डी. सांडपाणी निर्माण होते. विल्हेवाट लावण्यात येत असलेले सांडपाणी 1500 एम.एल.डी. आहे. विल्लेवाट लावणे आवश्यक असलेले सांडपाणी 1100 एम.एल.डी. आहे. खूप मोठया प्रमाणावर सांडपाणी तसेच राहते. ते बाहेर नेऊन टाकण्याची क्षमता आम्ही निर्माण करु शकलो नाही. महापालिकेकडे ही क्षमता नाही. मुंबई शहरातील शौचकूप आणि संडास पाहिले तर या ठिकाणी 1 लाख 25 हजार 55 शौचकुपांची आवश्यकता आहे. या ठिकाणी 75526 शौचकुपे आहेत आणि अजूनही 47 हजार शौचकुपे आणि संडास मुंबईमध्ये बांधण्याची आवश्यकता आहे. दवाखान्यामध्ये 8 हजार खाटांची व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी प्रत्येक बाबतीत डेफिसीट आहे. मुंबईतील रस्ते मजबूत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. आर. आर. पाटील .....

करणे, काही महत्वाकांक्षी प्रकल्प तयार करणे, मेट्रो रेल्वे तयार करणे यासाठी 36 हजार कोटी रुपये लागतील. हे सर्व पैसे राज्य सरकारच्या बजेटमध्ये नाहीत याही गोष्टीची आपणा सगळयांना कल्पना आहे. पण त्याबाबतीत राज्य सरकारने केंद्र सरकारकडे अपेक्षा व्यक्त केलेली आहे की, इतका मोठा निधी मुंबई शहर देत असताना केंद्र सरकारने प्रत्येक वर्षी किमान 2 हजार कोटी रुपयें द्यावेत आणि तितकाच निधी राज्य सरकारने येणा-या त्रुटीसाठी वापरला आणि खाजगीकरणातून काही प्रोजेक्ट्स आपण पुढे आणले आणि 36 हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांना चालना देण्यासाठी मग जागतिक बँक असेल, विविध वित्तीय संस्था आहेत अशा संस्थांकडून 36 हजार कोटीचे प्रोजेक्ट्स मुंबई शहरामध्ये जर आपण पूर्णत्वाला नेले तर आज मुंबई शहराला वाहतुकीच्या, पिण्याच्या पाण्याच्या, मलनिस्सारणाच्या, आरोग्याच्या निर्माण झालेल्या अडचणी पूर्ण होतील. लोकसंख्यावाढ रोखत या विकास कामांना चालना दिली तर हे शहर चांगले होऊ शकेल. काही सन्माननीय सदस्य भावना व्यक्त करतात. कधी राजकीय अभिनिवेषातून तर कधी भाषणे मजबुतीने लोकांपर्यन्त पोहोचावीत म्हणून कधी मुंबईचे शांघाय केले जाते तर कधी नवी मुंबईचे सिंगापूर केले जाते. मी नवी मुंबईमध्ये असे म्हटले होते की, नव्या मुंबईचे सिंगापूर का करावयाचे ? मुंबई मुंबईच ठेवू या आणि नवी मुंबई नवी मुंबईच ठेवू या. उद्या जर शांघायचा नगराध्यक्ष मुंबईला आले किंवा सिंगापूरचे महापौर नवी मुंबईला आले तर त्यांनाही असे वाटले पाहिजे की, आता सिंगापूरचे नवी मुंबई करु या आणि शांघायचे मुंबई करु या. नको त्या बाबतीत नको त्यांचे आदर्श घेण्याइतपत आपण नक्की बिघडलेलो नाही. मी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना सांगू इच्छितो की, मुंबई मुंबईच राहिली पाहिजे. ती आपण मुंबईच ठेवू. पण आज ज्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत त्या भविष्यामध्ये आपण थोडया थोडया करुन सोडवू. त्या नक्की सुटतील. दरवर्षी 2 हजार कोटी रुपये राज्य सरकार देण्याचा प्रयत्न करील. बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी असेही आपण म्हणाला. नुसती आश्वासने देण्यात येतात, चर्चा होते,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

आज काय सांगत आहेत ते ऐकण्यासाठी थांबलो होतो. महाराष्ट्रात आजपर्यंतचे कोणतेही बजेट काढून पहावे आणि मुंबईसाठी 1 हजार कोटी रुपयांची बजेटमध्ये तरतूद केल्याचे एखादे वर्ष आठवून सांगावे किंवा दाखवून द्यावे. परंतु हे पहिले वर्ष आहे की, बजेटमध्ये संपूर्ण मुंबईसाठी तब्बल 1 हजार कोटीची योजना केलेली आहे. या शहराचा आराखडा तयार करुन खाजगीकरणाच्या कामाला गती मिळेल. केंद्र सरकारने या देशातील सहा महानगरांसाठी 5500 कोटीची तरतूद केलेली आहे. आता बाकीच्या राज्यांचे प्रस्ताव जातील, या सहा महानगरांचा त्या 5500 कोटीवर जरुर दावा होऊ शकतो. परंतु मुंबईचे प्रस्ताव केव्हाच दाखल होऊन गेले आहेत. प्रस्ताव तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे यासाठी बाकीच्यांना वेळ लागेल. यासाठी जागे राहून पहिल्याच वर्षी किमान 3000 कोटी रुपये महाराष्ट्रासाठी आणि या मुंबईसाठी खेचून आणावयाचे आणि अनेक प्रकल्प मार्गी लावावयाचे असे आमचे प्रयत्न राहतील. वांद्रे-वरळी असा पूल, तेथून वरळी-नरिमन पॉईन्टपर्यंत पूल झालाच पाहिजे. काही ओव्हर ब्रिजना आज काही लोक विरोध करीत आहेत, वेगवेगळया भूमिका शासनाकडून घेतल्या जात आहेत. यातील पहिल्या टप्प्यात जे 56 पूल करावयाचे होते त्यापैकी 36 पूल झालेले आहेत, राहिलेले 20 पूल केले जातील. जे विरोध करतील त्यांना श्री.नवलकरसाहेब समजावून सांगण्याची भूमिका स्वीकारली जाईल. त्यांना नम्र विनंती केली जाईल की, जर ओव्हर ब्रीज येथे नको असेल तर तुमची कार कोणत्याही ओव्हर ब्रिजवरुन न जाता कशी चालेल, बाकीच्या ठिकाणी ओव्हर ब्रिज झाले पाहिजेत, त्या ओव्हर ब्रिजवरुन जाता येता आले पाहिजे, पण आपल्या ठिकाणी ओव्हर ब्रिज नको. काही काही वेळेला काही माणसांना माणुसकीचा इतका पुळका येतो, ती माणसे सरकारला दोष देतात. मी सहज एक समाजसेवक आल्यावर म्हटले की, तुमच्या गच्चीवर फक्त 10 झोपडया पोलीस संरक्षणासहित पाठवून देतो. एक महिना त्यांना ठेवा आणि पुन्हा पाठवून द्या, आपण असे केले तर तुम्ही म्हणाल ते ऐकतो. त्यावर मला ते म्हणाले की, मोर्चे मोर्च्यासाठी काढावे लागतात, काही लोक प्रामाणिक आहेत, गरीबांची बाजू भांडून घेण्यात त्यांनी आयुष्य घालविले आहे, परंतु ज्यावेळी खरी आंदोलने सुरु होतात त्यावेळी राजकारणात आणि पुढारपणात पुढे येण्यासाठी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

उत्सुक असणारे हौसे-नवशे सुध्दा त्याच्यामध्ये घुसतात. अशांच्याकडे थोडेसे दुर्लक्ष करीतच जरुर योग्य पध्दतीने राज्यसरकार काम करील. आज मुंबईच्यादृष्टीने ज्या भूमिका राज्यसरकारने घ्यावयास पाहिजेत त्या भूमिका मनापासून घेतलेल्या आहेत. आपण सुध्दा मनापासून साथ देण्याची आवश्यकता आहे. प्रश्न एकमेकाकडे टोलवत त्याचे फूटबॉल केले आणि फार आदर्शाचे बोलत बसलो, फार मानवतेचे आणि नियमांचे बोलत बसलो तर अनेक प्रश्न वाढतात. सभापती महोदय, सहज मध्यंतरी एका केंद्रीय नेत्याला वाटले होते की, प्राणीमात्र जगले पाहिजेत. त्यांच्यावर दया दाखविली पाहिजे. खरे तर आपल्या अवतीभोवती कुत्री घेऊन राहणे किती अवघड असते हे त्यांना माहीत नाही. त्यांनी यातील 4 कुत्री घेऊन बघावे. संपूर्ण मुंबई शहरामध्ये 2.5 लाख भटकी कुत्री आहेत, जगात इतकी भटकी कुत्री कोठेच नाहीत. दरवर्षी 65 हजार मुंबईकरांना ही भटकी कुत्री चावत आहेत. 65 हजार लोकांना प्रत्येकी 7 इंजेक्शन्स घ्यावी लागतात. हया 65 हजार लोकांचे जर मतदान घेतले तर कोणी तरी ही भटकी कुत्री ठेवून घ्यावीत काय, कोणाला तरी दिल्लीत, मुंबईत बसवून भटक्या कुत्र्यांकडे सहानुभूतिने बघा, असे भाषण करणे सोपे असते. परंतु ज्यांना चावते, त्याचे दुखते, पण माणसे बोलत राहत आहेत. हे करण्यासाठी दोन दिशेने प्रयत्न करण्याची गरज आहे. एक म्हणजे आज मुंबईत गर्दी ज्या कारणांमुळे होते त्यातील काही कारणे कमी करणे, मग मुंबईमध्ये जे उद्योगधंदे आहेत, ते थोडेसे मुंबईच्या बाहेर शिफ्ट होतील काय, अशादृष्टीने प्रयत्न करणे, ब-याच दिवसापासून असे प्रयत्न सरकारने विचाराधीन ठेवलेले होते, काहींचे निर्णय यापूर्वीच झाले आहेत, त्याचाच परिणाम म्हणून मुंबईतील शेतमालाची घाऊक बाजारपेठ नवी मुंबईला शिफ्ट झालेली आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

लोखंडाची घाऊक पेठ कळंबोलीला शिफ्ट झाली. पश्चिम उपनगरात बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्सची निर्मिती, वडाळा येथे बस व टर्मिनसची उभारणी या गोष्टी तर आम्ही करणारच आहोत. पण मुंबइतील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याच्यादृष्टीने एमयूटीपी मधून रेल्वे सेवेत सुधारणा, रस्त्यांच्या सुधारणा, तसेच मुंबई-हार्बर इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टमधून एकूण 134 रस्त्यांची बांधणी, रुंदीकरण, आणखी 51 उड्डाण पूल, 16 रल्वे लाईनवरील पूल, 10 वाहनाकरिता भुयारी मार्ग, 56 पादचारी मार्ग, बांद्रा ते नरिमन पॉईन्ट मुक्त मार्गाची बांधणी, 56 उड्डाण पुलांची बांधणी, याही गोष्टींना मुंबई शहरामध्ये गती दिली जाईल. सन्माननीय सदस्यांनी प्रामाणिकपणे मुंबईच्या अडचणी मांडल्या. मी देखील यासंदर्भात राजकीयदृष्ट्या भाष्य करणार नाही. एक भावना व्यक्त केली की, झ ाोपडपट्टया वाढत आहेत. कुणाच्या तरी आशीर्वादाने झोपडपट्टया वाढत आहेत आणि झ ाोपडपट्टीदादा थोडेसे शक्तिशाली झालेले आहेत. त्यांना उन्मादही आला आहे. त्यांना कुठे तरी रोखण्याची आवश्यकता या प्रस्तावाच व्यक्त केली आहे. मुंबई महानगरपालिकेने 146 जणांची यादी दिली होती. त्यातील 5 जणांना तडीपार करण्याची भूमिका स्वीकारली. एमपीडीअे 15 जणांना लावला, एमआरटीपीखाली 21 जणांवर कारवाई केली, 70 जण जे गवंडी होते, मामुली मजूर होते त्यांना एवढी मोठी कलमे पोटासाठी झटणा-या माणसांना लावलेली नाहीत. हे मजूर म्हणून काम करीत होते. एवढया दादांना पकडण्यात आलेले आहे. यांच्याकडून पुढील माहिती घेण्यात येईल. नुसती दादागिरीकरुन दादा होता येत नाही तर या दादांना समर्थन द्यायला झारीतील शुक्राचार्य असावे लागतात. महापालिकेत कोणी तरी त्यांचा गॉड फादर असतो. पोलीस खात्यात कोणी तरी असतो. महसूल खात्यात कोणी तरी असतो. हे दादा सापडल्यानंतर यांना कोणकोण मदत करीत होते ही माहिती गोळा केली जाईल आणि ह्यांचे खरे बाप जे शासकीय कार्यालयामध्ये बसलेले आहेत ते ठेचून काढले जातील, या गोष्टीची मी आपल्याला ग्वाही देईन. सदनातील मा.सदस्यांनी सुध्दा असे कुठले दादा आणखी छुपेपणाने फिरत असतील तर त्यांची बिनदिक्कतपणे नावे दिली पाहिजेत. एकवेळ झोपडपट्टीमध्ये राहाणा-या माणसाबद्दल सरकारची 10 वेळा सहानुभूती राहील. पण या दादांबद्दल सहानुभूती बाळगण्याची काहीच आवश्यकता नाही. त्याची कारणे आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

लोकांना सहज वाटते की, खेड्यापाड्यातून माणसे आली आणि येथे झोपड्या बांधून मोफत राहिली. पण असे होत नाही. या माणसांना त्या झोपडपट्टीदादांना एक तर भाडे देऊन किंवा जागा विकत घेऊनच आपली झोपडी बांधावी लागते. जागा महापालिकेची, जागा शासनाची आणि तिची किंमत हा दादा घेणार आणि हा दादा कुणाकुणाला रसद पुरविणार? रेशनिंग इन्स्पेक्टरची एक अशीच टोळी सापडली. एक बोगस कार्ड सापडले. पोलीस आणखी शोधत गेले आणि 21 रेशनिंग इन्स्पेक्टर सापडले. या 21 रेशनिंग इन्स्पेक्टरांना अटक करण्याची भूमिका, तुरुंगात डांबण्याची आणि सस्पेन्ड करण्याची भूमिका स्वीकारली गेली. या निमित्ताने हा संदेश द्यायचा होता की, आता सहन करण्याची परिस्थिती राहिलेली नाही. ते दिवस आता संपलेले आहेत. जे कोणी यांच्याकडून हप्ते घेत होते त्यांना जबाबदार धरले जाईल. ज्या क्षेत्रामध्ये नव्याने झोपड्या होत आहेत त्या क्षेत्रातील नगरपालिकेचा वॉर्ड ऑफिसर, त्या क्षेत्रातील जिल्हाधिकरी आणि त्याचे अधिकारी तसेच त्या क्षेत्रातील पोलीस अधिका-यांना सुध्द झोपड्या नव्याने होत असताना जबाबदार धरण्याची भूमिका स्वीकारली जाईल. यंत्रणांनी एकमेकावर टोलवाटोलवी करत जर पुन्हा बकालपणा वाढवणार असतीलल तर या यंत्रणांना सहन केले जाणार नाही. मा.सदस्य श्री. अनिल परब या ठिकाणी बोलले. मी जी वक्तव्ये केली होती ती झोपडपट्टीतील कामांना अडथळा आणण्यासाठी नाही. जशी अनधिकृत झोपडपट्टी आहे तशी बडयांची देखील अनधिकृत बांधकामे आहेत. त्यावेळी मंत्रिमंडळामध्ये मी आणि मुख्यमंत्री, आम्हा दोघांचेच कॅबिनेट होते. पहिल्या मिटींगमध्ये हा विषय आला होता. मुंबईमध्ये दररोज 300 झोपड्या नव्याने होत आहेत अशी माहिती सांगितली गेली होती. म्हणून या झोपड्यांच्या बाबतीत काही तरी केले पाहिजे असे सांगत असताना मी प्रश्न उपस्थित केला होता की, अतिक्रमणे ही केवळ गरीब माणसे करीत नाहीत तर बडी माणसेसुध्दा चैनीसाठी अतिक्रमणे करतात, आपण त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री. शिगम 21:20

श्री. आर.आर.पाटील..

आणि त्या बैठकीमध्ये ठरले होते आणि माझ्या पुन्हा लक्षात आले की, एकतर्फी झोपडयांवर कारवाईची गती वाढत होती. पण अनधिकृत बांधकामे आहेत, त्यांच्यावर मात्र हातोडे थोडे नरमाईने चालता आहेत. म्हणून सभापती महोदय, मला तशी भूमिका घ्यावी लागली होती. सभापती महोदय, आजही प्राथमिक माहिती आहे की, जवळ जवळ 600 अनधिकृत बांधकामे आहेत. काही अंशत: आहेत. काही ठिकाणी अतिक्रमणे केलेली आहेत. तर काही ठिकाणी पूर्ण स्ट्रक्चर अतिक्रमण करुन बांधलेली आहेत. या कामामध्ये सुध्दा महानगपालिकेस लागणारे सगळे मनुष्यबळ प्राप्त करुन दिले जाईल. या शहरामध्ये जसा गरीबांना कायदा सांगितला जातो, तसे कायदे पायदळी तुडविण्याची ताकद आमच्यामध्ये आहे असे व्हाईट कॉलरमध्ये फिरणारे जे मुजोर झालेले आहेत त्यांना सुध्दा या राज्यातील कायदा सारखाच आहे याची आठवण करुन दिली जाईल आणि एक कालबध्द कार्यक्रम बडयांच्या बांधकामासाठी आणि अनधिकृत अतिक्रमणासाठी राबविला जाईल अशा प्रकारची मी ग्वाही या ठिकाणी देतो. सभापती महोदय, कधी कधी चांगले निर्णय होतात. त्यातील एक चांगला निर्णय घेण्यात आला तो म्हणजे मुंबई शहरात गिरण्या मोठया प्रमाणात होत्या. या लोकांनी गिरण्या चालवून मजुरांना जगविण्यापेक्षा गिरण्या तोटयात आहेत म्हणून जागा विक्री करण्यावर मालकांनी लक्ष केंद्रीत केले. त्यावेळी सरकारने एक चांगला निर्णय घेतला की, गिरण्यांची तुम्हाला एक तृतीयांश जागा घेता येईल. त्यातून कामगारांची देणी दिली पाहिजे. असलेला नफा गिरणी मालकांनी घ्यावा. एक तृतीयांश जागा राज्य सरकारला मिळेल, एक तृतीयांश जागा म्हाडाला दिली पाहिजे. या योजनेचा खूप मोठा फायदा होऊन कामगारांचे 600 कोटी रुपये आतापर्यन्त कामगारांना मिळाले. राज्य सरकारला जागा मिळाल्या. म्हाडाला घरे बांधण्यासाठी जागा मिळाल्या. पण कायदा करताना कधी कधी त्रुटी सुध्दा रहातात. मुंबईमध्ये कापड गिरण्याच नव्हत्या तर मुंबईमध्ये दुसरे उद्योग सुध्दा होते. दुसरे कारखाने सुध्दा होते. गॅरेज पासून मोठया कारखान्यापर्यन्त अनेक कारखाने मुंबई शहरात होते. कायदा करीत असताना हे लोक सुटले. आज ज्याची कापड गिरणी होती. त्याने मात्र एक तृतीयांश जागा घेऊन दोन तृतीयांश जागा म्हाडा आणि शासनाला दिली पाहिजे. दुस-या प्रकारचे कारखाने असलेल्या त्या कारखान्याच्या मालकांकडे मोठया प्रमाणात जमिनी आहेत. तेथील कारखाने बंद करुन तेथे शॉपींग मॉल उभे रहावयास लागले आहेत, पंचतारांकित हॉटेल्स उभ्या राहू लागल्या आहेत. सरळ ---

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

उद्योगधंदे बंद करुन कामगारांना देशोधडीला लावण्याची भूमिका कारखानदाराकडून स्वीकारली जाते. मुंबई शहरात गिरणीच्या जमिनीच्या संदर्भात जो न्याय लावला गेला तोच न्याय अन्य उद्योगधंद्यांच्या बाबतीत सुध्दा लावला जाईल. त्या कारखान्यातील कामगारांना देखील न्याय दिला जाईल. त्या कारखान्याच्या जमिनींवर म्हाडासाठी आणि शासनासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल. आम्ही एका बाजूने जागा उपलब्ध करणार, झोपडया काढणार, अतिक्रमणे काढणार, त्याच वेळी प्लॅनमध्ये बदल करुन अनेक वेळेला नको त्याला जागा देण्याची भूमिका देखील स्वीकारल्या गेलेल्या आहेत. यापुढच्या काळात आम्ही कडक धोरण अंमलात आणू. प्लॅनमध्ये जागा ज्या कारणसाठी राखीव असेल, त्यात कोणत्याही प्रकारचे बदल करता उपयोगाचे नाही. या सर्व व्यवहारात पारदर्शीपणा राहील. याही गोष्टीकडे राज्य सरकारचे बारकाईने लक्ष राहील. प्रश्न तर अनेक आहेत. ते प्रश्न आपण सगळे एकत्र येऊन सोडविण्याचा प्रयत्न करु. सन्माननीय सदस्य श्री. नवलकर साहेबांनी डान्स बार विषयी चर्चेस सुरुवात केली. या सभागृहात जणू काही डान्स बार बद्दलच आज सदनामध्ये चर्चा आहे, तोच नियम 259 चा प्रस्ताव आहे असे थोडेसे सुरुवातीला त्यांचे भाषण ऐकावयास मिळाले. मी काही बाबतीत सुदैवी आहे. पण काही बाबतीत मी दुर्देवी देखील आहे. मी ग्रामीण विकास खात्याचा मंत्री असताना संत गाडगे बाबा अभियान सुरु झाले. पुन्हा या राज्याचा मी गृह मंत्री झालो. तर लोक माझ्याकडे बघताना मला बाबांच्याच भूमिकेतून बघत होते. गाडगे बाबा अभियानाशी माझा इतका संबंध जोडला गेलेला आहे की ,मी झाडू टाकून हातात दांडू घेतलेला आहे यावर लोक विश्वासच ठेवत नव्हते. माझ्या हातात झाडू आहे असे समजून लोक वावरत होते. सभापती महोदय, गृह विभागाच्या संदर्भात मला खूप कठोर निर्णय घ्यावे लागले. मागच्या वेळी बाबांशी संबंध होता आणि आता या भूमिकेत बारशी संबंध आहे. दुसरे मी काही करीत नाही. सभापती महोदय, मला महाराष्ट्रासाठी जे करावयाचे आहे त्यात बार बंद करणे ही फार लहान गोष्ट आहे. आज मोठया स्वरुपाचे गुन्हेगार आहेत, अनेक मोठे निर्ण्य अजून घ्यावयाचे आहेत, टप्प्या टप्प्याने तेथेपर्यन्त पोहोचावयाचे आहे. सगळयाच गोष्टी एकाच वेळी अंगावर घ्यावयाच्या म्हटल्या तर आपण माझी प्रकृती बघत आहात. आपल्याला ती धडधाकट वाटत असली तरी उंची खूप कमी आहे. अवाका देखील कमी आहे. त्यामुळे मला पेलेल तेवढाच बोजा टप्प्या टप्प्याने घेणे हे मला योग्य वाटते.

यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 21:25

श्री. आर.आर.पाटील ...

सभापती महोदय, ग्रामीण क्षेत्रामध्ये गेल्यानंतर डॉ. नीलम गो-हे सांगू शकतील विशेषत: पुणे परिसरातील खूप महिलांच्या तक्रारी आल्या. सभेत उभे राहून त्या बार बंद करा आणि आमचे प्रपंच वाचवा असे म्हणत होत्या. फक्त 70 बार बंद करण्याचा संबंध होता. मुंबईच्या बाहेर सरकारने परवानगी दिलेले फक्त 70 बार होते. मुंबईच्या अनेक गोष्टी रुजलेल्या आहेत येथे हात घालताना 10 वेळा विचार करावा लागतो.म्हणून सुरुवातीला मुंबईच्या बाहेर बार बंद केल्यानंतर अनेक लोकांनी अभिनंदन केले. मुंबईला का वगळले याचीही विचारणा केली. मंत्रिमंडळासमोर जाताना दोन्ही प्रस्ताव घेऊन गेलो. मुंबईच्या बाहेरचे बंद करा. मुंबईसाठी समिती नेमून तीन महिन्यात निर्णय होऊ द्या तोपर्यंत हाप्रश्न थंड ठेवावा. जो काही निर्णय व्हावयाचा असेल तो होऊ द्या.शेवटी मी एक राज्यकर्ता आहे. समाजातील सगळयाच अनैतिक गोष्टी घालविण्यासाठी मी काही भगवी वस्त्रे घातलेली नाहीत. त्यांच्यासाठी सुध्दा काही काम बाकी ठेवली पाहिजेत . मंत्रिमंडळ सुध्दा एवढे उत्साही होते त्यांनी दोन्ही प्रस्ताव मंजूर केले आणि मुंबईसह महाराष्ट्रातील बार बंद करुन टाका अशी ठोस भूमिका घेतली.कालपासून इंग्रजी माध्यमांचा बदललेला नूर मी बघतो आहे. कोणी तालिबानी निर्णय कोणी खोमेनी निर्णय असे म्हणू लागले.एका वर्तमानपत्रांने खेडयातून आलेला माणूस गृहमंत्री आहे त्याला मुंबई काय कळणार यापेक्षा अधिक वेगळा निर्णय काय घेणार ? अशा पध्दतीची टीका झाली. लोक चांगलेही बोलतात. पुढील बाजूच्या लोकांनी मात्र याबाबतीत खूप सहकार्य केले आहे. श्री. नवलकर साहेब आपण आयुष्यात ज्या ज्या गोष्टी आतापर्यंत बघितल्या त्या त्या सगळया बंद करण्याची माझ्याकडून अपेक्षा व्यक्त करीत आहेत. ही नवलाई माझ्या हातून कशी होऊ शकेल ?लोकांना शहाणे केले पाहिजे. लोकशिक्षण हा सुध्दा एक मार्ग आहे.शेवटी कायदे केले,नियम केले तरी पळवाटा खूप प्रमाणात शोधल्या जातात. माझी एक मात्र इच्छा आहे की,वर्तमानपत्रे नांवे ठेवणार नसतील तर तटस्थ भावनेने तुमच्या बरोबर फिरुन खरी मुंबई पाहण्याची माझी इच्छा आहे. प्रश्न काय आहेत हे बघितल्याशिवाय आपल्याला मार्गही काढता येणार नाहीत. त्यांनी मला पहिल्यांदा विचारले मी सांगाल तेथे येणार काय ? मी म्हटले मी येतो. आपण सांगा. म्हणाले पहाटे उठू शकाल काय मी म्हटले एखाद्या दिवशी उठायला माझी काही हरकत नाही. उद्या नाना-नानी पार्कमध्ये या आणि सगळया वयोवृध्द माणसांचे आशिर्वाद मला घ्यायला लावले. संध्याकाळी येणार का असे कधीच विचारले नाही. श्री.डावखरे

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 21:25

श्री. आर.आर.पाटील ....

साहेब निघाले होते. परंतु श्री.नवलकर साहेबांचे भाषण सुरु होते आणि ते फोन नंबर सांगत होते.ते उठून गेलेले पुन्हा फिरुन येऊन बसले. सदस्यांची भाषणे डायसवरुन सभापती पदाच्या खुर्चीतून इतक्या गांभीर्याने ऐकताना कधी मी त्यांना बघितले नव्हते. श्री. नवलकर साहेबांना मी सांगू इच्छितो की, या मुंबईचे सांस्कृतिक जीवन शुध्द आणि चांगले करण्यासाठी जे काही पोलीस दलाला करावे लागेल ते पोलीस दल करील आणि याबाबतीत आपला आणखी सल्ला घेतला जाईल ते आम्ही निश्चितपणाने करु. सगळे एकत्र आले तर अनेक चांगली कामे होऊ शकतात. राज्य सरकारची तीच प्रामाणिक भावना आहे. राजकीय अभिनिवेशाने पुढे न जाता प्रामाणिक भावनेने जे काही मुंबईसाठी करता येण्यासारखे आहे ते करण्याची राज्य सरकारची इच्छा आहे. याबाबतीत लोकशाही आघाडीचे सरकार ठामपणाने पुढे जाणार आहे. आपण सुध्दा सहकार्याची भूमिका स्वीकारण्याची गरज आहे. मुंबई ही राजकारणाच्या पलिकडची मानू या आणि तिच्यासाठी आवश्यक असणारे सगळे करण्यासाठी सिध्द होऊ या.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, आतापर्यन्त खूप कमी काम झालेले आहे. मी या ठिकाणी खात्रीने आणि आत्मविश्वासाने सांगतो की, आतापर्यन्त जे काम करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे त्याला दिल्ली सरकार कडून मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन मी हे सांगतो की, मुंबईतील पुढच्या पाच वर्षाचे चित्र आजच्या पेक्षा अधिक स्पष्ट व अधिक चांगले केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही.याची मी आपल्याला ग्वाही देतो एका चांगल्या प्रश्नावर राजकारण विरहीत चर्चा आपण सगळयांनी मिळून या ठिकाणी घडवून आणली याबद्दल मी आपणा सर्वांना धन्यवाद देतो.जयहिंद. जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, वेळ बराच झालेला आहे याची मला कल्पना आहे आणि या विषयावर उत्तर देण्यासारखे काहीही नाही हे सुध्दा मला माहीत आहे.आतापर्यन्त मला माननीय उपमुख्यमंत्री श्रीआर.आर.पाटील यांच्याबद्दल असे वाटत होते की, ते एक राज्यकर्ते आहेत परंतु ते एक चांगले चित्रकारही आहेत हे मला आता समजले आहे.मुबईचे चित्र त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे रंगवलेले आहे.ते चित्र प्रत्यक्षात येण्यासाठी आपल्याला जे काही सहकार्य लागणार आहे ते प्रत्येकाकडून मिळेल.मी आपल्याला एकच सांगतो की, आपल्या ज्या काही योजना आहेत त्या योजनांना फळे यावीत असे आपल्याला वाटत असेल तर मुंबईला कुंपण घालणे अत्यंत आवश्यक आहे .मुंबईची शक्ती आता संपलेली आहे. A last straw on the back of camel. उंटाच्या पाठीवर एक काडी जरी ठेवली तरी उंट खाली बसतो अशी स्थिती मुंबई शहराची झालेली आहे .याची जाणीव मुंबईत येणारे लोंढे थांबविण्यासाठी शासनाला आता युध्द पातळीवर काम करावे लागणार आहे.मघाशी बोलताना आपण असे सांगितले की ,मुंबईतील वस्ती हलविण्यात आली आहे. काही वस्ती वान्द्रा कुर्ला येथे हलवली आहे.परंतु जी वस्ती हलवली त्या ठिकाणी पुन्हा कोणती वस्ती आली आहे हे आपण पाहिले आहे काय ? फुले मार्केट जवळील मार्केट हलविले आणि ते नव्या मुंबईत नेले परंतु त्या ठिकाणी सगळया स्मगलर्सनी दुकाने सुरु केली आहेत. डंकन रोड येथील कांदा बटाटा विकणारा मराठी माणूस हलवला परंतु त्या ठिकाणी मुसलमान लोकांचे टाईल्स आणि मार्बल्सचें मार्केट सुरु झाले आहे.या सगळया गोष्टी फार जुन्या आणि मोठया आहेत. त्यावर काही उपाययोजना करावयाची असेल तर ती सर्वाच्या सहकार्यानेच करावी लागेल याबाबतीत तुमचे आणि आमचे एकमत आहे.त्या ठिकाणी पक्षीय अभिनिवेश नको तसेच.राजकारणही नको. मला आनंद झाला की, आपले गृहमंत्री मुंबईतील माणसांचीच नव्हे तर कुत्र्यांचीसुध्दा चितां करतात.मला त्याची कल्पना नव्हती की कुत्र्यांचीसुध्दा शिरगणती करण्यात आलेली आहे. मी सगळया गोष्टींचा अभ्यास केला आहे परंतु कुत्र्यांच्या संदर्भात अभ्यास केला नव्हत. त्यानी असे सांगितले की मुंबई शहरात अडीच लाख कुत्रे आहेत त्यापैकी चावणारे किती आहेत आणि भुंकणारे किती आहेत याचे वर्गीकरण त्यांनी केलेले नाही परंतु मी आपल्याला सागतो की प्रिन्स चार्ल्सच्या विवाहासाठी आपल्याकडील दोन डबेवाले लंडन येथे गेले होते त्यावेळी त्यांनी

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर ...

दोन कुत्रे बरोबर नेले होते परंतु लंडनच्या गर्दीत ते हरवले होते .त्यांना शोधण्यासाठी बरीच धावा धाव करण्यात आली होती परंतु मुंबईच्या डबेवाल्यांनी एवढया गर्दीतूनही हया दोघांना बरोबर शोधून काढले होते.याचे कारण असे की, कुत्रा चालत असतांना शेपटी आडवी हलवत असतो परंतु मुंबईमध्ये ती शेपटी हलविण्यासाठीसुध्दा त्याला जागा नसल्यामुळे तो उभी हलवत असतो..मुंबइर्मध्ये एवढी गर्दी झालेली असतांना ही गर्दी कमी कशी करता येईल हे अगोदर ठरवा आणि त्यानंतर पाण्याच्या रस्त्याच्या सगळया योजना कराव्यात. अपघातामध्ये जेवढी माणसे मरतात तेवढी युध्दात सुध्दा मरत नाहीत .तेव्हा मुंबईला गर्दीपासून प्रथम आपण वाचवा.शेवटी जाता जाता एका वाक्यात मी आपल्याला सांगतो की, मुंबई शहरातील मराठी माणसांच्या संख्येला ओहोटी लागणार नाही याची आपण काळजी घ्यावी.त्याबद्दल आम्ही आपले जन्माचे ऋणी राहू. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. यानंतर शासकीय विधेयके घेण्यात येतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही विधेयके उद्या घेण्यात यावीत.

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, माझी आपल्या मार्फत सदनाला अशी विनंती आहे की, शासकीय विधेयका पैकी काही विधेयके उद्या खालच्या सभागृहात दाखवावयाची आहेत.त्यामुळे ती विधेयके आज घेण्यात यावीत. कामकाज सल्लागार समितीमध्येसुध्दा तसे ठरविण्यात आलेले होते. त्यामुळे यातून आपण काही तरी मार्ग काढावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : मी यातून मध्यम मार्ग सुचविण्याचा प्रयत्न करतो. शासकीय विधेयके,अशासकीय कामकाज व अर्धा तास चर्चा एवढे कामकाज अजून शिल्लक आहे. शासकीय विधेयके आणि अर्धा तास चर्चा आता आपण घेऊ या आणि अशासकीय कामकाजा करिता अडीच तास लागणार आहेत. तेव्हा अडीच तासाची चर्चा आपण उद्या सकाळी 9.30 वाजता घेऊ या.

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर : सभापती महोदय, अडीच तासांची चर्चा झालेली आहे. ...

**सभापती** : अंतिम आठवडा प्रस्तावावरील अडीच तासांची चर्चा हा वेगळा भाग आहे. या शिवाय आजच्या कामकाजामध्ये अशासकीय कामकाज अडीच तासांचे आहे. आणि पुन्हा शासकीय कामकाज म्हणून विधेयके आहेत आणि शेवटी अर्धा तास चर्चा देखील आहे. तेव्हा या ठिकाणी मी असे सुचवितो की, आजचे जे शासकीय कामकाज आहे ते म्हणजे विधेयके संमत करणे, हे काम आपण आजच पूर्ण करू आणि दोन अर्धा तास चर्चा देखील घेऊ आणि उद्या सकाळी 9.30 ते 12.00 वाजेपर्यंतच्या काळामध्ये आजचे अडीच तासांचे अशासकीय कामकाज आहे ते पूर्ण करू. ..

काही सन्माननीय सदस्य : 10.00 ते 12.30 पर्यंत अशासकीय कामकाज घ्यावे. ..

**सभापती** : सकाळी 10.00 ते 12.30 वाजेपर्यंत अशासकीय कामकाजासाठी विशेष सत्र घ्यावयाचे असेल तर मग सदनाचे नियमित कामकाज आपल्याला 1.00 वाजता सुरू करावे लागेल.

काही सन्माननीय सदस्य : हरकत नाही.

**सभापती** : तर मग माननीय संसदीय कार्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेता आणि सदनाचे अन्य सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आता मी असा निर्णय घेतो की, आजचे शासकीय कामकाज पूर्ण करून शेवटी अर्धा तास चर्चा देखील आजच पूर्ण करावयाची आणि आजचे अशासकीय कामकाज उद्या सकाळी 10.00 ते 12.30 वाजेपर्यंत विशेष सत्र घेऊन पूर्ण करावयाचे आणि त्यानंतर मग सभागृहाची नियमित बेठक 1.00 वाजता सुरू करावयाची.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदय, एक गोष्ट मी आपल्या नम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या अधिवेशनामध्ये दररोज 9 तास सदनाचे कामकाज आपण चालवितो आहोत. आपण अधिवेशनाचा कालावधी, कामकाजाचे दिवस कमी करतो आहोत आणि रोज अशा प्रकारे अधिक तास बसावयाचे हे बरोबर नाही. आज सकाळी देखील 11.00 वाजता सभागृहाची बैठक सुरू झालेली आहे आणि आता रात्रीचे 9.30 वाजून गेले आहेत तरीही बैठक सुरू आहे आणि यापुढे आपल्याला शासकीय कामकाज पूर्ण करावयाचे आहे असे आपण सांगत आहात म्हणजे किती तास आपण काम करावयाचे आहे हे आपणच लक्षात घ्यावे. ..

**सभापती** : आपले म्हणणे बरोबर आहे. ..

श्री. मधुकर सरपोतदार : तर मग आपण अधिवेशनाचा कालावधी का कमी करता ?

..... 5टी 2 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** आपण जो मुद्दा उपस्थित केला आहे तो योग्य असाच आहे, पण आता त्याबाबत आपणास काही करता येणार नाही, मात्र भविष्यात आपण त्या दृष्टीने जरूर विचार करू. आजचे जे अशासकीय कामकाज आहे तेही महत्त्वाचे असल्याने तेही आपल्याला घ्यावे लागेल ..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण आज सकाळी 11.00 वाजल्यापासून कामकाज करीत आहोत. आजच्या एका दिवसामध्ये आपण नियम 93 खालील 19 निवेदने घेतली आहेत शिवाय 11 लक्षवेधी सुचनांवर चर्चा केली आहे, अंतिम आठवडा प्रस्तावावर देखील सुमारे 3 तासाचेवर चर्चा केली आहे., आणि आता रात्रीचे 9.30 वाजून गेलेले आहेत. तेव्हा मला वाटते आता अधिक वेळ न बसता उद्या सकाळी 10.00 वाजता हे राहिलेले कामकाज घ्यावे.

**सभापती :** मला वाटते आता आपण जेवढे शासकीय कामकाज होईल तेवढे पूर्ण करू आणि उद्या सकाळी 10 वाजता 12.30 पर्यंत अशासकीय कामकाज करू.

श्री. हर्षवर्धन पाटील : माननीय सभापती महोदय, आजचे जे आपल्यापुढे शासकीय कामकाज आहे त्यामध्ये महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक, 2005 हे एक अतिशय महत्त्वाचे विधेयक संमतीसाठी आहे. हे विधेयक विधानसभेने संमत केलेले आहे. या संबंधी माननीय अर्थमंत्र्यांच्या माध्यमातून विधानसभेमध्येसुद्धा येथील विधेयके मंजूर झाल्यानंतर पुन्हा त्या सभागृहात सादर करावी लागणार आहेत. दुसरे म्हणजे या सदनाचे विधेयक क्रमांक 14 - जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक,2005 हेही एक छोटे विधेयक आहे, कॉम्प्युटरच्या उपयोगासंबंधीचे हे विधेयक आहे तेही आपल्याला आज संमत करून विधानसभेकडे संमतीसाठी पाठवावयाचे आहे. सभापती महोदय, विधीमंडळ हे कायदा करणारे मंडळ आहे. येथे इतर चर्चाही झाल्या पाहिजेत पण कायद्याची विधेयके करणे हे आपले मुख्य काम आहे आणि नेमका विधेयकांच्या बाबतीतच आपल्याला उशीर होतो आहे. तेव्हा ही विधेयके तेवढी आपण आज पूर्ण करून घ्यावीत. या शिवाय विद्यापीठाचे देखील एक विधेयक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी अगदी बरोबर निदर्शनास आणलेले आहे. त्याबाबतच मला काही बोलावयाचे आहे. मी देखील असेच म्हणतो की, आपण येथे इतर चर्चा खूप करतो. परंतु या सदनाचे मुख्य कामकाज हे कायदा करण्याचे, विधेयके करण्याचे आहे असे आमचेही म्हणणे आहे. ....

( यानंतर श्री.जागडे ...5यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, कायदा करीत असताना त्या बाबत सविस्तर चर्चा झाली पाहिजे. कारण महाराष्ट्रातील जनतेचा संबंध येत असतो. चांगल्या कायद्याला आम्ही विरोध करीत नाही. आता कामकाज सल्लागार समितीमध्ये आमच्या नेत्यांनी मान्यता दिली असल्यामुळे आम्हाला या ठिकाण हो म्हणावे लागते. परंतु विधेयकावर आम्हाला आमची सविस्तर मते मांडू देणे महत्वाचे आहे.

श्री. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, राजकोषीय विधेयक आमच्याकडे आजच आले आहे. त्यामुळे आम्ही या विधेयकाला आता सुधारणा देऊ शकत नाही. जे विधेयक चांगले आहे, त्याबद्दल आम्हाला आमची मते मांडावयाची आहेत. तेव्हा उद्या सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यन्त विधेयकावर चर्चा करु.

**सभापती** : ठीक आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविलेले अशासकीय कामकाज पुढील अधिवेशनात घेऊ. तसेच अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहेत.

सभागृहापुढील दिवसाचे कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 16.4.2005 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 9 वाजून 43 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 16.4.2005 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली. )

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही